म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १९८४



# ७०
# सत्तरींतील काका



REFBK-0014382

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन

चित्रशाळा
प्रकाशन

# सत्तरींतील काका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 43866 दि: निर्बंध
नों. दि 5/3/69

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 98362

लेखक

न. वि. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

किंमत ५ रुपये

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :
**दामोदर त्र्यंबक जोशी,**
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
५६२ सदाशिव पेठ, पुणें २

प्रथमावृत्ति
१९६५

# अनुक्रमणिका


१. असे होते आसाराम पाटील - - - - १
२. भीमेच्या घाटावर - - - - - ६
३. निवृत्ति व कांहीं विचार - - - - १६
४. नेहरूंचें थोर व्यक्तिमत्त्व - - - - २२
५. गोरोबा कुंभाराची थापटी - - - . २८
६. नेहरू-मंत्रिमंडळांतील कांहीं खळबळीचे प्रसंग - ३५
७. सुंदोपसुंदी - - - - - - ४४
८. काश्मीर काल, आज, उद्यां - - - ५१
९. काँग्रेसमधील नवागत - - - - ६८
१०. अश्लील वाङ्मय - - - - ७६
११. नव्या सरकारसमोरील समस्या - - - ८२
१२. 'सारसंग्रही' शंकरराव जोशी - - - ८९
१३. कहाँ जायें रे गंगा - - - - ९४
१४. गद्दीपै आतेही सब बदमाश होते हैं। - - १००
१५. आजीचं घर उन्हांत बांधा - - - १०७
१६. श्रद्धांजलि - - - - - ११२
१७. भुवनेश्वरींतील समाजवाद - - - - ११७
१८. राजस्थानी साहित्यांतील कांहीं रस-विशेष - - १२१
१९. देवाचिया द्वारीं - - - - - १२९
२०. स जयति सिंदुरवदनो देवो - - - १३४
२१. राज्य नको, मोक्ष नको, क्षणक्षण काम हवें! - १४२
२२. जय सोमनाथचें स्वप्न - - - - १४८



REFBK-0014382

# लेखकाचे चार शब्द

जुने कार्यकर्ते, कांहींच्या मतें "असंतुष्ट आत्मे" मधून मधून चित्रशाळेंत जमत असतात. हे कार्यकर्ते व्यक्तिगत 'असंतुष्ट' नाहींत. ज्यांनीं सर्वस्व होमिलें आहे असेच बहु-संख्य आहेत. त्यांची असंतुष्टता देशविषयक आहे. आणि अशांपैकीं मधूनमधून चर्चेला हजर असणारा मी एक आहे. आणि त्या चर्चेचा परिणाम म्हणून गेल्या दोन वर्षांत मधून मधून लिहीत असतों; त्या लेखांचें हें संकलन आज प्रसिद्ध होत आहे. नांवाची कल्पना श्री. देवगिरीकर यांची आहे. लेखांची निवड संपादक श्री. कानिटकर यांची आहे. मुद्रितें तपासण्याच्या कामीं श्री. अनंतराव लिमये व श्री. महादेव शास्त्री जोशी यांची मदत झाली आहे. अनेकांनीं हे लेख वाचून आनंद प्रकट केला आहे व त्यांचें संकलन करावें असेंहि सुचविलें होतें.

या सर्वांचा परिणाम म्हणजे आज वयाला ७० वर्षें पुरीं झालीं आहेत. त्या दिवशीं हें लिखाण प्रसिद्ध होत आहे. उदा-सीनता असेल, खिन्नता वाटत असेल त्या वेळीं यांतील कोठलाहि लेख वाचावा म्हणजे ती जाईल असें माझें मत आहे. क्षणभर 'जिंतानच्या' गोळ्या घेतल्यामुळें मन प्रसन्न होतें, तसेंच थोडेसें या संकलनाच्या वाचनानें होईल अशी आशा आहे. रसिक व विवेकी मराठी वाचक या संकलनाचें स्वागतच करतील.

पुणें
दि. १० जानेवारी, १९६६.

न. वि. गाडगीळ

# प्रास्ताविक

' सत्तरींतील काका ' ह्या श्री. न. वि. गाडगीळांच्या लेखसंग्रहाला मीं प्रस्तावना लिहावी अशी इच्छा काकांनीं दर्शविली व मीं ती मान्य केली. श्री. काकासाहेबांच्या या लेखाची निर्मिति ते सत्तरीच्या घरांत डोकावूं लागले त्या काळांतली आहे. वाढतें वय हें विचारांना परिपक्वता आणीत असलें तरी ते विचार पूर्वकालांतील बैठकीला विसदृश नसतात. मुरंबा हा जितका मुरतो तितका तो लज्जतदार होत असतो; पण कैऱ्यांचा तो मुरंबा आहे हें कसें वेसरतां येईल ? श्री. काकासाहेबांचा सारा जन्म राजकारणांत गेलेला. ते स्वयंसेवकापासून तों राज्यपालापर्यंत परिणत होत गेले. पण काका हे राज्यपाल होवोत किंवा कुलगुरु असोत, त्यांच्या जीवनाला आंच जी लागली ती दीनहीन दरिद्री, अशा वर्गाच्या, करुणास्पद स्थितीनें. पारतंत्र्याविरुद्ध त्यांनीं जी राजकारणांत झेप घेतली, ती याच प्रेरणेनें. वयाच्या सत्तरीचा उंबरठा ओलांडतांना ते देशाच्या उद्दिष्टांचा व पदरांत पडलेल्या फळांचा आढावा घेऊं लागले व त्यांत त्यांच्याचप्रमाणें अनेकांना निराशा, असमाधान व दुःख वाटूं लागलें. काका व्यक्तिनिष्ठ असते, तर त्यांनीं आपली लेखणी व आपली जिव्हा इतक्या संयमित प्रखरतेनें चालविली नसती. त्यांचें वैयक्तिक जीवन हें एका दृष्टीनें कृतार्थ झालें आहे. पुण्याच्या शनिवार पेठेंत राहणारा, फार गरीब व फार श्रीमंत नसणारा, एल्एल्. बी 'झालेला साधा वकील राज्यपाल होऊं शकला, ही जशी त्यांची थोरवी, तशी राष्ट्रांच्या कृतज्ञतेच्या भावनाची द्योतक आहे. पण काकांचें जीवन हें एवढ्याकरितां नव्हतें. तें समर्पित जीवन आहे. म्हणून ते अस्वस्थ होतात, तळमळतात व त्वेषानें बोलतात. पण हा भावनांचा उद्रेक प्रातिनिधिक आहे. इतर सहकारी मनांतल्या मनांत खिन्न होऊन जागच्या जागीं तडफडतात. तसा स्वभाव काकांचा नाहीं.

ते खरे लढवय्ये आहेत. परिस्थितीप्रमाणें रणांगण बदलतें; पण लढवय्या बदलत नाहीं. म्हणून काकांनीं केलेली टीका ही कितीहि तिखट वाटली, तरी ती टीका एका संकटाच्या निखाऱ्यावरून चाललेल्या सच्च्या सेवकाची टीका आहे. त्या टीकेंत सत्य आहे, कळकळ आहे, प्रेम आहे व सुधारणा करण्याचें आवाहन आहे. भर्तृहरीनें म्हटलें आहे, ' अत्यंत कुपित झालेला विधाता हंसाचें कमलवनांतील निवासस्थान नष्ट करील; पण त्या हंसामध्यें पाणी व दूध यांचें पृथक्करण करण्याची जी शक्ति आहे ती तो कशी नष्ट करूं शकेल ? ' आजच्या संमिश्रवृत्तीच्या राजकारणांत पाण्यालाहि दूध म्हणावें लागतें व अशांनाच कमलवनांत निवासस्थान मिळूं शकतें. याचा अर्थ सत्य व असत्य यांमधील भेद करण्याची आपली कीर्ति गमवावी अशी आधुनिक भारतभाग्य-विधात्याची इच्छा आहे. पण हें निःस्पृह व सत्यनिष्ठांना जमत नाहीं. त्यांत तरुण व वृद्ध रक्ताचा संबंधच कुठें येतो ? घराला लागलेली आग ही तरुणांना भासते व वृद्धांना जाणवत नाहीं असें थोडेंच आहे ? जीवनाचे कांहीं धर्म असतात. ते धर्म प्रामाणिक माणसांचे सुटत नाहींत. ज्या दिवशीं ते धर्म सुटतात, त्या दिवशीं ती व्यक्ति अधर्मी व मृतवत् बनते, म्हणून जीवनधर्म हे जीवनव्यापी असतात. ते सुटले कीं, जीवनाला मृतावस्था येते. काकांचे हे जीवनधर्म ताजेतवाने, तेजस्वी व ज्वलंत आहेत, म्हणून त्यांनीं सत्तरी ओलांडली असली, तरी ते ताज्या रक्ताचे तरुण आहेत.

प्रस्तुतच्या लेखसंग्रहांत त्यांनीं कांहीं राजकीय, कांहीं धार्मिक, कौटुंबिक, ऐतिहासिक, साहित्यिक असे २२ लेख संग्रहित केले आहेत. त्याचा ' काश्मीर, काल, आज व उद्यां ' हा लेख काश्मीरचा इतिहास या दृष्टीनें फार महत्त्वाचा व उत्कृष्ट आहे. राजकारण हें सर्व लेखांत कुठें डोकावतें, कुठें वाक्याच्या रूपानें चमकतें, तर कुठें विस्तारानें चर्चिलें जातें. त्या लेखांत जोम, ठसठशीतपणा व स्वतःच्या विचारावर दृढश्रद्धा असलेली दिसते. क्वचित् ते अतिशयोक्तीनें लिहितात. पण वाचणारा त्यांचा स्थायी भाव काय आहे हें समजणारा असल्या-मुळें त्यानें विचलित होत नाहीं. मला त्यांची ' आजीचें घर उन्हांत ' ही नातीवर लिहिलेली लघुकथा फार आवडली. त्यांत साहित्यांतील सर्व गुण उतरले आहेत. गोष्टीला कथानक आहे, हलुवारपणा आहे. बालकाच्या मनाचें यथार्थ चित्रण आहे. भावना आहे. भाषा व मांडणी सुंदर आहे. साहित्यांत त्या गोष्टीला कायमचें स्थान मिळावें इतकी ती सुंदर आहे.

'देवाचिया द्वारीं' या लेखांत थापेबाजांच्या थापांचे काय परिणाम होतात हें नानाफडणिसांच्या वेळच्या एका गोष्टीवरून कथन केलें आहे. लेखकासह सर्वांनीं थापांतील धोके, धक्के व परिणाम लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. 'राजस्थानी साहित्यांतील रस-विशेष' हे काकांच्या साहित्यपरिचयाचें दर्शन घडवितें. 'गद्दीपे आतेहि सब गद्धे होते हैं।' हा एका न्हाव्याच्या तोंडचा अनुभव आहे व तो एका अशिक्षित सामान्य माणसाचा उद्रेक आहे. नाहींतरी काका 'गद्दीपे' होतेच. त्यांना कसें हें वाक्य लागू होणार? त्यांचा सिद्धटेक गणपतीचा प्रवास, सोमनाथची कामगिरी त्यांच्या धार्मिक वृत्तीवर व देवावरील श्रद्धेवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

काका हे साहित्य-परिषदेचे अध्यक्ष होते, त्यामुळें त्यांच्या लेखांतील साहित्यगुणांचें मूल्यमापन करण्याची आवश्यकता नाहीं. शुद्ध, सुबोध, क्वचित् प्रासादिक, कोठें कोठें अलंकारांनीं सजलेली अशी ती भाषा आहे. त्यांचीं मधून मधून विखुरलेलीं वाक्यें जरी खटकलीं, तरी तीं समर्पक आहेत. उदाहरणें पुष्कळच देतां येतील. 'अनुयायी जसे मंत्र्याभोंवतीं गोळा होतात, तशीं त्यांचीं (शेतकऱ्यांचीं) मेंढरें त्यांच्याकडे येऊं लागलीं.' 'अनुयायांमागें जातो तो पुढारी.' आतां ग्रामपंचायतींत 'ग्रामापेक्षां पंचायती करण्याकडेच तिचें अधिक लक्ष असतें.' 'मी मार्गदर्शनांतील दुसरा भाग म्हणजे दर्शन दिलें व भाग्यांचा मार्ग त्यांच्या रसाळ वाक्गंगेला मोकळ करून दिला.'

काकांचा हा लेखसंग्रह वैशिष्ट्यपूर्ण आहे. वाचकांना रिझवणारा, खुलवणारा व त्यांच्या मनांतील विचारांना वाचा फोडणारा आहे. सत्तरींतील काकांचे हे लेख बुरसटलेले, खुरटलेले व निराशावादी नाहींत. या पुस्तकाचें जनतेकडून सहर्ष स्वागत होईल अशी माझी खात्री आहे.

पुणें
ता. २३।१२।६५

त्र्यं. र. देवगिरीकर

: सतरींतील काका :

: १ :

# असे होते आसाराम पाटील

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थल प्रत)

तसें म्हटलें तर, रोज ५-२५ पत्रें येतात, त्यांना उत्तरें पण दिलीं जातात. त्या पत्रांतून विविध व्यक्ति आपापले विचार व्यक्त करीत असतात. कोणी अन्न-धान्याबद्दल काँग्रेसचा प्रतिनिधि म्हणून मला टीकेचा विषय करतात, तर कुणी मी खरा जनतेचा आवाज काढत आहे असें मानून अभिनंदन करतात. राज-रस्त्यावरून जातांना ज्याप्रमाणें नाना तऱ्हेचे लोक भेटतात, त्याप्रमाणें पत्रव्यव-हाराच्या चौकांत नाना तऱ्हेचे विचार, खरेदी-विक्रीसाठीं अगर स्वीकृति देण्या-साठीं आढळून येतात. ‘ संवाद चतुष्पथीचा गणेश ’ असें वर्णन पराकोटीला पोहोंचलेल्या ज्ञात्याचें ज्ञानेश्वरींत केलें आहे. पराकोटीला न पोचतां, ज्ञानाची प्राप्ति बेताचीच असतांना, वादविवादाच्या गल्लीचा मी ‘ गणेश ’ झालों आहें.

डोकें पिकविणाऱ्या अनेक पत्रांतून असेंच एखादें पत्र येतें कीं, जें सामान्य वातावरणांतून मनाला पलीकडे नेतें. नित्याचा उंबरा ओलांडून श्रेष्ठ वृत्तींच्या गाभाऱ्यांत प्रवेश करवितें. आज सकाळीं जें पत्र आलें, त्यांतील मजकूर अवघा ४ ओळींचाच होता. आणि वरच्या गांवच्या मुक्कामाची १ ओळ व सहीची १ ओळ धरल्यास तें पत्र ६ ओळींचें होतें. पण त्यानें ६० वर्षांचा इतिहास डोळ्यांपुढें उभा केला.

२५ सप्टेंबर रोजीं आसाराम पाटील हे मृत्यु पावले, असें औपचारिक-रीत्या अशुभ व वस्तुतः शुभ असें वर्तमान देणारें तें पत्र होतें! पत्र वाचतांच माझें मन भीमेच्या पवित्र तीरावरील माझ्या आजोळच्या गांवीं म्हणजे सिद्ध-टेकीं एकदम प्रवेश करतें झालें.

## ते पिढीजात पाटील

तें सिद्धिविनायकाचें देऊळ, तो मोठा प्राकार, पायऱ्यांची उतरंड, ती प्रचंड वेस डोळ्यांपुढें उभी राहिली. आणि त्या वेशीबाहेर दोन्ही बाजूंना असणाऱ्या शेतांतून, काळ्या वावरांतून जाणारा गाडीमार्ग आणि सुमारें मैलभर त्याच मार्गाच्या बाजूला असलेली आसाराम पाटलांची वस्ती डोळ्यांपुढें आली. सिद्धटेकचे ते पिढीजाद पाटील. पाटील शब्दांतील पाहिला 'प' म्हणजे प्रतिष्ठा, ही त्यांच्यांत होती. अखेरच्या 'ल' तील लहानपण तर त्यांच्यामध्यें स्वाभा-विकपणें दिसून येत असे. पाटील संस्थेंत जें जें श्रेष्ठ, प्रतिष्ठापूर्ण तें तें सर्व त्यांच्या देहांत साकार झालें होतें.

## आसाराम मामा

आतांच्या पाटलांप्रमाणें टीचभर टोपी घालून त्यांनीं भारदस्त डोक्याची अप्रतिष्ठा केली नव्हती. अंगावरचें उपरणें कधीं त्यांनीं टाकलें नव्हतें, कारण ते उपरणें परंपरेचें लक्षण मानत. नेहरू शर्ट घातला म्हणजे नेहरूंचें सारें राजकारण कळतें, असा भ्रम त्यांना कधीं झाला नाहीं. उलट नेहरूंनीं कांहीं प्रसंगीं कार्य-सिद्धीसाठीं केलेला कृत्रिम, किंचित् पोरसवदा आचार जो आज सरसहा कॉंग्रेस-जनांत दिसून येतो, तोहि त्यांना मान्य नव्हता! किंबहुना पाटीलपदावर राहा-वयाचें म्हणजे परंपरा संभाळून, जबाबदारी ओळखून असेंच त्यांचें मत होतें.

शरीर उंच, भक्कम बांध्याचे, रुंद भालप्रदेशाचे, डोक्यावर प्रशस्त रुमाल, अंगांत कोट, त्यावर उपरणें, पायांमध्यें नगरी जोडा व हातांत कळकाची काठी, खिशांतून डोकावणारी त्यांची चंची असें सारें चित्र त्या पत्रांतील मजकूर वाच-तांना डोळ्यांपुढें उभें राहिलें.

तीन महिन्यांपूर्वी सिद्धटेकला गेलों असतांना त्यांच्या वस्तीवरून गेलों ते आजारी असल्याचें कळलें म्हणून. पण ते मला भेटले नाहींत, कारण ते पर-गांवीं गेले होते! जुन्या संस्कृतींत आईच्या गांवचे पुरुष म्हणजे मामा व सासुरवाशणी म्हणजे माम्या अगर आजी. आणि माहेरवाशणी म्हणजे मावश्या

असें असे! त्या संस्कृतींत वाढलों असल्यानें आसाराम पाटलांना मी मामाच मानीत असें.

## आईची उणीव भरून काढली

आसाराम पाटील हे जवळजवळ ९६ वर्षांचे झाले होते. आणि आज जर माझी आई असती, अर्थात् असती तर, माझा उत्साह व पराक्रम जो किंचित् आहे तो कोटीचा झाला असता. तथापि तिचा अभाव ज्या अनेक मंडळींनीं भरून काढला त्यांत आसाराम पाटील हे एक होते. १९३४ व १९४५ च्या निवडणुकींत त्यांनीं त्या साऱ्या भागांत प्रचंड खटपट करून मला आशीर्वाद दिले होते. आणि मंत्री म्हणून किंवा त्यानंतर राज्यपाल म्हणून सिद्धटेकला गेलों असतांना सिद्धटेकांतील ज्या लोकांना आनंद झाला त्या सर्वांत ते प्रमुख होते. आणि 'रंगूताईचें लेकरूं' अशाच गोड एकवचनी शब्दानें ते माझा उल्लेख करीत.

आतां माझ्या नात्यांत अगर मानलेल्या नात्यांत तसा उल्लेख करणारी आणि उल्लेखानें मनांत मंगल भावना उत्पन्न करणारी व्यक्ति राहिलेली नाहीं. पांचवें वर्ष संपतांच मी मातृहीन झालों. माळव्यांतून आणून आम्हांला सिद्धटेकी वडिलांनीं ठेवलें. त्या वेळेपासून थोरले थोडे रागीट आणि तामसी मामा ह्यांचा अनुभव जसा चांगला आणि वाईट होता, त्या तुलनेनें ह्या आसाराम मामांचा अनुभव चांगलाच होता. ते रागावलेले कधीं दिसलेच नाहींत. शांत वृत्तीचे म्हणून त्यांचा लौकिक साऱ्या हयातभर होता. प्रत्यक्ष वस्ती गणपतीच्या देवळापासून जवळ जवळ मैलभर होती. प्रातःकाळीं उठल्याबरोबर तेथून दिसणाऱ्या देवळाच्या शिखराचें सुप्रभातीं दर्शन घेऊन मन मंगल करण्याचें कार्य त्यांचें अखंड चालत असे. सामान्यपणें कामानिमित्त अगर अन्यथा सिद्धटेकला त्यांची खेप दररोज ठरलेलीच असे.

## एकमेव पत्र–केसरी

१९०२ पासून १९१६ अखेरपर्यंत १४ वर्षांच्या त्या काळांत अनेक वेळां पुण्यांतील प्लेगनें आम्हांला सिद्धटेकास महिना दोन महिने राहणें भाग पडलें, आणि त्या मुक्कामांत दररोज त्यांची भेट होई. कारण ते आमच्या मामांच्या घरीं, बुवासाहेब यांच्याकडे येत असत. विद्यार्थिदशेंत असतांना जेव्हां सिद्धटेकला मुक्काम असे, त्या वेळीं नानाविध प्रश्न मी त्यांना विचारी. गांवकी-

संबंधीं, पीकपाण्यासंबंधीं, आसपासच्या बाजारासंबंधीं, शेतीच्या माझ्या अल्प ज्ञानांत त्यांच्या मार्गदर्शनानें मी भर घालीत होतों. केसरीशिवाय क्वचितच वर्तमानपत्रें त्या वेळीं खेडेगांवापर्यंत पोहोंचत. आणि तें आठवड्याचें वर्तमानपत्र, बेटावर एकाकी टाकला गेलेला मनुष्य ज्याप्रमाणें जवळ असलेलें अन्न पुरवून खातों, तसें खेडेगांवांतील वाचक एका मंगळवारचा अंक दुसऱ्या मंगळवारपर्यंत "नखशिखान्त" वाचून काढीत. म्हणजे मुखपृष्ठावरील सिंहापासून नारायण पेठेंत छापून प्रसिद्ध केलें येथपर्यंत. जुम्मेके जुम्मे नाहणाऱ्या पाक मुसलमानाप्रमाणें, मंगल ते मंगल ही मराठी जनता ज्ञानाचें मार्जन करीत असे.

अर्थात् आतां सर्व कांहीं बदललें आहे. आतां जिल्हास्तरावरहि वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. बातमी अगदीं गरमागरम मिळावी अशी इच्छा ग्रामीण भागांतहि प्रभावी झाली आहे. आतां एक वेळ गांवच्या चावडीला पाटी नसेल पण ब्रुकबाँडची पाटी गांवगन्ना झाली आहे व चहाच्या कपाबरोबर मुक्याला सुद्धां कंठ फुटतो आणि आमचा ग्यानबा रशियाचें सूक्ष्म राजकारणहि काढूं लागतो! दहाच दिवस तो जर मुंबईला जाऊन परत आला असला तर "ऐसे गहिरे" अर्थशास्त्र सांगतो कीं त्याचें तें ज्ञान पाहून गांवांतील वृद्ध रावजीकाका व खंडू पाटील ह्यांनाहि आश्चर्य वाटतें. पण त्या वेळीं तसें कांहीं नव्हतें.

## ज्ञानेश्वरीचें भक्तिज्ञान

आसाराम पाटील नेमानें केसरी वाचीत होते आणि अन्य कांहीं ते वाचत असत असें कधीं आढळून आलें नाहीं. पण नित्य नेमानें ते ज्ञानेश्वरी मात्र वाचत. प्रसंगीं फडामध्यें ती सांगतहि असत आणि १९१६ सालच्या मुक्कामांत अशाच एका प्रसंगानें त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या 'भक्तियुक्त ज्ञानाचें' मला दर्शन घडलें. 'ज्ञानयुक्तभक्ति' हा गीतेचा सिद्धान्त, पण ज्ञानेश्वरींत भक्तियुक्त ज्ञान सांगितलें आहे, अशा स्वरूपांत त्यांनीं सांगितलें. त्यांची भाषा मित, मधुर, मोजकी व मोह पाडणारी अशी असे.श्रोत्यांच्या मनाला ती सहज जिंकी. त्या वेळीं मला ज्ञानेश्वरीबाबत जें कांहीं सांगितलें, त्यामुळें माझ्या मनांत कुतूहल उत्पन्न झालें आणि त्याहि वेळीं जें त्यांनीं सांगितलें, त्यांतील "वाक्प्रचारानें" मी मोहित झालों! परतत्त्व लक्षांतच आलें नाहीं, आवाजानें मन मुग्ध झालें, आशय दुर्लक्षित राहिला. पण मनाच्या भूमींत त्या वेळीं जें बीज प्रक्षेपित झालें त्याला अंकुर पुढें १४

वर्षांनीं येरवड्याच्या कारावासांत शंकरराव देवांनीं जेव्हां ज्ञानेश्वरीची एक प्रत मला दिली, त्या वेळीं फुटला.

## संतपरिचय

संतवाङ्मयाचा परिचय तसा पूर्वी होताच, पण तो परिचय करून देणाऱ्यांपैकीं आसाराम पाटील हे प्रमुख होते. पार्लमेंटमध्यें नवीन निवडून आलेल्या सभासदाला जुना सभासद हातानें धरून सभापतीपर्यंत नेतो, तसेंच साधकाच्या सभेंत प्रवेश केल्यानंतर आसाराम पाटील ह्यांनीं मला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरापर्यंत नेऊन जणूं परिचय करून दिला.

आधुनिक विद्वत्तेच्या मापानें ते खास विद्वान् नव्हते. घटपटादि खटपट त्यांच्या वाणीनें कधींच केली नाहीं. त्यांची वाणी पिकलेल्या आंब्याप्रमाणें मधुर, आमूलाग्र मधुर, मधुमधुर अशी होती. त्यांचें ज्ञान व भक्ति दोन्ही त्यांच्या आचरणांत अभिव्यक्त होत असे.

ज्ञानेश्वरींत म्हटल्याप्रमाणें " बीं जमिनींत टाकलें म्हणजे कांहीं दिवस तें नाहींसें झालेंसें वाटतें, पणं नंतर त्याचें अस्तित्व लवलवणाऱ्या अंकुरानें व्यक्त होतें, तसेंच ज्ञानी पुरुषाचें आहे. त्याचें ज्ञान जीवनांत कामीं लागतें कीं नाहीं हें त्याच्या वागणुकीवरून दिसतें. " तीच गोष्ट आसाराम पाटील यांच्या जीवनांत दिसून येत असे. पाटील असून अभिमान अगर ताठा नाहीं, गांवांत राहून गांवगुंडींत नाहीं, असें थोडेंसें स्वयंकेंद्रित पण निवृत्त व निराभिमानी असे ते होते. सरत्या १९ व्या शतकांतील अखेरच्या चतुर्थपाद व उगवत्या २० व्या शतकांतील चतुर्थपाद ह्या अर्धा शतकांतील खास मराठी संस्कृतीचे, नागरी नव्हे, ग्रामीण भागांतील भीमाकांठच्या प्रदेशांतील ते एक शेवटचे प्रतिनिधि होते. त्यांच्या पूर्वजांनीं मराठ्यांचें वैभव भीमातीरींच्या घोड्यावरतीं बसून अटकेपार नेलें होतें. हा त्या पिढीचा शेवटला शिलेदार दि. २५ सप्टेंबर १९६४ रोजीं दिवंगत झाला. आणि ह्या माझ्या मातुलाला आतां केवळ स्मृति कुसुमांजलि वाहूनच संतुष्ट करावें लागत आहे.

***

: २ :

# भीमेच्या घाटावर

तसें म्हटलें तर, गेल्या ६५ वर्षांत अनेक वेळां मी सिद्धटेकला गेलों आहें. महिनेच्या महिने राहिलों आहें, भीमेच्या प्रवाहांत डुंबलों आहें, वाळूंत खेळलों आहें, सुंदर व चौरस घाटावर बसून अनंत विचार केले आहेत. " क्षणे क्षणे यन्नवताम् उपैति तदैव रूपम् रमणीयतायाः " असें त्या सिद्धटेकच्या सिद्धिविनायकाला भक्तिभावानें उजवी घालून जाणाऱ्या भीमेच्या प्रवाहाबद्दल मला नेहमीं वाटत असतें. अशा त्या पवित्र स्थानाला भेट देण्याचा योग परवां ३० जूनला अकल्पित रीतीनें आला.

## साहाय्यासाठीं प्रथमारंभीं सुपारी

१९६० सालीं जानेवारींत मी सहकुटुंब गेलों होतों. मातेच्या स्मरणार्थ बांधलेल्या धर्मशाळेच्या वास्तुपूजनासाठीं गेलों होतों. राज्यपाल असल्यानें इतमामानें गेलों होतों. भूषण व बंधनें दोन्हींसहित गेलों होतों. स्त्रियांना जड दागिन्यांचें ओझें वाटत नाहीं. पुरुषाला अधिकार व प्रसिद्धि यांचें ओझें वाटत नाहीं. वावडें तर तें नसतेंच. पण या खेपेला तसा कांहीं प्रकार नव्हता. भेटीच्या ७–८ दिवस आधीं मुंबई विधानसभेचे सभापति अकल्पितपणें घरीं आले व म्हणाले, ' २८ ते ३० जून कोठलीहि सोयीची तारीख सांगा. आपल्याला सिद्धटेकला

जावयाचें आहे.' मी म्हणालों, "ही गणेशभक्ति केव्हां उद्‌भवली?" तसें म्हटलें तर बाळासाहेब भारदे हे सनातनी, साहित्यिक, माळ नसली तरी वारकरी संप्रदायाचे आहेत. पण स्वभावांतील खुसपटपणा राजकारणाच्या खलत्त्यांत एक रसायन झाला होता, आणि चार तपांच्या संगतीनें तो व मी एकमेकांला सोडूं शकत नव्हतों.

प्रांजळ बाळासाहेबांनीं सरळ उत्तर दिलें, "माझ्या मित्रांनीं व आप्तांनीं कांहीं वर्षांपूर्वी नवस केला होता, तो आतां फेडावयाचा आहे, म्हणून सिद्ध-टेकला जावयाचें आहे." राजकारणी मनुष्य जेव्हां नवस करतो तेव्हां नवसाचा विषय राजकारणीच असला पाहिजे हा अनुभव; पण त्यांचा प्रांजळपणा पाहून मीं आधिक विचारलें नाहीं.

१३ जूनला पुणें विद्यापीठाचा कुलगुरु म्हणून माझी एकमतानें निवड झाली होती आणि सहज मनांत विचार आला कीं, अनायासें गणाधीश व सर्व विद्येचा प्रभु याचें दर्शन होत असेल तर कां नाहीं म्हणा? आणि मीं मनांत म्हटलें कीं, एक जुलैला अधिकारसूत्रें घेणार आहे. त्याच्या आदल्या दिवशीं सिद्धि-विनायकाचें दर्शन घडलें तर एक चांगलाच योगायोग आहे.

ऐन संकटांत धावा करून त्या बिचाऱ्या देवतेची धांदल करण्यापेक्षां आगाऊच आशीर्वाद घेऊन सर्व संकटसमयीं हजर राहण्याची सुपारी दिली तर काय वाईट? आणि हा मुत्सद्देगिरीचा विचार मनांत येतांच माझा मलाच अभिमान वाटूं लागला आणि ३० तारीख त्यांना दिली.

## धोरणांतील परिवर्तनक्षमता

दि. ३० ला सकाळीं बाळासाहेब भारदे एक तास उशिरां कां होईना पण आले! आणि एके काळीं मंत्री होते, याचा सज्जड पुरावा मिळाला. मित्रांनीं केलेला नवस भारदे फेडावयास जात होते व त्यांचा एक मित्र म्हणून मी जात होतों. आम्ही सातला निघून दौंडमार्गें भीमा ओलांडून कोष्टी, पेडगांव, जलालपूर-मार्गें सिद्धटेकला जाणार होतों. भारदे नगर जिल्ह्यांतले. आमचा पोलीस सारथी पुणें जिल्ह्यांतील आणि मी महाराष्ट्राचे रस्ते न् रस्ते जाणतों असा अभिमान बाळगणारा. तेव्हां रस्ता चुकूं अशी शंका चुकूनहि कोणाला आली नाहीं. तथापि दौंडच्या फाट्यापासून विचारीत विचारीत जावयाचें हें धोरण स्वीकारून आम्ही निघालों. तरीपण २-३ ठिकाणीं आगाऊ वळण घेतलें, २-३ ठिकाणीं पुढें गेलों, आणि केंद्रीय सरकारच्या धोरणाप्रमाणें आमच्या धोरणांतहि निश्चित परिवर्तन-क्षमता (Flexibility) प्रदर्शित होत होती.

## घटनेला घटना : विनोदाला विनोद

रस्त्यामध्यें दोन राजकारणी भेटल्यानंतर काय काय चर्चा होतात, हें सांगायला पाहिजे असें नाहीं. "क्या क्या होगा अगर मिलेंगे दिवाने दो।" दोन वेडे एकत्र झाले म्हणजे आकाशाखालील एकहि वस्तु अगर व्यक्ति ज्यांच्या चर्चेत येणारच नाहीं असें कोण सांगूं शकेल ?

भारदे हे पिढीजात कीर्तनकार, आधुनिक ज्ञान त्यांच्या रसनेवर नाचत होतें, आणि कीर्तनकार असल्याकारणानें कथासरित्सागर ते होते. विनोदाचा झरा सतत त्यांच्या मनांत उचंबळत होता. त्यांची अभिव्यक्ति चटकदार प्रसंग व सार्वजनिक जीवनांतील गमती जमती सांगत होत होती. "हम भी कुछ कम नहीं थे" हें दाखविण्याच्या ईर्षेनें नव्हे पण स्वाभाविकतेनें कथेला कथा, घटनेला घटना, विनोदाला विनोद असें जीपमधील त्या चर्चेच्या आखाड्यांत भिडलेले होते !

## वेगळें पेडगांव कशाला ?

मागल्या खेपेच्या प्रवासांत श्रीगोंद्यावरून काष्टी करून दौंडला आलों होतों. ह्या खेपेला तोच रस्ता घ्यावा अशी माझी सूचना काष्टीजवळील एका शेतकऱ्याच्या सांगण्यावरून अमान्य झाली. त्यानें हातानें दाखविलेल्या दिशा, अवकाशांत काढलेला नकाशा माझ्या त्या प्रदेशाच्या ज्ञानाशीं जुळणारा होता. आणि त्यानें 'या मार्गानें गेलांत तर वेळ कमी लागेल' असें निश्चितपणें सांगितल्यामुळें वेळेची काटकसर करण्यास नेहमीं तयार असलेलें मन ती सूचना मग मान्य करतें झालें. आणि मग आम्ही त्यानें सांगितल्याप्रमाणें एका हाकेवर, पण अनुभवांत एक मैल दूर असलेल्या फाट्यावर वळलों ! वाटेंत पेडगांव लागणार होतें, आणि मी म्हणालों कीं 'पेडगांवच्या शहाण्यांना" जमलं तर भेटूं. पण नंतर लगेच म्हणालों कीं, बहुतेक ते तेथें नसतील आणि असले तरी त्यांची ही जमात आतां महाराष्ट्रभर पसरली आहे आणि हळूच म्हणालों, कीं याहि जीपमध्यें त्यांचे प्रतिनिधि आहेत. मग वगळें पेडगांव कशाला ?

## स्थितप्रज्ञ रस्ता

आम्ही नगर–राशीनच्या रस्त्याला लागलों त्या वेळीं गल्लींतून राज-रस्त्यावर आलों असें वाटलें. तेथपर्यंत आलेल्या जवळच्या रस्त्याला आमच्या जीपचा सहवास इतका आवडला कीं, "दिसली पुनरपि गुप्त जाहली" असें होऊं नये म्हणून तिला मंदगति केली, त्यामुळें पेट्रोल अधिक खर्च झालें, वेळहि अधिक खर्च झाला. तथापि न अनुभवलेला मार्ग संपवून अनुभवलेल्या मार्गावर आलों ! तो मोठा

रस्ताहि त्या लहान रस्त्याचा वडील भाऊ शोभेल असाच होता ! अरुंद होता; कारण देशभक्तिप्रमाणें भक्तीचा मार्गहि अरुंद आहे. "क्षुरस्य धारा" इतका कठीण नव्हता, पण वर खालीं उतारूंना झटके देण्याइतका विनोदी होता. तो स्थितप्रज्ञ होता, मूक निरीक्षक होता. आम्ही मात्र माजी मंत्र्याला साक्षी ठेवून सरकारच्या कार्यक्षमतेवर टीका करीत होतों. मंत्री अगर अधिकारपदावर असतांना सर्वज्ञता येते, असलेल्या व नसलेल्या जबाबदारीची जाणीव मनांत असो अगर नसो, चेहऱ्यावर चिंतेचें गंध लावून प्रकट केली जाते. आणि अधिकारपदापासून मुक्त झाल्यानंतर अगर केल्यानंतर काय करतां येण्यासारखें आहे याचें संपूर्ण ज्ञान त्यांच्या वाणीवाटें प्रकट होतें !

## ढाली परतवल्या

याहि रस्त्यावरील प्रवास काव्यशास्त्रविनोदेन आमच्यासारख्या धीमतांचा चालला होता आणि त्या कालाचा सदुपयोग आमच्या मतें आम्ही करीत होतों. त्यामुळें जेथें फाटा फुटून उजवीकडे वळावयाचें त्या जागेपासून २ मैल पुढें गेलों. अखेर गुरांना मोकाट सोडून दूरवर झाडाखालीं बसलेल्या शेतकऱ्याला जाऊन विचारावयास सांगितलें. तो मग हातांत काठी, खांद्यावर घोंगडी, डोक्यावर मुंडासें, धोतर, तिन्ही वस्तु फाटलेल्या अशा इतमामांसह आमच्या मोटारीजवळ आला. तो आलेला पाहून, अनुयायी जसें मंत्र्याभोंवतीं गोळा होतात, तशीं त्याचीं मेंढरें त्याच्याकडे येऊं लागलीं. 'महाराष्ट्र देशाचा तो राजा होता.' आणि त्यानें सांगितलें कीं, गाडी मागें नेली पाहिजे. त्यानें कांहीं तरी खूण सांगितली. तेथें उजवीकडे वळविली पाहिजे. मग आम्हीं ढाला परताविल्या.

## अनुयायांमागें पुढारी

आमच्या सुदैवानें एस्. टी. ची बस राशीनकडे चालली होती. तिच्या ड्रायव्हरनें रस्ता कुठें फुटतो तें सांगतों असें आश्वासन दिलें. मग त्या बसमागें गेलों. 'अनुयायामागें जातो तो पुढारी' या आधुनिक अनुभवाचा आम्हीं साक्षात्कार करून घेतला ! पुन्हा तीन मैल पुढें गेलों आणि मग ड्रायव्हरनें सांगितलेल्या रस्त्याला जीप वळवून पुढें गेलों. तो रस्ता होता याचा अर्थ गाडीमार्ग होता. आणि मनुष्य जसा "जन्मना जायते शूद्रः" त्याप्रमाणें हा रस्ता संस्काराविरहित शूद्र होता. म्हणूनच तो गहन सेवाधर्म बजावत होता. चढउतार सामान्य माणसाच्या जीवनांत असतात. त्याचा अनुभव आम्हांला तो देत होता. वाकडा आणि वळण घेऊन तत्त्व व व्यवहार यांची सांगड कशी करावी

याचा वस्तुपाठ तो देत होता. वाटेंत एका गुराख्यानें 'गणपतीच्या देवळाचें शिखर दिसतें आहे तें पहा आणि त्याच रस्त्यानें जा' हा आदेश दिला. ध्येय गांठतांना व्यवहारी माणसानें भलतीच साधनशुद्धता ठेवतां कामा नये, हेंहि त्यानें सूचित केलें होतें !

सुमारें १५ मिनिटांनीं आम्ही देऊळवाडीला आलों. तेथील आसाराम पाटील यांच्या वस्तीला उजवी घालून पुढें एक मैलावर असलेल्या व आतां अधिकाधिक स्पष्ट दिसत गेलेल्या शिखराच्या अनुरोधानें जाऊं लागलों. धावणारे जसे शेवटच्या टप्प्यांत सफलता मिळावी म्हणून जोरानें धावतात, त्याप्रमाणें आमच्या जीपच्या ड्रायव्हरनें गाडी अधिक जोरानें चालविली.

शरीर जीपमध्यें असलें तरी मन देवळाच्या गाभाऱ्यांत शरीराचें स्वागत करण्यासाठीं आगाऊच पोचलें होतें. आणि स्वागतासाठीं स्मृतिकुसुमांजलि त्यानें हातीं घेतली होती. त्याचा सुगंध मनाच्या मंडपांत राहून सुखवीत होता.

सकाळीं ७। ला निघालों. आमची जीप ९॥ ला पोचावी असा संकल्प होता. ती पावणेअकराला पोचून त्या संकल्पाची सिद्धि आम्हीं अखेर हस्तगत केली.

## वेस कायम : नगारखाना गायब

वेशीच्या कमानीजवळ आम्ही उतरलों. वेस तशीच होती. वरचा नगारखाना नादुरुस्त होता आणि चौघडा आतां येथें न वाजतां, देऊळवाड्यांत वाजत असतो असें कळलें. जो नगारखाना व जी वेस हरिपंत तात्या फडके यांनीं बदामी फत्ते करून तेथील मोठ्या वेशीचे–मुख्य वेशीचे–सारे दगड तेथून येथें आणले त्याची ही वेस अशी कायम होती. नगारखाना पडला होता. पुरुषांच्या पराक्रमावर काळानें अहिंसात्मक रीतीनें मात केली होती.

आणि वेशींत गांवची मंडळी भेटली. त्यांच्याबरोबर आमची जीप-पार्टी मीं बांधलेल्या धर्मशाळेंत गेली. तेथें दर्शनाआधीं गणपतीचा प्रसाद म्हणजे जनतारूपी देवाचा प्रसाद अर्थात् चहा प्यालों. मी आंघोळ करून निघालों होतों, तरी भीमेच्या घाटावर गेलों. केलेल्या व्यवस्थेनुसार भारदे आंघोळीसाठीं गेले. गणपति अथर्वशीर्षाचा कार्यक्रम १२ ला सुरू व्हावा असें ठरलें होतें. हा एक तास मग मीं घाटावर घालविण्याचें ठरविलें. या घाटावरती लहानपणीं मी बसत असें,

त्याच पायरीवर अगदीं नकळत जाऊन बसलों ! जणूं कांहीं ६० वर्षें एकदम अध्याहृत झालीं. आणि मन विचार करूं लागलें.

## भविष्यवाणी खरी ठरली

घाटाजवळ आतां नदीचा प्रवाह नव्हता. त्या सुंदर घाटाचा प्रवाहाजवळील भाग मातीनें व्यापून गेला होता आणि वर्षाऋतूनें आपलें हिरवें निशाण त्या ठिकाणीं लावलें होतें ! प्रवाहाची दिशा बदलण्याबाबत जर योग्य व्यवस्था केली नाहीं तर प्रवाह घाटापासून दूर जाईल आणि घाटावर गाळ व माती येईल असें मी ४ वर्षांपूर्वी सांगितलें होतें. माझी भविष्यवाणी आतां खरी झालेली दिसत होती. राजकारणांतहि मी अशींच भविष्यें सांगत असतों, सूचना देत असतों, पण ऐकलें जात नाहीं !

सुंदर घाट आणि नदीचें पात्र व प्रवाह ह्या तिघांत समन्वय असावा लागतो.

सुंदर घाट म्हणजे समाजधारणेचीं मौलिक तत्त्वें. पात्रें म्हणजे त्यांच्या विद्यमान जीवमूल्यांचा स्रोत होय.

तो प्रवाह घाटाजवळून जाण्यांत एक सौंदर्य व एक समतोल येतो आणि त्यानेंच पात्राचें संरक्षण व शोभा वाढते.

## जुन्या आठवणींना उजाळा

येथें आतां ग्रामपंचायत झाली आहे. पण तिचें लक्ष ग्रामापेक्षां पंचायती करण्याकडे अधिक दिसतें. किंबहुना या विकेंद्रीकरण्याचा प्रत्यक्ष अनुभव जीवनाचें–सामान्य जनांच्या जीवनाचें–क्षुद्रीकरण करण्यांत होत आहे. घाटाच्या जवळ असलेल्या सात चिंचा, त्या आतां तेथें दिसल्या नाहींत. पण त्या ठिकाणीं केलेल्या पराक्रमाची आठवण त्या चिंचाइतकीच तोंडाला पाणी सुटण्याइतकी ठरली. घाटासमोर म्हणजे नदीच्या पात्राच्या उत्तरेला रामटेकचें राममंदिर झाडांनीं व वन्य झाडांनीं आपापल्या कबजांत घेतलें होतें. घाट आणि रामटेकचें राममंदिर यांतील अंतर आत्यंतिक ध्येय व विद्यमान प्रयत्न यांच्याइतकें कायम होतें. पण वन्य वृक्षांनीं तें मलीन झालें होतें. घाटाच्या खालील प्रवाहांत बदल झाला होता. तेथील डोह आतां जवळ जवळ उथळ झाला झाला होता. मला वाटलें, समाजवादाच्या राष्ट्रीयकरणाचा प्रयोग तेथेंहि झाला असावा. कदाचित् गांधीवादी अपरिग्रह तत्त्वज्ञान त्यानें स्वीकारलें असावें.

## पूजेच्या हक्कापेक्षां प्रसादाची मागणी

इनामदाराच्या घोडीवर ज्या ठिकाणीं मात केली, ती जागा तशीच होती. बदल एवढाच होता कीं, आतां इनामदार नव्हते, व घोडी दुर्मिळ झाली होती ! आणि अधिक मौलिक गोष्ट म्हणजे मी सत्तरींत आलों होतों. आणि त्या घाटावर तासपर्यंत मनांत ६०–६५ वर्षांचे विचार येत होते, जात होते. किती माणसें माझ्या मनाच्या दरबारांत, माझ्या अस्मितेच्या सिंहासनासमोर गायलीं, तडकलीं, गरजलीं, तडपलीं, स्मृतींनीं पुन्हा एकदां तें प्रसंग डोळ्यां-पुढें आणले. वैयक्तिक व सार्वजनिक जीवनांतील सुखदुःखांचे, मानापमानाचे भरती-ओहोटीचे सारे प्रसंग चलच्चित्रपटाप्रमाणें, करमणूक–कर न भरतां मला पाहावयास मिळाले. टेकडीवरील विष्णुमंदिर पाठीशीं होतें. एक वेळ मनांत आलें कीं, वर चढून जावें. पण सावधानी मन म्हणालें, कीं तेथेंच विष्णुलोकाची प्राप्ति व्हावयाची ! तो विचार सोडून दिला आणि आढळून आलें तें असें कीं, वर जाण्याचा मार्गहि जवळ जवळ बंद झाला आहे. पिढीजात गुरव-पुजारी आतां राहिले नाहींत. आतां पूजेच्या हक्कापेक्षां प्रसादाची मागणी करण्याचें युग सुरू झालें आहे. मानाच्या चिंधीसाठीं माडी सोडणारी मराठी वृत्ति आतां लुप्तप्राय झाली आहे.

## समानशाहीचा गुणधर्म

भूगोल तसाच आहे. गंगा व गोदा तशाच आहेत, नगराज तसेच आहेत. पण सारी विचारसृष्टि बदलत आहे, सृष्टीकडे पाहण्याचे दृष्टिकोन बदलले आहेत. मानवा–मानवांतील नातीं बदलत आहेत. सर्वत्र समानभावाची प्रेरणा आहे, आणि जेथें ही प्रेरणा प्रकर्षानें कार्यान्वित होते तेथें गुणाचा कस कमी होतो, कला किंचित् कलंडते, पराक्रमांतलें तेज किंचित् निस्तेजतें.

लोकशाही म्हणजे समानशाही. ही कोणाला विशेष खालीं जाऊं देत नसली तरी कोणाला विशेष वर येऊं देत नाहीं. आणि तसें कोणी करूं लागलें तर, त्याच्या प्रतिभेला टीकेच्या कात्रीनें कापलें जातें, मत्सरानें झांकलेलें जातें.

लोकशाही म्हणजे मुक्त स्पर्धा नव्हे, त्याचबरोबर संपूर्ण अनुशासनशील समाज पण नव्हे. समान संधि व समानता या दोन तिच्या श्वासनलिका खऱ्या, पण त्याच कारणासाठीं गुणप्रधान विषमता दोषास्पद ठरवली जाते. एका चंद्रमानें ज्योतिष्मति होणारी रात्र वावडी ठरते. अनंत तारे थोड्या प्रकाशानें चमकले म्हणजे ती रात्र पसंत पडते.

## जग हें अखेर असेंच आहे

माझ्या बरोबरची मंडळी कोण कोण कुठें कुठें आहेत या विचारानेंच हा विचार स्फुरला. प्रगतीच्या मार्गांत असतांना, आलेले अडथळे व त्याला जबाबदार असलेल्या व्यक्ती पाहिल्यामुळें राजकारणांत कोणालाहि पुढें जाऊं द्यावयाचें नाहीं, ही वृत्ति विशेषतः महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत दिसून येते. याबद्दल सार्वजनिक अभिमान व व्यक्तिगत दुःख वाटलें. वास्तविक कुलगुरुपदासाठीं कधीं व कांहींहि प्रयत्न केला नव्हता. मनानें आयुष्यभर आक्रमण करावयाच्या मार्गांत तें मुक्कामाचें स्थळ नव्हतें, पण कांहींना त्याचाहि हेवा वाटला आणि त्यांनीं अक्षरजननीला निष्कारण कष्ट दिले ! त्याचा मनावर परिणाम झाला नाहीं, दुःख वाटलें नाहीं, खेद वाटला. युधिष्ठिर हा अजातशत्रु पण त्यालाहि विरोधक निघालेच ना ? कृष्ण सर्व जनांचा. पण त्यालाहि त्याच्या मामाकडूनच विरोध झालाच ना ? जग हें असेंच आहे. त्यांत सुधारणा होते पण सापेक्षतेनें ! अशा विचारांच्या तंद्रींत असतांना बारा वाजल्याचा डंका झाला. आवर्तनाची सुरुवात झाली असेल म्हणून परतलों.

## ' सहाणाधीश ' झालेला पणतु

गाभाऱ्यांत सुमारें १५–१६ जण दोन रांगांत बसले होते. अगदीं गर्भागारांत ३–४ जण होते. त्यांत भारदे होते तेहि रांगेंत बसले होते. मध्यें मंगलमूर्तींची मूर्ति होती. " नेत्रीं दोन हिरे प्रकाशित करे " असें गोजिरें रूप दिसत होतें आणि अथर्वशीर्षाचा पाठ चालू होता. " अव दातारम् अव धातारम् " त्याचप्रमाणें ऋतम् सत्यं हेहि शब्द ऐकत होतों. श्रोतारम् वक्तारम् हेहि शब्द ऐकत सूर्य, चंद्रमा, जगांतील सर्व कांहीं तूं आहेस, हेहि त्या मंत्र्यांतील शब्द कानीं येत होते. अथर्वशीर्ष एके काळीं पाठ येत होतें. पण आतां तें जवळ जवळ विस्मृत झालें. त्याची जागा आतां अर्थशास्त्र व राजकारणशास्त्र इत्यादिकांतील अनध्यात्मक गोष्टींनीं घेतली होती. त्या पाठकांच्या शेजारींच मी बसलों होतों. तेथील पुरोहितानें मला बसण्यासाठीं मोठा पाट आणून दिला. ६५ वर्षांपूर्वीं त्याला प्रथम पाहिला होता तसाच तो आजहि होता. एकसंधि, २ फूट रुंदीचा व ३ फूट लांबीचा ! त्यावर त्या वेळीं एकटे गणुकाका बसत. आतां त्याचा १०० टक्के उपयोग करावयाचा म्हणजे दांपत्य व एक बटु यांसह उपयोग करावा लागेल, अशी 'प्रगति' आतां झाली आहे !

## मूककथा ऐकण्यांत मन गुंग

मंगलमूर्तींकडे पाहात होतों, त्याच्या उपासनेकडे पाहात होतों. जवळच त्या पाटाबरोबर प्रथम पाहिलेली सहाण जवळ जवळ १॥ फूट व्यासाची तेथेंच दिसत होती.

इंद्र बदलले, इंद्राणी कायम, याच अनुभवाची ती साक्ष देत होती. पुजारी बदलले. नवे आले गेले. सहाण तीच, चंदनाचें खोड मात्र धीमेपणानें वागत असतां, हळूहळू झिजून जाऊन तेंहि दुसरें किंवा तिसरें आलें असावें! सूर्याला सुद्धां आपण स्नान करीत आहोंत, हें ज्यानें ७५ वर्षांत कधीं दिसूं दिलें नाहीं, ते उंच व भव्य ब्रह्मचारी गणूकाका, जे या सहाणेवर गंध उगाळतांना पाहिले होते ते आतां गेले. पहाटे सूर्योदयापूर्वी साही ऋतूंत भीमेंत स्नान करून खास मंगलमूर्तीसाठीं कळशीभर पाणी घेऊन येणारे व आम्हां मुलांना गंध लावण्यास देणारे, गांवचें शिवार न सोडतां जगाचा विचार करणारे एक सत्पुरुष आतां तेथें नव्हते. त्यांचा पुतण्या तोहि आपला प्रहर गाजवून गेला, पुतण्याचा मुलगा तोहि आपला प्रहर गाजवून गेला. आणि पुरोहित घराण्यांतील पणतु असणारा आतां विद्यमान "सहाणाधीश" झाला होता. चंदनाप्रमाणें झिजून जावें व सुगंध दरवळीत जावें, ही संतांची, साधूंची भक्तांची परंपरा आहे. मी अथर्वशीर्ष ऐकत होतों पण माझें मन पाट, सहाण, खोड, भिंतींतिल फडताळें यांच्या मूककथा ऐकण्यांत गुंतलें होतें. वास्तविक पूर्वी अथर्वशीर्षाचें यज्ञवत् कर्म करतांना त्यांत चहा अगर कॉफीचा खंड येत नसे. पण या दोन तासांच्या जपयज्ञांत, वाग्यज्ञांत चहाचा खंड आलाच आणि "यद् यद् आचरति श्रेष्ठः" या नात्यानें मीहि चहाचा अवमान केला नाहीं. म्हणणाऱ्यांपैकीं कांहींजण मधूनमधून बाहेर जात आणि शिवाजी विडीचा झुरकाहि येत. त्या श्रेष्ठ पंथाचा पाईक मी होऊं शकलों नाहीं. जेथें धूर तेथें अग्नि याचा उलट अनुभव येत आहे. जेथें ज्ञानाग्नि तेथें धूर असें आज आढळून येत आहे.

## मार्गदर्शनाची श्रमविभागणी

यथासमय आवर्तनें संपलीं. आरती झाली. आणि आम्ही सर्व मंडळी जेवणास गेलों. पुष्कळ दिवसांत भारदे यांचें कीर्तन ऐकलें नव्हतें म्हणून त्यांना श्लोक म्हणण्याचा आग्रह केला, व त्यांनीं त्याप्रमाणें म्हटलाहि. अन्नरसाबरोबर थोडा आनंदरस पण त्यांनीं आम्हांला उपलब्ध केला. गांवांत कॅांग्रेसचा कार्यकर्ता

आला आणि "मार्गदर्शन" न करतां गेला, असें कधीं घडत नाहीं." येथेंहि ५-५० मंडळी जमा झालीच. मी मग त्यांना मार्गदर्शनांतील दुसरा भाग म्हणजे 'दर्शन' दिलें व भारद्यांचा मार्ग त्यांच्या रसाळ वाकूगंगेला मोकळा करून दिला.

## दिलेली सुपारी उपयोगी पडली

चारला पुन्हां वेशीवाटें सिद्धटेकचें शिवार सोडलें. वाटेंत भरपूर तेल भरलें आहे अशा भरंवशावर आमचा सारथी होता; पण जीपनें अर्धांवायु व्हावा त्याप्रमाणें लिंपण गांवानजीकच बैठक मारली! दोन–तीन तासांच्या खटपटीनें ट्रकला जीप बांधून दौंडपर्यंत आमची वरात निघाली. मात्र उखाणा न घेतां गांठ सोडली गेली! पुण्यांत ७ ला पोहोंचण्याचा अंदाज पण सातपर्यंत दौंडांतून पाय निघाला नाहीं.

मनांत म्हटलें आम्ही सरकारचे, खरोखर राजनिष्ठ प्रजाजन आहोंत. वेळेवर काम सुरू करावयाचें नाहीं, आणि केलें तरी वेळेवर संपवायचें नाहीं, हा आमचा दण्डक. त्याला येथेंच अपवाद कशाला?

एकच अपवाद असतो—पगाराचीं अगर भत्त्याचीं बिलें वेळच्या वेळीं दिलीं जातात. आणि पहिल्या तारखेला सुटी असल्यास आदल्या दिवशीं त्यांचे पैसे मिळण्याची दक्षता व कार्यक्षमता दाखविली जाते.

वाटेंत उरळीकांचनजवळ समोरून येणारा ट्रक आणि पुण्याकडे जाणारी आमची जीप यांची सलामी झडली आणि अगदीं केसाएवढ्याच अंतरावर मी वांचलों! जीपच्या मागील भागावर ट्रकचा मागील भाग आदळला. पण ड्रायव्हरच्या हुषारीनेंच शेपटावर निभावलें! विघ्नहर्त्या गणपतीला आगाऊ सुपारी दिली म्हणूनच हें विघ्न टळलें. आणि यथाक्रम पुण्यास आलों. भीमेच्या घाटावर सुचलेले हे सारे विचार स्वतःजवळ न ठेवतां हा प्रसाद असंख्य वाचकांना आज नम्रभावानें वाटीत आहे.

* * *

: सत्तरींतील काका :

: ३ :

# निवृत्ति व कांहीं विचार

जगामध्यें संकल्पाप्रमाणें सर्व सिद्ध होतें, असा सार्वत्रिक अनुभव नाहीं. माणसाच्या आकांक्षा अरबी घोडे असतील तर प्रत्येक व्यक्ति चाबूकस्वार बनून जीवनांतील यशोमंदिर निश्चितपणें गांठील. हें व्यक्तीचे बाबतींत जसें खरें, तसें समूहाच्या बाबतींतहि खरें असतें. पिढ्यान्–पिढ्या माणसें खपत असतात, आणि श्रमाचा मोबदला आणि साफल्य पुढल्या पिढीला मिळत असतें असा जगाचा इतिहास आहे. कित्येक वेळां आयत्या पिठावर नागोबा असें घडून येतें, आणि मग ती व्यक्ति कर्तृत्वाचा फणा मोठ्या अभिमानानें काढत असते. १९ व्या शतकांत भारताच्या स्वातंत्र्यासाठीं ज्यांनीं आपापल्या परीनें उद्योग केले, ब्रिटिश सत्ता प्रस्थापित होऊं दिली नाहीं, अगर प्रस्थापित झाल्यानंतर तिच्या सत्तेच्या तंबूचे कुरतडून कुरतडून दोर कापले, त्या सर्व व्यक्ति श्रेष्ठ व कर्तृत्वान् असून-सुद्धां आज त्यांचे स्मृतिशेषसुद्धां नाहींत. तथापि त्यांनीं जें केलें, जे पायांतील दगड बनले, त्यांच्याच त्यागावर व सेवेवर, वर्तमानकाळाचें यशोमंदिर उभारलेलें दिसत आहे. भारतीय संस्कृतींत कृतज्ञता ही एक संस्कृतीचें श्रेष्ठत्व दाखविणारी मोठी भावना आहे. पंचमहाभूतांनीं देह दिला म्हणून त्यांचें स्मरण, त्यांची गाथा वेदांनीं गायिली आहे, पुराणांनीं तिला अलंकृत केलें आहे आणि इतिहासानें ती

मूळ भावना गोरवून एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत पोचवली आहे. कांहीं व्यक्तींनीं खपावें व कांहींनीं ख्यालीखुशालींत आराम करावा, ही विषमता व्यक्ति-जीवनाप्रमाणें सामुदायिक जीवनांत दिसून येते.

## व्यापक विचाराची जरूरी

इंग्लंडमध्यें क्रांति घडवून आणणारा क्रॉमवेल यानें म्हटलें आहे कीं, "या पिढीची सेवा आम्ही करत राहूं आणि विश्रांतीसाठीं आम्ही अन्यत्र जाऊं, कारण तेथें चिरविश्रांति मिळणार आहे." तसेंच भारताच्या इतिहासांतहि झालें आहे. ज्यांनीं प्रचंड उद्योग केला, आपल्या पिढीला बरोबर घेऊन ध्येयमार्गावर प्रवास केला, ते आतां चिरशांति भोगत आहेत व ज्यांनीं विनाकष्ट, विनालायकी कालप्रवाहाच्या कारणानें पदप्राप्ति केली आहे, त्यांनीं कांहीं व्यापक विचार करावा, असें म्हणणें प्राप्त झालें आहे. जे वृद्ध व वडील आहेत त्यांना आपण तरुण नाहीं याची जाणीव पुष्कळदां नसते व सतत आपण कोठें तरी सत्तेच्या आवतीं भोंवतीं सिंहासनाच्या परिसरांत असावें असें वाटतें, तें अस्वाभाविक नाहीं. पण त्यांनींहि राष्ट्राच्या चिरंतन हितासाठीं विचार करावयास पाहिजे व त्यांना मिळालेल्या अनुभवाचा फायदा तरुण मंडळींना दिला पाहिजे. राजकारण हें शासनाचें शास्त्र आहे व त्यांत एक कला आहे व ती कला व पात्रता या जोरावर राष्ट्राला दृढ करून जनतेचें कल्याण करावयाचें असतें. अधिकारपद व सत्तेचा उपयोग राष्ट्राच्या व जनतेच्या हितार्थ करण्यांतच राजकारणाची सांगता असते. आणि म्हणून ज्या वेळीं अधिकारपदावर राहण्यापासून जनतेचा फायदा होत नसेल तर त्याचा त्याग केला पाहिजे.

## सत्तेचें पागोटें काढून ठेवावें

इ. स. पूर्वी ६०० वर्षें प्राचीन चीनमध्यें लाओ-त्से हा एक मोठा साधु पुरुष होऊन गेला. त्यानें लिहिलें आहे कीं, "आपल्याला निवृत्त व्हावयाचें आहे, सत्तेचें पागोटें काढून ठेवावयाचें आहे व शक्य तितक्या लवकर याची जाणीव माणसानें ठेवावी." ज्या क्षणीं आपण कोठल्याहि कारणानें स्थानाला अपात्र झालों आहोंत असें वाटेल, त्याच वेळीं निवृत्त होण्यामध्यें स्वतःचें हित व चारित्र्य-संरक्षण आहे. प्रलोभनानें अगर अहंकारानें त्या क्षणापलीकडे राहणें हें इष्ट. हात-पाय चालू आहेतच, तोंपर्यंत विश्रांति घेणें यांत धैर्य व शहाणपणा आहे. ते बंद पडले म्हणजे येणारी विश्रांति यांत स्वारस्य नाहीं. चांगल्या कार्यानें, सेवेनें मिळा-

लेली कीर्ति व सुगंध देत आहे तोंपर्यंत निवृत्त व्हावें. जनविन्मुख व्हावें. तुम्
तसें न केलें तर कीर्ति तर जाईलच, पण देशाचें अनहित केलें हें पाप तुमच्
डोक्यावर येईल.

## वानप्रस्थाश्रमाची कल्पना व अर्थ

वर प्रगट केलेले विचार आपल्या धर्मशास्त्रांतहि जी आश्रमव्यवस्था आहे
तिला धरून आहेत. वयाच्या २५ वर्षांपर्यंत विद्या व तिच्याद्वारें पात्रता सि
करावयाची आणि त्यानंतर साठीपर्यंत व्यवसायांत राहावयाचें, आपल्या कर्तृत्वाच
फायदा, ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा समाजाला द्यावयाचा आणि कार्याच
धुरा व्यक्तिगत संसाराप्रमाणेंच सार्वजनिक संसारांतसुद्धां उदयोन्मुख पिढीला द्याव
याची. दशरथानें युवराज्याभिषेक करण्यामागें हीच श्रेष्ठ भूमिका होती. आणि साठी
नंतर शहरापासून दूर नव्हे पण जवळहि नव्हे अशा ठिकाणीं राहून वानप्रस्थाश्रमाचे
जें मुख्य धर्मकार्य म्हणजे विद्यमान नेतृत्वाला सल्लामसलत द्यावयाची, हें करीत
राहणें. वानप्रस्थाश्रम याचा अर्थ वनांत अगर अरण्यांत जाऊन राहणें नव्हे
तसेंच जनतासंपर्क संपूर्णपणें तोडणें अगर सोडणें असाहि नव्हे. साठ वर्षांत मिळवि
लेला अनुभव हा समाजांत मिळविलेला असतो व तें ऋण वानप्रस्थाश्रमांत
फेडावयाचें असतें. लोक आपल्याकडे येऊन सल्लामसलत मागतील अशी अपेक्ष
ठेवणें गैर नाहीं, पण ते आले नाहींत तर नाराज होण्याचें कारण नाहीं, अगर
आपला सल्ला मानला नाहीं तरी नाराज होण्याचें कारण नाहीं. वानप्रस्थाश्रम
म्हणजे केवळ आठवणींची जपमाळ घेऊन बसणें नव्हें. कांहीं ज्ञानाचा नवीन प्रांत
हस्तगत करण्याचाहि प्रयत्न असावा. आणि एखाद्या प्रश्नाला अगर एखाद्या विशिष्ट
कार्यक्रमाला वाहून घेणें हें त्या संबंधित व्यक्तीच्या दृष्टीनें व समाजाच्या दृष्टीनेंच
उपयुक्त ठरतें. आजच्या जगांत सार्वजनिक जीवन हें एवढें व्यापक व विस्तृत
झालें आहे कीं प्रत्येकाला आमरण थोडेंबहुत काम करतां येण्यासारखें आहे. सार्व-
जनिक सेवा ही आधुनिक जगाची कल्पना नाहीं. ती एक श्रेष्ठ व प्राचीन परंपरा
हिंदुधर्माची आहे.

## जगाचें रहाटगाडगें चालूच

अर्जुनाला भगवान् श्रीकृष्णांनीं विचारलें, "तुझी काय इच्छा आहे?"
अर्जुनानें उत्तर दिलें कीं, "नाहं कामये राज्यम् न मोक्षम् न पुनर्भवम् ॥
कामये दुःखततानां, प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥" मला राज्य नको, मोक्ष नको,

लेली कीर्ति व सुगंध देत आहे तोंपर्यंत निवृत्त व्हावें. जनविन्मुख व्हावें. तुम्ही तसें न केलें तर कीर्ति तर जाईलच, पण देशाचें अनहित केलें हें पाप तुमच्या डोक्यावर येईल.

## वानप्रस्थाश्रमाची कल्पना व अर्थ

वर प्रगट केलेले विचार आपल्या धर्मशास्त्रांतहि जी आश्रमव्यवस्था आहे, तिला धरून आहेत. वयाच्या २५ वर्षापर्यंत विद्या व तिच्याद्वारें पात्रता सिद्ध करावयाची आणि त्यानंतर साठीपर्यंत व्यवसायांत राहावयाचें, आपल्या कर्तृत्वाचा फायदा, ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा समाजाला द्यावयाचा आणि कार्यांची धुरा व्यक्तिगत संसाराप्रमाणेंच सार्वजनिक संसारांतसुद्धां उदयोन्मुख पिढीला द्यावयाची. दशरथानें युवराज्याभिषेक करण्यामागें हीच श्रेष्ठ भूमिका होती. आणि साठीनंतर शहरापासून दूर नव्हे पण जवळहि नव्हे अशा ठिकाणीं राहून वानप्रस्थाश्रमाचें जें मुख्य धर्मकार्य म्हणजे विद्यमान नेतृत्वाला सल्लामसलत द्यावयाची, हें करीत राहणें. वानप्रस्थाश्रम याचा अर्थ वनांत अगर अरण्यांत जाऊन राहणें नव्हे, तसेंच जनतासंपर्क संपूर्णपणें तोडणें अगर सोडणें असाहि नव्हे. साठ वर्षांत मिळविलेला अनुभव हा समाजांत मिळविलेला असतो व तें ऋण वानप्रस्थाश्रमांत फेडावयाचें असतें. लोक आपल्याकडे येऊन सल्लामसलत मागतील अशी अपेक्षा ठेवणें गैर नाहीं, पण ते आले नाहींत तर नाराज होण्याचें कारण नाहीं, अगर आपला सल्ला मानला नाहीं तरी नाराज होण्याचें कारण नाहीं. वानप्रस्थाश्रम म्हणजे केवळ आठवणींची जपमाळ घेऊन बसणें नव्हें. कांहीं ज्ञानाचा नवीन प्रांत हस्तगत करण्याचाहि प्रयत्न असावा. आणि एखाद्या प्रश्नाला अगर एखाद्या विशिष्ट कार्यक्रमाला वाहून घेणें हें त्या संबंधित व्यक्तीच्या दृष्टीनें व समाजाच्या दृष्टीनेंच उपयुक्त ठरतें. आजच्या जगांत सार्वजनिक जीवन हें एवढें व्यापक व विस्तृत झालें आहे कीं प्रत्येकाला आमरण थोडेंबहुत काम करतां येण्यासारखें आहे. सार्वजनिक सेवा ही आधुनिक जगाची कल्पना नाहीं. ती एक श्रेष्ठ व प्राचीन परंपरा हिंदुधर्माची आहे.

## जगाचें रहाटगाडगें चालूच

अर्जुनाला भगवान् श्रीकृष्णांनीं विचारलें, "तुझी काय इच्छा आहे ?" अर्जुनानें उत्तर दिलें कीं, "नाहं कामये राज्यम् न मोक्षम् न पुनर्भवम् ॥ कामये दुःखतप्तानां, प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥" मला राज्य नको, मोक्ष नको,

पुनर्जन्म नको, जे दुःखी व कष्टी आहेत त्यांचें दुःख व कष्ट निवारण करण्याची माझी इच्छा आहे. आणि जोंवर जग आहे तोंवर दुःख आहे. मनुष्याला सांवली जशी सोडीत नाहीं, त्याचप्रमाणें सामाजिक व आर्थिक समस्या स्वतंत्र राष्ट्रालाहि सोडत नाहीं. त्यांचे संदर्भ बदलतात, स्वरूप बदलतें. कांटा बोचला काय, टांचणी बोचली काय, किंवा खंजीर भोसकला काय, दुःखाचें स्वरूप एकच असतें. त्याची तीव्रता व भोगण्याचा काल कमीजास्त असतो एवढेंच. आणि प्राचीन काळीं समाज ज्या वर्णव्यवस्थेवर आधारित होता त्या काळीं दुःखांना इतकी जोरानें वाचा फुटत नसे. आतां जगभर जनता जागृत आहे. कुठें मोर्चाद्वारां ती बोलते, सभेच्याद्वारां बोलते, वृत्तपत्रद्वारां बोलते, कुठें संपाद्वारां, कुठें बंड अगर बलवा करून तेंच पद निरानिराळ्या रागांत गातें, तसें होत आहे. 'हा गमका तराना' ही 'दर्दभरी कहानी' अजून संपलेली नाहीं. ती जगाचे सुरुवातीपासून सुरू झालेली आहे व जगाच्या अंतापर्यंत ती जाणार आहे. तथापि, माणसानें आपल्या आयुष्याच्या चारी आश्रमांतून तिची दखल घ्यावयाची असते. पहिल्या भागांत तो स्वरूप समजून घेतो. दुसऱ्या भागांत मुकाबला करतो. तिसऱ्या भागांत उस्ताद डावपेंच शिकवतात, त्याचप्रमाणें नव्या पिढीला शिकवीत असतो आणि शेवटच्या विभागांत कांहीं समाधानांत, कांहीं असंतोषांत जगाचा निरोप घेत असतो.

## मौलिक विचारांची गरज

हीं आश्रमाचीं कर्तव्यें स्वधर्मानुसार केलीं म्हणजें जें असह्य तें थोडें सुसह्य होतें. जें अटळ तें थोडें सोयीस्कर केलें जातें, व जगाचा व्यवहार किंचित् नियमित व नियंत्रित होतो. पाण्याला मर्यादा नसली म्हणजे तें अफाट पसरतें, तसा लोकव्यवहार राहात नाहीं, कारण तो नियंत्रित होत जातो. पुरानें प्रवाह बदलतात हें लक्षांत घेऊन कांठावरील लोकवस्ती व शेती यांचा प्रपंच वरीत असतात. आणि मागील इतिहासाचे दाखले गांवांतील वृद्ध सतत सांगत असतात व गांवगाडा चांगला चालण्याच्या दृष्टीनें ते मदत करीत असतात; आणि हा सर्व लोकव्यवहाराचा प्रपंच लक्षांत घेतां योग्य समयीं स्वसंतोषानें निवृत्त होणें हें मग कर्तव्य ठरतें. व्यापारांत व राजकारणांत मनुष्य निवृत्त होण्याच्या वृत्तींत नसतो. व्यापारांत ठोकर बसली तरी रहाटगाडग्यांतील पोहऱ्याप्रमाणें रिकामें झालेले पोहरे पुन्हा भरून येतील अशी त्याची दुर्दम्य आशा असते. राजकारणांत हुकूमशाहीमध्यें मर्जीतून निघालेला राजकारणी गुप्त व गुंतागुंतीचें राजकारण करतो, पुन्हां मर्जींत येतो. कमीपणा घेऊन मोठेपणाच्या पाल्खींत जाऊं इच्छित असतो. लोकशाहीमध्यें

व्यक्तीचा अनुनय करावयाचा नसतो. समाजाचा व संघाचा करावयाचा असतो. आणि म्हणून लोकशाहीमध्यें कमी भानगडी, कमी वैरभाव, कमी कारस्थानबाजी सामान्यतः असते. तथापि, तेथेंहि कपट व कारस्थान यांचा प्रवेश कमीजास्त प्रमाणांत असतोच आणि ही गोष्ट इंग्लंडसारख्या लोकशाही मूल्यांबाबत अभिमान बाळगणाऱ्या राष्ट्राच्या राजकारणांत दिसून येते. मग भारताच्या लोकशाही राजकारणांत ती दिसून आली तर आश्चर्य नाहीं. जें वाईट वाटतें तें एवढ्याचसाठीं कीं ज्या राजकारणाचें दाईपण टिळकांसारख्या कर्मवीरांनीं गोखल्यांसारख्या त्यागी व्यक्तींनीं व गांधींसारख्या स्थितप्रज्ञांनीं केलें, त्या राजकारणांत व्यक्तिगत हेवेदावे नसावेत. पण पं. नेहरूंनंतर जें स्वरूप केंद्रीय राजकारणाचें दिसून आलें तें मोठें स्पृहणीय अगर वांछनीय नव्हतें. कमी–जास्त प्रमाणांत तेच निदान बहुतेक घटकराज्यांच्या बाबतींत खरें ठरत आहे. म्हणून भारतांतील अनुभवी व विचारवंत नेत्यांनीं इष्ट तें वळण देण्यासाठीं कांहीं मौलिक विचार केला पाहिजे.

## चांगल्या परंपरा उचलाव्यात

माणसानें राजकारणांत किती काळ राहावें, कसें राहावें याबद्दल कांहीं सिद्धान्तिक विचार केला पाहिजे. राजकारण हें उघड उघड सत्ताभिमुखी असते. स्त्रीला मातृत्व व राजकारणी पुरुषाला अधिकारप्राप्ति याशिवाय जीवनांत साफल्य अगर समाधान सांगता येत नाहीं. ही मौलिक गोष्ट आहे व ही लक्षांत ठेवूनच वर सुचविलेल्या गोष्टीचा विचार व्हावयास पाहिजे. माझ्या मतें निश्चित वयोमर्यादा झाली कीं, अगर निश्चित काळ सत्ता गाजविली कीं त्या व्यक्तीनें निवृत्त व्हावें व आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा जनतेला द्यावा, ही सूचना अनेकांना मान्य होणार नाहीं. त्यांना आमरण सत्तेवर राहून जनतेची सेवा करावयाची असते. तथापि सेवेऐवजीं अन्य कांहींतरी समाजाच्या वांट्याला येतें. इंग्लंडच्या इतिहासांत ७० च्या पलीकडे मुत्सद्दी दैनंदिनी राजकारणांत भाग घेत नाहींत. कुणालाहि असें वाटत नाहीं कीं, मी नसलों तर राष्ट्राचें काय होईल ? आणि तेथील परंपरेप्रमाणें ते आपलें वारस नेतृत्व तयार करीत असतात. हें मूल्य आपल्याकडे आलें पाहिजे. या देशांत कोणी मनुष्य त्याग करून सत्तेबाहेर आला तर, त्यांत त्याचा अधिक मिळविण्याचा हेतु आहे, असेंच गृहीत धरलें जातें. आणि तसा थोडा अनुभव मला स्वतःला आला आहे. चंदीगडहून परत येतांना मुंबई–पुण्याच्या गाडींत एक मोठें महाराष्ट्रीय भांडवलदार भेटले व म्हणाले कीं, कोणत्या लग्गयासाठीं राजीनामा दिलांत ? मला फार वाईट वाटलें. राग आला नाहीं. कारण त्यांची धन-

प्रधान दृष्टि लक्षांत घेतां तो प्रश्न स्वाभाविक होता. मीं एवढेंच उत्तर दिलें कीं, "तुमच्याशिवाय असा प्रश्न कोण विचारणार?" त्याच सुमारास पुण्यांतील एका वर्तमानपत्रानें कोल्हापूर विद्यापीठाचा मी कुलगुरु होणार अशी सर्वस्वीं खोटी बातमी छापली. त्याचा उद्देश राजीनाम्यामागील नैतिक दृष्टि हिणकस ठरवायची असा होता.

## नैतिक ऱ्हास थांबवावा

बातमी खोटी व ती निव्वळ दुष्ट हेतूनें पुण्यांतच बनविलेली होती. हें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, टिळक–गोखले यांच्या राजकारणांत राहूनसुद्धां ही हीनवृत्ति राहावी, याचें आश्चर्य वाटत होतें. आणि आज तर भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणांत पैसा हें दैवत झालें आहे. आणि म्हणून कांहीं मंडळींनीं क्रियात्मक राजकारणांतून किंचित् बाजूला होऊन खऱ्या उपासनेचा मार्ग दाखविला पाहिजे. नाहींतर भारताचा सुरू झालेला नैतिक ऱ्हास झपाट्यानें होत राहील व आधीं बुद्धि गेल्यानें भांडवल जाण्याला 'मार्गदर्शन' होईल.

* * *

सत्तरींतील काका

: ४ :

# नेहरूंचें थोर व्यक्तिमत्त्व

'तुम्ही असें काय लिहिलें आहे?' असा प्रश्न 'माझे समकालीन' या माझ्या पुस्तकांतील पं. नेहरूंच्या शब्दचित्राचा अनुवाद हिंदी 'हिंदुस्तान' या पत्रांत आल्यानंतर झालेल्या भेटींत पंडितजींनीं मला विचारला. वास्तविक हिंदी वृत्तपत्रें ते क्वचित् वाचतात. माझीं सारीं प्रसिद्ध पुस्तकें मराठी, इंग्रजी आहेत. राष्ट्रपति राजेंद्रप्रसाद व पं. नेहरूंना मी तीं देत असे. तथापि मला न कळवितां माझ्या अनेक मराठी लेखांचे अनुवाद हिंदी पत्रें करीत असतात हा अनुभव होता. मी त्यांना म्हणालों, "मी लिहिलेलें तुमचें शब्दचित्र तुम्हीं हिंदींत वाचलें याबद्दल मला प्रथम आनंद वाटतो. त्या लेखांतील टीका मित्राची आहे व गुणग्रहण टीकाकाराचें आहे.

(The criticism is that of a friend and appreciation that of a critic.)

ते हसले. त्यांच्या स्वभावांत कुणी टीका केल्यास चिडून जाणें हें नव्हतें. अर्थात् यालाहि कांहीं अपवादात्मक प्रसंग माझ्या आठवणींत आहेत. मीं 'लालकिल्ल्याच्या छायेंत' या पुस्तकांत तसे कांहीं समाविष्ट केले आहेत. तथापि ते रागावले, प्रक्षुब्ध झाले तरी थोड्या क्षणापुरतेच. त्यांच्या जीवनांत बुद्धिवादी विवेक हा स्थायी भाव होता.

## प्रेमळ प्रसंग व आठवणी

१९२४ सालीं या महान् पुरुषाला मीं प्रथम जवळून पाहिलें. थोडीशी ओळखहि झाली, आणि तेव्हांपासून गेलीं चाळीस वर्षें या ओळखीचें रूपांतर अनुयायी, साथी, सहकारी व एक विश्वासू मित्र या अवस्थेंतून परिवर्तित झालें आहे. त्यांच्याबद्दल जगांत अनेकांनीं लिहिलें आहे. त्यांची ग्रंथसंपत्ति अनेकांच्या अवलोकनांत आली आहे. म्हणून त्यांच्या जीवनदर्शनाविषयीं फार न सांगतां कांहीं प्रेमळ प्रसंग व संस्मरणीय आठवणी मी सांगत: आहे. १९२५ सालीं पंडितजी पुण्यास आले होते. त्यांचा एक दिवसाचा मुक्काम मजकडेच होता. १९२५ पासून १९४१ पर्यंत जेव्हां जेव्हां ते पुण्यास येत त्या त्या वेळीं त्यांच्या वास्तव्याचा मान ४१९ शनिवार या वास्तूला मिळत असे. त्यानंतर पर्णकुटी अथवा राजभवनमध्यें ते उतरत व तेंहि योग्य आणि स्वाभाविक होतें.

## '४१९ शनिवार' एक तीर्थक्षेत्र

माझें व माझ्या वास्तूचें भाग्य असें कीं, १९२० ते १९५० सालांत काँग्रेसच्या रंगमंचावर ज्या विभूती आल्या व ज्यांनीं भारताच्या इतिहासाला वळण लावलें त्यांपैकीं एक सोडून बाकी सर्वांनीं आपल्या पदरजांनीं ही वास्तु एक तीर्थक्षेत्र केली आहे. न आलेली व्यक्ति म्हणजे गांधीजी. आणि ते आले नाहींत म्हणूनच ही वास्तु आज माझ्याकडे आहे. ते आले असते तर कदाचित् मीं ती त्यांना समर्पण करणें अशक्य नव्हतें. अशीच माझी त्यांच्यावरील श्रद्धा, नेहमींच्या सावधानतेच्या स्वभावाला सोडून होती ! मला वाटतें पंचवीस सालीं पंडितजींचें व्याख्यान पुण्यांत झालें व नंतर ते केरळकडे रवाना झाले. सत्तावीसपासून युवक-चळवळीला सुरुवात झाली व अठ्ठावीसमध्यें मुंबई इलाखा युवक परिषदेचें अधिवेशन पुण्यामध्यें भरलें. या चळवळींत सुरुवातीला मी नव्हतों. पण माझ्या सोयीसाठीं युवक शब्दाची व्याख्या पस्तीस वर्षें वयापर्यंतचा तो युवक अशी करण्यांत आली. हें करण्याचें मुख्य कारण म्हणजे माझीं सामाजिक व समाजसत्तावादी मतें ! या घटनेचे सूत्रधार मेहेरअल्ली हे होते. आणि त्यांच्याबरोबर छगला, नरिमन इत्यादि मंडळी पण होती. १९२८ च्या ऑक्टोबरमध्यें सायमन कमिशनला विरोध, पुणें युवकसंघानें संघटित केला होता. त्या दिवशींचा हरताळ व सभा यांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें. त्याचा दुय्यम परिणाम म्हणून मी पुण्याबाहेर ओळखला जाऊं लागलों. युवकपरिषद टिळक महाविद्यालयांत भरली होती, पंडितजी मजकडे

उतरले होते आणि माझें घर लग्नकार्य नसतांनाहि वऱ्हाडानें भरलें होतें. खालचा चौक चहापानगृह झालें होतें. पूर्वीपासून काँग्रेसचा कुणीहि पुढारी आला तरी अन्य पक्षाच्या लोकांना मी चहाला बोलवीत असे. या वेळींहि श्री. वझे, वा. गो. काळे, अभ्यंकर ही मंडळी उपस्थित होती. आणि मोठी मोकळ्या मनाची चर्चा झाली. या परिषदेनंतर नेहरूंचा आणि माझा प्रसंगाप्रसंगानें पत्रव्यवहार सुरू झाला. त्यांचें शेवटचें पत्र गेल्या मार्चमध्यें आलेलें मजजवळ आहे! १९२८ च्या मे महिन्यांत वसंतव्याख्यानमालेंत पंडितजींचें व्याख्यान झालें त्याहि वेळीं ते मजकडे उतरले होते. व्याख्यानानंतर ते व मी बापू टिळक यांचेकडे जेवावयास गेलों. जेवणानंतर आम्ही दोघांनीं पंडितजींना बंगलोर मेलमध्यें बसविलें आणि परत निघालों तोंच वाटेंत बापू टिळक नव्या पुलाकडे गेले. दुसरे दिवशीं बापूंनीं आत्महत्या केल्याचें वृत्त मीं वाचलें!

## पंडितजींचा राजीनामा

१९२८ च्या डिसेंबरमध्यें कलकत्ता काँग्रेसचें अधिवेशन झालें व त्याच ठिकाणीं अखिल भारतीय तरुणांची परिषद भरली होती. तेथेंहि पंडितजीच अध्यक्ष होते. त्या परिषदेंत मोतीलाल नेहरू समितीचा 'नेहरू रिपोर्ट.' अमान्य करण्याचा व सामाजिक सुधारणेचा जोरानें प्रचार करण्याचा ठराव पास झाला होता. दुसऱ्या ठरावावर मी हिंदीत भाषण केलें होतें आणि पंडितजींनीं माझें अभिनंदन केलें होतें. १९३० सालच्या सत्याग्रहाच्या चळवळींतून पहिली शिक्षा भोगून सप्टेंबर १९३० मध्यें मी सुटून आलों होतों. मी व मेहेरअली असे पंडितजींच्या बोलावण्यावरून अलाहाबादेस जाण्यास निघणार होतों. तिकीट-खिडकीजवळच आम्हांला पंडितजींच्या अटकेची वार्ता कळली. आमचा बेत रहित झाला. आम्हांला बोलावण्यांत पंडितजींचा हेतु काय होता तें मला समजलें नाहीं. परंतु मेहेरअलीच्या म्हणण्याप्रमाणें 'चळवळ खेडेगांवांत अधिकाधिक वाढवावी' हें सांगण्याचा नेहरूंचा हेतु होता. १९३२ जानेवारींत गांधीजी विलायतहून परत येण्यापूर्वीच पंडितजी पकडले गेले होते व त्यांच्या मनामध्यें 'गांधी-आयर्विन करार सरकार पाळत नाहीं आणि सर्वत्र दडपशाही वाढत आहे याला उत्तर दिले पाहिजे, नमून नाश करून घेण्यापेक्षां हात उगारून उखडले जाणें हें क्रांतीच्या दृष्टीनें अधिक फलदायी' असें पंडितजींचें मत मुंबईस समजलें. १९३३ च्या सप्टेंबर महिन्यांत दीड वर्षाची शिक्षा भोगून मी नाशिक तुरुंगांतून पुण्याला आलों होतों. माझ्यामागून दोन-तीन दिवसांनीं पंडितजी सुटले व ते पुण्यास येणार आणि माझ्याकडे उतरणार असा निरोप आला.

पुण्यांत त्या वेळीं प्लेग होता. घरांत उंदीर पडले होते. गांधीजी पर्णकुटींत होते तेव्हां त्यांची व्यवस्था तेथेंच करण्यांत आली. पंडितजी पुण्यास आले आणि त्यांना गांधीजींच्या खोलीत हजर केलें. नेहरू गहिंवरले. गांधीजींच्या जवळ जाऊन बसले. गांधीजींनीं त्यांच्या पाठीवर हात फिरवले. मी म्हणालों, As a good jailor I shall be out of hearing and out of sight राहतों. गांधीजी म्हणाले. You are a wonderful jailor. त्यांच्यांत काय संभाषण झालें. माहीत नाहीं. तथापि सर्व कॉंग्रेस-कार्यकर्त्यांशीं चर्चा व्हावी म्हणून दुसरे दिवशीं संध्याकाळीं पांच वाजतां मी पन्नास एक कार्यकर्ते चहाला बोलावले. सारें घर फिनेलनें धुवून टाकलें. चहापेक्षां धूपावरच अधिक खर्च केला. पंडितजींनीं गांधीजींच्याशीं झालेल्या चर्चेचा उल्लेख न करतां, चळवळ चालवली पाहिजे हें स्पष्ट केलें. मी म्हणालों कीं, हिंदुस्थान राज्यव्यवस्थेचें बिल पार्लमेंटांत पास होईपर्यंत हें चाललें पाहिजे. नेहरू त्याच्याशीं सहमत झाले. पुढील दोन–तीन महिने महाराष्ट्रांत मी व आणखी कांहीं कार्यकर्ते हिंडत होतों. १९३४ च्या जानेवारींत मला अकोल्यास शिक्षा झाली. पंडितजींना कलकत्त्यास दोन वर्षांची शिक्षा झाली. निवडणुका झाल्या. आणि १९३५ च्या सप्टेंबरमध्यें त्यांच्या पत्नीच्या आजारामुळें त्यांची सुटका झाली, पण त्यांची भेट लखनौ कॉंग्रेसच्या अधिवेशनांत झाली. व्यक्तिगत दुःखें सामान्य जनाप्रमाणें कमीजास्त प्रमाणांत त्यांच्या वांट्याला आली होतीं. तथापि जीवनांतला व्यक्तिगत भाव त्यांनीं स्वहस्तें पुसून टाकला होता. त्या अधिवेशनांत व नंतर पंडितजींनीं केलेलीं भाषणें कॉंग्रेसमधील कांहीं ज्येष्ठ व्यक्तींना आवडलीं नाहींत. संघटनेला तडा न जावा म्हणून त्यांनीं राजीनामाहि दिला होता. भारतांत स्वातंत्र्याचा लढा पंडितजींच्यामुळें कसा आकारत गेला हें इतिहासकार सांगतील.

## गांधीवाद पूर्ण मान्य नव्हता

एक गोष्ट मी अनुभवानें सांगू शकतों कीं, गांधीजींची विचारसरणी शंभर टक्के त्यांना मान्य नव्हती. परंतु गांधीजींचें तंत्र नैतिक शक्ति याला वळसा घालून कॉंग्रेस पुढें गेली तर तिचा प्रभाव लुब्ध होईल याची त्यांना जाणीव होती. आणि म्हणून त्यांनीं गांधींचें नेतृत्व, विवेकी श्रद्धेनें मान्य केलें. ४२च्या दंग्याबाबत सरकारनें पुस्तिका प्रसिद्ध केली. त्यांत पंडितजींशिवाय सर्वांना जपानधार्जिणे म्हटलें आहे. पार्लमेंटमध्यें त्या दृष्टीनें मजूर सभासदांनीं समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. यश मिळालें नाहीं. क्लेमंट ॲटलींनीं आपल्या पुस्तकांत लिहिलें आहे कीं,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमांक
नमुकम ६३८६० दि. ...
... २९७७ ... ५१३१६९

' हिंदी पुढारी निर्णय घेतच नाहीं. कुणीतरी निर्णय दिला म्हणजे थोडीबहुत तक्रार करून समाधान मानतात. ' हा आरोप पंडितजींच्या बाबतींतहि खरा आहे. मात्र पंडितजींची भूमिका निर्णयाची जबाबदारी टाळावी अशी नव्हती, तर कुठल्याहि निर्णयानें जय अगर पराजय अशी भावना निर्माण होऊं नये ही त्यांची एक जीवन-श्रद्धा होती. मला वाटतें त्यांच्या जीवनावर बुद्धधर्माचा मोठा परिणाम झाला होता. याचा अर्थ हिंदु धर्माच्या ते विरुद्ध होते असा नाहीं. ते कुठल्याच धर्माविरुद्ध नव्हते. सर्व धर्मांतील अवडंबर व अविवेक याविरुद्ध त्यांचा कटाक्ष असे. १९५० सालीं राजघाट तयार झाला. त्या वेळीं दोन ऑक्टोबर रोजीं मोठा समारंभ करण्याचें ठरलें होतें व समाधीच्या चारी बाजूंना तुळशीचीं झाडें लावावयाचीं होतीं. पैकीं एक झाड डॉ. राजेंद्रबाबू लावणार होते. एक देविदास गांधी, एक मी व पंडितजींनीं लावावें--नाहीं लावलें तर कुणी लावावें याबद्दल अधिकाऱ्यांनीं चिंता व्यक्त केली. मी म्हणालों, ' तुम्ही कांहीं काळजी करूं नका. ' समाधीकडे जातां जातां मी पंडितजींना म्हणालों कीं, ' तुळशीचें एक झाड तुम्हीं लावावें हें मला उचित दिसतें. ' पंडितजी म्हणाले, ' why not ! ' आणि त्यांनीं तें झाड लावलें. पुढें अनेक ख्रिश्चन व मुसलमान पत्रांतून त्यांच्यावर टीका झाली. तेव्हां ते मला म्हणाले, ' पहा तुझें ऐकलें त्याचा परिणाम ! ' मी म्हणालों, ' निधर्मी याचा अर्थ अधर्मी नव्हे. सर्वधर्मी असा अर्थ मी करतों. ' तथापि सोमनाथ प्रतिष्ठापनेच्या वेळीं मात्र ते नाराज होते आणि राष्ट्रपतींनीं तें काम करूं नये अशी इच्छाहि त्यांनीं प्रदर्शित केली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं ' मी गाडगीळांना वचन दिलें आहे, तें पूर्ण करीन, वाटल्यास राष्ट्रपतिपदाचा राजीनामा देईन असें सांगितलें, आणि शेवटीं शरदृतूतील वादळ आकाशांतच नाहींसें होतें तसें हें संभाषण संपलें !

## प्रेमळ मैत्री दिसणार नाहीं.

राजकारणांत अनेक मतभेदाचे प्रसंग आले. त्यांचे उल्लेख अन्यत्र झाले आहेत; पुढेंहि येतील. अनुयायी, स्नेही, साथी मंत्रिमंडळांतलि सहकारी, त्यांच्या अधिपत्याखालीं राज्यपाल व नंतर त्यांच्या कारभारावरलि टीकाकार या सर्व अवस्थेमध्यें मतैक्याचे आणि मतभेदाचे अनेक प्रश्न आले. एका प्रसंगीं तर त्यांनीं माफी मागून आपल्या उदार चारित्र्याचा परिचय करून दिला. सरदार वल्लभभाईंनीं मृत्यूपूर्वी तीन दिवस आधीं मला बोलावून वचन मागितलें. पण काय वचन हवें तें सुरुवातीला सांगितलें नाहीं. सरदार मृत्युशय्येवर होते म्हणून मी

वचन देतों असें म्हणालों. आणि नंतर सरदार म्हणाले, ' तुझे व पंडितजींचे मतभेद कितीहि तीव्र असले तरी आणि ते जाहीर केलेस तरी हरकत नाहीं. पण पंडितजींना तूं सोडूं नको. ११।१२।१९५० रोजीं हें वचन मीं त्यांना दिलें आणि पंडितजींच्या निधनापर्यंत मीं तें पाळलें आहे. स्पष्ट बोललों आहे. सत्य बोललों आहे आणि भुवनेश्वरी विकल स्थितींतहि पंडितजींनीं माझें अभिनंदन केलें आहे. ता. १७ मे रोजीं सकाळीं मीं त्यांना भेटलों. वास्तविक त्यांना कष्ट होतील म्हणून मी जवळ जात नव्हतों. टक लावून ते मजकडे पहात होते. म्हणून काँग्रेस पक्षाचे चिटणीस रघुनाथसिंग म्हणाले, ' तुम्ही त्यांना भेटा. ' मी गेलों. हात मिळविले आणि ' तुमची तब्येत चांगली राहो ' एवढें बोलून मी वळलों. पंडितजींना अधिक बोलावयाचें होतें असें वाटलें. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती. तीच प्रसन्नता, तेंच हास्य, तोच स्वाभिमानी विनय, तीच प्रेमळ मैत्री यापुढें आतां जगाप्रमाणें मलाहि दिसणार नाहीं. मी वंचित झालों आहे. मैत्रीधन हें सर्वश्रेष्ठ असें मी मानतों आणि या धनाचा वांटा मोठ्या प्रमाणांत मला ईश्वरानें दिला याबद्दल मी त्या नियंत्याचा ऋणी आहें. पंडितजींचें व्यक्तित्व पूर्णपणें वर्णन करणें शक्य नाहीं. आणि झालें तरी ' एतावान् अस्य महिमा ' हा त्याचा महिमा आहे. ' अतो जायान् पुरुषः ' या महिम्यापेक्षां तो मोठा आहे. अधिक काय लिहूं !

✕✕✕

: सलरींतील काका :

: ५ :

# गोरोबा कुंभाराची थापटी

" आणि याच सभामंडपांत नामदेवांनीं कीर्तन केलें. महाराष्ट्रांतील सारे संत श्रोते होते. गोरोबाकाकांनीं प्रत्येकाच्या डोक्यावर थापटी मारून नामदेवासुद्धां सर्वांना कच्चीं मडकीं ठरविलें." हे शब्द तेथील पुजारी व मार्गदर्शक अशी द्विविध भूमिका करणारांनीं उच्चारतांच माझ्या साऱ्या अंगाला घाम फुटला. आणि सभोंवार पाहूं लागलों कीं, कोणी हातांत गोरोबाकाकासारखी थापटी घेऊन तर उभा नाहीं ना? कुंभारी मुद्रा असलेला अगर वेष धारण केलेला कोणी इसम त्या घोळक्यांत दिसेना. परंतु शतकापूर्वी हाच परिसर आपल्या वास्तव्यानें पुनीत करून आपल्या वाणीनें पुण्यमय करून गेलेल्या गोरोबांची मूर्ति शारीरिक नसली तरी अलौकिक दृष्टीनें त्या सभामंडपांत वावरत आहे असें वाटूं लागलें. पोलिसांची धाड आली म्हणजे कागदपत्रांची लपवालपवी करण्याचा अनुभव चाळीस वर्षांच्या राजकीय जीवनांत होता. त्याच अनुभवाला अनुसरून मनाच्या दिवाणखान्यांत विकृत व विसंगत विचारांचे पडलेले अस्ताव्यस्त कागद मनांतल्या मनांत लपविण्याचा प्रयत्न करूं लागलों. न जाणों, गोरोबाकाका मनाची झडती घेतील आणि डोक्यावर थापटी मारून, ' हा नरू कच्चें मडकें आहे, ' असें जाहीर

करतील ! आणि चाळीस वर्षांत कांहीं कष्टार्जित, कांहीं यदृच्छया, कांहीं प्रसिद्धीद्वारां मिळालेली याची प्रतिष्ठा अयोग्य आहे, असा अभिप्राय देतील. तें सुवर्ण नाहीं, पितळ आहे असा धर्मकांटी निर्णय देतील !

## मनांत खळबळ पण चेहऱ्यावर

अशा अनेक गोष्टी व घटना माणसानें केलेल्या असतात कीं तो त्याला अगदीं मनाच्या भुयारांत लपवून ठेवीत असतो. धर्मशास्त्र सांगतें कीं, चित्त, वित्त व मैथुन कोणालाहि सांगूं नये. पण लोकशाही युगाला हा वर्तनक्रम विसंगत वाटतो. लोकशाहीचें जीवन तत्त्वप्रसिद्धि व प्रचार हीं असल्यानें, केलेलें सांगावें लागतें, न केलेलें मिरवावें लागतें व तें जें करणार त्याची जाहिरात आत्मविश्वासानें करावी लागते. या गोष्टी करतांना मनुष्य संभ्रमित होतो व जें अत्यंत गुप्त तें चव्हाट्यावर व चौकांत सांगत जातो; व जें कु-कृत्य असेल त्याची जाहिरात करून त्या जाहिरातीला प्रायश्चित्ताचें स्वरूप देऊन त्यांतहि मोठेपणा तो मिरवीत असतो. मी लोकशाही कृतीचा खरा, त्या धर्माचा अनुयायी खरा, तरीसुद्धां माझ्या मनामध्यें फार मोठी राखीव व गुप्त गंगाजळी असावी त्याप्रमाणें अनेक विचारांचा संग्रह–चांगला व वाईट–आहे. आणि तो जर या अ-शरीरी गोरोबाकाकाला दिसला तर लौकिकदृष्ट्या कांहीं होणार नाहीं हें खरें; पण मनाची मान खालीं पडेल, आणि अभिमानाचें हाड मोडून पडेल ! या व असल्या विचारांनीं माझ्या मनामध्यें खळबळ उडवून दिली. पण नेहमींच्या धूर्तपणानें जणूं कांहीं झालेंच नाहीं व सराईत निढावलेल्या वृत्तीनें मी त्या जमलेल्या मंडळींना त्या वास्तूचा इतिहास विचारीत होतों.

## नवा महाराष्ट्रधर्म

हा प्रसंग दि. १० जून ६४ सालीं मुक्काम तेर, जिल्हा उस्मानाबाद येथें सकाळीं ११ च्या सुमारास घडला. उस्मानाबाद येथील समाजप्रबोधन संस्थेतर्फे व्याख्यान देण्याचें मीं कबूल केलें होतें. त्यासाठींच व्याख्यानाला गेलों होतों. जातांना वाटेंत तुळजापूरच्या भवानीचें दर्शन घेण्याचें बरोबरच्या मंडळींनीं ठरविलें. मीं पूर्वी दर्शन घेतलेलें असल्यानें प्रवेशद्वारींच उभा राहून नमस्कार केला व जवळच्या उडपी उपाहारगृहांत चहाला गेलों.

सारा महाराष्ट्र आतां या उडपी ब्राह्मणांनीं उपाहारगृहाच्या क्षेत्रांत व्यापून टाकला आहे. भांडीं घासण्यापासून गल्ल्यावर बसणारापर्यंत सारी मंडळी उडपी दिसून येतात. व्यावहारिक फायद्यासाठीं कांहीं मंत्र्यांना अगर त्यांच्या नातेवाइकांना

हे भागींत घेतात असा लौकिक कानावर आला आहे. पाणिनीनें श्वा, युवा, मघवा यांना एका सूत्रांत आणलें; तीच किमया आधुनिक महाराष्ट्रांत अर्थ अगर पैसा, स्वार्थ अगर फायदा साऱ्या जातीजमातींना एकत्र आणीत आहे. जुन्या तत्त्वांना समाधि देऊन त्यावर वैयक्तिक स्वार्थाची पूजा हाच आज महाराष्ट्रधर्म झाला आहे.

आजचे उस्मानाबाद (पूर्वीचें धाराशिव) आतां बरेंच बदललें आहे. पण मुक्कामाच्या ठिकाणीं आलेली कार्यकर्ती मंडळी तींच दुःखें, तींच गाऱ्हाणीं, तोच भ्रष्टाचार, तीच गटबाजी यांना वाचा फोडीत होती. गेलीं दोन वर्षें सर्वत्र मी तेंच ऐकत आहे. पण समाजप्रबोधन संस्थेच्या कार्यांत अग्रेसर झालेल्या तरुण मंडळींच्या उत्साहाकडे पाहून महाराष्ट्राच्या भविष्यकालाबद्दल आशा वाटूं लागली. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या मनाचीं वस्त्रें शुद्ध विचाराचीं होतीं. त्यांत व्यक्तिगत स्वार्थ नव्हता; जातीयता नव्हती.

## मंत्र्याबरोबर धोरण बदलतें

दुपारच्या चर्चेत दुसऱ्या दिवशींचा कार्यक्रम ठरवितांना तेरला जायचें का? तेथें गोरोबाकाका कुंभाराची समाधि आहे व अंतर अवघें दहा मैलांवर आहे. रस्ता साधारण आहे, पण जीपनें व्यवस्था करूं असें सांगण्यांत आलें. मनानें हुषार चिटणीसाप्रमाणें मागील संदर्भ पुढें ठेवला व मी तें लागलींच मान्य केलें.

रस्त्यापासून तेर गांवापर्यंतचा रस्ता करावा असें आश्वासन सध्यांच्या कारकीर्दीला अनुसरून लोकांना दिलीं होतीं. हैद्राबादला पोलीस कारवाईनंतर स्थापित झालेल्या राज्यव्यवस्थेनें रस्त्याचा कांहीं भाग तयार केला होता. मंत्री बदलले म्हणजे काय बदलतें? साहित्यांत कोणीहि कवि असला तरी वृत्त बदलत नाहीं. राजकारणांत मंत्र्याबरोबर धोरण बदलतें; कारण धोरण म्हणजे मंत्र्यांचा खासगी पोशाखासारखा विषय होतो.

## काँग्रेस–अमलाची खूण

आम्ही जीपमधून प्रवास करीत होतों. जीपला मार्ग लागत नाहीं–सरळ अगर वाकडा, कोणताहि चालतो. स्थितप्रज्ञाप्रमाणें उंच व सखल प्रदेशांतूनसुद्धां ती निर्धास्तपणें जाते. सुमारें १२ वाजतां आमची जीप तेर गांवांत प्रवेश करती झाली. तेर महाराष्ट्रांत आहे; काँग्रेसच्या अमलाखालीं आहे. ह्याची खात्री प्रवेश करतांच पटली. पडकीं घरें, राज्यकर्त्यांच्या वैराग्यवृत्तीची साक्ष देत

होतीं. वाकडेतिकडे रस्ते त्यांच्या डावपेचाची साक्ष देत होते. मोठमोठीं बोध-वाक्यें कोणी न पाहील अशा ठिकाणीं चितारून त्यांच्या लोकशिक्षणाची कळकळ आमच्या नजरेस आणीत होतीं.

वास्तविक तेर हें प्राचीन नगरराजधानी होतें; आणि असें सांगतात कीं, येथील व्यापारपेठ जगभर प्रसिद्ध होती. आणि रोमपर्यंत ह्या शहराची कीर्ति गाजली होती. गांव तेर नदीच्या तीरावर वसलें आहे. ह्या नदीवर आतां तेर गांवापासून कांहीं मैलांच्या अंतरावर धरण बांधण्यांत आलें आहे. एवढी आधुनिक कामगिरी सोडली तर सर्व कांहीं जीर्ण व उद्ध्वस्त आहे. माणसें अस्वस्थ आहेत. तथापि तेरचें नांव पुराणवस्तुसंशोधन खात्यांत प्रामुख्यानें झळकतें आहे. आणि त्या ठिकाणीं इ. स. ८०० ते १२०० पर्यंतच्या व त्याहि पूर्वींच्या संस्कृतीच्या दुर्मिळ वस्तु पाहण्यास मिळाल्या. त्या वस्तूंच्यावर छापलेले निबंधहि श्री. रामलिंग यांनीं मला दाखविले. कांहीं खापराचे तुकडे, कांहीं हस्तिदंती बाहुल्या यांच्यावर खर्चीं पडलेली विद्वत्ता पाहून थोडा हेवा वाटला. कांहीं वस्तूंचें व व्यक्तींचें नशीब त्यांच्या नाशानतंर उदयास येतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं.

## गोरोबांची समाधि

या वास्तूचें पूर्ण निरीक्षण केल्यानंतर गोरोबाकाका यांच्या समाधीकडे जावयाच होतें. ती वास्तु नदीच्या पलीकडे आहे, आणि म्हणून जीपमधून आम्ही तेरच्या पैलतीराला गेलों आणि त्या वास्तूंत प्रवेश केला. गोरोबा हे व्यवसायानें कुंभार होते, आणि त्यांचें उत्पादन श्रेष्ठ मानलें जात असे. प्रत्येक मडकें कच्चें का पक्कें हें हातांतील लाकडी थापटीनें ते पारखीत असत. त्यांची समाधि एका मोठ्या प्राकारांत आहे. अतिशय जुनें शिवमंदिर तेथें आहे. त्याच्या रचनेवरून अदमासें १५०० वर्षांपूर्वीचें तें असावें असें वाटतें. तेथें पुजारी होते, पण इतिहासाची माहिती कोणींच दिली नाहीं. आतां आम्ही स्वातंत्र्यांत इतिहास निर्माण करणारे झालों आहोंत, म्हणून इतिहास हा विषय आम्हांला नकोसा झाला आहे. पुढील पिढीला अधःपाताचा इतिहास मोठ्या प्रमाणावर शिकण्यासाठीं आज आम्ही ग्रामविकासापासून आंतरराष्ट्रीय धोरणापर्यंत तो निर्माण करीत आहोंत.

## थापटी सांपडली नाहीं

एका गृहस्थानें सभामंडप १५० वर्षांपूर्वी बांधला, असा इतिहास सांगितला. तो प्रकार थोडासा खरा असावा असें वाटलें. गोरोबाकाकांची

थापटी ठेवली आहे का असें विचारलें व तशी मिळाल्यास स्वतःच्या डोक्यावर मारून घेऊन खांद्यावरील मडकें कच्चें का पक्कें तें पाहणार होतों. आपलाच पेपर आपणच तपासायचा असा हा प्रकार होता. तथापि ती थापटी तेथें नव्हती व कोठेंहि नाहीं असें कळलें. माझ्या मतें ती आजच्या युगांत सुवर्णाची परीक्षा जशी विशिष्ट दगडावर घासून करतात, त्याप्रमाणें देशभक्तीचें सुवर्ण किती नंबरी शास्त्रीय व साहित्यिक सुवर्ण किती नंबरी हें पाहण्याची ती कसोटी ठरली असती. पण तिच्या अभावीं एक फायदा होत आहे, हेंहि मनांत आलें. किती गाढव गोपाळदास होत आहेत, किती कवडे कवि ठरत आहेत, साहित्यिक खद्योत रश्मी ठरत आहेत. गुणावर जर समाजाची धारणा ठेवली तर समाज चालणारच नाहीं; आणि म्हणून विषमता ही समाजाच्या धारणेचें आणि एका दृष्टीनें प्रगतीचें कारण ठरत आहे. सर्व समाधानी व कोणीच असंतुष्ट नाहीं, तर समाजाचें मन विचाराविन्मुख होईल.

## परीक्षेंत डोकें पक्कें ठरलें !

कांहीं खळबळ, कांहीं निवळ हा समाजाच्या प्रगतीचा कायदा आहे. आणि असे विचार मनांत करीत असतांना पुन्हां तेर नदीच्या पैलतीराला आलों. नंतर २००० वर्षांपूर्वीचें पडीक अवस्थेंत असलेलें त्रिविक्रममंदिर पाहण्यास गेलों ! मंदिरापुढील रस्ता जीप जाईल एवढा होता. रस्त्यापुढील भागांत फक्त उंच पायऱ्या दिसत होत्या. आणि त्या पायऱ्यांवर मृदु मातीनें ताठरपणें कब्जा केला होता. त्यांतून वर येणाऱ्या गवतानें तिच्या पराक्रमाचें निशाण दाखविलें होतें. बाजूच्या गल्लींतून चालत जाऊन त्या मंदिराच्या लेखाच्या सुरुवातीस सांगितलेल्या सभामंडपांत शिरलों. आपलें डोकें थापटीनें अदृश्य व अ-शरीरिणी अशा कोण्या व्यक्तीनें थापटलें तर काय होईल ह्या भीतीनें कंप सुटला आणि मनांतील पापें मनांतच दडविण्याचा, लपवून ठेवण्याचा विक्रम चालू असतांनाच मुख्य मूर्तीकडे जाण्यास निघालों. आणि कृतकृत्यांच्या जाणिवेनें मस्तक नम्र करून सुद्धां त्या साडेतीन फूट उंचीच्या दारांतून जातांना डोक्याला लागलेंच ! पण तें फुटलें नाहीं. या जाणिवेनें लागल्याचें दुःख विसरलों. गोरोबाकाकांच्या परीक्षेंत माझें डोकें पक्कें ठरलें, असा उत्साही आत्मविश्वासी विचार मनांत येऊन गेला. त्या प्रवेशद्वारांतून आंत गेल्यावर भव्य मूर्ति—वामनावताराची—डोळ्यांसमोर दिसूं लागली. एक पाय गुडघ्यापर्यंत उभा, एक मांडी घातलेला आणि त्याखालीं दोन पावलांत पृथ्वी,

आकाश हें व्यापून तिसरें पाऊल बळीराजाच्या डोक्यावर ठेवल्याचा प्रसंग कोरला होता. पृथ्वीवर मी उभा होतों. आकाश भोंवतीं घटाकाशाप्रमाणें दिसत असलें तरी तें होतें. बळीचें चित्र छिन्नभिन्न झालेलें दिसत होतें. मनांत म्हटलें कोणीतरी साम्यवाद्यानें अगर शे. का. पक्षवाल्यानें तें शेकलें असावें.

आजहि वामनमूर्ति राज्यकर्ते पृथ्वी, आकाश व्यापूं पाहात आहेत, बळी-राजाला चिरडूं पाहात आहेत, पण तो आतां चिरडला जाणार नाहीं. तो आतां जागृत झाला आहे. आतां त्याचें स्थान वामनाचे खांदे हें झालें आहे. एकावर शेतकरी व एकावर मजूर असें ते बसूं पाहात आहेत आणि ते एकदां बसले कीं, मग आधुनिक त्रिविक्रमाचा अवतार होणार आहे.

या मुख्य मूर्तीपुढें दोन पावलें दिसत होतीं, आणि त्यावरील कृष्णाची मूर्ति खालीं जमिनीवर ठेवली होती. अप्रतिम शिल्पाचा तो एक नमुना होता. चार फूट लांब असलेली मूर्ति, भगवान् श्रीकृष्णाचें वर्णन जसें भारतांत व पुराणांत दिलें आहे त्याप्रमाणें कवचकुंडलधारी अशी होती. हाताचीं नखें चकाकत होतीं. काळ्या पाषाणांतलि तें शिल्प होतें. पण असें सांगण्यांत आलें कीं कांहीं शतकांपूर्वी पायांतून तें निराळें झालें. पुन्हा २०० वर्षांपूर्वी तें उभें करण्याचा प्रयत्न केला. पुन्हा भंग झाला आणि हा शेषशायी भगवान् आतां धराशायी झाला आहे.

## उभारणीचें मूलभूत तत्त्व

साऱ्या व्यक्तित्वाची उभारणी मूलभूत तत्त्वावर असते. तीं पावलें भक्कम असलीं तर व्यक्तित्व अष्टविध प्रकारें शोभतें. त्याच्या ठायीं षोडश कलांचा विकास दिसून येतो. अन्यथा ते धराशायी होतें. तीच अवस्था त्या मूर्तीची झाली होती.

साऱ्या राज्याचा, साऱ्या समाजाचा पाया श्रमजीवी जनता आहे. राज्य त्यापासून अलिप्त झालें, म्हणजे तें कोलमडतें हाच संदेश त्या मूर्तिरहित पाव-लांनीं व पदरहित मूर्तीनीं मला दिला. हजारों वर्षांपूर्वीच्या घडलेल्या घटना दिक्कालातीत आहेत, हा विचार सहज मनामध्यें आला. व्यक्तीप्रमाणें वस्तु पण क्षणभंगुर असतात. इतिहास असें सांगतो कीं, राजस्थानच्या वाळवंटांत पूर्वी समुद्र होता आणि सारें ऑस्ट्रेलिया खंड हें समुद्र आटून वर आलें, म्हणून उद्यां काय होणार ह्याचें भविष्य कोण करील ? मात्र वर्तमानक्षणीं जें करावयाचें

तें करतांना मानवी मनाचें व अस्मितेचें मडकें कच्चें नसावें. नाहींतर, तें भंग-लेल्या मूर्तीप्रमाणें व्हावयाचें.

पुन्हां त्या लहानशा दारांतून मंडपांत आलों, आणि तेव्हांहि थोडा भीतच होतों कीं, कोणी डोक्यावर थापटी मारणार नाहीं ना ? आणि जेव्हां त्या मंदिरांतून गल्लींत, आणि गल्लींतून रस्त्यावर उभ्या असलेल्या जीपमध्यें बसलों, त्या वेळीं क्षणभर असा विचार आला कीं, विद्यमान सार्वजनिक जीवनांत नाच-णाऱ्या व नटणाऱ्या व्यक्तींच्या नैतिक योग्यतेची परीक्षा घेणारी गोरोबा काका-सारखी व्यक्ति जर भारताला मिळेल तर किती चांगलें होईल ! आणि असले विचार करतां करतां पुढें धुरळा, मागें धुरळा, या लवाजम्यांत मुख्य रस्त्यापर्यन्त जीपनें आलों.

* * *

: सनदींतील काका :

: ६ :

# नेहरू-मंत्रिमंडळांतील कांहीं खळबळीचे प्रसंग

पं. जवाहरलाल नेहरू हे भारताच्या स्वतंत्र राष्ट्राचे पहिले पंतप्रधान होते. आणि त्यांचें मंत्रिमंडळ तारीख १५ ऑगस्ट १९४७ रोजीं विधिपूर्वक अधिकारारूढ झालें.

त्या पहिल्या मंत्रिमंडळांतील चौदा सभासदांत मी एक असण्याचें भाग्य मला लाभलें होतें. आज त्या चौदांपैकीं मी, जगजीवनराम व भाभा हे हयात आहेत; बाकी सर्व दिवंगत झाले आहेत. या चौदानंतर अनेक आले व अनेक गेले. त्याचप्रमाणें गेल्या सतरा वर्षांत मंत्रिमंडळें आलीं व गेलीं. अन्य देशांत जें अस्थैर्य दिसून आलें तें भारतांत दिसून आलें नाहीं. मंत्रिमंडळें गडगडलीं असें झालें नाहीं. कांहीं सांधेमोड झाली. कांहींना वगळलें गेलें, कांहींना जोपासलें गेलें. तथापि सापेक्षेनें सातत्य व धोरणविषयक सुसंगतपणा भारतीय मंत्रिमंडळाच्या बाबतींत जितका दिसून येतो तितका या सतरा वर्षांत अन्य राष्ट्रांतून दिसून येत नाहीं.

या घटनेचें रहस्य, भारतांतील स्वातंत्र्ययुद्धाची कहाणी, कॉंग्रेस पक्षांतील गांधी-तत्त्वज्ञानाचें श्रेष्ठत्व, कॉंग्रेस-जनांतील तत्कालीन त्यागप्रवृत्ति या सर्वांची दखल घेतल्याशिवाय समजणार नाहीं. त्याचबरोबर हें स्थैर्य व थोडीशी कां होईना प्रगतिसन्मुखता जी दिसून येते ती पंडितजींच्या सुस्वभावामुळें, सौजन्यपणामुळें व सामान्य-

पणें न सुटणाऱ्या संयमामुळें. याचा अर्थ असा नव्हे कीं मंत्रिमंडळाच्या चर्चेंत कधींहि खळबळजनक प्रसंग आले नाहींत; ते जरूर आले. प्रवाही नदींत खळबळ अनिवार्य असते, तसेंच कार्यरत मंडळींच्या चर्चेंत मतभेद, खटके हे अपरिहार्य असतात. लोकशाहीचें लक्षण म्हणजे निवडणुकीपासून मंत्रिमंडळापर्यंत मुक्त व मोकळी चर्चा, बहुमतानें निर्णय; मात्र त्यानंतर तो सर्वांचा निर्णय ही भावना. ज्या ठिकाणीं एकानें सांगावें आणि सर्वांनीं ऐकावें हें निरपेक्षपणें असेल तर तें लोकशाही जीवन नव्हे, लोकशाही नेतृत्व नव्हे व लोकशाही अनुयायित्व नव्हे. पांच वर्षांच्या मंत्रिमंडळाच्या जीवनांत पंडित व पटेल दोघांशीं खटके उडाले. पटेल यांच्याशीं आर्थिक बाबतींत व पंडित यांच्याशीं राजकीय व विशेषतः पाकिस्तानविषयक धोरणाबाबत. सामान्यपणें पंडितजी हिंदूंकडून औदार्य, औचित्य व त्यागाची अपेक्षा करत व याच गुणामुळें पाकिस्तान निर्माण झालें याचा विसर हिंदूंना पडणें कठीण होतें. मरहूम महंमदअल्ली एकदां असें म्हणाले कीं, मुसलमानाची जातीयता म्हणजे राष्ट्रीयत्व व हिंदूचें राष्ट्रीयत्व म्हणजे धूर्त जातीयता. कदाचित् पंडितजींचाहि असा समज असणें असंभवनीय नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवून त्यांच्या हातून जें झालें तें पाहिलें पाहिजे.

## महात्माजींच्या वधानंतर

तीस जानेवारी अठ्ठेचाळीस रोजीं गांधींचा वध झाला. सत्तेचाळीसच्या अखेरीच्या तीन-चार महिन्यांत जवाहरलालजी हे जातीय हिंदुवाद्यांना हिंदु राज्य स्थापन करावयाचें आहे असें गर्जून सांगत होते. मीं त्यांना लिहिलें कीं ही गोष्ट खरी नाहीं. सरकार हिंदूंचें रक्षण करत नाहीं तेवढ्यापुरतें ते बोलत आहेत. जातीय मुसलमानांबद्दल तुम्ही बोलत नाहीं. याचा परिणाम विपरीत होईल असें मला वाटतें !

आणि एका पंजाबी हिंदूनें २० जानेवारी १९४८ ला गांधींच्यावर बॉंब टाकला. तीसला गोडसे ह्यानें गांधींचा वध केला. ३१ जानेवारी व एक फेब्रुवारी रोजीं गव्हर्नरांची सभा झाली. त्या सभेला सरदारसाहेबांनीं मला हजर राहण्यास सांगितलें व तेहि हजर होते. हिंदु सभा व आर. एस्. एस्. बद्दल सक्त धोरण ठेवावें असाच विचार तेथें मांडला गेला. दुसरे दिवशीं मंत्रिमंडळाची बैठक झाली. शामाप्रसाद मला आधीं भेटले होते. ते बेचैन झाले होते. हत्यारा प्रांतिक हिंदुसभेचा चिटणीस होता. या विषयाची चर्चा झाली व मीं असा दृष्टिकोन मांडला कीं ज्यानें कृत्य केलें व त्याला ज्यांनीं सहाय्य केलें

त्यांच्या विरुद्ध कडक व कायदेशीर योजना व्हावी. पण अमुक संस्थेचा तो सभासद आहे म्हणून त्या संस्थेवर व तिच्या अन्य सभासदांवर कारवाई व्हावी हें अयोग्य आहे. असें झालें तर ब्रिटिशांचीच नीति आपण चालवीत आहोंत असें होईल. मी महाराष्ट्रांतील हिंदुसभेच्या लोकांना ओळखतों. ते गांधीविरोधी आहेत. कॉंग्रेसला देशाचा शत्रु मानतात. पण राजकीय खून व्हावा अशा मताचे ते नाहींत. आणखी कांहीं माणसें रागावून बोललीं. थोडेंसे पंडितजी पण प्रक्षुब्ध झाले. तथापि मीं त्यांना पुन्हां सांगितलें कीं हिंदुसभेस बेकायदेशीर ठरविणें व तिच्या पुढाऱ्यांना अटक करणें यांत राजकीय सूड आपण घेत आहोंत असें होईल. पक्षाविरुद्ध सूड निवडणुकीद्वारें घ्यावयाचा असतो. शामाप्रसाद मुग्ध राहिले. सरदारांनीं असें म्हटलें कीं माझ्या विचारसरणींत बरेंचसें सत्य आहे आणि मग पंडितजींची अस्वस्थता निमाली. पुढें काय झालें हें सर्वज्ञात आहे.

१९४९ च्या अखेर अखेर पूर्व पाकिस्तानांत हिंदूंची कत्तल सुरू झाली व जवळ जवळ हैद्राबादच्या धर्तीवर पोलीस ॲक्शन करण्याचें ठरत होतें. तथापि त्या कामीं कारवायी केल्यास भारतांत दंगल माजेल असा अभिप्राय सेनापतींनीं दिल्यामुळें ती गोष्ट स्थगित झाली. ही दुर्दैवाची गोष्ट आहे व त्याचे परिणाम आज आपण भोगत आहोंत. ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं लियाकत अल्लीला तडजोड करण्यास सांगितलें व एप्रिल १९५० मध्यें लियाकत अल्ली दिल्लीस आले. तडजोडीचा ड्राफ्ट तयार झाला व सकाळीं १० वाजतां मंत्रिमंडळापुढें तो मांडण्यांत आला. त्या ड्राफ्टमधील दोन कलमें अशीं होतीं कीं, त्यामुळें मुसलमानांना राखीव जागा, राखीव प्रतिनिधित्व व राखीव नोकऱ्या मिळणार होत्या. त्याच्या बदल्यांत तशीच व्यवस्था पाकमध्यें व्हावयाची होती. मीं त्याला विरोध केला व मिंटोसाहेबांच्या कारवाईपासून घटना-समितीच्या निर्णयापर्यंत कॉंग्रेसचा विचारप्रवाह कसा वाहात आहे व त्याविरुद्ध आपण कसें वागत आहोंत हें स्पष्ट करून दाखविलें. नवें राष्ट्र उभें करीत असतांनाच त्या अमृतांत विघटनेचें विष या योजनेनें टाकलें जाणार आहे. माझ्यानंतर गोपाळस्वामी म्हणाले कीं, "गाडगीळ म्हणतात त्यांत मर्म आहे. मी ते दोन पॅरे री-ड्राफ्ट करतों." मी म्हणालों कीं, "No South Indian cleverness will do, they must go lock, stock and barrel." ते सर्व काढून टाकले पाहिजेत." त्यावर पंडितजी प्रक्षुब्ध झाले व म्हणाले कीं, "मी लियाकत अल्लीशीं करार करून चुकलों आहें." मी म्हणालों, "मंत्रिमंडळानें मान्य केल्याशिवाय तो वैध नाहीं हें सांगितलें

असेलच." ते 'होय' म्हणाले. मी म्हणालों, "माझी मान्यता नाहीं. I will be out of this." सरदारसाहेबांनीं दुसऱ्या दिवसापर्यंत सभा तहकूब करावी अशी सूचना केली व आम्ही घरीं परतलों. सरदारसाहेबांनीं मला बोलावणें पाठविलें व त्या योजनेंतील धोका माझ्या मताप्रमाणें मीं त्यांना सांगितला-- "आतांच नाहीं म्हणा म्हणजे पुढील कटकटी वांचतील. पसंत नसलेली मुलगी केली म्हणजे कांहीं कालानें ती टाकणें कठीण जातें." आणि पटेल हंसले. गोपालस्वामींचा तर्जुमा त्यांनीं अमान्य केला व दोन्ही पॅरिग्राफ गाळा असें पंडितजींना लिहिलें व मला कळविलें. दुसरे दिवशीं पंडितजींनीं शांतपणें माझ्याकडे पाहिलें व "आणखी कांहीं सांगावयाचें आहे काय?" असें विचारलें. मी कांहीं सांगणार होतों, पण पटेलांनीं सांगितलें कीं, "आतां ठीक आहे. चर्चा नको." मीं तें ऐकलें. पंडितजींचें माझ्याबद्दल काय मत आहे तें मी सांगूं शकत नाहीं. पण महत्त्वाचा प्रश्न निघाला म्हणजे माझे विचार ते अधिक लक्षपूर्वक ऐकत असा अनुभव त्यांच्या मृत्यूपर्यंत मला येत होता.

## पाणी–वांटपाचा खटका !

पाकिस्तान प्रत्येक बाबतींत भांडेल, मग ती अवमूल्यनाची असो अगर पाण्याच्या वांटपासंबंधीं असो; निर्वासितासंबंधीं असो, अगर देण्याघेण्याच्या संबंधीं असो.

त्यांच्या प्रतिनिधींच्या बोलण्यांत अहंकार व शिष्टपणा ओतप्रोत असे. कांहीं परिषदांमधून भारतीय मंत्र्यांना अवमानित केलें होतें.

१९४७ च्या ऑगस्टमध्यें वांटणी झाली होती. त्या वेळीं रावी नदीच्या पाण्याबद्दल एक करार झाला होता व तो मार्च १९४८ मध्यें समाप्त झाला होता. दरम्यानच्या काळांत पाण्याची किंमत पाकिस्ताननें भारताला द्यावयाची होती. ती त्यांनीं दिली नाहीं व कराराची मुदत: संपली म्हणून माझ्या सांगण्यावरून पंजाब सरकारनें पाणी बंद करूं, अशी नोटीस दिली होती. ता. ३ मे ४७ रोजीं दिल्ली येथें पाकिस्तानचे प्रधान व अन्य अधिकारी गुलाम महंमद यांच्या नेतृत्वाखालीं चर्चेस आले होते. भारतातर्फे मी मुख्य व आंबेडकर सल्लागार व अन्य अधिकारी असे होतों. ३ तास चर्चा झाली. मीं माझें म्हणणें सोडलें नाहीं. पण उठण्यापूर्वीं असें म्हणालों कीं, "५ वर्षांत तुम्ही दीपालपूर क्षेत्रांत पाणीपुरवठ्याची अन्य सोय करावी व तोंपर्यंत आम्ही क्रमाक्रमानें पाणी।

कमी करूं." मी हें बोललों मात्र, तोंच आंबेडकर व खोसला हे नाखूष झाले. एक मिनिट झाल्यावर मी गुलाम महंमद यांना म्हणालों कीं, "मीं माझी सूचना मागें घेतली आहे, तुम्हांला ती पसंत नाहीं," असें सांगितलें व मग उठलों. दुपारीं ३ वाजतां नेहरूंनीं विचारलें, "हें काय झालें ?" मीं सांगितलें कीं, "न्याय व सोय यांचा समन्वय करणारी योजना मीं त्यांच्यापुढें मांडली. त्यांनीं नामंजूर केली. मी पाणी देणार नाहीं." एक तासानें त्यांनीं मला बोलावलें व माउंट बॅटनच्या मध्यस्थीनें एक करार दाखविला. त्यांत मुदतीचा उल्लेख नव्हता व "कायदेशीर हक्कास बाध न येतां" हे शब्द होते. त्या दोहोंस मीं हरकत घेतली. मी म्हणालों, "तुम्ही सही करा, मी करणार नाहीं व पाणीहि देणार नाहीं." गुलाम महंमदनें सांगितलें कीं मुदत नसली तरी तुम्ही सुचवलेली "मुदत लक्षांत ठेवूं." मी राजी नव्हतों. तथापि मी सही केल्याशिवाय पंडितजी करीनात. मग मीं केली व तोच तो ३ मे ४८ चा पाणी-वांटपाचा प्रसिद्ध करार पुढें कार्यान्वित झाला. तथापि तें प्रकरण पुन्हां १९५० मध्यें उद्भवलें. सप्टेंबर १९५० मध्यें पाकिस्ताननें असा खलिता धाडला कीं हिंदुस्थाननें पाणी बंद करून जागतिक शांतता धोक्यांत आणली आहे व त्याला काय उत्तर द्यावें याची चर्चा करण्यासाठीं पंडितजींच्या खोलींत मी, राजाजी, गोपालस्वामी, पंजाबचे गव्हर्नर त्रिवेदी, पंजाबचे मंत्री, कांहीं एंजिनियर्स व कांहीं आय. सी. एस्., असे २०-२५ जण जमलों होतों. उत्तराचा ड्राफ्ट मीं तयार करून आणला होता तो मांडला. नेहरूंमध्यें कोठलीहि गोष्ट जागतिक म्हटली कीं, एक विशिष्ट प्रतिक्रिया होत असे व चर्चेच्या ओघांत "पाकिस्तानी जनतेनें काय अपराध केला म्हणून त्यांचें पाणी तुम्ही बंद करणार ?" असें विचारलें. मी म्हणालों, "कराराप्रमाणें मी वागत आहे. तशी वागणूक पाक सरकारनें करावी, हें काम पाक जनतेनें करावें;" व म्हणालों कीं "I must be just to my people before I am generous to others." माझ्या लोकांना न्याय प्रथम मिळाला पाहिजे. नंतर मी इतरांना औदार्य दाखवीन." व पुढें म्हणालों कीं, What is the good of Casting pearls? मोती विखरणें यांत काय अर्थ आहे ? या म्हणींतला पुढला भाग जाणूनबुजून उच्चारला नाहीं. नेहरू एकदम गरम झाले व म्हणाले कीं, "Have I no right as a Prime Minister to take a decision ? मला मुख्य प्रधान म्हणून निर्णय घेण्याचा हक्क आहे कीं नाहीं ?" मी म्हणालों व अगदीं शांततेनें म्हणालों कीं, "घटनेप्रमाणें जे हक्क तुम्हांला आहेत ते मी कोण नाकारणार ? पण

घटनेप्रमाणेंच संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वानुसार एक सभासद म्हणून माझें मत व माझा दृष्टिकोन मांडण्याचा मला अधिकार आहे. मंत्रिमंडळाचा निर्णय मला पसंत नसेल तर मी काय करायचें तें मी ठरवीन." यावर चिडून ते म्हणाले, "राजीनामा मागण्याचा हक्क आहे कीं नाहीं?" मी म्हणालों, "तो आहे व हा घ्या. मी कोणाचा होयबा नाहीं. संयुक्त जबाबदारीच्या मर्यादा मी ओळखतों. उद्यां या वेळेपर्यंत तुम्ही तुमचा निर्णय कळवा. माझा राजीनामा तयार आहे." ते थंडावले व कमीजास्त फरक करून माझा ड्राफ्ट त्यांनीं मान्य केला. मंडळी गेली. मी, राजाजी व ते असे राहिलों. राजाजी म्हणाले कीं, "तुम्ही कां भांडतां?" मी म्हणालों, "माझी चूक कोठें आहे तें सांगा." नेहरू म्हणाले, "आमच्या स्वभावांत विरोध आहे." मीं उत्तर दिलें कीं, "संयुक्त जबाबदारीच्या संदर्भांत विविध दृष्टिकोन मांडले जातात, चर्चा होते; बहुमतानें जरी निर्णय झाला तरी तो सर्वांचा मानला जातो. ज्याला सदसद्विवेकबुद्धि अडचणींत पाडते तो राजीनामा देऊन बाहेर पडतो. तथापि मीं तुम्ही मला ठेवा असें म्हणणार नाहीं. मला जें देशासाठीं योग्य वाटलें तें मी बोललों आहे. मी बाहेर गेलों तरी तीच निष्ठा व तेच श्रम करीत राहीन." मी माझ्या कचेरींत परतलों. खाजगी कागदपत्र बांधले. झालेली सर्व हकीकत तांतडीच्या पत्रानें मुंबईस वल्लभभाईंना कळविली. नंतर ४ वाजतां पुन्हां कचेरींत आलों तों तावडतोब पंडितजींनीं बोलावलें आहे असा निरोप कळला. मनामध्यें राजीनाम्याची भाषा योजली. त्यांच्या कचेरीत गेलों, तों तावडतोब ते खोलींतून बाहेर आले व सर्व लोकांसमक्ष "जें दुपारीं झालें त्याबद्दल मी तुमची माफी मागतों," असे म्हणाले. मी म्हणालों, "हे शब्द परत घ्या. मी सर्व विसरून गेलों आहे." नंतर तासभर गप्पा झाल्या. चहापाणी झालें व त्यांनीं मला सांगितलें कीं, "तुमचा डाफ्ट मीं पसंत केला आहे असें "सरदारांना कळवलें आहे." मग मी राजाजींच्या घरीं गेलों, ते वाटच पाहात होते. मी त्यांना म्हणालों, 'तुम्ही हा काय उद्योग केलात?' ते म्हणाले कीं, "तुम्ही गेल्यानंतर मी नेहरूंना चूक केलीत हें सांगितलें व मग त्यांनीं मला बोलावून दिलगिरी व्यक्त करणें जरूर आहे असें म्हटलें. म्हणून तुम्हांला त्यांनीं बोलावलें." या घटनेचा परिणाम त्यांच्यावर काय झाला हें मी सांगूं शकत नाहीं. पण पंजाब नद्यांच्या पाणी वांटपाचा प्रश्न ६० सालीं सुटला. त्या वेळेपर्यंत ते त्या बाबतींत मला विचारीत असत हें सत्य नमूद करणें न्याय्य होणार आहे.

## बजेटवरील खडाजंगी

असाच एक खटका १९५० च्या बजेटच्या वेळीं निर्माण झाला. सामान्य-पणें नोव्हेंबर अखेरपासून बजेटचे आंकडे तयार होत असतात. फेब्रुवारीच्या १ ल्या आठवड्यांत **सामान्य निवेदन** त्या बाबतींत मंत्र्यांकडे येतें. उत्पन्न जास्त झालें तर काय करावयाचें व कमी झालें तर कोणते कर बसवावयाचे याचा विचार मुख्य मंत्री, अर्थमंत्री, संबंधित मंत्री व **दुय्यम मुख्य प्रधान** यांच्या कामिटींत होतो.

फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशीं १० वाजतां मंत्रिमंडळाची खास सभा होते. त्या दिवशीं अखेरचे आंकडे, नवीन करांचें स्वरूप व अर्थमंत्र्याचें भाषण चर्चिलें जातें. त्या वेळीं कांहीं विरोध केला तर बदल होणें शक्य नसतें. कारण तें भाषण प्रेसकडे गेलेलें असतें. ह्या रीतीबद्दल मीं नापसंती व्यक्त केली व म्हणालों कीं, " गुप्तता राखण्यासाठीं जें करावयाचें तें करा. पण अन्य सभा-सदांचा अनुभव व दृष्टिकोन समजून देण्याची संधि त्यांना मिळाली पाहिजे. अनौपचारिक चर्चा झाली तरी ती निर्णयापूर्वी व्हावी. विद्यमान पद्धतींत आम्हांला निर्णय कळतो व आम्ही कांहीं करूं शकत नाहीं." वल्लभभाईंना सांगितलें कीं, " हा मौलिक प्रश्न आहे व त्याचा आपण विचार करूं." बजेट मांडल्यानंतर २ दिवसांनीं कॉंग्रेस पक्षाच्या सभेंत चर्चा झाली. त्यांत मी व जगजीवनराम यांनीं नवीन करांबाबत टीका केली. त्या वेळीं नेहरू अध्यक्षस्थानीं होते. ते उसळून म्हणाले, " मंत्र्यांनीं मंत्रिमंडळाच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला पाहिजे. निष्ठा-वंत ( Loyal ) राहिलें पाहिजे." मी म्हणालों, निर्णय **मंत्रिमंडळाचा** व चर्चे-नंतर तो असला पाहिजे. तसेच तो आम पक्षाच्या ( Mass party ) धोरणास व मौलिक विचारास अनुसरून असला पाहिजे. मंत्रिमंडळांत नवीन करांबाबत फक्त माहिती दिली. निर्णयांत आम्ही सहभागी नव्हतों. " श्रेय व लाथा ( Credit & Kicks ) दोन्ही संयुक्त जबाबदारींत मिळत असतात व म्हणूनच सर्वांचे दृष्टिकोन चार्चिले गेले पाहिजेत. तसें या बाबतींत झालें नाहीं. शिवाय आम्ही मंत्री कोणाशीं निष्ठावंत आहोंत ? व्यक्तिगत मंत्रिमंडळाशीं व मुख्य प्रधा-नाशीं, का कॉंग्रेस पक्षाशी ? " शांत रीतीनें मी तात्त्विक स्थरावर चर्चा नेली. शामाप्रसाद नेहरूंच्या मताचे दिसले. गोपालस्वामी हे नेहमींप्रमाणें तात्त्विक दृष्ट्या माझ्या बाजूचे पण प्रश्न धसास लावूं नये या मताचे दिसले. वल्लभभाईंकडे वळून मी म्हणालों, " लियाकत बजेटच्या वेळीं तुम्हांला विचारलें नाहीं म्हणून तुम्ही नाराज होतां. हा प्रश्न येथें तात्त्विक म्हणून मी मांडत आहे." रफी साहेब

म्हणाले कीं, " सिद्धान्ताच्या गोष्टी करूं नका. काय फरक हवा तो सांगा. " " वल्लभभाई पुन्हां म्हणाले कीं, " पार्टीची कमिटी नेमूं. तेथें सर्वांचें ऐक्र्ं व मग करूं. याला काय तुझी हरकत आहे ? " मीं उत्तर दिलें, " निष्ठेचा प्रश्न तसाच राहतो. तो लोंबत ठेवण्यांतील धोका लक्षांत घ्या. आमपक्षाचा प्रभाव पक्षाच्या मंत्रिमंडळावर आधींचा व अधिक असला पाहिजे. " पंडितजी म्हणाले, " तुमचें म्हणणें महत्त्वाचें आहे. त्याचा विचार पुढें करूं. तूर्त करांबाबत कमिटी नेमूं. " तो महत्त्वाचा प्रश्न आजहि तसाच लोंबकळत आहे.

१९५० च्या फेब्रुवारी-मार्चमध्यें पूर्व पाकमधून हिंदु निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे येऊं लागले. सियाल्दा स्टेशन व त्याचें आवार हजारों निर्वासितांनीं व्यापलें गेलें. हे निर्वासित फक्त जीव घेऊन आले होते. अत्याचाराच्या, लूटमारीच्या, बलात्काराच्या कथाहि पण मनाच्या गांठोड्यांतून त्यांनीं आणल्या होत्या व भारतांत येतांच त्या सान्या कथा बंगाली वर्तमानपत्रांतून, सभेंतून वातावरण प्रक्षुब्ध करीत होत्या. आणि नियोगी व शामाप्रसाद यांनीं राजीनामे द्यावेत अशी मागणी सान्या बंगालभर करण्यांत आली. हिंदी राजकारणांत कांहीं अन्याय झाला कीं मंत्र्यांनीं राजीनामे द्यावेत अगर न्यायाधीशानें चौकशी करावी हा एक नवा स्वभाव निर्माण झाला आहे. या दोन्ही संबंधित मंत्र्यांची परिस्थिति कठीण झाली होती. स्वार्थीपणाचे आरोप केले जात होते. हीहि गोष्ट खरी कीं पंडितजींचें पाकिस्तानबाबतचें धोरण दुर्बल होतें व जेव्हां हा प्रश्न मंत्रिमंडळांत चर्चेस निघाला त्या वेळीं शामाप्रसाद यांनीं पंडितजींच्या धोरणावर उघडउघड हल्ला केला. बराच वेळ पंडितजी शांत होते. शामाप्रसाद म्हणाले कीं, " काश्मीरमधील मुसलमानांवर हल्ला केल्याबरोबर भारताचें सैन्य तुम्हीं धाडलेंत. कोट्यवधि रुपये खर्च केलेत. आम्हां बंगाली हिंदूंची तुम्हांला काय किंमत आहे ? आमच्यावरील अत्याचार व आमच्या स्त्रियांवरील बलात्कार याची तुम्हांला काय दखल आहे ? " पंडितजीहि चटकन उभे राहिले व शामाप्रसादांकडे जाऊं लागले. ह्या बंगाली वाघानेंहिपण हात सरसावून पुढें पाउल टाकलें व क्षणभर असें वाटलें कीं, मंत्रिमंडळाच्या जागीं रणांगण होणार. तेवढ्यांत मीं शामाप्रसादांना आवरलें. ही स्थिति येतांच पटेल बैठक सोडून निघून गेले. आणखी एक दोन मंत्री निघून गेले. मी पंडितजींना म्हणालों, " अर्धें मंत्रिमंडळ निर्वासित झालें आहे. मला वाटतें कीं बैठक तहकूब व्हावी. " पंडितजी शांत झाले. बैठक तहकूब झाली. शामाप्रसादांना मी गाडींत बसविलें. संध्याकाळीं यांनीं राजीनामा दिला असें सरदारांनीं मला फोनवर सांगितलें व बोलावलें. नंतर

त्यांच्या सांगण्यावरून मी शामाप्रसादांना भेटलों. त्यांचा निर्णय त्यांनीं सोडला नाहीं.

आणखी अनेक क्षण व प्रसंग खळबळजनक घटनांचें घडले आहेत. तथापि कालांतरानें तें सांगणें इष्ट. पण असे प्रसंग घडले म्हणून पंडितजींनीं आपल्या मनाचा तोल क्वचितच बिघडून दिला व बाह्यतः त्यांची वागणूक ऋजुतेचीच होती. तथापि गांधींनीं त्यांचें स्वातंत्र्यापूर्वी केलेलें वर्णन अनेकांना बदलावें लागलें आहे. एका मोठ्या गुजराती नेत्याच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ते ' स्वातंत्र्यापूर्वी मुत्सद्दी होते, पण त्यानंतर अंतर्गत राजकारणांत ते राजकारणी (Politician) झाले. " अनेकांना हें मत विवाद्य वाटेल. तसें म्हटलें तर राजकारण हें राजकारणच असणार. देवतेला गंध वाहून प्रसादाबद्दलचें भांडण पुजारी न करतील तर ते आठवें आश्चर्य मानलें पाहिजे.

※ ※ ※

: ७ :

# सुंदोपसुंदी

गेल्या कांहीं वर्षांपासून आणि विशेषतः स्टालिनच्या मृत्यूनंतर साम्यवादी तत्त्वज्ञानांतील विरोध जगापुढें आधिकाधिक येऊं लागला आहे. एका शंकराचार्यांचे दोन शंकराचार्य व्हावेत असें थोडेंसें घडून येत आहे. पहिल्या महायुद्धांत रशिया साम्यवादी झाला. दुसऱ्या महायुद्धांत रशियाच्या साम्यवादी संघटनेनें जगाला हुकूमशाहीच्या पंजांतून सोडाविलें, अतिरेकी राष्ट्रवादांतून जगाला वांचविलें आणि दुसऱ्या महायुद्धानंतर मॉस्को हाच साम्यवादी सूर्यमालेंतील मध्यबिंदु झाला. साम्यवादी रशियानें पाश्चात्य भांडवलशाहीशीं संकटसमयीं केलेली मैत्री ही चिरस्वरूपी नव्हती व भांडवलशाहीचा साप वांचला असला व शक्तिहीन झाला असला तरी आपल्या साम्यवादावर तो केव्हां हल्ला चढवलि याचा नेम नाहीं अशा विश्वासानेंच रशिया आपलीं पावलें टाकीत राहिला.

## हिटलरशाहीचा भस्मासुर

पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडचें परराष्ट्रीय धोरण साम्यवादी रशियाला जगापासून अलिप्त ठेवण्याचें होतें. १९१९ पासून १९३९ पर्यंत सामान्यपणें रशियाला वगळून व प्रसंग आलाच तर त्याला अपमानित करून आंतरराष्ट्रीय राजकारण करायचें हा प्रधान हेतु होता आणि हा साध्य होण्यासाठीं इंग्रज व

अन्य भांडवलशाही राष्ट्रांनीं हिटलररूपी भस्मासुर उत्पन्न केला! या चुकीच्या नीतीविरुद्ध सतत व सुसंगतपणें ज्यांनीं विरोध केला त्यांत भारतांतील 'राष्ट्रीय सभा' ही प्रमुख होती आणि तिचें धोरण १९२७ पासून ठरावरूपानें पंडित नेहरूच मांडीत आले होते.

१९३३ सालीं हिटलर लोकशाही मार्गानें हुकूमशहा झाला. मंदिरांतील प्रतिमा मोडून मशीद बांधावी असें झालें. हिटलरच्या वाढत्या बळाला ब्रिटनच्या राज्यकर्त्यांनीं खतपाणी घातलें. चेंबर्लेनच्या छत्रीनें हिटलरच्या डोक्यावर साऱ्या पश्चिम युरोपचें छत्रच धरलें असें वाटलें; आणि १९३९ च्या ऑगस्टमध्यें हिटलरनें तुफानी वेगानें युरोप पादाक्रान्त केला; आणि हें साध्य व्हावें म्हणून सोव्हिएट रशियाशीं तह करण्यास कमी केलें नाहीं; पण ह्या बाबतींत ठकास महाठक भेटावा त्याप्रमाणें अनुभव आला! अखेर १९४१ मध्यें हिटलर व सोव्हिएट रशिया यांच्यांतच युद्ध सुरू झालें. ८ मे १९४५ रोजीं युद्धसमाप्ति झाली. हिटलरचा नायनाट झाला.

## प्रकाश-प्रेरणा देणारा सूर्य

दुसरें युद्ध संपल्यानंतर अवघ्या पांच वर्षांच्या काळांत रशियानें आपल्या देशांतील आर्थिक व्यवस्थेला अधिक चालना देऊन मोठी प्रगति केली. शस्त्रांत व शास्त्रांत प्रगति करून साम्यवादाविरुद्ध घेण्यांत येत असलेल्या अनेक आक्षेपांना ठणठणीत उत्तर दिलें व साऱ्या साम्यवादी राष्ट्रांचें नेतृत्व संपादन केलें. साम्यवादी राष्ट्रांचें रशियाचें नेतृत्व एकसंधी होतें आणि रशिया हा या साऱ्या साम्यवादी राष्ट्रांना प्रकाश व प्रेरणा देणारा महासूर्य ठरला.

याच काळांत भांडवलशाही राष्ट्रांचें नेतृत्व लंडनची वास्तु सोडून वॉशिंग्टनला दाखल झालें. जगांत आपण श्रीमंत व बहुतेक देश गरीब अशा स्थितींत एक तर आपण सबळ असलें पाहिजे अथवा गरिबांशीं सहानुभूति ठेवून राहिलें पाहिजे. अमेरिकेनें दोन्ही गोष्टी केल्या. शस्त्रांत प्रगति केली. सैन्य वाढविलें. साम्यवादी राज्यांच्या भोंवतालीं लष्करी संघटनांचें कडें उभारलें. अर्थात् या त्यांच्या धोरणांत रशियाबद्दलची भीति हाच प्रमुख भाग होता हें उघड आहे.

सीटो, नाटो, मिडो या सर्व संघटना म्हणजे साम्यवादी वाघाला पिंजऱ्यांत कोंडण्याच्या दृष्टीनें केल्या गेल्या. त्यासाठीं अब्जावधि रुपयांची मदत अमेरिकेनें केली व आजहि करीत आहे. तथापि या सर्व राजकारणाला आतां निराळें वळण लागूं पाहत आहे. त्याचें मुख्य कारण रशिया व चीन यांच्यामधील स्पष्ट झालेलें वितुष्ट-जें आतां वैराकडे धाव घेत आहे.

## वैराकडे धावणारें वितुष्ट

दुसऱ्या महायुद्धानंतर दोन गोष्टी अशा झाल्या कीं त्या रशियाच्या एकसंधी नेतृत्वाला बाधा करणाऱ्या ठरल्या. मार्शल टिटो यांनीं स्टालिनच्या धोरणाला मान्यता दिली नाहीं. तो त्या कळपांतून बाहेर पडला. त्याप्रमाणें १९४० सालीं चीनचें राज्य साम्यवादी लोकांच्या हातीं आलें! युगोस्लाव्हिया जर सरळ सरळ भांडवशाही गटांत गेला असता तर रशियाच्या नेतृत्वाला दीर्घगामी परिणाम करणारा असा तो झाला नसता! युगोस्लाव्हिया वृत्तीनें व तत्वज्ञानानें साम्यवादी राहिला, पण तो साम्यवाद त्या राष्ट्रानें आपल्या प्रजेला थोड्याबहुत प्रमाणांत अनुभवास आणून दिला.

एकसंधी विचार, विचारशून्य शिस्त, शंभर टक्के नियंत्रित अर्थव्यवस्था या तिवईवर साम्यवादाचा गणपति बसतो. पण तें मत साफ खोटें असल्याचें युगोस्लोव्हियानें स्वतःच्या अनुभवानें सिद्ध केलें.

## साम्यवादी कुळांत गडबड

आपलें औषध न घेतां तो रोगी बरा झाला म्हणजे जसें धिक्कारलेल्या वैद्याला वाटतें तीच स्थिति रशियाची झाली. युगोस्लाव्हियाच्या उदाहरणानें मॉस्कोच्या साम्यवादी कुळांत गडबड उडाली आणि त्यांना वाटूं लागलें कीं मॉस्कोचें नेतृत्व न स्वीकारतां, साम्यवाद कार्यान्वित करतां येऊं शकतो. 'साधनानाम् अनेकता' हा सिद्धान्त प्रभावी ठरूं लागला.

## बंडखोरीला प्रतिष्ठा

स्टालिनच्या मृत्यूनंतर स्टालिनवादाविरुद्ध जी कारवाई रशियांत झाली तीमुळेंहि युगोस्लाव्हियानें जें कांहीं केलें त्याला तात्त्विक प्रतिष्ठा मिळाली. स्टालिनचें चुकलें म्हणजे दुसरें कोणाचें बरोबर होतें असा तर्क स्पष्ट झाला आणि त्याचाच परिणाम क्रुश्चोव्हनें मिळतें घेऊन युगोस्लाव्हियाची मैत्री संपादन केली. बंडखोराला प्रतिष्ठा मिळाली. संपूर्णपणें आज्ञाधारी होते त्यांनाहि असें वाटूं लागलें कीं, बंडखोरी केल्याशिवाय प्रतिष्ठा नाहीं. त्याचाच परिणाम पोलंड, हंगेरी या राष्ट्रांत घडून आला.

## चीनचा मोठा प्रश्न

तथापि आतां रशियापुढें दुसराच एक मोठा प्रश्न उभा राहिला. तो होता चीनचा! या दोन्ही साम्यवादी राष्ट्रांत पहिल्यापासून तेढ होतीच. स्टालिनच्या

मृत्यूनंतर ती स्पष्ट झाली. आणि जें जें कांहीं जगांत घडेल त्याबद्दल या दोघांच्या प्रतिक्रिया समान अगर सारख्या दिसेनाशा झाल्या! आंतरराष्ट्रीय राजकारणांत क्षणाची कुंडली मांडूं नये, युगाची मांडावी असें म्हणतात. त्या कुंडलीवरून असें दिसतें कीं, साम्यवादी राष्ट्रासाठीं एकसंधि नेतृत्व आतां जवळ जवळ संपलें आहे. या नाथपंथीयांचे आतां दोन आखाडे झाले आहेत. आखाड्या–आखाड्यांत सांप्रदाय–सांप्रदायांत जें वितुष्ट असतें. तेंच या दोन देशांत दिसून येत आहे.

एकाच गुरूचे शिष्य एकच पोथी वाचणारे, एकाच सहाणेवर उगाळलेलें गंध लावणारे, गंध आडवें कीं उभे लावावें यावर भांडावेत, हमरीतुमरीवर यावेत याप्रमाणें घडूं लागलें आहे.

परिणाम असा झाला आहे कीं, दोघां शिष्यांनीं चेलें-मुंडन करण्याचें काम सुरू केलें आहे. युगोस्लाव्हिया अद्यापि आपलीच बाजू खरी 'लाल' आहे असेंच म्हणत आहे. आल्बेनिया हें राष्ट्र वास्तविक नाटोला विरोधी म्हणून अस्तित्वांत आलेल्या वॉरसाकरारामधील एक; पण असें असून तें पीकिंगवादी झालें आहे. चालू राजकारणांत अजूनहि तें मॉस्कोला जवळ आहे. प्रत्यक्ष साम्यवादी नसलेल्या राष्ट्रांतून जे साम्यवादी पक्ष आहेत त्यांच्यामध्येंहि मतभेद सुरू झालेले आहेत. भारतांतील साम्यवादी पक्षाचा इतिहास लोकांच्या डोळ्यांसमोर आहे. जर कांहीं अकल्पित असें आंतरराष्ट्रीय जगतांत घडलें नाहीं तर ही परिस्थिति बराच काळ टिकून राहील.

चीन व रशियामधील मतभेद मिटावे म्हणून प्रयत्न जरूर होतील. पण आर्थिक प्रगतीमध्यें चीन कोसळला आहे. अर्थात् सापेक्षतेनें पोलंडधील साम्यवाद मॉस्कोच्या साम्यवादाशीं पूर्वीइतका मिळता जुळता नाहीं. तथापि पोलंडमधील कम्युनिस्ट पक्ष या बड्या धेंडांत समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करील असें वाटतें. राजकारण एकाच आदर्शवादावर असलें तरी, एकाच पक्षाचें असलें तरी भिन्न व्यक्तींच्या विचारसरणीमुळें त्यांत प्रसंगीं मोठा बदल घडून येतो. कदाचित् हाहि अनुभव चीन-रशियाच्या संबंधांत घडून येणें असंभवनीय नाहीं.

## नुसतेंच वाग्युद्ध का प्रत्यक्ष लढाई ?

विद्यमान नेते निवर्तले, निवर्तविले, निवृत्त झाले, अगर निवृत्त केले गेले तर निराळा परिणाम होणें अशक्य नाहीं. तथापि यालाहि मर्यादा आहे. प्रत्येक राष्ट्रांत त्याच्या त्याच्या अशा गरजा असतात. कांहीं कांहीं अपरिवर्तनीय गोष्टी

असतात आणि त्यामुळें त्यांना बदलणें अवघड बनतें. समाजकारण अगर राजकारण आकाशांत अगर अवकाशांत चालत नाहीं. कोऱ्या पाटीवर तें लिहिलें जात नाहीं. जुने टाक, जुने बाळकृष्ण मुशीमध्यें घालून त्यांना वितळून नवे करावे लागतात. समाजजीवनाच्या पाठीवर कोरेपणा कधींच येत नाहीं. कोणी म्हणेल कीं ' श्रीगणेशापासून मी तें करीन तर तें शक्य नसतें ! म्हणून पूर्वीचा एकसंधीपणा आतां साम्यवादी जगांत राहणार नाहीं. तो आतां निरनिराळ्या साखरेंत घोळविला गेला आहे. त्यामुळें त्याचें मूळचें स्वरूप पार बदललें आहे. आतां तर साम्यवादी विचारसृष्टींत राष्ट्रवादाचा आवाजहि ऐकूं येऊं लागला आहे.

काबामध्यें काफिरांनीं बांग दिली आहे, म्हणून पूर्वीची स्थिति आतां येणार नाहीं. तथापि आत्तांच भांडणें विकोपाला जाऊन खुनाखुनी होईल व 'करबला' दिसूं लागेल हेंहि शक्य नाहीं.

## क्रांतिकार्याची वाटचाल कशी ?

वादाचा मुख्य प्रश्न आतां साम्यवादी राष्ट्रांनीं अन्य राष्ट्रांशीं कसें वागावें हा आहे. एका राष्ट्रांत साम्यवाद शक्य आहे, शक्य झाला आहे. तेव्हां हातीं शस्त्र घेऊन युद्धद्वारें जगभर क्रांति करून तो स्थापन करण्याची जरूरी नाहीं. शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गानेंहि तो स्थापन होणें शक्य आहे. तो हळूहळू होईल. कार्य होईल, फक्त विलंब लागेल. अशी विचारसरणी रशियाची आहे म्हणून रशियानें सहजीवनाचा, स्पर्धामय सहजीवनाचा मार्ग स्वीकारला आहे. चीनला तो पसंत नाहीं. चीन आर्थिक उडींत तोंडघशीं पडला ! याचें कारण जागतिक क्रांतीचा उठाव झाला नाहीं. रशियानें तो केला नाहीं असें चीनचें मत आहे. याहिपुढें जाऊन रशियानें अण्वस्त्राबाबत तह केला ही गोष्ट चीनला मार्क्सवादाशीं विद्रोही आहे असें वाटतें. आणि हाच वाद जगभर साम्यवादी पक्षांतून आज चर्चिला जात आहे.

चीनला जे साम्यवादी नाहींत त्यांचा नाश ताबडतोब व्हावा असें वाटतें व तात्पुरतेंसुद्धां भांडवलशाही राष्ट्रांशीं जुळवून घेणें हें अयोग्य वाटतें. शांततेच्या मार्गानें कांहीं होईल हें चीनला वाटत नाहीं. क्रांतीसाठीं युद्ध अपरिहार्य आहे हा चीनचा विचार स्फोटक आहे. शांतिपूर्ण सहजीवन हें जसें कित्येक पाश्चात्य राष्ट्रांना असंभवनीय वाटतें, तसाच हा विचार आहे.

## साम्यवादी शक्तीचें विकेंद्रीकरण

तथापि आजची परिस्थिति पाहतां एक गोष्ट स्पष्ट होते; ती ही कीं, साम्यवादी शक्ति विकेंद्रित होत आहे. स्टालिनच्या युगांत तिचें झालेलें केंद्रीकरण कमी कमी होत आहे. एका बाजूला रशिया, जगांतील तंग परिस्थिति कमी व्हावी म्हणून प्रयत्न करीत आहे, तर दुसऱ्या बाजूनें ती तशीच राहावी अशी चीनची इच्छा दिसते. आंतरराष्ट्रीय संबंधांत अधिक विधायक वृत्ति आली नाहीं तर हें तंग वातावरण चालूच राहील आणि कम्युनिस्ट पक्षांत जगभर जें विचारमंथन चालू आहे त्या योगानें या तंग वातावरणाला आशीर्वाद व आवश्यक तें खतपाणी मिळत राहील !

## शांततामय सहजीवन

पूर्व युरोपमधील साम्यवादी राष्ट्रांतून विचारमंथन सुरू असलें तरी मॉस्कोला सोडून तीं राष्ट्रें जाणार नाहींत. मॉस्कोशीं त्यांचे लष्करी संबंध आहेत आणि त्यांच्या राज्याच्या संरक्षणाची हमी त्यांत आहे. वॉर्सा करारानंतर जी भूमिका आतां हीं राष्ट्रें घेत आहेत त्यावरून युगोस्लाव्हियाप्रमाणें हीं राष्ट्रें स्वतंत्र 'प्रज्ञा'दाखवितील हें शक्य नाहीं. तथापि आपल्या स्वतःच्या राज्यकारभारांत तीं स्वतंत्रपणें वावरूं लागतील असें दिसतें. कांहीं तशीं वागूंहि लागलीं आहेत. अर्थव्यवस्था, सामाजिक संस्था या पूर्वींपेक्षा अधिक व्यक्तींच्या दृष्टीनें उदारमतवादाकडे अगर शिथिलतेकडे झुकत आहेत. व्यापाराबाबत स्वतःच्या अर्थव्यवस्थेला सबळ करण्याच्या दृष्टीनें अधिकाधिक संबंध जोडीत आहेत. मॉस्कोचें नेतृत्व अमान्य न करतां अन्य पाश्चात्य राष्ट्रांशीं मिळतें-जुळतें घेण्याकडे त्यांचा कल आहे, ही गोष्ट अधिक अनुभवास येऊं लागली आहे; आणि ती प्रवृत्ति वाढली तर शांततामय सहजीवनाबाबत जो विरोध आज पाश्चात्य राष्ट्रांत दिसत आहे तो कमी होईल. पण त्यासाठीं पाश्चात्य राष्ट्रांचें धोरण बदललें पाहिजे. साम्यवादी नेतृत्वांत जसजसें अधिक विकेंद्रीकरण होत जाईल तसतसें हें धोरण यशस्वी होईल.

पाश्चात्य राष्ट्रांच्या नेतृत्वांत केंद्रीकरण नसलें तरी कांहीं प्रमाणांत गटबाजी आहे ती बंद झाली पाहिजे. कुणी कुणाशीं व्यापार करावा हें सांगण्याची दादागिरी अमेरिकेनें यापुढें करतां कामा नये. नॅटो, सिटो, सियॅटो या संघटनांना आज जें केवळ लष्करी स्वरूप आहे त्यांत बदल करून त्यांना जरा निराळें स्वरूप दिलें गेलें पाहिजे.

ज्या अविकसित राष्ट्रांना अमेरिका व अन्य पाश्चात्य राष्ट्रें मदत देत आहेत त्यांच्यांतील लष्करी उद्देशाचा भाग कमी मानला गेला पाहिजे. आर्थिक उन्नतीच्या भागाला अधिक प्राधान्य दिलें पाहिजे.

साम्यवाद हा जेथें दुःख, दारिद्र्य, विकलता व विपन्नता आहे तेथें जन्मतो व तेथेंच झपाट्यानें वाढतो. म्हणून जगांत जसजसें दारिद्र्य कमी होत जाईल, तसतसें कम्युनिझमचें स्वरूप बदलत जाईल व हा क्रूर दिसणारा वाघ स्वारीस उपयोगी ठरणारा अश्व ठरेल. तात्पर्य, एका बाजूनें मदतीमधील लष्करी हेतु नाहींसा झाला पाहिजे, तर दुसऱ्या बाजूनें आर्थिक मदत निर्हेतुकपणें आर्थिक विकासासाठीं, सामाजिक उन्नतीसाठीं दिली गेली पाहिजे आणि पाश्चात्य राष्ट्रांनीं कांहींहि करून साम्यवाद हाणून पाडावयाचा हें जें धोरण पूर्वी ठरविलें होतें तें बदललें पाहिजे. रशिया व चीन यांत सध्यां पडलेला तडा ही एक उत्कृष्ट संधि गेल्या वीस वर्षांतील राजकारण तपासून पाहायला प्राप्त झाली आहे. खुसपटें काढून पाकिस्तानाला मदत दे, कुठें अतिपूर्व राष्ट्रांत हस्तक्षेप कर, या योगानें जागतिक शांतता लाभणार नाहीं. साम्यवादी जगांत चीन सोडून दिल्यास थोडी चांगली प्रवृत्ति दिसून येत आहे. तिचा फायदा घेतला पाहिजे. एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यवादी राष्ट्रांनीं मूर्खपणानें, अदूरदृष्टीनें जगांतील लक्षावधि लोकांना शत्रु करून घेतलें. आतां या विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतहि तसाच अदूरदर्शीपणा, तसाच मूर्खपणा पाश्चात्य राष्ट्रांनीं दाखविलाच तर जगाचें चित्र कसें निर्माण होईल याची कल्पनाच न केलेली बरी !

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ...... दि. ......
क्र. ...... 



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ......
शाखा

: ८ :

# काश्मीर काल, आज, उद्यां

काश्मिरी भाषेंत एक म्हण आहे कीं, केशराचें शेत गाढवें खात आहेत. या म्हणीची यथार्थता आज काश्मीरच्या राजकारणांत व तत्संबंधीं जी चर्चा सर्वत्र ऐकूं येत आहे त्या बाबतींत यथार्थ आहे असें वाटतें ! काश्मीरचा प्रश्न मिटला, जखमेनें खपली धरली व हळूहळू युद्धबंदीरेषा कायमची सीमारेषा होईल, कायमची सरहद्द बनेल असा अभिप्राय इंग्लंडमधील अनेक विचारवंत व वर्तमानपत्रवाल्यांनींहि चार–पांच वर्षांपूर्वी व्यक्त केला होता; इतकेंच नव्हे तर १९५८ च्या ऑक्टोबरमध्यें जी लष्करी क्रांति झाली त्या वेळीं भारतांतील अनेक लोकांनीं या नव्या बनावामुळें पाकिस्तान व भारत यांच्यांतील प्रश्न झपाट्यानें सुटतील अशी आशा व्यक्त केली होती.

## टोळीवाल्यांना चिथावणी

१४ ऑगस्ट १९४६ रोजीं भारतभर लीगनें मुक्तिदिन साजरा केला होता व तेव्हांपासून बंगाल व पंजाबमध्यें हिंदूंची कत्तल सुरू झाली होती व हजारोंनीं हिंदु रावळपिंडी, मुलतान, गुजराथ वगैरे भागांतून दिल्लीकडे येत होते. तथापि पंजाबमधील श्रीमंत व जमीनदारवर्ग फाळणीबाबत उत्सुक नव्हता. मुख्य प्रधान खिजर हयातखान हे विरुद्ध होते व त्यांनीं जिनांना सांगितलें कीं ज्या

ज्या अप्रगत राष्ट्रांना अमेरिका व अन्य पाश्चात्य राष्ट्रें मदत देत आहेत त्यांच्यांतील लष्करी उद्देशाचा भाग कमी मानला गेला पाहिजे. आर्थिक उन्नतीच्या भागाला अधिक प्राधान्य दिलें पाहिजे.

साम्यवाद हा जेथें दुःख, दारिद्र्य, विकलता व विपन्नता आहे तेथें जन्मतो व तेथेंच झपाट्यानें वाढतो. म्हणून जगांत जसजसें दारिद्र्य कमी होत जाईल, तसतसें कम्युनिझमचें स्वरूप बदलत जाईल व हा क्रूर दिसणारा वाघ स्वारीस उपयोगी ठरणारा अश्व ठरेल. तात्पर्य, एका बाजूनें मदतीमधील लष्करी हेतु नाहींसा झाला पाहिजे, तर दुसऱ्या बाजूनें आर्थिक मदत निर्हेतुकपणें आर्थिक विकासासाठीं, सामाजिक उन्नतीसाठीं दिली गेली पाहिजे आणि पाश्चात्य राष्ट्रांनीं कांहींहि करून साम्यवाद हाणून पाडावयाचा हें जें धोरण पूर्वी ठरविलें होतें तें बदललें पाहिजे. रशिया व चीन यांत सध्यां पडलेला तडा ही एक उत्कृष्ट संधि गेल्या वीस वर्षांतील राजकारण तपासून पाहायला प्राप्त झाली आहे. खुसपटें काढून पाकिस्तानाला मदत दे, कुठें अतिपूर्व राष्ट्रांत हस्तक्षेप कर, या योगानें जागतिक शांतता लाभणार नाहीं. साम्यवादी जगांत चीन सोडून दिल्यास थोडी चांगली प्रवृत्ति दिसून येत आहे. तिचा फायदा घेतला पाहिजे. एकोणिसाव्या शतकांत साम्राज्यवादी राष्ट्रांनीं मूर्खपणानें, अदूरदृष्टीनें जगांतील लक्षावधि लोकांना शत्रु करून घेतलें. आतां या विसाव्या शतकांच्या उत्तरार्धांतहि तसाच अदूरदर्शीपणा, तसाच मूर्खपणा पाश्चात्य राष्ट्रांनीं दाखविलाच तर जगाचें चित्र कसें निर्माण होईल याची कल्पनाच न केलेली बरी !

✱ ✱ ✱

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
नुक्रम ...३८८८... दि. ...निर्बंध
क्रमांक ...१२७५... नों. दि. ...५/३/६७
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४३८२
ग्रंथ शाखा ठाणे (मूळ प्रत)

सतरींतील काका

: ८ :

# काश्मीर काल, आज, उद्यां

काश्मिरी भाषेंत एक म्हण आहे कीं, केशराचें शेत गाढवें खात आहेत. या म्हणीची यथार्थता आज काश्मीरच्या राजकारणांत व तत्संबंधीं जी चर्चा सर्वत्र ऐकूं येत आहे त्या बाबतींत यथार्थ आहे असें वाटतें ! काश्मीरचा प्रश्न मिटला, जखमेनें खपली धरली व हळूहळू युद्धबंदीरेषा कायमची सीमारेषा होईल, कायमची सरहद्द बनेल असा अभिप्राय इंग्लंडमधील अनेक विचारवंत व वर्तमानपत्रवाल्यांनींहि चार–पांच वर्षांपूर्वी व्यक्त केला होता; इतकेंच नव्हे तर १९५८ च्या ऑक्टोबरमध्यें जी लष्करी क्रांति झाली त्या वेळीं भारतांतील अनेक लोकांनीं या नव्या बनावामुळें पाकिस्तान व भारत यांच्यांतील प्रश्न झपाट्यानें सुटतील अशी आशा व्यक्त केली होती.

## टोळीवाल्यांना चिथावणी

१४ ऑगस्ट १९४६ रोजीं भारतभर लीगनें मुक्तिदिन साजरा केला होता व तेव्हांपासून बंगाल व पंजाबमध्यें हिंदूंची कत्तल सुरू झाली होती व हजारोंनीं हिंदु रावळपिंडी, मुलतान, गुजराथ वगैरे भागांतून दिल्लीकडे येत होते. तथापि पंजाबमधील श्रीमंत व जमीनदारवर्ग फाळणीबाबत उत्सुक नव्हता. मुख्य प्रधान खिजर हयातखान हे विरुद्ध होते व त्यांनीं जिनांना सांगितलें कीं ज्या

नद्यांच्या पाण्यावर पंजाब समृद्ध झाला आहे त्या सिंधु, झेलम, चिनाब या नद्या काश्मिरांतून येतात म्हणून काश्मीर स्वतंत्र राहिलें अगर भारतांत गेलें तर पाणी मिळणार नाहीं आणि गुलजार पंजाब उजाड होईल. मग जिनांनीं खिजर हयातखान याला असें सांगितलें कीं, ईदच्या आंत म्हणजे ऑक्टोबरच्या आंत काश्मीरवर पाकिस्तानचा कबजा होईल. जिना हे पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल असल्यानें त्यांनीं आपल्या ब्रिटिश सेनापतीला ताबडतोब काश्मीरवर हल्ला करण्यास सांगितलें. त्यानें तें नाकारलें. कारण भारताचें सैन्य लढाईस येईल, ब्रिटिश ऑफिसरला ब्रिटिश ऑफिसराविरुद्ध लढावें लागेल. म्हणून हल्ला करण्याचें नाकारलें. चिडलेल्या जिनांनीं मग सरहद्दीवरील टोळ्यांना उत्तेजन देऊन काश्मीर-वर हल्ला करण्यास सांगितलें व १४ सप्टेंबर १९४७ ला हल्ला सुरू झाला. या क्रूर लोकांनीं हिंदु-मुसलमान या सर्वांची सर्रास कत्तल केली. संपत्तीची लूटमार केली. स्त्रियांवर अत्याचार केले.

## भारताशीं सामीलनामा

महाराजानें मग भारत सरकारकडे लष्करी मदतीची याचना केली व पाकिस्ताननें जम्मू–काश्मीरचा जबरदस्तीनें कबजा घेऊं नये म्हणून मदतीची याचना केली. काश्मीर हा हिंदुस्थानचा भाग झाल्याशिवाय मदत करणें कायदेशीर नव्हतें आणि म्हणून सामीलनामा करण्याची तयारी महाराजासाहेब यांनीं दाखविली. राज्य हें राजाची खाजगी मिळकत नाहीं म्हणून जुनागडच्या नबाबानें पाकिस्तानशीं केलेला करार व सामीलनामा अग्राह्य मानला. तसेंच हैद्राबादच्या निजामानें केलें असतें तर भारताच्या हृदयांत कायमचा खंजीर बसला असता, म्हणून लोकांनीं मागणी करावी असा दृष्टिकोन महाराजांपुढें ठेवण्यांत आला व मग महाराजांनीं नॅशनल कॉन्फरन्सच्या पुढाऱ्यांना दिल्लीस पाचारण केलें. कारण त्या वेळेस ही परिषद एकमेव लोकप्रतिनिधित्व करीत होती. तिचे पुढारी अब्दुल्ला हे होते. ते दिल्लीस आले. २६ ऑक्टोबर १९४७ सालीं मंत्रिमंडळाची सभा पं. नेहरू यांच्या निवासस्थानीं झाली. नेहरू सामीलनामा करण्याच्या बाबतींत नाखूष होते. कारण उघड होतें. त्यांना मौंटबॅटननीं महाराजाला पाकिस्तानला मिळण्याचा दिलेला सल्ला माहीत होता. मग पलीकडील खोलींत बसलेले शेख अब्दुल्ला व महाजन आम्ही बसलेल्या खोलींत आले व म्हणाले, "जर संकटसमयीं तुम्ही मित्र आम्हांला मदत करणार नसाल तर त्या मैत्रीचा काय उपयोग?" त्याचा परिणाम झाला आणि सामीलनाम्यावर नॅशनल कॉन्फरन्सच्या संमतीनें महाराजांनीं सही

केली. भारततर्फे मौंटबॅटन यांनीं सही केली आणि शेखसाहेबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "२६ ऑक्टोबर १९४७ पासून जम्मू व काश्मीर भारतीय संघराज्याचा एक भाग झालें." (११-८-१९५२ चें भाषण)

## भारतानें ताबा घेतला

२७ ऑक्टोबर १९४७ रोजीं सकाळीं ९ च्या सुमारापासून भारतीय विमानें व लष्करी सामान श्रीनगरच्या विमानतळावर उतरूं लागलीं. आणि त्यांनीं आक्रमकांविरुद्ध लढाई सुरू केली. जर दोन तास उशीर झाला असता तर विमानतळाचा ताबा आक्रमकांनीं घेतला असता व काश्मीर पाकिस्तानच्या गुलामगिरींत कायमचें पडलें असतें. सुटकेनंतर व मुख्य प्रधान झाल्याबरोबर शेखसाहेब व त्यांच्या साथीदारांनीं आक्रमकांबरोबर मुकाबला करण्यास स्वयंसेवकांचीं पथकें उभारलीं व बारामुल्ला या जागीं आक्रमकांना थांबविलें. सामीलनाम्याच्या वेळीं प्रधानमंडळ हें जबाबदार असावें ही मागणी मान्य करण्यांत आली होती व त्यास अनुसरून शेखसाहेब मुख्य प्रधान झाले होते.

## सामीलनामा अखेरचा

या सामीलनाम्याच्या वेळीं जनमतगणनेचा उल्लेख जो करण्यांत आला त्याची हकीगत अशी आहे कीं, त्यासंबंधींचा उल्लेख नेहरू यांनीं भारतांतील संस्थानिकांच्या प्रश्नाच्या दृष्टीनें केला होता. वास्तविक त्याची गरज नव्हती. आणि या बाबतींत केलेला सामीलनामा हा अखेरचा आहे असें शेख अब्दुलांचें मत होतें. सुरक्षा-समितीपुढें बोलतांना (दि. ५ फेब्रुवारी १९४८) शेख अब्दुल्ला म्हणाले कीं, "महाराजा आणि जनता यांनीं भारत सरकारला सामील करून घ्या म्हणून विनंती केली. जनगणनेचा उल्लेख करण्याचें नेहरूंना कांहीं कारण नव्हतें. भारताला अडचणींचा फायदा घ्यावयाचा नव्हता व शांतता झाल्यावर लोकांनीं हा निर्णय कायम करावयाचा होता. २६ ऑक्टोबर १९४८ पासून नवा काश्मीर अस्तित्वांत आला व नॅशनल कॉन्फरन्सनें वयांत आलेल्या स्त्रीपुरुषांनीं घटना परिषद निवडून द्यावी व तिनें काश्मीरची घटना तयार करावी असा ठराव केला. ३१ ऑक्टोबर १९५१ सालीं घटना परिषद् निवडणूक होऊन भरली. पहिल्या दिवसाच्या सभेंत शेखसाहेब म्हणाले कीं, "जग आपल्या घटना-परिषदेला मानो अगर न मानो, आम्ही आपलें भवितव्य ठरवावयाचें आहे. ही परिषद् वयांत आलेल्या काश्मिरी जनतेनें

निवडून दिलेली आहे व तिला भारतांत जावें का पाकिस्तानांत जावें हें ठरविण्याचा पूर्ण हक्क आहे. सभासदांना निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत काय आहे याची माहिती आहे. गेल्या चार वर्षांत कॉन्फरन्सनें काय केलें आहे यावर शिक्कामोर्तब हवा आहे. निवडणुकीमध्यें भारताशीं केलेल्या सामीलनाम्याबद्दल मान्यता हवी आहे असें आम्हीं सांगितलें आहे, आणि ज्या भागांत आपल्याला सहानुभूति आहे असें पाकिस्तान म्हणत होतें, त्या भागांतून एकहि मतदार विरुद्ध मताचा निवडून आला नाहीं. या परिषदेनें जर अखेरचा निर्णय घ्यावयाचा नाहीं तर मग कोणीं घ्यावयाचा ? मतदारांची तीच इच्छा आहे. तुमच्या निर्णयानें काश्मीरच्चें पुढील भवितव्य ठरणार आहे, एवढेंच नव्हे तर अनंत काळपर्यंत त्या भाविष्याचें स्वरूप तुम्हांला ठरवावयाचें आहे."

## दोन्ही राज्यांमागें दोन आदर्श

५ नोव्हेंबर ५१ रोजीं घटना–परिषदेंत केलेल्या भाषणांत शेखसाहेब म्हणाले, " भारताशीं केलेल्या सामीलनाम्याबद्दल गुणदोषदृष्टीनें मी विवेचन करूं इच्छितों. यांतील सार असें आहे कीं, या दोन्ही राज्यांमागें दोन आदर्श आहेत. भारतीय कॉँग्रेसनें संस्थानी प्रजेची बाजू घेऊन व तिच्या स्वातंत्र्यासाठीं मोठा त्याग केला आहे, मोठी मदत केली आहे, म्हणून हिंदुस्थानांत सामील होण्यामध्यें पुनः आम्ही सामंतशाहींत सांपडूं अगर हुकूमशाहींत सांपडूं हा धोका नाहीं. राज्याचें स्वरूप त्याच्या घटनेंत दिसून येतें. भारतीय घटना निधर्मी लोकशाही असून स्वातंत्र्य, समता व न्याय यांवर ती आधारलेली आहे. आधुनिक लोकशाहीचीं सर्व तत्त्वें त्यांत समाविष्ट आहेत. आणि म्हणून काश्मीरच्या मुसलमानांना सामील होण्यांत धोका नाहीं. धार्मिक गोष्टीवर भर देऊन गटबाजी करण्याची वृत्ति हें साम्राज्यवादाचें देणें आहे. कुठल्याहि आधुनिक राज्यांत कृत्रिम वर्गवारी निर्माण केल्यास प्रगति व संपत्ति राष्ट्राला प्राप्त होत नाहीं. भारतीय संविधानांत धर्माधिष्ठित राज्याचा संपूर्ण इन्कार केला आहे. आणि निधर्मी राज्य ज्यामध्यें सर्व नागरिकांचे हक्क, धर्म, जात, रंग, अगर वर्ग यांना बाजूला सारून कार्यान्वित होतात तेथेंच प्रगति होते. आणि तेथेंच मध्ययुगीन प्रतिक्रांतिवादाला टोला बसतो."

## आतां भारताबरोबरच सर्व कांहीं

काश्मीरच्या घटनासमितींतच ही त्यांची विचारसरणी प्रथम मांडली असें नव्हे. ७ मार्च १९४९ रोजीं ते म्हणाले, " भारताबरोबर काम करावयाचें व

भारताबरोबर मरावयाचें हा आमचा निर्णय झाला आहे व हा निर्णय २६ ऑक्टोबर १९४७ सालीं घेतला नाहीं तर १९४४ मध्यें जेव्हां जिनांनीं आम्हांला लीगमध्यें या म्हणून आमंत्रण केलें त्या वेळीं घेतला आहे. भावनेनें तो घेतला नाहीं. क्षणिक गोष्टीकडे लक्ष देऊन घेतला नाहीं. नैराश्यांत घेतला नाहीं; विचार करून विवेकानें तो घेतला आहे. काश्मीर व भारत यांनीं खांद्यास खांदा लावून स्वातंत्र्याच्या आदर्शासाठीं लढा दिला आहे. कष्ट सहन केले आहेत. त्यांच्यांत व आमच्यांत आदर्श समता आहे. समान विचारसरणी आहे."

२० फेब्रवारी १९४८ च्या भाषणांत ते म्हणाले कीं, "मे १९४४ मध्यें जीनांनीं आम्हांला द्विराष्ट्रवाद मान्य करावा म्हणून आग्रह केला. आम्हीं तें मानलें नाहीं. भारतांतील अन्य भागांत पाकिस्तानी विषारी विचारांचा वृक्ष फोफावूं लागला. काश्मीर हें बहुसंख्याक मुसलमानी प्रजेचें राज्य असूनहि पाकच्या बाहेर राहिलें आहे आणि काश्मीरचें तसें राहणें हें एक जिनांच्या द्विराष्ट्रवादाला आव्हान आहे. जें त्यांना विचारविनिमयानें करतां आलें नाहीं तें आतां तलवारीच्या जोरावर करीत आहेत."

## भारतीय लोकांसाठीं परीक्षा

दि. २४ जुलै १९४८ च्या एका लेखांत शेखसाहेब म्हणतात, "काश्मीरच्या हृदयांत स्वयंनिर्णयाचा प्रजेचा हक्क आणि संकुचित धार्मिक दृष्टि यांचा लढा चालू आहे. तथापि या गोष्टींनीं राज्याचा दृष्टिकोन बदलला जाणार नाहीं. आक्रमणानें देशाचें भवितव्य ठरवावें व धार्मिक वेडानें त्याचा कारभार चालावा हें अशक्य आहे. गांधीतत्त्वज्ञान आणि जिनांचा धार्मिक दृष्टिकोन यांमध्यें हा लढा आहे. काश्मीर ही भारतीय लोकांसाठीं एक परीक्षा आहे. त्यांनीं दाखवून दिलें पाहिजे कीं, त्यांना मिळालेलें स्वातंत्र्य योग्य आहे व तें त्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहेत!"

## पाकिस्तानचें अस्तित्व द्वेषावर

२ मे १९५० च्या काश्मीर–आकाशवाणीच्या दुसऱ्या वाढदिवसानिमित्त केलेल्या भाषणांत शेखसाहेब म्हणाले कीं, "आमचे आदर्श व आमची राजकीय श्रद्धा व पाकिस्तानची एतद्विषयक श्रद्धा यांत कांहींहि साम्य नाहीं. पाकिस्तानचें अस्तित्व द्वेषावर अवलंबून आहे. नॅशनल कॉन्फरन्सची दृष्टि सर्वांशीं मैत्री

व सर्वोत्रात्रत सहिष्णुता अशी आहे आणि त्यामुळें लीग व कॉन्फरन्स कधींच जवळ येऊं शकत नाहीं. भारतीय काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स एकत्र आल्या याच कारण दोन्हींमधील समान आदर्श व समान श्रद्धा होत. शिवाय काश्मीर-वर हल्ला केला त्या वेळीं भारत मदतीस धावून आला. म्हणून काश्मीरचा सामील-नामा अखेरचा ( फायनल ) आहे. "

## पठाणांबद्दल द्वेषभावना

७ जुलै १९४८ रोजीं जम्मू–पठाणकोट रस्त्याचें उद्घाटन झालें. त्या दिवशीं पंडितजी म्हणाले कीं, " पाकिस्तान हें मत्सर व द्वेष यांवर आधारलेलें आहे. ढोंगबाजी व लबाडींतून त्याची निर्मीति झाली आहे. " तीच विचार-सरणी शेखसाहेबांची होती. १६ नोव्हेंबर १९४७ रोजीं तात्पुरत्या सरकारचे प्रमुख म्हणून बोलतांना शेखसाहेब म्हणाले, " आक्रमण करून जयाचा मार्ग स्वीकारणाऱ्या लोकांनीं किती नीच कृत्यें केलीं आहेत याचा अनुभव गेल्या महा-युद्धांत जगाला आला आहे. तथापि काश्मीरमध्यें पाकिस्तानी आक्रमकांनीं जें केलें, जी नीचतेची पातळी गांठली, त्याला जगाच्या इतिहासांत तोड नाहीं. टोळीबाज पठाण हे पुढें होते. पण सारी साधनसामग्री पाकिस्तानची होती. त्यांच्या कृत्याचें नियंत्रण व निर्देशन मध्यवर्ती अशा केंद्राकडून होत होतें. त्यांचा उद्देश बंदूक आमच्या छातीवर रोखून पाकिस्तानचा कबजा काश्मीरवर बसवावयाचा होता. ज्यांनीं ह्या निर्दय आक्रमकांना उचलून धरलें व ज्यांनीं यांना काश्मीरच्या जनतेचे उद्धारक म्हणून गौरविलें ते सर्व इतिहासाच्या पुढें अपराधी ठरतात. या आक्र-मकांनीं स्त्रिया पळविल्या, भ्रष्टविल्या, त्यांच्यावर बलात्कार केले, मुलांच्या कत्तली केल्या व जें जें लुटतां येण्यासारखें होतें तें तें लुटून नेलें. पवित्र कुराणाचा अपमान केला व मशिदींना वेश्यालयें बनविलीं व आज प्रत्येक काश्मिरीच्या मनांत या आक्रमक पठाणांबद्दल व त्यांना भडकविणाऱ्या पाक पुढाऱ्यांबद्दल द्वेषाची भावना आहे. "

## पाकिस्तानचें क्रूर स्वरूप

५ फेब्रवारी १९४८ रोजीं सुरक्षा समितीपुढें बोलतांना शेखसाहेब म्हणाले कीं, " जम्मू आणि काश्मीर यांच्या प्रश्नांत पाकिस्तानला कांहींहि भूमिका नाहीं. ती गोष्ट मान्य करण्यास मी तयार नाहीं. आम्ही काय करावें व काय करूं नये हें सांगण्याचा पाकला हक्क नाहीं. पाकचा परिचय मुझफराबाद, बारामुल्ला व जम्मू-

काश्मीरमधील शेंकडों खेड्यांना झाला आहे व हा अनुभव पुनः घेण्यास मी तयार नाहीं."

## पाकिस्तानच्या ढोंगाचा भाग

नॅशनल कॉन्फरन्स व पाकिस्तान यांच्यामध्यें तात्त्विक व व्यावहारिक दृष्टीनें तडजोड अशक्य आहे. पाकिस्तान हें इस्लामिक राज्य आहे, व या बाबतींत शेख-साहेब यांनीं काश्मीरच्या संविधान-परिषदेंत ५ नोव्हेंबर १९५१ रोजीं आपले विचार प्रदर्शित केले, "पाकिस्तान हें मुस्लिम राज्य आहे, हा एक ढोंगाचा भाग आहे. खरें म्हणजे तें सामंतशाही राज्य आहे व थोड्या लोकांच्या हातांत त्याचीं सूत्रें राहावींत म्हणून राज्याला धार्मिकतेचा मुलामा दिला आहे. शिवाय पाकिस्तान हें संघटित राज्य नाहीं. सर्व मुसलमान त्यांत आलेले नाहींत. एका बाजूला अडीच कोटि प्रजा व दुसऱ्या बाजूला पूर्व बंगालमधील चार कोटि प्रजा या दोहोंत हजारों मैलांचें अंतर आहे. भारतांत फाळणीनंतरहि चार कोटि मुसलमान आहेत. आणि मुसलमान म्हणून विचार करावयाचा तर जेथें चार कोटि आहेत तेथें जाणें अधिक श्रेयस्कर."

## ब्रिटिशांचा कुटिल कावा

वरील सर्व भाषणें देण्याचा उद्देश एवढाच आहे कीं, जें घडलें आहे, घडविलें गेलें आहे तें वारंवार कुणाच्या लहरीसाठीं, कुणाचा हट्ट काढण्यासाठीं बदलतां येणार नाहीं. राजकारण म्हणजे पत्ते पिसण्याचा प्रकार नाहीं. माणसें बिथरतात, पण माणसें विवेकीहि असतात. १९५३ पर्यंत काश्मीरचा राज्यकार-भार कमीजास्त प्रमाणांत स्थिरपणें चालला होता. शेखसाहेबांनीं बऱ्याच प्रगति-पर गोष्टी केल्या. तथापि लोकशाही राजकारण म्हणजे खटपटबाजी व गटबाजी, तसेंच काश्मीरचें हिंदुस्थानला सामील होणें इंग्रजांच्या जागतिक धोरणाला विसं-गत होतें. काश्मीरच्या संरक्षणार्थ भारतानें केलेली योजना मौंटबॅटननीं ओळखली होती. नोव्हेंबर १९४७ मध्यें मौंटबॅटन राणीच्या लग्नासाठीं इंग्लंडमध्यें दहा दिवस गेले. राणीचे यजमान त्यांचे पुतणे लागतात. तेथें त्यांना काश्मीरच्या प्रश्नाबाबत ब्रिटिशांचें धोरण काय आहे हें सांगण्यांत आलें. काश्मीरच्या उत्तरेस व पश्चिमेस सोव्हिएट रशिया आहे. त्यांच्याशीं भारताचा संपर्क न वाढवा ही ब्रिटि-शांची दृष्टि होती. लंडनहून परत येतांच मौंटबॅटन यांनीं नेहरू-लियाकतअल्ली भेट लाहोरला घडवून आणली. तेथें तडजोड झाली नाहीं. आणि त्या सभेंत

मौंटबॅटन यांनीं हें प्रकरण युनोकडे नेण्याची कल्पना पंडितजींच्या मनांत भरविली. मंत्रिमंडळानें नाखुषीनें या गोष्टीला मान्यता दिली. काश्मीरमध्यें आपण हस्तक्षेप करूं नये अशी विचारसणी डॉ. आंबेडकर यांची होती. यूनोकडे हा प्रश्न न्यावा या गोष्टीस गांधींची मान्यता आहे असें मंत्रिमंडळापुढें सांगितलें गेल्यानें मंत्रिमंडळानें या गोष्टीस मान्यता दिली. तथापि सैनिकी कारवाई चालू ठेवावी असा कांहींनीं आग्रह ठेवला. पण सैनिकी दृष्टिकोन बाजूला ठेवून नेहरू यांनीं आपलें मत सेनापतीवर लादलें. त्यांच्या मतें जशी भारताची फाळणी झाली तशी काश्मीरची व्हावी व तशी परिस्थिति निर्माण झाल्यास प्रश्न सुटेल, असें प्रामाणिकपणें त्यांना वाटलें असेल; पण प्रत्यक्ष युद्धबंदी रेषा निश्चित झाल्यावर त्यांचें मत बदललें, असें मानण्यास जागा आहे.

## अमेरिकेचा मनसुबा

१ जानेवारी १९४९ रोजीं युद्धतहकुबी झाली. युद्धबंदीच्या वेळीं जीं सैन्यें होतीं, त्याचा विचार करून सीमा आंखली गेली. १ जानेवारी १९४९ पासून युनोमध्यें अनेक वेळां काश्मीरचा प्रश्न आला. अनेक तज्ज्ञ व अनेक मध्यस्थ धाडण्यांत आले. पण प्रश्न मिटला नाहीं. युनोच्या युद्धतहकुबीच्या ठरावान्वयें पाकिस्ताननें आपलें सैन्य काढून घ्यायचें होतें तें त्यानें काढलें नाहीं. ठरावाप्रमाणें आचरण केलें म्हणून जनमत करण्याचें कारण उरलें नाहीं. जेव्हां भारतीय सैन्य मोठ्या संख्येनें काश्मिरांत आलें, तेव्हां पाकिस्तानच्या सेनापतीनें त्याला विरोध करण्याचा सल्ला दिला नाहीं, तर सारा काश्मीर भारत व्यापील व त्यामुळें पाकिस्तानच्या स्वातंत्र्याला धोका निर्माण होईल असें त्यानें सांगितलें. उघड रीतीनें पाकिस्तानचें सैन्य काश्मीरमध्यें दाखल झालें. युनोच्या बैठकींत पाकिस्तानला आक्रमक ठरविण्यांत आलें. काश्मीरमध्यें झालेला पराभव पाकला भरून काढावयाचा होता व आहे. त्या दृष्टीनें पाकिस्ताननें आंतरराष्ट्रीय राजकारण खेळण्यास सुरुवात केली. अमेरिकेला जो काश्मिराचा भाग पाकिस्तानच्या ताब्यांत राहिला त्याचा उपयोग साम्यवादी राष्ट्रांविरुद्ध उभारलेल्या फळीसाठीं करण्याची संधि मिळाली. रशिया व चीन यांना चारी बाजूंनीं घेरण्याच्या दृष्टीनें जी एक न्यूनता मध्यपूर्वेपासून अतिपूर्वेपर्यंत होती ती गिलगिट हा भाग पाकिस्तानांत आल्यानें भरून निघाली आणि त्या ठिकाणीं अमेरिकेचे हवाई अड्डे आले. अमेरिकेच्या संरक्षणयोजनेंत पाकिस्तानला सियाटो व मिडोमध्यें स्थान दिल्यानें तो त्यांत सामील झाला. पाकिस्तानची परराष्ट्रीय नीति अमेरिकेच्या परराष्ट्रीय नीतीची दासी झाली. काश्मीरचें शासन

शेख अब्दुल्ला हे चालवीत असतांना त्यांचा संबंध अनेक अमेरिकन धूर्त व धोरणी राजकारणाशीं आला. अमेरिकेला हिंदुस्थानची तटस्थ नीति पसंत नव्हती आणि तिला शह देण्यासाठीं अमेरिकाहि पाकिस्तानला पुरस्कारीत होती.

## शेखसाहेबांची प्रतिज्ञा

काश्मीर आतां सुरक्षित झालें. कोट्यवधि रुपयांची मदत भारताकडून होऊं लागली व त्याचाच परिणाम अब्दुल्लांच्या दृष्टिकोनांत फरक करण्यास कारणीभूत झाला. घटनेंतील ३७० कलम त्यांच्या हट्टामुळें व आग्रहामुळें आलें. वस्तुतः स्वतंत्र काश्मीर अशा रुबाबानें ते काश्मीरचें राजकारण हाकीत होते. १९५२ नंतर त्यांच्या भाषणांत काश्मीरच्या स्वातंत्र्याबद्दल दांभिक जोर आढळून येतो. १९५१ च्या सुरवातीस त्यांनीं रणभीरपुरा येथें जें भाषण केलें त्यांत त्यांच्या विचारांतील बदल दिसूं लागला. त्या भाषणाची दखल पंतप्रधानांनीं घ्यावी अशी कांहीं मंत्र्यांनीं पंडितजींना विनंती केली, पण कांहीं परिणाम झाला नाहीं. तथापि काश्मीरच्या कार्यकर्त्यांत त्यामुळें मतभेद सुरू झाले आणि शेखसाहेबांच्या विरुद्ध बक्षी गुलाम महंमद यांचा एक गट तयार झाला. अब्दुल्लांच्या गटांत कांहीं साम्यवादी होते, व त्यांचाहि उद्देश त्यांच्या तंत्रानुसार काश्मीरचें शासन चालावें असें होतें. १९५३ सालीं मंत्रिमंडळांतील भांडणें जोरांत सुरू झालीं आणि सदरे रियासत करणसिंग यांनीं ऑगस्टच्या एका रात्रीं त्यांना मंत्रिमंडळाची पुनर्रचना करण्यासंबंधीं कळविलें. त्यांनीं सकाळपर्यंत वेळ मागून घेतला. त्या वेळीं रफीअहंमद किडवाई जिवंत होते. त्यांचा पुतण्या काश्मीर राज्याच्या प्रमुख सचिव होता. दूरध्वनिक्षेपक तासभर चालला व त्या तासांत अब्दुल्लांचें मंत्रिमंडळ बरखास्त करण्यांत आलें. बक्षींना नवें मंत्रिमंडळ बनविण्यास सांगण्यांत आलें, त्यांचा शपथविधि झाला व नव्या मंत्रिमंडळानें अब्दुल्लांना अटक करण्याचा हुकूम केला. बिजवराच्या लग्नकार्याप्रमाणें हें कार्य उरकण्यांत आलें व सकाळीं गुलमार्गच्या डाक बंगल्यांत शेख साहेब उठले त्या वेळीं पोलिस-अधिकाऱ्यांनीं त्यांना अटक केली. ते चरफडले तरी त्यांना प्राप्त परिस्थितीला तोंड द्यावें लागलें. भर भोजनांतून ब्राह्मणाला उठवावें असें झालें. चाणक्यावर हा प्रसंग आला असतां 'नंदकुलाचा नाश केल्याशिवाय शेंडीला गांठ मारणार नाहीं' अशी प्रतिज्ञा त्यानें केली होती. तशीच कांहीं प्रतिज्ञा शेखसाहेबांनीं केली असावी.

१९५८ सालापासून काश्मीरमध्यें पाकिस्तानी लोकांकडून घातपाती

कृत्यांना सुरुवात झाली होती. सरहद्दीवरील कटकटी तर सतत चालू होत्या व आहेत. आझादकाश्मीर म्हणजे गुंडांचें व गटबाजीचें आगर झालें होतें. १९५९ मध्यें आझाद काश्मीरनें आपण स्वतंत्र राष्ट्र आहोंत व या भूमिकेला पाकनें मान्यता दिली आहे, असें जाहीर केलें. या गोष्टीचे दूरवर परिणाम काय होतील या गोष्टीसंबंधीं प्रस्तुत लेखकानें पंडितजींना कळविलें होतें! आझाद काश्मीर स्वतंत्र म्हणून त्यावर युद्धतहकुबी शर्तींचें बंधन नाहीं. त्यांनीं कांहीं आक्रमण केलें तर पाकिस्तान जबाबदार नाहीं. त्याचप्रमाणें त्यांना शस्त्रास्त्रें पुरवून पाकिस्तानला नामानिराळें राहतां येईल व यावर उपाय म्हणून काश्मीरवर पाकिस्तानच्या बाजूनें कुणीहि कोठेंहि हल्ला केला तर तें भारताविरुद्ध युद्ध पुकारलें गेलें आहे अशी घोषणा नेहरू सरकारनें करावी म्हणून प्रस्तुत लेखकानें सूचना केली होती. काश्मीरचा प्रश्न लोंबकळत ठेवावा म्हणजे भारत समर्थ होणार नाहीं, समृद्ध होणार नाहीं आणि आशियाचें नेतृत्व त्याला मिळणार नाहीं ही एक विचारसरणी अमेरिकेच्या व ब्रिटनच्या वरच्या राजकीय वर्तुळांत होती ही गोष्ट प्रसिद्ध आहे. भारत हा लोकशाहीप्रधान आहे. पण समाजवादी आहे किंवा होणार ही गोष्ट अमेरिकेच्या राजकारणाला इष्ट नव्हती किंवा नाहीं. म्हणून पाकिस्तानचा शह अमेरिका कायम ठेवीत आहे. सैनिकी व औद्योगिक मदत पाकिस्तान मिळवीत आहे. काश्मीरच्या पराभवाचा बदला घ्यावयाचा आहे व पूर्व–पश्चिम पाकिस्तानांना जोडणारा एक पट्टा उत्तर हिंदुस्तानांत त्यांना हवा आहे. पाकिस्तानचें मत या बाबतींत घट्ट आहे, हट्टी आहे. तें दोलायमान नाहीं. साधनशुचिता या गोष्टीला पाकिस्तानच्या राजनीतींत स्थान नाहीं. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां काश्मीरच्या बाबतींत निश्चित भूमिका भारतानें घ्यावी अशी विचारसरणी अनेक लोक पूर्वीपासून मांडीत आले आहेत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत काश्मीरच्या प्रश्नामुळें हिंदुस्थानला जी भूमिका घ्यावी लागत आहे ती केविलवाणी आहे. युनोंतून हा प्रश्न कांहीं वैध कारणासाठीं काढून घेतां येत नसला तरी हिंदुस्थाननें चर्चेंत भाग घेऊं नये असेंहि अनेकांनीं पूर्वीपासून सुचविलें आहे. तथापि काश्मीरचें हाडूक दाखवून युनोमध्यें भुतावळ उठविण्यास पाकिस्तानच्या भुट्टोला बरेंच यश मिळालें आहे व भारतामध्यें हजारों पाकिस्तानी विगरपरवानगी राहात आहेत व त्याची दखल अद्याप पुरेशी घेतली जात नाहीं.

## पाकिस्तानी प्रचारामुळें सुटका

पूर्व बंगालमधून १५ लाख मुसलमान भारतहद्दींत गेल्या दहा वर्षांत आले आहेत. फाळणीनंतर सुमारें ८५ लाख हिंदु भारतांत आले आहेत. आणि

ही सर्व गोष्ट नियोजनपूर्वक होत आहे. भारत सरकार व पोलीस एक तर भ्रमांत आहेत, अगर जाणूनबुजून या गोष्टी करीत आहेत. याच्या उलट काश्मीरमध्यें पाकिस्तानी मुसलमानांना प्रवेश मिळणें दुरापास्त आहे. पण कांहीं काश्मिरी मुसलमान पाकिस्तानचा प्रचार करीत आहेत. घातपाती कृत्यें करीत आहेत. १९५८ सालीं घातपाती कृत्यांत शेख अब्दुला यांचा हात आहे म्हणून काश्मीर सरकारनें त्यांच्यावर खटला सुरू केला. शेखसाहेबांची बायको, मुलगा व जावई उघडपणें भारताविरुद्ध प्रचार करीत होतीं व आहेत. चीनचें आक्रमण होईतोंपर्यंत कांहीं उठाव करण्याची संधि पाकिस्तानला मिळाली नाहीं. चीनचें आक्रमण ऑक्टोबर १९६२ मध्यें झालें व तेव्हांपासून अमेरिकेची लष्करी मदत भारताला मिळूं लागली. चीननें नेफा सोडला व भारताला मिळणारी मदत पाकिस्तानाविरुद्ध वापरण्यांत येईल असा आक्रोश पाकिस्ताननें सुरू केला आणि गेल्या फेब्रुवारी महिन्यांत युनोपुढें पुन्हा काश्मीरचा प्रश्न आला आणि मार्चअखेर तो प्रश्न तहकूब करण्यांत आला. ५ मे ६४ ला तो पुनः यावयाचा होता. शेखसाहेबांचा खटला चार वर्षें चालूच होता. लक्षावधि रुपये त्यावर खर्च झाले होते व कोर्ट म्हणजे प्रचाराचा रंगमंच बनला होता. आणि आंतरराष्ट्रीय जगांत पाकिस्ताननें केलेल्या प्रचाराला भिऊन जाऊन कारण नसतांना शेख अब्दुल्लांची सुटका पंडितजींच्या संमतीनें मुख्य मंत्री सादिक यांनीं केली.

## हजरतबाल–प्रकरण

डिसेंबर १९६३ अखेर श्रीनगर येथें हजरतबाल प्रकरण उमटलें. बक्षी मंत्रिमंडळ तिसऱ्या निवडणुकीनंतर अप्रिय झालें. दडपशाही व भ्रष्टाचार यांना मर्यादा राहिली नाहीं. कोटि रुपयांची मिळकत बक्षीबंधूंनीं केली असे उघड आरोप करण्यांत आले. त्याच वेळीं कामराज योजनेच्या बुरख्याखालीं बक्षी यांनीं राजीनामा देऊन सुटका करून घेतली. त्यांची इच्छा आपला भाऊ मुख्य प्रधान व्हावा अशी होती, पण लोकांनीं ती ऐकली नाहीं. शमसुद्दीनला पाठिंबा दिला व त्याची राजवट खतम करावी यासाठीं हजरतबालचा कट करण्यांत आला असें वर्तमानपत्रांतून बोललें जात होतें. जी जाळपोळ झाली ती बक्षींच्या मिळकतीची. हिंदु-मुसलमान हा प्रश्न तेथें नव्हता. दोन दिवस सारें श्रीनगर कृति–समितीच्या तंत्रांत होतें. तिचे अध्यक्ष मसुदी हे पाकिस्तानविरोधी पण स्वतंत्र काश्मीर असावें या मताचे होते.

## सुटकेचा विपरीत परिणाम

जानेवारीच्या पहिल्या तारखेस प्रस्तुत लेखक व लालबहादुर शास्त्री यांची या प्रकरणाबाबत चर्चा झाली. या प्रकरणांतून अनेक अनर्थकारी घटना निघतील म्हणून मध्यवर्ती सरकारनें तात्पुरतें काश्मीर शासन हातीं घ्यावें व जरूर पडलें तर लष्करी अंमल सुरू करावा अशी विचारसरणी प्रस्तुत लेखकानें मांडली. तसाच सल्ला श्रेष्ठ मुलकी अधिकाऱ्यांनीं दिला, असें पुढें कळलें. लाल बहादूर यांनीं कॉंग्रेसच्या 'तात्पुरत्या' (ॲडहॉक) नीतीला अनुसरून शाब्दिक समझोता केला व सादिक यांची निवडणूक मुख्य प्रधान म्हणून. एकमतानें—अर्थात् वरवरच्या—घडवून आणली. तेथील परिस्थिति सुधारली नाहीं आणि काश्मीरच्या परिस्थितीमुळें पूर्व पाकिस्तानमध्यें नियोजनपूर्ण नियोजन झालें. लक्षावधि हिंदु भारतांत आले. मुकी व संयमी अशी वन्य जमातींतील जनता खवळली. कारण या निर्वासितांत वन्य जातींतील व ख्रिश्चन जातींतील जनता अधिक होती. ओरिसा व पश्चिम बंगालमध्यें दंगे झाले. कलकत्त्यांत दंगे झाले. भारत सरकारनें ते आटोक्यांत आणले. तथापि असेच दंगे पूर्वबंगालमध्यें दर पांच—सहा महिन्यांनीं होतच राहणार व पुढील दहा—पंधरा वर्षांत पूर्व पाकिस्तानांत हिंदु राहणार नाहीं. तसें झालें म्हणजे पंजाबी पाकिस्तान्यांचें वर्चस्व राहील हें उघड आहे; तें घडवून आणण्याचा हेतु आयुबखानाचा आहे. पूर्व बंगालमधील मुसलमान ते जाणून आहेत. म्हणून तेथें मोठा उठाव झाला आहे. काश्मीरमध्यें अस्वस्थता, हिंदुस्थानमध्यें अस्वस्थता, पूर्व बंगालमध्यें अस्वस्थता ही परिस्थिति असतांना अब्दुल्लांची सुटका करण्याचा हा निर्णय एक शोकान्तिका ठरणार आहे. अब्दुल्लांची सुटकाच झाली असें नव्हे तर त्यांचा एक राज्याभिषेकच झाला आहे. या सुटकेचा परिणाम, शेखसाहेबांच्या भाषणांचा परिणाम व त्यांवर केलेलीं भाष्यें संतापासून पंतापर्यंतचीं या सर्वांचा परिणाम काश्मीर, भारत व जग यांवर होणार आहे हें निर्विवाद; म्हणून या सर्वांचा विचार केला पाहिजे.

## अब्दुल्लांची विसंगत भूमिका

शेखसाहेबांची सुटका झाल्यापासून, त्यांनीं मुलाखती, भाषणें व चर्चा यांची गर्दी उसळून दिली आहे. हल्लीं त्यांनीं केलेलीं वक्तव्यें पूर्वी केलेल्या वक्तव्यांशीं विसंगत आहेत. त्यांची वृत्ति स्थिर नाहीं हाच त्याचा अर्थ आहे. जी गोष्ट पक्की व कायमची झाली त्या बाबतींत पुनर्विचार याचा अर्थ इति-

हासाची पुनरावृत्ति हाच होतो. हिंद व पाकिस्तान यांमध्यें मैत्री राहावी ही गोष्ट सर्वमान्य आहे. याचा अर्थ सामीलनामा रद्द केला पाहिजे. त्याशिवाय मैत्री राहत नाहीं हें अमान्य. काश्मीच्या प्रश्नांत पाकिस्तानचा संबंध येत नाहीं, असें म्हणणारे शेखसाहेब पाकिस्तानच्या सल्ल्याशिवाय व मान्यतेशिवाय काश्मीरचा प्रश्न सुटणार नाहीं असें म्हणत आहेत. भारतसरकारची भूमिका राजकारणाची आहे, घरगुती आहे, त्यांत पाकिस्तानला अधिकार नाहीं, ही भूमिका छगला यांनीं सुरक्षा समितींत स्पष्ट केली आहे व हें आक्रमण रद्द झाल्याशिवाय पाकिस्तानशीं बोलणीं करणें अयोग्य, ही भूमिका भारतानें अद्याप सोडली नाहीं. नेमकें या विरुद्ध शेख बोलत आहेत. राजकीय प्रश्न म्हणजे मंडईत भाज्यांचा भाव दररोज बदलतो असे नसतात. पाकिस्तान व भारत यांत मैत्री असावी हें सांगतांना व स्वयंनिर्णयाचा हक्क पुनः मागतांना शेखसाहेब पूर्व पाकिस्तानांतील कत्तलीचा विचार करीत नाहींत. बलुचिस्तान व पख्तुनिस्तान यांच्या स्वयंनिर्णयाच्या हक्काबद्दल बोलत नाहींत. याउलट जाऊन आयुबखानांची वकिली करीत आहेत व ती करतांना ऐतिहासिक घटना विपर्यस्त स्वरूपांत मांडत आहेत. श्री. मेनन यांनीं एका प्रसंगीं असें म्हटलें आहे कीं, "पाकिस्तान हा भारताचा शत्रु नंबर एक आहे व त्यामुळें पाकिस्ताननें सीआटो व सेंटो या संरक्षण-योजनेंत भाग घेतला व त्याच कारणासाठीं चीनशीं समझोता केला." शेखसाहेब म्हणतात, "भारतानें पाकिस्तानला चीनच्या जाळ्यांत ढकललें." वस्तुस्थिति अशी आहे कीं, मेनन हे १९५२ अखेर मंत्री झाले. पण पाकिस्तान त्यापूर्वीच अमेरिकेच्या सिआटो व सेंटोमध्यें सामील झाला होता. पाकिस्तानला काश्मीर अमेरिकेच्या मदतीनें लवकर मिळणार नाहीं म्हणून व अफगाणिस्तान हें रशियाच्या कच्छपीं आहे म्हणून दुरंगी राजकारण पाकिस्तानला करावें लागलें, ही वस्तुस्थिति आहे. लोकशाहीचा पुरस्कार करणारे शेख अब्दुल्ला पाकिस्तानच्या हुकूमशाहीबद्दल ११ मे १९६४ ला म्हणाले कीं, "पाकिस्तानमध्यें कसें राज्य असावें हा पाकिस्तानचा प्रश्न आहे."

## जगाची शांतता धोक्यांत येईल

तात्पर्य, आज शेखसाहेबांचीं भाषणें म्हणजे काश्मीर, भारत, पाकिस्तान व जग या सर्वांना धोक्यांत आणणारीं आहेत. इतकेंच नव्हे तर जगाची शांतता सुद्धां त्यामुळें धोक्यांत येण्याची शक्यता आहे. त्यांच्या भाषणांतून तीन मुद्दे प्रमुखपणें पुढें येतात. (१) काश्मीरचें भवितव्य निश्चित झालें नाहीं. (२

तें निश्चित करण्याच्या कामीं काश्मिरी जनतेच्या इच्छा प्रधान मानल्या पाहि-जेत. ( ३ ) काश्मीरला एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे व याच संदर्भात ते म्हणाले आहेत कीं, भारत व पाकिस्तान राहिलें तर काश्मीर राहिलें. काश्मीर हा भारतखंडाचा एक भाग आहे. तथापि निश्चित अशी योजना त्यांनीं अद्यापि मांडली नाहीं. त्यांचे आध्यात्मिक मित्र राजकीय प्रेरक आणि या प्रश्नांत साथ देणारे साथी या सर्वांनीं अनेक सूचना केल्या आहेत. या साऱ्या सूचना गेल्या पांच–सात वर्षांत अमेरिकेच्या मार्फत अनौपचारिकपणें मांडल्या गेल्या आहेत. कुठल्याहि सूचनेंत नावीन्य असें नाहीं. काश्मीरचा प्रश्न मिटला आहे ही भूमिका भारतानें सोडतां कामा नये. आणि काश्मीरचा प्रश्न मिटला नाहीं या सबबीवर अन्य घटक–राज्यांपेक्षां अधिक स्वायत्तता काश्मीरला दिल्यास हिंदुस्थानची एकता व ऐक्यभाव विस्कळित होईल. क्रिप्सच्या योजनेंत हेंच तत्त्व होतें. म्हणून काँग्रेसनें ती नाकारली आणि आज एका घटक–राज्याला अधिक स्वायत्तता दिली तर घटना ठिसूळ होईल व संघराज्य ( फेडरल स्टेट ) हें संयुक्त राज्य ( कॉन्फिड-रेशन ) होईल. आर्थिक प्रगतीचा वेग आणखी कमी होईल. भावनात्मक ऐक्य पूर्णपणें कानसलें जाईल. प्रांतीयता वाढेल.

## भारतानें ठाम भूमिका घ्यावी

म्हणून काश्मीर प्रश्न मिटला आहे अशी ठाम भूमिका भारत सरकारनें घेतली पाहिजे. इतकेंच नव्हे तर काश्मीर भारतांत राहील पण भारताचें राहणार नाहीं अशी कोणतीहि योजना मान्य करतां कामा नये. लाल बहादूरशास्त्री यांनीं, शेवटीं लोकांची इच्छा मानली जाईल असें आश्वासन दिलें आहे व त्यांतून काश्मीरचा प्रश्न अनिर्णित आहे असा अर्थ शेखसाहेब काढत आहेत. उद्यां जर भारतांतील पूर्वीच्या संस्थानांतील प्रजेनें हा हक्क मागितला तर लाल-बहादूरना मोठा पेचप्रसंग पडेल. आज राजधानींत स्पष्ट व यथार्थ भूमिका कोणी घेत नाहीं. शेखसाहेब म्हणत आहेत कीं, काश्मीर प्रश्नांत पाकिस्तानची संमति हवी आहे, ही तर अतिशय घातुक विचारसरणी आहे व तिचाच फायदा हिंदु-स्थानांतील मुसलमान घेतल्याशिवाय राहणार नाहींत व ते उघड उघड मोठ्या प्रमाणांत भारताविरुद्ध वागूं लागतील व भारतामध्यें अशांतता निर्माण करतील.

काश्मीरचें असें खास व्यक्तिमत्त्व आहे हा दावा थोडा खरा, बराचसा खोटा आहे. तसें पाहिलें तर एका शासनाखालीं असल्यानें थोडें वैशिष्ट्य त्या त्या घटक–राज्याला अगर प्रदेशाला स्वाभाविकच येतें. तथापि काश्मीरची अशी

खास संस्कृति अगर व्यक्तिमत्त्व आहे असें मानणें चूक ठरेल. तेथील हिंदु व शीख भारतांतील हिंदु-शिखांप्रमाणेंच आहेत. तेथील मुसलमान भारतांतील मुसलमानांप्रमाणें आहेत.

## देशांत अराजक माजेल

जे म्हणून उपाय सुचविले आहेत त्यांपैकीं पहिला सध्यांची युद्धरेषा ही कायम समजावी हा आहे. हा उपाय ब्रिटिशांनीं पूर्वी सुचविला होता. थोडें कमी-जास्त करून नेहरूंनीं तो मान्य करण्याची तयारीहि दाखविली होती. पण आयुबच्या उदयानंतर त्याचा विचार करण्यास पाकिस्तान तयार नाहीं. दुसरी योजना युनो-तर्फे ग्रॅहॅमनें सूचित केली होती. ती अशी कीं, लडाख ते जम्मू हें भारतांत जावें व काश्मीर खोरें पाकिस्तानांत जावें. या गोष्टीला पाकिस्तान किंवा भारत दोन्ही तयार नव्हते व आतां तर लडाखचें संरक्षण करण्यासाठीं काश्मीर खोरें भारतांत असणें लष्करी दृष्ट्या आवश्यक झालें आहे. काश्मीरवर दोघांचा अंमल असावा ही राजाजींची योजना अव्यवहार्य व प्रश्न निकालांत काढण्याऐवजीं त्याला जीवदान दिल्यासारखी ठरते. साऱ्या राज्यकारभारांत दोन सत्ता एकमेकां-वर मात करण्याचा प्रयत्न करीत राहतील व जात्याच्या दोन तळींत दाणे भरडले जावेत तशी काश्मीरची स्थिति होईल. जयप्रकाशांनीं सुचविलेली योजना ही अमेरिकन छापाचा माल आहे. त्यांत लडाख हा हिमाचल प्रदेशांत घालावा, जम्मू पंजाबमध्यें घालावा व आझाद काश्मीर व भारतांतील काश्मीर खोरें यांना स्वतंत्र राज्य बहाल करावें. या योजनेंत चातुर्य व अमेरिकन कपट स्पष्ट दिसून येतें. याला पाकिस्तान विरोध करील, कारण कुठल्याहि परिस्थितींत पाकिस्तानला काश्मीर खोरें स्वतंत्र राज्य नको आहे. तसें झालें तर पाकिस्तानचें व चीनचें जुंपणार आहे. अमेरिकेच्या संरक्षण-योजनेंत गिलगिटबरोबर सारें काश्मीर खोरें सामील होईल व त्या योजनेला चीनचा विरोध आहे. तिसरा उपाय सारा जम्मू–काश्मीरचा भाग पाकिस्तानला द्यावयाचा म्हणजे पाकिस्तानच्या जनतेनें तसा निर्णय द्यावयाचा व तो निर्णय पाकिस्तानच्या बाजूनें लागेल. कारण निवड-णुकींत होणारें आवाहन कुराण हातांत घेऊनच होईल व मग परिणाम हिंदु स्त्रियांची कत्तल काश्मीरमध्यें, हिंदु-मुसलमान-दंगे भारतांत, हिंदूंना मुसल-मानांच्या सुऱ्यांना व भारतसरकारच्या गोळ्यांना बळी पडावें लागेल. आणखी एक परिणाम म्हणजे पूर्व पाकमध्यें हिंदूंची कत्तल व हिंदु निर्वासितांचा लोंढा भारतांत लोटणार. याचाच एक परिणाम भारताची आर्थिक व्यवस्था कोलमड-

णार इथपर्यंत होईल व देशांत अराजक माजेल. तेव्हां हा उपाय म्हणजे जनमत-गणनेचा उपाय ( प्लेबिसाइट ) हा भारताचा नाश करणारा व अराजक माजविणारा आहे.

## यांत अर्थहि नाहीं, अध्यात्महि नाहीं

आणि हे सर्व प्रश्न शेखसाहेबांची मुक्तता करून अदूरदृष्टीनें देशापुढें व जगापुढें मांडले गेले आहेत. आयुबखान यांनीं आपण केव्हांहि बोलणीं करण्यास तयार आहोंत व हे प्रश्न सोडविण्याच्या कामीं भारतानें सूचना मांडाव्यात, मांडलेली कोणतीहि सूचना मान्य करावयाची नाहीं ही जनाब जिनांची नीति पाकिस्तानचा स्वभावधर्म झाला आहे. भारतांतील कांहीं मंडळी केवळ सिद्धान्त-प्रेमामुळें बोलत असतात. विनोबांना आदर दाखवून सुद्धां असें म्हणावें लागतें कीं, या प्रश्नांचे संपूर्ण धागेदोरे, गुप्त व सुप्त अर्थ त्यांना पूर्णपणें माहीत नाहींत. जयप्रकाश हे तर उघड उघड अमेरिकेच्या विचारांशीं सहमत आहेत. आणि या सर्वांच्या विचारांचा उपयोग धूर्त पाकिस्ताननीनें मुत्सद्देगिरीनें आपल्या प्रचारार्थ करीत आहेत. शेजारचें राष्ट्र मित्र असावें हें मान्य. पण त्याची मैत्री संपादन करण्यासाठीं वाटेल ती किंमत देणें यांत अर्थहि नाहीं व अध्यात्महि नाहीं. भारतानें कुठलीहि सूचना करावी व ती जर काश्मीरच्या लोकांना पसंत असेल तर ती आम्हांला मान्य आहे असें मार्च १९६१ मध्यें आयुब यांनीं सांगितलें होतें. त्याचीच री पाकिस्तानचा परराष्ट्रमंत्री कादीर यांनीं एप्रिल १९६१ मध्यें ओढली. लेफ्ट. जनरल शेख यांनीं जुलैमध्यें असें सांगितलें कीं, जनगणनाव्यतिरिक्त दुसरी सूचना हिंदुस्थानानें सुचवावी. तिचा विचार होईल.

या सर्व वक्तव्यांमागें काश्मीरचा प्रश्न अनिर्णित आहे ही भूमिका आहे, व तीच भूमिका शेखसाहेब उचलून धरीत आहेत. भारताच्या लोकशाहींत व तिच्या घटनेंत भाषण–स्वातंत्र्याचा हक्क आहे. पण त्याला कांहीं मर्यादा आहेत. त्यांचें उल्लंघन शेखसाहेब मोठ्या प्रमाणांत करीत आहेत.

## जागतिक युद्धाचें आवाहन ?

गेल्या कांहीं दिवसांत शेखसाहेबांच्या भाषणांतून पूर्वीइतका अहंमन्यपणा किंवा अहंकार दिसून येत नाहीं. अशी सूचना आतां पुढें येत आहे कीं, काश्मीर-मध्यें निवडणुका व्हाव्यात व त्याहि बाबतींत तसें केलें तर चूक होणार आहे. निवडून येणारे लोक पुनः स्वयंनिर्णयाचा हक्क पाहिजे असें म्हणतील व मग

हिंदुस्थान सरकारची परिस्थिति केविलवाणी होईल. लोकांच्या इच्छेविरुद्ध दडप-शाहीनें शासन चालावें असें कोणी म्हणणार नाहीं. लोकांच्या इच्छा खुद्द शेख-साहेबांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या निवणुकींतील निवडून आलेल्या घटनासमितींतील घटनासभादांनीं पूर्वीच व्यक्त केल्या आहेत. आणि पुनः हा हक्क प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष देणें म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणांत शीतयुद्ध काश्मीरमध्यें आणण्यासारखें आहे.

काश्मीर स्वतंत्र राहिला अगर पाकिस्तानला मिळाला तर हिंद व रशिया यांच्यामधील संबंध दुरावतील. पाकिस्तानांत जाणें याचा अर्थ अमेरिकेंत जाणें व कदाचित् वस्तुतः चीनमध्यें जाणें असा होऊं शकतो. चीन, रशिया व अमेरिका यांचे सध्यांचे संबंध लक्षांत घेतां काश्मीरच्या विद्यमान स्थितींत फरक करणें म्हणजे शांततेचें कंकण बांधणाऱ्या भारतानें जागतिक युद्धाचें-निदान शीतयुद्धाचें-पुण्याहवाचन ठेवण्यासारखें आहे.

## काश्मिरांत काय हवें ?

मग प्रश्न असा उपस्थित होतो कीं, काश्मिरांत काय व्हावें, काय इष्ट आहे. प्रस्तुत लेखकाचें मत आहे कीं, काश्मीरचें शासन अधिक स्थिर व भ्रष्टाचारविरहित व्हावें व तसें होण्याच्या दृष्टीनें सादीक मंत्रिमंडळाला योग्य ती मदत करावी. कायदा व सुव्यवस्था नीट राखण्यासाठीं जरूर पडली तर पुनः विद्रोही नेत्यांना तुरुंगांत टाकावें. पण त्या कामीं त्यांच्या विचारसरणीस तपशील-वार प्रचार करून उत्तर द्यावें. अनेक वर्षे तुरुंगांत खितपत पडलेल्या बादशाहा-खानची काळजी पाकिस्ताननें केली नाहीं. आणि शेख अब्दुल्लांना १९५६ मध्ये पकडण्यांत झालेली चूक १९६४ मध्यें सोडण्यानें दुरुस्त झाली नाहीं. उलट ती गोष्ट आज शोकांतिका होऊं पाहात आहे.

✻ ✻ ✻

: १ :

# कॉंग्रेसमधील नवागत

मराठी भाषा जेथें बोलली जाते त्या सर्व विभागाचें एक स्वतंत्र व एकसंध राज्य निर्माण होऊन आतां चार वर्षें पूर्ण झालीं आहेत. भाषिक राज्याबाबत ज्यांचे कांहीं गैरसमज होते ते गैरसमज या काळानें अनाठाई ठरविले आहेत. आणि हा इतिहास पाहतां प्रथम पंचवार्षिक योजनांचा प्रपंच करण्याच्या अगोदर भाषिक राज्यांची रचना पूर्णत्वास नेण्यावर भर देण्यांत आला असता, तर नंतर जी कटुता निर्माण झाली आणि जो राष्ट्राचा बहुमोल काळ व्यर्थ गेला तो गेला नसता. शिवाय नंतर जें पाणीवांटप आणि सीमाविषयक बांडगुळी प्रश्न निर्माण झाले, तेहि टळले असते असें वाटूं लागतें. कारण त्या वेळीं देश देवाणघेवाणीच्या मनोवृत्तींत होता. कॉंग्रेस–संघटना पूर्णपणें जनमत व्यापून होती व संघटनेंतल्या मातब्बर पुढाऱ्यांनीं घेतलेले निर्णय जनतेनें शिरोधार्य मानले असते.

असो. सांडलेल्या दुधाबाबत रुखरुख करण्यांत कांहींच अर्थ नसतो. महाराष्ट्राचें एकभाषी राज्य उशीरानें कां होईना, पण झालें व तें झाल्यामुळें एका विशाल भूखंडाच्या आर्थिक आणि सांस्कृतिक पुनर्रचनेस चालना मिळाली याबद्दल समाधान अवश्य वाटलें पाहिजे. एकभाषी राज्य झाल्यामुळें महाराष्ट्रांत प्रगतीचें व नवविचाराचें एक नवयुग निर्माण झालें ही गोष्ट महाराष्ट्राच्या कट्टर शत्रूंनाहि कबूल करावी लागेल.

महाराष्ट्राबद्दल परप्रांतीयांचेच नव्हे तर आपले म्हणविणारांचेहि फार भयानक गैरसमज होते. आजहि ते कोठें कोठें मूळ धरून आहेत. पण महाराष्ट्र राज्य झालें व त्यानें शासन आणि आर्थिक प्रगति यासंबंधांत जें ओज दाखविलें त्यामुळें हे गैरसमज आपोआप वितळले आहेत. त्याचें श्रेय अवघ्या मराठी माणसाला–मुंबईपासून नागपूरपर्यंत आणि पुण्यापासून बेळगांवपर्यंत पसरलेल्या मराठी माणसालाच आहे.

महाराष्ट्र निर्मिति दिनाच्या या प्रसंगानें आज आमची प्रगति जशी आमच्या डोळ्यांपुढें उभी राहील, त्याचप्रमाणें आमच्या या मराठी भाषिक राज्याचे जे कांहीं भाग आम्हांला नाकारण्यांत येत आहेत त्यांचीहि आठवण झाल्याशिवाय राहात नाहीं. बेळगांवचा प्रश्न आहे. गोवा अजून आम्हांला मिळावयाचा आहे. आमच्या गोदा, कृष्णा या नद्यांचें पाणी आमचें नाहीं असें म्हटलें जातें तोहि वाद मिटावयाचा आहे. आमच्या अडचणीहि लौकरच दूर होतील अशी आशा या मंगलदिनीं आपण करूं या. महाराष्ट्र-निर्मित दिनाच्या या अवसरावर गोव्यांत मडगांव येथें मराठी साहित्यसंमेलनाचें अधिवेशन भरत आहे. या अधिवेशनाला गोव्यांतील जनतेचा हार्दिक पाठिंबा लाभला आहे ही शुभ घटनाच म्हणावयास हरकत नाहीं.

महाराष्ट्राला आपल्या सर्व मराठी भाषिकांची मंगलमय प्रगति साधावयाची आहे. ती साधीत असतांच देशाचेंहि मंगल करावयाचें. त्यासाठीं महाराष्ट्र तन, मन आणि धन देतच आहे. पुढेंहि देतच राहील. आणि त्याबरोबर लोकशाही मार्गानें आपले न्याय्य हक्क बजावून घेत राहील. आमचे जे बांधव आमच्यापासून तूर्त तोडले गेले आहेत त्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं त्यांना आम्ही आमच्यांत घेणारच आहोंत.

१८८५ सालीं काँग्रेस अस्तित्वांत आली व तिचें पहिलें अधिवेशन मुंबई येथें झालें. वास्तविक तें पुणें येथें व्हावयाचें, परन्तु पुण्यास त्या वेळीं सांथ असल्यानें तेथें तें होऊं शकलें नाहीं. सुरवातीचा तिचा उद्देश मर्यादित होता. देशाच्या राज्यकारभारांत कांहीं नोकऱ्या व कांहीं हिस्सा मिळावा व देशांत प्रतिनिधित्व असलेल्या राजकीय संस्था अस्तित्वांत याव्यात असा उद्देश होता. १८८५ ते १९०० अखेरपर्यंत काँग्रेसचा विस्तार होत गेला. तिचे सभासद सामान्यपणें मध्यमवर्गीय होते. कांहीं श्रीमंत व जमीनदार मंडळी पण तिच्या क्षेत्रांत दिसत होती. तिचें नेतृत्व, विद्वत्ता व चारित्र्य, व्यवहार व चातुर्य यांनीं

सजलेलें होतें. पण तिचें मुख्य काम जें लोकांना जागृत करावयाचें, राजकीय शिक्षण द्यावयाचें तें सामान्यपणें वृत्तपत्रद्वारां केलें जात होतें. वर्षांतून एकदां कॉंग्रेस अधिवेशन होई, ठराव होत, उत्कृष्ट भाषणें होत व नाताळांतील ३ दिवसांचा हा तमाशा समाप्त होई.

## भूक शांत झाली नाहीं

१९ व्या शतकाच्या अखेर कॉंग्रेसची चळवळ लोकांत पसरूं लागली. आणि मोठमोठ्या शहरांतून तिच्या संघटनेच्या शाखा निघूं लागल्या. ३ दिवस होणारी चर्चा प्रांताप्रांतांत होऊं लागली. प्रचलित प्रश्न विशेषतः आर्थिक व राजकीय चर्चिले जाऊं लागले, वृत्तपत्रें वाढलीं, ग्रंथालयें व सभा आतां मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्या. कॉंग्रेसच्या ठरावामागें हलकें हलकें जनशक्ति निर्माण होऊं लागली. १८९३ सालीं पहिला कौन्सिलचा कायदा करण्यांत आला. थोड्या प्रमाणांत केंद्रीय व प्रांतांतील कायदेमंडळांत निवडून आलेले प्रतिनिधि बसूं लागले. 'भूक भाकरीची, घांस भुईमुगाएवढा' यामुळें भूक शांत तर झालीच नाहीं, उलट आपण फसविलें गेलों आहोंत या जाणिवेनें जनमत संतप्त होऊं लागलें आणि तें संतप्त मन निरनिराळ्या तऱ्हेनें अभिव्यक्त होऊं लागलें. मोर्चे, सत्याग्रह हे अद्याप काळाच्या उदरांत होते. अर्ज, विनंत्या निरुपयोगी म्हणून बाजूला फेकल्या गेल्या होत्या. लोकशक्ति प्रभावी होत होती. पण उपयुक्त व उचित अशी अभिव्यक्ति तिला सांपडत नव्हती. शतकाअखेर मोठमोठ्या सभा भरूं लागल्या त्याचबरोबर जपानचा रशियाविरुद्ध जय, यामुळें भारतीयांच्या मनामध्यें एक अपूर्व उत्साह निर्माण झाला. इंग्लंडनें भारतांतील उद्योगधंदे शंभर वर्षें कारवाई करून हाणून पाडले होते. कांहीं कापडगिरण्या निघाल्या होत्या, पण इंग्लिश माल महाग पडूं नये म्हणून या गिरण्यांच्या येथील उत्पादनावर कर लादण्यांत आले होते. दुष्काळ, बेकारी व निर्भेळ दारिद्र्य, निरपेक्ष दारिद्र्य यांनीं जनता गांजली होती. आर्थिक वर्चस्वानें भारत कायमचा गुलाम बनला आहे, दरिद्री झाला आहे ही गोष्ट दादाभाई नौरोजींपासून रावसाहेब रानड्यांपर्यंत अनेक नेत्यांनीं स्पष्ट केली होती. या गोष्टीविरुद्ध विरोधाचा उठाव रचला जात होता. याशिवाय कांहीं जुलमी कृत्यांमुळें प्रक्षोभ उत्पन्न झाला होता आणि त्याचा परिणाम इंग्रज अधिकाऱ्यांचे खून होण्यांत होऊं लागला होता.

ठरावाचा आवाज पोहोंचला नाहीं, पिस्तुलांचा आवाज पोहोंचला. दडपशाहीला सुरुवात झाली. दडपशाहीला सुरुवात म्हणजे सत्तात्यागाची नांदी ठरते. हाच अनुभव पुढें आला. नव्या विचारांची मंडळी काँग्रेसमध्यें निर्माण झाली. स्वराज्य, सुराज्य, स्वावलंबन, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चार तत्त्वांनीं नवीन पक्ष सुसज्ज झाला होता. १९०६ मध्यें कलकत्ता काँग्रेसमध्यें स्वराज्य शब्द प्रथम उच्चारला गेला आणि एक शब्द केवढी क्रांति करूं शकतो याचा अनुभव देशांतील प्रजा व राज्यकर्ते यांना आला. नदीचें पाणी थांबत नाहीं. मोठ्या अडथळ्याला वळसा घालतें. किरकोळ फोडून उघडून पुढें जातें. प्रवाह मागें तोंड वळवत नाहीं. स्वातंत्र्याचें युद्ध म्हणजे बापानें मुलाकडे द्यावयाचा वारसा. तें एकदां सुरू झालें म्हणजे ज्याचा अंत स्वातंत्र्यप्राप्तींतच होतो ह्या विश्वासानें काँग्रेसचें राजकारण बदलूं लागलें. नव-नेतृत्व आलें. दीर्घदृष्टि जुन्यांनीं त्याचें स्वागत केलें. सत्ताभिलाषी पण समय न समजणाऱ्यांनीं विरोध केला आणि त्याचा परिणाम सुरतेंत काँग्रेसचीं शकलें पडलीं. नवनेते नव्या समाजाच्या आकांक्षा घेऊन हद्दपार झाले. कारागृहांत गेले, अनेक फांशीच्या तख्तावर चढले, जुनें नेतृत्व अकर्तृत्वाच्या ब्रणींत पडून राहिलें, आणि मग त्यांत कृमिकीटक निपजणें स्वाभाविक होतें. अशी परिस्थिति १९१४ च्या जूनपर्यंत होती.

## लोकमान्य सुटल्यानंतर

१९१४ च्या जूनमध्यें लोकमान्य सुटले, आणि ३–४ महिन्यांतच पहिलें महायुद्ध सुरु झालें. टिळकांनीं हा प्रसंग ओळखून धोरणानें पावलें टाकलीं. आणि काँग्रेसची परम्परा ही एक मोठी शक्ति जाणून जुळवून घेतलें. व्यक्तिगत अहंभाव अगर प्रतिष्ठा राष्ट्राच्या हितार्थ बाजूला टाकली. काँग्रेसमध्यें प्रवेश केला आणि त्याच्याबरोबर हजारों नवीन नवीन तरुण माणसें काँग्रेसमध्यें आलीं. १९१६ मध्यें लखनौला अधिवेशन झालें. पुन्हां काँग्रेस लोकांची होऊं लागली. जे कर्तृत्व-हीन होते, अगर ज्या प्रकृतीला लोकसंपर्क मानवत नव्हता, ते दूर झाले. काँग्रेस-संघटना बळावत गेली. १९२० सालीं काँग्रेसच्या राजकारणांत आणखी एक स्थित्यंतर झालें. कायद्याच्या मर्यादेंत राहून प्रगति होत नाहीं, तेव्हां त्याबाहेर जाऊन पण अहिंसेनें राजकारण चालविणें ही युगाची गरज ठरली. ती विचारसरणी गांधीजींच्या मार्फत अभिव्यक्त झाली. निराशेंतून आशा जन्मली. गंगेचा प्रवाह न उलटतां, न थांबतां पुढें जाऊं लागला. राज्य हें " अन्ततो गत्वा " प्रजेच्या संतोषावर व संमतीवर चालत असतें. प्रजेमध्यें आज्ञाधारकत्वाची भावना असेल

तर कायदा. नाहीं तर ती एक हास्यास्पद गोष्ट ठरते. चालू युगांत कायदा हा शासनाचा उजवा हात असतो आणि कारभार हा लोकांनीं ऐकलें तरच चालतो. पालखीपदस्थ यांची गति पालखी वाहणाऱ्या भोयांच्या पायांवर अवलंबून असते. त्यांनीं पालखी खालीं ठेवली म्हणजे त्यांत बसणारा अपदस्थ होतो. राज्यकारभाराची पालखी भारतीयच वाहात आहेत. ती त्यांनीं खालीं ठेवावी. याचाच अर्थ गांधींच्या शब्दांत सांगावयाचें तर असहकार. टिळक, जें केलें तें कायद्यांत नसतें, असें सांगत; फार तर कायदा अवैध आहे, असें म्हणत. गांधींची भूमिका निराळी. त्यांचें म्हणणें कायदेपण येण्यासाठीं जनतेची संमति अवश्य आहे. ती नसेल तर तो कायदा बंधनकारक नाहीं. कुत्र्याच्या गळ्यांत मालकाच्या नांवाचा पट्टा नसला तर तें कुत्रें गोळी घालून मारावें, असें आपण म्हणतों त्याप्रमाणें जनतेच्या सम्मतीची मोहोर कायद्यावर उमटली नसेल तर, तो कायदा बंधनकारक नाहीं. एक निराळा विचार, एक नवा राजकीय साक्षात्कार जनतेला घडला. पण त्याची किंमत द्यावी लागली. १९२०–२१ ची चळवळ, १९३०–३४ ची चळवळ, १९४१ ची चळवळ, १९४२–४७ पर्यंतची चले जावची चळवळ; ही सर्व स्वातंत्र्याचा सौदा पटविण्यासाठीं योग्य तो त्याग–प्राणदानापर्यन्त–या साठीं होती. ज्या चळवळींत या पाव शतकांत जे लोक पडले, मृत्यु पावले, कारागृहीं गेले, त्यांच्यांत स्वार्थबुद्धि किमान होती व देशप्रेम कमालपर्यंत होतें. तेथें प्रतिष्ठा अगर पदप्राप्ति याचा विचारहि नव्हता. कां करावें, याबद्दल चौकशी नव्हती. ऐकावें व मरावें हाच त्या युगाचा संदेश होता. ४२ च्या चळवळींत देशाची निष्ठा कसोटीला लागली. थोडे अपशब्द सोडून दिल्यास कार्यकर्ते दृढनिश्चयी ठरले. व परिणाम असा झाला कीं, कांहीं आंतरराष्ट्रीय राजकारणामुळें, कांहीं अंतर्गत चळवळीमुळें इंग्रजांनीं सत्तांतर केलें व ती सत्ता ज्याचे हातीं यावयाची होती त्यांनाच म्हणजे ६० वर्षें, ६० संवत्सरें अहोरात्र झगडणाऱ्या स्वातंत्र्याच्या चळवळीचें नेतृत्व करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाच्या हवालीं केली.

## कॉंग्रेसमध्यें आलेले संधिसाधु

कॉंग्रेसनें जी सत्ता घेतली ती पक्षासाठीं नसून देशासाठीं घेतली होती. झगडण्याच्या युगांत ज्यांनीं ज्यांनीं व ज्या पक्षांनीं विरोध केला होता, तो सर्व बाजूला सारून जुन्या हिशोबांची चुकती बाकी करून जें पहिलें मंत्रिमंडळ बनविलें, त्यांत सर्व पक्षांचे लोक घेतले. राष्ट्रीय सरकार असें त्याचें स्वरूप केलें. याचा परिणाम कॉंग्रेस-संघटनेवरहि होणें अनिवार्य होतें. कॉंग्रेस ही सेवा, संघ

असावी, अशी इच्छा गांधींनीं प्रदर्शित केली; तथापि लोकशाही राजकारण म्हणजे निवडणुका, निवडणुका म्हणजे पक्ष, पक्ष म्हणजे जाहीरनामे व प्रचंड खटाटोप करणारांची संख्या. आज ना उद्यां घटना पुरी होणार आणि निवडणुका होणार, मग त्यासाठीं नवें संघटन करणें सोपें नव्हतें. म्हणून गांधींचा सल्ला काँग्रेसश्रेष्ठींनीं सादर नाकारला, व संघटनेंत शिस्तीचा काटेकोरपणा नव्हता. मतस्वातंत्र्याला वाव होता, आणि महत्त्वाकांक्षी लोकांना साधन सुचविण्याचा वाव होता; आणि परिणाम असा झाला कीं, देशद्रोही, राष्ट्रद्रोही, स्वार्थी प्रवृत्तीचे, आदर्श जीवनाशीं अपरिचित असे, नशिबाची परीक्षा पाहणारे हैदरअल्ली असे सर्व काँग्रेसचे 'पावलीवाले' सभासद झाले. ज्यांनीं इंग्रजांशीं सहकार्य केलें रिक्रूट भरती केली, पोलिसांना काँग्रेस चिरडण्यांत मदत केली ते सर्व पांढरी टोपी घालून तेथपर्यंत केलेल्या पापांवर पांघरूण घालूं शकले. कुठल्याहि संस्थेच्या जीवनांत नवीन माणसें येत असतात, जुनीं निवृत्त होत असतात, पण संस्थेचा कुलधर्म व कुलाभिमान सारखा जोपासला जातो. पावसाळ्यांत नवें पाणी येत असतें, गढूळ असतें, कालांतरानें तें स्वच्छ होतें. प्रवाहसातत्याला मदत करीत असते. म्हणून नवागतावर निर्बंध बरोबर नसतो. पण किमान पात्रता, किमान चारित्र्याची पातळी असावयास पाहिजे. गळ्यांत माळ घालावयाची व संत व्हावयाचे तर माळ गळ्यांत असेपर्यंत तरी मद्यपान करतां कामा नये. पितांना माळ खुंटीवर टांगली व पान संपतांच घातली, येवढ्यानें पथ्य पाळलें गेलें असें होत नाहीं. विष्ठलमात्रा घ्यावयाची तर पथ्यें सांभाळावयास पाहिजेत. १९५२ च्या व ५७ च्या निवडणुकींत बहुमतानें नव्हे तर बहुमतांत उमेदवार निवडून आल्यानें काँग्रेस सत्तेवर राहिली आणि अनेकांना असें वाटूं लागलें कीं ही स्थिति कायमची आहे. महाराष्ट्रांत १९५२ सालच्या निवडणुकींत पुष्कळ नवीन मंडळी घेतली गेली. पण त्यांच्या चारित्र्याचा विचार केला गेला. पण त्याहि वेळीं जातीयवादी पक्षाचे लोक जुनीं लक्तरें टाकून काँग्रेसची टोपी व नेहरू शर्ट घालून काँग्रेस-कमिट्यांच्या अंगणांत दिसूं लागले. व्यापारी पूर्वी काँग्रेसचे सावकार होतेच, आतां ते कब्जेगहाणदार झाले. परिणाम असा झाला कीं निवडणुकींत व्यापाऱ्यांनीं पैसा द्यावा आणि पूर्वी मराठेशाहींत मामलतीचा लिलाव होत असे त्याप्रमाणें व्यापाऱ्यांना जनतेची लूट करण्याचे परवाने मिळूं लागले. महाराष्ट्र काँग्रेसच्या दुटप्पी धोरणानें १९५६ मध्येंच मिळावयाचा संयुक्त महाराष्ट्र लांबला आणि वैयक्तिक स्वार्थासाठीं व प्रतिष्ठेसाठीं अनेकांनीं आपल्या निष्ठा अधिकारलालसेनें बदलल्या, विकल्या, विकृत करून घेतल्या. वाटेल तें महाराष्ट्राचें करा

पण मंत्री राहूं द्या ही प्रवृत्ति दिसून आली. द्वैभाषिक आलें. त्यांत सारी सत्ता गुजराथी लोकांच्या हातांत येणार हें दिसूं लागतांच गुजराथ्यांनीं त्याचा फायदा घेऊन महाराष्ट्रीय राजकारणाचा फड नासला. दोन तट निर्माण केले आणि एका पक्षानें द्वैभाषिक म्हणजे मराठ्यांचें राज्य होईल म्हणून त्याला ब्राह्मणांचा विरोध आहे, असें सांगण्यास सुरुवात केली, व तें मिळतांच संयुक्त महाराष्ट्र झालाच आहे, अशा घोषणा मारल्या. आणि १९५७ च्या निवडणुकींत जातीय राजकारण घुसडून महाराष्ट्रांत काँग्रेसचा पराभव करून घेतला. समितीनें ज्यांना शेंदूर लावला ते निवडून आले आणि नंतर निवडून आलेल्या समितींतील सभासदांना जातीयतेच्या स्थरावर आवाहन करून द्वैभाषिक राबविण्याचा प्रयत्न केला, आणि जेव्हां जनतेची चळवळ व कांहीं महाराष्ट्रीयांची संयुक्त महाराष्ट्राबाबतची तीव्र व अव्यभिचारी निष्ठा यांचा परिणाम होऊन संयुक्त महाराष्ट्र झाला, त्याहि वेळीं तें दान घेण्यास द्वैभाषिकाबद्दलची निष्ठा दाखविणारे हात पसरून उभे होते आणि जेव्हां १९६२ मध्यें निवडणुका झाल्या त्यांत ज्या लोकांनीं संयुक्त महाराष्ट्राबद्दल निष्ठा दाखविली त्यांना काँग्रेसनें कटाक्षानें बाजूला सारलें व सामान्यपणें जे निवडणुकीसाठीं उभे केले होते त्यांच्या पूर्वचारित्र्याचाहि विचार करण्यांत आला नाहीं. मंत्रिमंडळांत सुद्धां अनेकांना प्रवेश मिळाला आणि त्यांची कसोटी काँग्रेसनिष्ठा अगर चारित्र्य ही न ठरतां दुसरीच कांहीं ठरली. आज महाराष्ट्राच्या काँग्रेसमध्यें स्वार्थासाठीं आलेले बहुसंख्याक आहेत. शिस्त, सुविचार, सुव्यवस्थितपणा या गोष्टी आतां नकोशा झाल्या आहेत. आज काँग्रेस म्हणजे मोरे यांच्या शब्दांत सांगायचें तर "सर्किटें, नरनटें, खटपटें यांनीं गजबजलेली मार्केट यार्डची भूमि आहे." मंदिरांत येणारे पूजापात्राऐवजीं चाकूकात्र्या घेऊन आले आहेत व मंदिर हें स्वार्थाचा सौदा करण्यासाठीं एक पेढी झाली आहे आणि आज ग्रामीण भागांत पंचायती राज्यानें व सहकारी चळवळीनें असा परिणाम झाला आहे कीं कायदा व सुव्यवस्था ठिसूळ झाली आहे. गुन्हेगारांना काँग्रेसच्या पुढाऱ्यांचें संरक्षण आहे. कोणी अधिकारी सरळ वागूं लागला तर "फोनवरून" बदली होईल बघ अशी धमकी देण्यांत येते. भ्रष्टाचार इतका माजला आहे कीं सदाचार दुर्गुण ठरला आहे. थेट डोक्यापासून पायाच्या नखापर्यंत काँग्रेसचा देह सडला आहे व टीकेची कदर नाहीं, कारण मनाला लाज अशी आतां वाटतच नाहीं आणि हें सर्व माझ्या मतें काँग्रेसच्या संघटनेचें स्वरूप बदलण्यानें झालें आहे.

## नवीन रक्त हवें पण कसें

संस्थेमध्यें नवीन माणसें आलीं पाहिजेत. पण त्या प्रवेशावर कांहीं तरी निर्बंध हवे आहेत आणि या दृष्टीनें १९६२ च्या मार्चपासून या बाबतींत माझे विचार मीं जाहीर केले त्याहिपूर्वी १९५७ सालीं ढेबर अध्यक्ष असतांना काँग्रेस-संघटनेविषयीं माझी योजना त्यांना दिली होती व त्यांत केवळ ४ आणे वर्गणी दिल्यानें सभासदत्व असूं नये अगर मिळूं नये, असें मीं प्रतिपादिलें होतें. सभासदांचे २ प्रकार असावेत :–

( १ ) सामान्य, ( २ ) क्रियाशील. क्रियाशील सभासदांची संख्या जिल्ह्यामागें ३००-४०० पेक्षां अधिक असूं नये. त्यांनीं सर्व वेळ राष्ट्रकार्याला दिला पाहिजे व त्यांच्या योगक्षेमाची काळजी काँग्रेसनें घेतली पाहिजे. आणि या सभासदांतूनच सर्व शासनक्षेत्राच्या निवडणुकींत उमेदवार उभे केले पाहिजेत. आळीपाळीनें त्यांनीं संघटनेंत व शासनांत कामें केलीं पाहिजेत. क्रियाशील सभासदत्व मिळण्यासाठीं एक वर्ष उमेदवारी व अभ्यासक्रम पुरा करण्याची अट असावी. सामान्य सदस्यांची संख्या लोक-संख्येच्या एक शंभरांशपेक्षां अधिक नसावी. काँग्रेसचे जलसे सुटसुटीत व व्यव-हारी दृष्टीनें असावेत. काँग्रेसची कार्यकारिणी मंत्रिमंडळाच्या धर्तीवर व अखिल भारतीय काँग्रेस सभा कायदेमंडळाच्या धर्तीवर असावी व वार्षिक जलशांत केवळ क्रियाशील सभासदांनीं भाग घ्यावा. सामान्य सभासदांना हजर राहूं द्यावें अशी ती स्थूलमानानें योजना होती. ढेबर यांनीं कांहीं केलें नाहीं, पुढें कांहीं झालें नाहीं म्हणून १९६२ च्या मे महिन्यांत ही योजना सोशॅलिस्ट काँग्रेसमध्यें मीं प्रसिद्ध केली व राज्यपालपदाचा राजीनामा दिला. इच्छा अशी कीं या योजनेचा स्वीकार काँग्रेसनें करावा व आज जें काँग्रेसमध्यें झालें आहे तें न व्हावें. काँग्रेस पुनः सतेज, चारित्र्यसंपन्न लोकांची व्हावी. लोकशाही शासनाचें यजमानपद निदान ऋत्विजपद तिच्याकडे असावें हीच इच्छा होती. यांत जातीचा, धर्माचा विचार नव्हता व नाहीं. नवागतांचें मी स्वागत करतों, पण गुंडांचें स्वागत करूं शकत नाहीं. सुसंस्कृत स्वार्थाचेंहि स्वागत करूं शकतों, पण निकृष्ट व ओंगळ स्वार्थाचें स्वागत करूं शकत नाहीं. आणि म्हणून काँग्रेसजनांनीं या दृष्टीनें विचार करावा, असें मी इच्छितों. भाजीविक्या कोणत्या जातीचा अगर धर्माचा आहे, याचा विचार मी करीत नाहीं, पण केळीं म्हणून कारलीं विकूं लागेल तर त्याला मी विरोध करीन. आणि आज काँग्रेसमध्यें क्रांतिकारक फरक न झाल्यास जें चीनमध्यें चँग के शेक पक्षाचें झालें तेंच इथें होईल असें दिसूं लागलें आहे.

✕ ✕ ✕

: खबरींतील काका :

# : १० :

# अश्लील वाङ्‌मय

आधुनिक राज्याचें स्वरूप आतां पूर्वीसारखें राहिलें नाहीं. पूर्वीचें राज्य म्हणजे बंदोबस्ती राज्य. वित्त व जीवित यांचें संरक्षण करण्याचें राज्य आणि म्हणून त्याला पहारेकरी स्वरूपाचें राज्य असें यथार्थपणें म्हटलें जात असे. आतां राज्याचें स्वरूप बदललें आहे. आतां त्याचें क्षेत्र म्हणजे व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत. एवढेंच नव्हे तर त्याचा जीव गर्भावस्थेंत असल्यापासून राज्य काळजी घेतें व तो मेल्यानंतर त्याच्या संपत्तीची पण काळजी घेतें आणि या कारणांनीं आधुनिक राज्य हें भद्र राज्य, कल्याणकारी राज्य ही पदवी घेऊन जगांत वावरत आहे. व्यक्तीचें शिक्षण त्याच्या चरितार्थाची व्यवस्था, त्याबरोबरच त्याच्या विचारांची सृष्टि व चारित्र्याबद्दलहि राज्यानें, जें कर्तव्य या परिस्थितींत निर्माण होतें, तें करणें आवश्यक ठरलें आहे.

## शासनाची व्यापकता

शिक्षण हें आतां राज्याची जबाबदारी आहे, आणि केवळ तें खाजगी प्रयत्नावर सोपवून चालणार नाहीं याची जाणीव आधुनिक राज्याला आहे. आधुनिक राज्यांत हेतुविरहित कांहीं असूं शकत नाहीं व प्रयोजनाशिवाय कांहीं घडत नाहीं. केवळ पंडित करणें, चालते बोलते विश्वकोश निर्माण करणें, हें शिक्षणाचें

ध्येय नसावें ही गोष्ट आतां मान्य झाली आहे. समाजांतील सार्‍या घटना व गोष्टी, प्रयोग व प्रक्रिया ह्या सुसंगत व कांहीं तरी मध्यवर्ती कल्पनेला धरून असल्या पाहिजेत. राज्य हें निर्हेतुक संघटन नाहीं. सामान्यपणें याचें सभासदत्व जनसिद्ध असतें. कशासाठीं राज्य अस्तित्वांत आलें ? हें आधुनिक राज्यांच्या घटनांकडे पाहतां त्यांमध्यें स्पष्ट केलेलें असतें. न्यायासाठीं समाज अस्तित्वांत आला. दंडयोजनेमुळें समाजाचें एक अंग शासन असें निर्माण झालें आणि एके काळीं मर्यादित क्षेत्र असलेलें शासन आतां समाजाच्या सार्‍या जीवनक्षेत्रावर हक्क सांगत आहे आणि त्यामुळें व्यक्तीच्या जीवनावरसुद्धां प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष राज्याचा अधिकार व पगडा बसला आहे. आधुनिक राज्यांत व्यक्ति व शासन असा संघर्ष निर्माण होत नाहीं, असें नाहीं. पण त्या संघर्षाचा निर्णय समाजाच्या बाजूनें होतो. भाषण-स्वातंत्र्य, मुद्रण–स्वातंत्र्य, संचार–स्वातंत्र्य, संघ–स्वातंत्र्य इत्यादि स्वातंत्र्यें हीं कधींहि निरपेक्ष व अमर्याद अशीं नव्हतीं. प्राचीन काळीं सुद्धां कांहीं संयम होते, कांहीं आचारधर्म होता. ‘ आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् । ’ आपल्याला जें आवडणार नाहीं तें आपण परक्यांच्या बाबतींत करूं नये. ह्या महान् तत्त्वावर सामाजिक जीवन आधारलेलें आहे. प्राचीन काळीं सामाजिक मर्यादा धार्मिक स्वरूपांत समाजापुढें असत. पण जो आचारधर्म सांगितला होता त्याच्यामध्यें अनेक शतकांचा अनुभव जमेस धरला होता. भाषणस्वातंत्र्य होतें, पण कसें बोलावें, किती आदरानें व अदबीनें बोलावें, कुठें बसावें, कसें बसावें, ह्या सार्‍या गोष्टींचा विचार केला होता. मोठे वादविवाद होत. न्यायसभा भरत. धर्मनिर्णय होई. पण साध्या भाषणांतून विवेकाच्या मर्यादा पाळल्या जात. ‘ वचनात् प्रवृत्ति, वचनात् निवृत्ति ’ असे तर्कशुद्ध विचार मांडावे लागत. अयोग्य व अश्लील भाषण होत नसे. कारण एक अनुशासनी हवा सार्‍या समाजांत होती. अचकट विचकट लिखाणाला व वक्तृत्वाला होळीचा एक दिवस बिनशर्त आंदण दिला होता व अशा रीतीनें सारें नियमन व नियंत्रण, सभ्यता व संस्कृति ह्याला अनुसरून समाजानें सुव्यवस्थित केलें होतें. आतां ही जबाबदारी सर्वव्यापी राज्याकडे आली आहे.

## व्यक्तिस्वातंत्र्याच्या मर्यादा

नोकरीसाठीं, शिक्षणासाठीं, औषधासाठीं प्रत्येक व्यक्तिगत व सामाजिक गरजेसाठीं राज्याकडे आपण धांव घेतों. छापण्याचीं यंत्रें, छापण्यासाठीं कागद

ह्याहि गोष्टींची मागणी सरकारकडे आपण करतां. धान्यांत काळाबाजार झाला तर, सरकारी यंत्रणेवर तुटून पडतों,पदार्थांत भेसळ झाली तर सरकारवर उखडतों; कुणी असें म्हटलें कीं, "गिऱ्हाइका, सावध राहा, डोळे उघडून भाव दे, माल घे;" तर आपण त्यावर टीका करतो आणि असें म्हणतों कीं योग्य भावांत योग्य प्रमाणांत चांगल्या प्रतीचा माल पुरविण्याची व्यवस्था सरकारनें केली पाहिजे व हें म्हणतांना प्राचीन काळच्या व्यापारस्वातंत्र्यावर आपण गदा आणत असतों. आणि असेंहि म्हणतों कीं, आजच्या जगांत स्वातंत्र्य अनुभवायचें म्हणजे त्याला मर्यादा असली पाहिजे. सीमारहित प्रदेश म्हणजे राज्य नव्हे, चौकटीशिवाय चित्र नव्हे, लांबीरुंदीशिवाय वस्त्र नव्हे, त्याप्रमाणें कांहीं मर्यादित मान्य असल्याशिवाय कोठलेंहि नागरिक स्वातंत्र्य हें असूंच शकत नाहीं. आणि जी मर्यादा असेल ती समाजाच्या, स्वास्थ्याच्या, उन्नतीच्या, संरक्षणाच्या दृष्टीनें असली पाहिजे. सभा शांतपणें चालली आहे आणि सभेंत जर एखाद्यानें साप साप म्हणून आरडाओरड केली आणि सभेंत गोंधळ झाला आणि कांहीं मुलें चेंगरलीं, स्त्रिया कोलमडल्या आणि ज्यानें हा उपद्व्याप घडवून आणला तो जर म्हणूं लागला कीं, मी माझ्या भाषण-स्वातंत्र्याचा हक्क बजावला, तर त्याच्या श्रीमुखांत भडकावून सांगितलें पाहिजे कीं, स्वातंत्र्याचा हक्क असा बजाविण्यासाठीं नाहीं. १० माणसें एखाद्या उपहारगृहांत बसून दरोडा घालण्याचा विचार करत असलीं तर तशी बातमी लागतांच राज्यसरकारनें त्यांना पकडलें पाहिजे. आणि जर ती मंडळी असें म्हणूं लागलीं कीं, आमच्या संघस्वातंत्र्यावर हल्ला होतो, तर त्यांना पकडूनच संघस्वातंत्र्याच्या मर्यादा स्पष्ट केल्या पाहिजेत. राज्य युद्धांत गुंतलेलें आहे, त्याचें अस्तित्व धोक्यांत आहे, अशा वेळीं कुणी एखादा अहिंसावादी लढूं नका, रंगरूट भरतींत जाऊं नका, असें म्हणत असेल तर, त्याला कारागृहांतच टाकलें पाहिजे. भाषण-स्वातंत्र्याची मर्यादा त्याला याच रीतीनें पटवून दिली पाहिजे. वाटेल त्या भावानें वाटेल तें उत्पादन करून वाटेल तेथें वाटेल त्या भावानें, वाटेल त्याला विकणें व देशामध्यें दुर्भिक्ष्य व दुर्मिळता आणणें असें कुणी करीत असेल तर, त्याचा बंदोबस्त केला पाहिजे व तें करणें योग्य, आणि सरकार तें न करील तर सरकार दोषी व त्याला हाणून पाडणें नागरिकांचें मग पवित्र कर्तव्य होतें. या दृष्टीनें विचार करतां चांगलें अन्न योग्य प्रमाणांत, योग्य किंमतींत देणें, चांगल्या, स्वच्छ व हवेशीर जागा योग्य भाड्यांत देणें, हें जसें सरकारचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें चांगलें वाङ्मय जनतेला देणें, व जें दिलें

जात आहे, तें योग्य आहे कीं नाहीं याची दक्षता घेणें हें सरकारचें कर्तव्य आहे, आणि आधुनिक राज्याचें आज्ञापक कर्तव्य आहे. केवळ ऐच्छिक नाहीं.

या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन १९६२ च्या सातारा येथील साहित्य-संमेलनांत अश्लील वाङ्मयाबाबत ठराव झाला. मोठा वादविवाद झाला. आणि शेवटीं कांहीं दुरुस्ती होऊन तो ठराव एकमतानें पास झाला. या ठरावान्वयें संमेलनाचे अध्यक्ष व चार अन्य सभासद यांची समिति नेमण्यांत आली आणि त्या समितीनें या बाबतींत जें अश्लील असेल तें अध्यक्षांचे नजरेस आणावें व त्याची अध्यक्षानें दखल घ्यावी असें होतें. ही ४ मंडळी प्रतिष्ठित आहेत. त्यांत एक निवृत्त न्यायाधीश आहेत व तीन ख्यातनाम साहित्यिक आहेत. स्वीकृत केलेल्या दुरुस्तीमुळें ही समिति कायम स्वरूपाची आहे. फक्त तिचा अध्यक्ष बदलेल. या ठरावावरील चर्चेंत कलेचा शिखंडी पुढें उभा करून अनेक वाग्वीरांनीं शुद्ध साहित्यावर हल्ले चढविले. तथापि कांहीं परिणाम झाला नाहीं. उलट एकमतानें तो ठराव पास झाला. या ठरावानें अस्तित्वांत आलेल्या समितीनें कोठलीहि वैयक्तिक भावना न ठेवतां जें वाङ्मय गलिच्छ, लैंगिक भावना प्रक्षुब्ध करणारें, जाणून बुजून हेतुपूर्वक लिहिलेलें अशाच वाङ्मयाबद्दल दखल घेतली. सरकारशीं पत्रव्यवहार केला, आणि सरकारनें अशा तऱ्हेचें वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आढळून आल्यास आपणहून पोलिसांनीं कारवाई करावी, असे आदेश जिल्हा-पोलिसांना देण्यांत आले. ठरावामुळें जें वातावरण उत्पन्न झालें, त्याचा परिणाम सुमारें वीस-एक तक्रारी सरकारकडे अध्यक्षांनीं धाडल्या, आणि कांहींचा निकाल लागून कांहीं संपादकांना व लेखकांना कडक शिक्षाहि झाल्या. बाकीच्या तक्रारींची चौकशी चालू आहे. समितीच्या अध्यक्षांनीं व सभासदांनीं मिळून गृह-मंत्र्यांची गांठ घेऊन कायदा अधिक तीव्र करावा अशी मागणी केली. त्या वेळीं तूर्त विद्यमान कायद्यांत जेवढी कडक शिक्षा देणें शक्य आहे, तेवढीच देण्यांत येईल व त्यानंतर आळा न बसल्यास कायदा तीव्र करण्याचा विचार करण्यांत येईल असें सांगण्यांत आलें. याच सुमारास मद्रास सरकारनें अश्लील लिखाणाबाबत कायदा तीव्र केला आहे. २ वर्षांची शिक्षा ठेवली आहे. मोठा दंड ठेवला आहे. आणि त्याचा परिणाम चांगला झाला आहे असा वृत्तान्त आहे. लोकसभेंत एका महिला सभा-सदानें बिल मांडलें असून त्यांत २ वेळां अश्लील लिखाणाबाबत शिक्षा झाली तर छापखाना जप्त करावा अशी व्यवस्था आहे. तें विधेयक पुढील अधिवेशनांत चर्चेला येईल. त्यावर जें लोकमत प्रसिद्ध झालें आहे, त्यावरून विधेयकाची

इष्टता लोकांना पटली आहे असें दिसून येतें. दरम्यान एखाद्या मासिकाला आक्षेपार्ह लिखाणाबद्दल शिक्षा झाली तर तें मासिक रेल्वेच्या बुकस्टॉलवर विक्रीस ठेवूं नये, याहि सूचनेचा विचार सरकार करीत आहे. त्याचप्रमाणें असल्या लिखाणाबद्दल ज्यांना शिक्षा झाली आहे, अगर ज्या मासिकांची प्रवृत्ति असें लिखाण प्रसिद्ध करण्याची आहे, त्यांना सरकारी जाहिराती मिळूं नयेत, ह्याहि सूचनेचा विचार सरकार करीत आहे, असें मानण्यास जागा आहे. पण याच-बरोबर असल्या लिखाणाचा विरोध व निषेध समाजांतील स्त्री-पुरुषांनीं अवश्य केला पाहिजे. ‘ चर्चा, शंका, उत्तरें येणेंच कार्य बळावें ’ ही समर्थांची उक्ति लोकशाहीला धरून आहे. आणि या दृष्टीनें अनेक ठिकाणीं परिसंवाद झाले आहेत व होत आहेत. महारोगापेक्षां सुद्धां हा भयंकर रोग आहे. जर्मनी, अमेरिका व अन्य पाश्चात्य राष्ट्रांत याविरुद्ध कारवाई केली जात आहे पण तेथें असल्या लिखाणाकडे धंदा म्हणून पाहण्यांत येत आहे व त्याला “ वाङ्मयीन वेश्याव्यवसाय ” अशी संज्ञा दिली आहे. तेथील समाजाचे नेते संभ्रमित झाले आहेत आणि वेळींच कांहीं उपाययोजना न केल्यास समाज हा नैतिक अराजक-तेंत परिवर्तित होईल, हें स्पष्ट दिसूं लागलें आहे; आणि तसें झालें म्हणजे अघोरी व राक्षसी संस्कृति अस्तित्वांत येईल व सारीं पवित्र नातीं पशु-स्थरावर येतील. आदर्शानें व त्याच्या आचरणानें सुसंस्कृत झालेला समाज विस्कळित होईल, विकृत होईल आणि ज्याची लाठी त्याची म्हैस हा जंगलचा कायदा समाजाचा दंडक ठरेल. हें भविष्य भारताला टाळावयाचें असेल तर वेळींच नियोजनपूर्ण कडक उपाय भारतानें केले पाहिजेत.

## स्त्रियांनीं पुढाकार घ्यावा

महाराष्ट्रामध्यें गेल्या १० वर्षांत असलें वाङ्मय मोठ्या प्रमाणांत प्रका-शित होत आहे व त्याची विक्री चोका-चोकांतून होत आहे. खेडेगांवांतील मुलें आतां कोठें शिकूं लागलीं आहेत आणि त्यांच्यांत असल्या वाङ्मयाचा प्रसार झपा-ट्यानें होत आहे. घर रचण्यापूर्वीच तें मोडण्याची व्यवस्था असावी असा हा प्रकार आहे. दुधाच्या चरवींत दूध येण्यापूर्वीच मिठाचे बारीक खडे टाकण्यांत येत आहेत; म्हणून महाराष्ट्र सरकारनें या बाबतींत अधिक दक्षता घेतली पाहिजे. मुलें साहसी असतात. त्यांच्या साहसाला व कुतूहलबुद्धीला योग्य वळण योग्य काळीं लावलें पाहिजे. ह्या बाबतींत ( Precensorship ) म्हणजे मुद्रणापूर्वी तपासणी ही व्यवस्था केली तरी त्यानें मुद्रण-स्वातंत्र्याच्या हक्कावर गदा येते असें वाटत नाहीं आणि समाजाच्या संरक्षणार्थ नैतिक व लौकिक या बाबतींत अमर्याद

हक्क राज्याला असतात. अन्यथा ते समाजाचें संरक्षण करूं शकत नाहींत. समाजांत स्त्रियांनी व त्यांच्या संस्थांनीं असल्या लिखाणाबाबत सभा भरवाव्या व असल्या लेखिकांना व संपादकांना असल्या लिखाणापासून निवृत्त करण्याचा प्रयत्न करावा व प्रसंगीं आपण अबला नाहीं हेंहि दाखवावें. तसें थोडेंसें कार्य सुरू झालें आहे. ज्या लिखाणाबाबत कलेचा आश्रय घेण्यांत येतो, त्याचाहि विचार केल्याशिवाय समितीनें तें लिखाण आक्षेपार्ह मानलें नाहीं. गेल्या वर्षभर केलेल्या खटपटीमुळें व त्याहिपेक्षां लोकमत निर्माण केल्यामुळें अनेक अश्लीलपटु लेखकांनीं खेद व्यक्त केला आहे.

## संमेलनानें विचार करावा

१९६३ च्या दिवाळी अंकांतून अश्लील लिखाण मोठ्या प्रमाणांत कमी झालें आहे. तथापि हें वातावरण कायम ठेवलें पाहिजे. दंडाच्या भीतीबरोबर लेखकाच्या व संपादकाच्या सद्‌बुद्धीला व सामाजिक जबाबदारीला आवाहन केलें पाहिजे. ह्या दोन्ही दृष्टिकोनांतून समिति काम करीत आहे. अश्लील लिखाणाबरोबर अर्वाच्य लिखाण हाहि एक रोग वाढतच आहे. ठरावाप्रमाणें समितीच्या कक्षेंत हा विषय तूर्त येत नाहीं. तथापि याचाहि विचार मडगांव साहित्य-संमेलनानें करावा असें मला वाटतें. सार्वजनिक जीवन हें अधिक गंभीर, अधिक गौरवयुक्त, अधिक सभ्य व अधिक सौजन्यशील असावें असें मला वाटतें. चांगल्या शिवराळ लिखाणानें आनंद होणारें मन दुर्बळ म्हणून हें दौर्बल्य नाहींसें करणें ही एक साहित्यिकांची जबाबदारी आहे. साहित्यानें समाजाचें सारथ्य केलें पाहिजे.

* * *

: सत्तरींतील काका :

: ११ :

## नव्या सरकारसमोरील समस्या

दि. १७ मे १९६४ रोजीं मुंबईत ए. आय्. सी. सी. च्या अधिवेशनामध्यें मीं पंडित नेहरूंना पाहिलें. मीं त्यांच्याशीं फक्त हस्तांदोलन केलें. त्यांची बोलण्याची इच्छा दिसली, पण मी त्यांना आयुरारोग्य चिंतून माझ्या जागेवर जाऊन बसलों. माझ्या मनांत मात्र विचार चमकून गेला कीं, आतां आणखी कांहीं आठवड्यांचेच हे सोबती आहेत. नाशिबानें आठवड्यांचें कांहीं दिवसांतच रूपांतर केलें आणि दि. २७ च्या दुपारीं त्यांच्या मृत्यूच्या बातमीनें साऱ्या जगाबरोबरच माझ्याहि मनाला हादरा दिला. एका परीनें मी यासाठीं तयारच होतों. जानेवारीमध्यें भुवनेश्वर येथें त्यांच्या आजारानें एकदम डोकें वर काढलें. तेव्हांपासून मला वाटत होतें कीं, ते अजूनहि कांहीं महिने जगतील व तो कालखंड आपल्या वारसासाठीं कांहींतरी निश्चित योजना आंखून ठेवतील.

तीन तपें ज्या काँग्रेस पक्षाचें त्यांनीं एकट्यानें नेतृत्व केलें त्या काँग्रेसपक्षासाठींहि कांहीं तरी दिशा निश्चित करतील असें वाटलें होतें. पहिल्या प्रतिक्रियेचा भर ओसरल्यावर माझें मत चिंतनशील झालें आणि वाटलें कीं नेहरू आणि आमच्यासारखे इतर कांहीं जण ज्या काळचे होते तो काळ आतां संपलेला आहे, आतां आम्ही आहोंत म्हणजे काय आमच्या इच्छेविरुद्ध दिवस ढकलीत

आहोंत. कोणीहि माणूस अनिवार्य नसतो आणि जो कोणी स्वतःला तसें समजतो तो आपल्या पूर्वजांवर, आपल्या सहकाऱ्यांवर आणि भावी पिढ्यांवरहि घोर अन्याय करीत आहे. साऱ्या देशानें, नव्हे साऱ्या जगानें, त्यांच्या मृत्यूबद्दल शोक करावा हें स्वाभाविक आहे. पण काळ कोणापुढेंहि तमा बाळगीत नाहीं; तो कोणालाहि अनिवार्य समजत नाहीं. जगाला पुढें जायचें असतें पण देशाला प्रगति करायची असते.

## माझें आणि पंडितजींचें एकमत

पं. नेहरूंनंतर कोण याची भारतांत सर्वांनाच चिंता वाटत होती. तीन वर्षांपूर्वी माझी लालबहाद्दूर शास्त्रींशीं कांहीं कारणानें गांठ पडली होती. तेव्हां पंजाबच्या राजकारणाबद्दल आमचें बोलणें झालें. तेव्हां मी त्यांना म्हणालों कीं, शास्त्रीजी हे समतोल बुद्धीचे गृहस्थ आहेत. म्हणून कोणत्याहि आणीबाणीच्या परिस्थितीच्या वेळीं मी त्यांच्याकडे पाहीन, ते तेजस्वी मार्गदर्शनासाठीं नव्हे तर आहे तीच परिस्थिति धैर्यानें कायम ठेवण्यासाठींच होय. भुवनेश्वर अधिवेशन संपल्यावर विलासपूर रेल्वे स्टेशनावर पी. टी. आय. चा एक बातमीदार माझ्या डब्यांत शिरला. मी पुण्याला परत चाललों होतों. त्यानें मला पंडितजींच्या प्रकृतीबद्दल विचारलें आणि पुढें कसें काय करावें असाहि प्रश्न टाकला. तेव्हांच मीं त्याला सांगितलें होतें कीं, पंडितजी आतां कांहीं फार दिवस जगत नाहींत आणि म्हणून आपण ताबडतोब शास्त्रीजींना परत बोलाविलें पाहिजे. ही गोष्ट दि. ११ जानेवारी १९६४ ची आहे आणि दि. १४ च्या वर्तमानपत्रांत बातमी प्रसिद्ध झाली कीं, शास्त्रीजी बिन खातें मंत्री म्हणून मंत्रिमंडळांत प्रवेशले आहेत. माझें नि पंडितजींचें एकमत आहे हें पाहून मला आनंद झाला. त्यांनीं हा निर्णय वेगळ्या कारणासाठीं घेतला असेल हें शक्य आहे. पंजाबच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिल्यापासून जेव्हां जेव्हां कोणी मला विचारी तेव्हां मी हेंच सांगत आलों आहे कीं, पुढील सार्वत्रिक निवडणुका होईपर्यंत पंडितजींच्या मृत्यूनें रिकामी होणारी गादी शास्त्रीजीच सुशोभित करूं शकतील. पंडितजींचा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय दर्जा हाच शास्त्रीजींचाहि आहे असें म्हणणें चूक होईल. शिवाय पंडितजींचें जें प्रचंड व्यक्तिमत्त्व त्यांनीं राजकारणांत समर्थपणें आणि सर्वहितसाधक रीतीनें वापरलें त्याचीहि शास्त्रीजी-कडे उणीवच आहे. दिल्लीच्या राजकीय रंगभूमीवर ज्या अनेक व्यक्ति गर्जत आहेत आणि मिरवत आहेत, त्यांमध्यें श्रेष्ठ सचोटी, चारित्र्य आणि धैर्य या

बाबतींत लालबहादूर शास्त्री हे सर्वश्रेष्ठ आहेत. सध्यां तरी त्यांच्या ठिकाणीं स्वतःहून पुढें पाऊल टाकण्याची वृत्ति नाहीं. पण अनेकांच्या बाबतींत घडलें आहे तसें घडून येईल व नवी जबाबदारी अंगावर पडल्यावर त्यांच्या अंगीं हाहि गुण चमकूं लागेल आणि मग त्यांच्या वाणींत व वृत्तींत हेतुप्राधान्य आणि नियोजन यांचाहि सुगावा जाणवूं लागेल. आतां त्यांची काँग्रेसपक्षाचे नेते म्हणून रीतसर निवड झालेली असल्यानें ते आतां भारताचे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. तेव्हां आतां त्यांचें काम ठरलेंच म्हणायचें.

## तरीहि शास्त्रीच आले असते

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वातावरण सध्यां अशा अवस्थेंत आहे कीं, त्यांतून हरेक प्रकारच्या दुष्परिणामाचा जन्म होणें शक्य आहे. त्यांची एकमतानें झालेली निवडहि केवळ औपचारिक आहे. या औपचारिकतेच्या पोटांत अनेक व्यक्तिगत वा राजकीय हितसंबंधाचा संघर्ष लपलेला आहे. तो खदखदता आहे आणि तो केव्हां पेट घेईल याचा नेम नाहीं. त्यांच्या अविरोध निवडणुकीसाठीं ज्या तंत्राचा वापर करण्यांत आला त्यामुळें लागलेल्या निकालाला नैतिक प्रतिष्ठा वा डौल लाभला नाहीं. संसदेंतील काँग्रेस पक्षाला जरी पक्षनेत्याची सरळ निवडणूक करायला सांगितलें असतें तरी शास्त्रीच निवडले गेले असते–विजयाचें मान फार मोठें पडलें नसतें कदाचित्–पण त्यांचीच निवड झाली असती यांत शंका नाहीं. गेल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून एक वदंता सर्वत्र दाट पसरलेली होती कीं, कोणी एक भांडवलवाला लोकसभेंतील सत्तर मतें आपल्या खिशांत असल्याची बढाई मिरवतो आहे. आणखी एका जातीयवादी काँग्रेस पुढाऱ्याचें म्हणणें असें कीं, त्यांच्याहि खिशांत जवळ जवळ तितकींच मतें आहेत. या म्हणण्यांत कांहीं सत्यांशहि आहे. काँग्रेसच्या संसदीय पक्षांत उघड निवडणूक झाली असती तर भांडवलवाले आणि जातीयवाले एक झाले असते. पण तरीहि शास्त्रीच विजयी झाले असते. आणि हीच पद्धति चांगली ठरली असती. त्यामुळें निरामय लोकशाही प्रजेचा मान राखला गेला असता. राजकीय परिस्थितीच्या संदर्भांत कामराज यांनीं अवलंबिलेली पद्धति योग्य ठरत असेलहि; काँग्रेसमधील यादवी लक्षांत घेतां असें करणें जरूरहि झालें असेल; पण झाली गोष्ट दाखला म्हणून फार खराब आणि लोकशाही विरोधी ठरणार आहे. लोकशाहीच्या पद्धतीनें निवडल्या गेलेल्या पक्षाचा नेता निवडण्याचें काम बाहेरच्या एखाद्या गटावर सोपवणें हें फारच आक्षेपार्ह आहे. तें संपूर्णपणें लोकशाहीविरोधी आहे आणि

त्यांतून असा एखादा दाखला जन्म घेईल कीं, पक्षाची हुकूमशाही–विशेषतः एखाद्या छोट्या गटाची हुकूमशाही–त्यांतून उदयाला येईल.

## मंत्रिमंडळासाठीं औपचारिकता नको

या सर्व प्रकारांतून एक मोठा घटनात्मक आणि राजकीय प्रश्न निर्माण होतो. मंत्रिमंडळाची तरी निवड बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्यानें करावयाची कीं, तीहि पक्षाचे सत्तासुलतानच करणार हें नागरिकांना कळलें पाहिजे. कॉंग्रेसच्या अध्यक्षाशीं विचारविनिमय करूनच आपण आपलें मंत्रिमंडळ निश्चित करूं असें शास्त्री म्हणाल्याचें कळतें. मला वाटतें हें लोकशाहीला धरून नाहीं. तुम्ही तुमच्या मित्राचा विचार घ्या, पक्षाच्या पुढाऱ्यांना विचारा, पण या सर्वांला औपचारिकता आणून देणें चूक आहे. जें कांहीं घडून आलें आहे त्याचा अर्थ स्पष्टपणें असा होतो कीं, कॉंग्रेस पक्षाच्या यंत्रणेनें पक्षनेता लादावयाचा आणि त्याचें मंत्रिमंडळहि त्या यंत्रणेनेंच ठरवावयाचें आणि जरी त्याच्या मागें विधान सभेतील पक्षबंधूंचें बहुमत निश्चितपणें असलें तरीहि, पक्षधुरीणांना तो नको असेल तर त्याला राजीनामा देण्यास सांगण्यांतहि येईल.

## इतिहास काय सांगतो—

गुजरातमध्यें हेंच घडलें आणि पुन्हाहि घडूं शकेल. १९४५ च्या ब्रिटिश निवडणुकीमध्यें घडलेल्या प्रसंगाची मला येथें आठवण होते. मजूर पक्षाचे अध्यक्ष प्रो. लास्की त्या पक्षाचे पार्लमेंटमधील नेते अटली यांना सल्ला देऊं पाहात होते. तेव्हां अटलींनीं जाहीर समजावणी देऊन त्यांना बजावलें कीं ही त्यांची जबाबदारी नव्हे. पक्षीय पुढाऱ्याचें काम धोरण ठरवण्याचें आहे आणि पार्लमेंट-मध्यें असणाऱ्या त्या पक्षाचें–मग तो अधिकारारूढ सरकारचा पक्ष असो वा विरोधी पक्ष असो–त्या धोरणांची अंमलबजावणी करण्याचें असो–आम्ही ब्रिटि-शांशीं झुंजत होतों. तेव्हांची गोष्ट निराळी होती. देशांत पक्षाचें जें वजन आणि लोकप्रियता होती तिच्या परिणामीं त्या पक्षाचे कांहीं लोक तेव्हां मंत्री झाले असल्यामुळें त्यांच्यावर पक्षधुरीणांचा पूर्ण दाब असणें अवश्य होतें. पण आतां परिस्थिति पालटली आहे. भारत स्वतंत्र झाला आहे आणि तो लोकशाही देश झाला आहे. त्यामुळें ज्या परंपरा आणि पद्धति चांगल्या लोकशाहीचीं लक्षणें मानलीं जातात त्याचाच अवलंब आमच्या राजकीय आणि संसदीय जीवनांत केला गेला पाहिजे. पक्षांतर्गत विविध गटांमध्यें समतोल साधण्याच्या स्वार्थी

दृष्टीनें कांहीं मंडळी लालबहादुरांच्या माथीं मारली जातील आणि जर ते बोटचेपे निघाले तर मग राजकीय वा आर्थिक प्रश्नाबाबत प्रगतीचें नांव काढायला नको असें मला वाटतें. शास्त्रीजी आग्रही असतील तर त्यांना कायदेमंडळाप्रमाणेंच पक्षाच्या प्रत्येक सभेंतहि विरोधाला तोंड द्यावें लागेल आणि हा विरोध जास्त बोलका आणि संघटित असेल. वरवर पाहतां सारें कांहीं ठाकठीक दिसत असलें तरी यांत जो खास कारणाच्या तत्त्वज्ञानाचा दर्प मारतो त्यामुळें कॉंग्रेस पक्षाची प्रत्येक कृति दूषित ठरते. कांहीं तरी तत्त्वें असलीं पाहिजेत आणि कोणती तरी पद्धति अनुसरली पाहिजे आणि परिणामांची पर्वा न करतां त्यांचा अवलंब केला पाहिजे. साधनांची तमा न बाळगतां मिळालेला विजय हेंच जर उद्दिष्ट असेल तर मग कॉंग्रेस पक्षाचेंच निदान पक्षीं विसर्जन करावें. ध्येयासाठीं जे जगले व मेले अशा टिळक, गांधी, नेहरू यांच्या नांवानें जयघोष करण्याचा आपणाला मग अधिकार राहणार नाहीं.

कामराज योजना हीच अनेकांच्या मतें एक फसवें जाळें होतें. तत्त्वापेक्षां तात्पुरत्या फायद्यावर डोळा ठेवणाऱ्या राजकारण्यांनीं आपलीं कांहीं उद्दिष्टें साधण्यासाठींच त्यांनीं ही योजना राबविली असा अनेकांचा आक्षेप आहे. या मंत्र्यांना परत घेण्यांत आल्यास तो एक मोठाच विश्वासघात ठरेल. पं. नेहरूंच्या थोर ध्येयवादाचा तो मुडदा ठरेल. आपल्या कांहीं सहकाऱ्यांचीं मतें व वागणूक ध्यानीं घेऊन त्यांची मंत्रिमंडळांतून हकालपट्टी करण्याची इच्छा असूनहि नेहरूंना तेवढें धैर्य झालें नाहीं हें उघड आहे. इतर अनेक देशांच्या मुख्य मंत्र्यांच्या अंगीं असलेलें राजकीय धैर्य जर नेहरूंच्या अंगीं असतें तर त्यांनीं जें केलें असतें तेंच करण्यास त्यांना कामराज योजनेचा आधार मिळाला असता. नेहरू हे सहृदय व सहकाऱ्यांवर लोभ करणारे होते. तोच त्यांचा मोठेपणा होता आणि तोच त्यांचा दोषहि होता.

## नाहींतर देश रसातळाला जाईल

थोडक्यांत सांगायचें म्हणजे शास्त्रींची जी ही अविरोध निवडणूक झाली तींत कांहीं घालमेल गृहीत धरलेली आहे आणि तीमुळें त्यांना बराच ताप होण्याचा संभव आहे. लोकशाहींत व्यक्तीपेक्षां धोरणाला महत्त्व जास्त आहे, व्यक्तिमत्त्वापेक्षां कार्यक्रम मोठा आहे. हे दोन्ही प्रश्न इतके महत्त्वाचे आहेत कीं, त्यांपैकीं कोणत्याहि एका प्रश्नाची सोडवणूक करण्यांत झालेली दिरंगाई म्हणजे या देशाचा आर्थिक अधःपात व राजकीय अस्थिरता होय. १९६३ च्या फेब्रुवारी-

पासून अन्नधान्यें व इतर पदार्थांच्या किंमती वाढत आहेत. तेव्हांपासून आमच्यासारखे कांहींजण ओरडत आहेत कीं, अन्नधान्याचा व्यापार सरकारने ताब्यांत घ्यावा. गेल्या वर्षांतच किंमती चाळीस टक्क्यांनीं वाढल्या आणि तरीहि अजून भाववाढ सुरूच आहे. पुण्यांत गहू किलोग्रॅमला एक रुपया दहा पैसे झाला आहे. साखरेच्या वितरणाबाबतच नव्हे तर दैनंदिन गरजेच्या सर्वच पदार्थांच्या संबंधांत ग्रामीण भागांत तर संपूर्ण गोंधळ माजलेला आहे. खरेदीपासून वितरणापर्यंतचा सर्व व्यवहार सरळ सरकारनेंच आपल्या ताब्यांत घ्यावा अशी कांहींनीं सूचना केली आहे. म्हणजे दैनंदिन गरजांच्या पदार्थांसंबंधांतील दलालांची बेबंदशाही तरी दूर होईल, योग्य किंमती ठरवून देतां येतील व उत्पादकापासूनच विकत घेतलेलें अन्नधान्य सरकारनें आपल्या दुकानांतून किंवा विश्वसनीय खाजगी व्यक्तीच्या मार्फत अथवा सरकारी सोसायट्यांतर्फे विकावें. पण या सूचनेबाबत कॉंग्रेसनेते पूर्णपणें बेफिकीर होते. माझ्या मतें कॉंग्रेसनेते जाणून वा नेणून नफेबाजांच्या हातीं गेले आहेत. त्यांच्या परिणामीं लोकांना हाल सोसावे लागतात. जर शास्त्रींनीं या संबंधांत तातडतोब कांहीं उपाययोजना केली नाहीं तर आमची अर्थव्यवस्था पूर्णतया ढासळून पडेल व अन्नव्यवहारांत तर बेबंदशाहीच पसरेल यांत मला शंका वाटत नाहीं. १९३१ मधील कराची अधिवेशनापासून आपण सर्वचजण समाजवादी पोपटपंची करीत आहोंत. प्रतिवृत्तें आणि कार्यकारिण्याच्या नियुक्त्या यांतून कांहींहि निष्पन्न झालेलें नाहीं. समाजवादाबद्दलच्या फसव्या दुतोंडी भाषेने यापुढें भागणार नाहीं हें मी सरकारला स्पष्ट बजावून सांगतों. लोक खूपच जागे झाले आहेत आणि सरकार कोणतीहि परिणामकारी योजना करण्याच्या कामीं कांकूं करीत आहे हेंहि लोकांना माहीत झालेलें आहे. या प्रश्नाबाबत कॉंग्रेसच्या वर्तुळांत अथ तो इति वैचारिक गोंधळ माजलेला आहे. आणि लांबलचक निवेदने नि जाड जाड भाष्यें यांनीं यापुढें लोकांचें मुळींच समाधान होणार नाहीं. पालकांचा काळ संपलेला आहे. कांदा तुम्ही एकेक पाती उलगडून खाऊं शकतां, पण वाघाला कांहीं एकेक पंजा तोंडांत घालून खातां येत नाहीं. भारतांतील आजच्या भांडवलशाही अर्थव्यवस्था पद्धतीवर आतां समोरून उघड हल्ला करण्याची वेळ आलेली आहे. कॉंग्रेसनें तसें केलें नाहीं, तर १९६७ च्या निवडणुकींत जनता कॉंग्रेसला रसातळाला पोचवील. दुसरा प्रश्न पूर्व पाकिस्तानांतून येणाऱ्या निर्वासितांच्या अखंड प्रवाहाबाबत आहे. मला वाटतें कीं, पूर्व पाकिस्तानांतून सर्वच हिंदूंना हांकून देण्याचा पाकिस्तानचा

दृढनिश्चय झालेला आहे. लोकसंख्येंत घट करून पूर्व पाकिस्तान ही पश्चिम पाकिस्तानची एक वसाहत करण्याचा हा त्यांचा डाव आहे. काश्मीरच्या सोडवणुकीच्या तंगडींत या प्रश्नाची तंगडी अडकवणें हें शहाणपणाचें होणार नाहीं.

पं. नेहरूंनीं ठेवलेला आणखी एक वारसा म्हणजे काश्मीरचा प्रश्न होय. मी जें वारंवार म्हणालों आहे आणि ज्याची मी आज पुन्हा घोषणा करीत आहे त हेंच कीं, काश्मीर स्थिरावण्याच्या बेतांत असतांना शेख अब्दुल्लांची सुटका करणें ही घोडचूक आहे आणि आतां तर हें प्रकरण शोकान्त होऊं पाहात आहे. भारतानें सामिलीकरणाच्या प्रश्नावर घट्ट उभें राहिलें पाहिजे आणि पाकिस्ताननें केलेल्या आक्रमणाबाबतहि भारतानें खंबीर भूमिका घेतली पाहिजे. ह्या आक्रमणाला युनोच्या ठरावानें मान्यता दिली आहे. युनोमध्यें काश्मीरबाबतच्या कोणत्याहि चर्चेंत यापुढें भाग घेण्याचें भारतानें साफ नाकारावें. त्याचबरोबर भारतानें खूप जागरूक राहून युद्धविराम रेषेचें संरक्षण करावें, सादिक सरकारला पाठिंबा द्यावा आणि काश्मीरच्या लोकांना चांगल्या, प्रामाणिक आणि कार्यक्षम शासनाची सादिकमार्फत खात्री द्यावी. दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें गेल्यास भारत स्वतःवर अनंत संकटें ओढवून घेईल. दुबळेपणा दुःखाची जननी असल्याचें इतिहास सांगतो. भारत काश्मीरबाबत शरणागति न स्वीकारील तर आंतरराष्ट्रीय युद्ध भडकेल ही भाषा व्यर्थ आहे. अस्थिर धोरणाचें युग संपवून आतां पूर्ण विचार करून आणि आखणी करून कृतीचीं पावलें टाकलीं पाहिजेत. पाकिस्तानशीं आपण आतांपावेतों खूपच नरमाईचें धोरण स्वीकारलेलें आहे. भारतांतील व्यापाऱ्यांशीं आपण फार फार नरमाईनें वागलों आहोंत. लालबहादूर शास्त्रींनीं आतां हे प्रश्न सोडवले पाहिजेत, त्यांनीं त्याची हाताळणी कृतनिश्चयी वृत्तीनें केली तर स्वार्थसाधु आणि क्षुद्र जीवजंतु सोडून या देशांतील इतर सर्वांचा त्यांना मनापासून पाठिंबाच मिळेल.

* * *

## : १२ :

# ' सारसंग्रही ' शंकरराव जोशी

तीस मार्चच्या सकाळच्या वृत्तपत्रांतून दोन शंकरराव निवर्तल्याचें वाचलें. एक शंकरराव जोशी–इतिहाससंशोधक, आणि दुसरे शंकरराव चव्हाण–पुण्यांतील एक वकील. दोघेहि माझे मित्र होते. एक २-४ वर्षांनीं लहान, एक २-४ वर्षांनीं मोठे. पण कोणास उचलावें व कोणास गाळावें, कोणास खो द्यावा व कोणास देऊं नये ही ठरविणारी शक्ति मानवी नाहीं. जगांत ढकलतांना व्यक्तीला विचारलें जात नाहीं. आणि जगाबाहेर नेतांनाहि त्या व्यक्तीची सोय व गैरसोय विचारांत घेतली जात नाहीं. जगामध्यें बसस्टॉपपासून तों साखरेच्या दुकानापर्यंत क्यू लागतो, रांग लागते आणि नियमानुसार कुणी पुढें मागें जाऊं शकत नाहीं. पण मृत्यूच्या बाबतींत यम अनियमी आहे; त्याचें कार्य निर्बंधहीन आहे व त्याच्या मर्जीवर कोणतेंच बंधन नाहीं !

### वडिलार्जित सबंध

ह्या दोन शंकररावांपैकीं शंकरराव जोशी हे अनेक अर्थांनीं जवळचे व परिचित. एक तर आम्ही दोन्ही दोघे वाईकर. माझा जन्म प्रत्यक्ष जरी वाईस झाला नसला तरी वाईचा अभिमान रक्ताच्या बिंदूबिंदूमध्यें आहे. आणि लहानपणापासून मी वाईला वारंवार जात आहे. खासगी व सार्वजनिक कार्याकरितां आज तेथें आमची वडिला-

र्जित अशी खासगी वास्तु नाहीं. घाट व मठ आहे. वडिलोपार्जित घर आमच्या चुलत आजोबांनीं, शंकरराव जोशी यांच्या आजोबांना विकलें, हाहि एक संबंध शंकररावांच्या बाबतींत आम्हांला एकत्र आणण्यास कारणीभूत झाला. वाईची मंडळीं भारतभर कोठेंहि असली तरी प्रसंगानें एकत्र येतात आणि मजलशींत रस घेतात. दिल्लीला हजारों महाराष्ट्रीय आहेत, तथापि दरवर्षी तेथें वाईकर मंडळी जमतातच. तीच गोष्ट १९१५ ते ३० सालपर्यंत पुण्यामध्यें घडून येत असे. आणि ज्या वेळीं वाईकरांचा कंपू बालाजीजवळ जोशी यांच्या दुकानांत असे त्या वेळच्या वाईकर मंडळींत, शंकरराव जोशी, बाबूराव भिडे, साठे, शिधये, मी, अभ्यंकर अशी बरीच मंडळी होती.

१५ ते १८ साल म्हणजे होमरूल चळवळीचें महायुग होतें. पर्वणीसारखा योग होता. त्या वेळीं जिवंत असणें ही एक भाग्याची गोष्ट होती व तरुण असणें म्हणजे तर प्रत्यक्ष स्वर्गात असल्यासारखें होतें. असा आठवडा जात नव्हता कीं, तीन-चार चांगलीं व्याख्यानें राजकीय विषयांवर झालीं नाहींत. आम्ही फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी; पण जीवनाचा अभ्यास नव्या मंडईत व किर्लोस्कर थिएटरांत होणाऱ्या सभांत करीत होतों. तें खरें शिक्षण होतें. त्यांत वेदाभ्यासजडता नव्हती, त्याचप्रमाणें लावणीवजा पाचकळपणाहि नव्हता. त्या वेळच्या राजकारणांत विद्वत्तेला मान होता, चातुर्य पुरस्कारलें जात असे व चारित्र्याचें गांभीर्य राजकारणाच्या चेहऱ्यावर शोभा देत होतें.

## परिचयाचा पहिला मुजरा

शंकरराव हे कॉलेजचे विद्यार्थी नव्हते, पण त्या काळांत सभांच्या व्यवस्थेमध्यें ते स्वयंसेवक म्हणून काम करीत आणि त्यामुळें आम्हां विद्यार्थ्यांचा व त्यांचा थोडा खटका उडे. स्वयंसेवकांचे प्रमुख डॉ. पळसुले हे असत व त्यांचा निर्विकार चेहरा पाहून असें वाटे कीं, तें एक हलतें चालतें चित्र आहे. आणि अशा एका प्रसंगीं किर्लोस्कर थिएटरांत त्यांचें व आमचें भांडण झालें! नागपूरकडील कोणी आळकर नांवाच्या गृहस्थाचें इंग्रजींत व्याख्यान होतें. इंग्रजी न समजणारे पण पगडीबाज, राजकारणांत भाग न घेणारे, पण प्रसिद्धीच्या संदर्भात वावरणारे, उपरणेबाज, असे अनेक लोक आंत जात होते. पण आम्हांला स्वयंसेवकांनीं मज्जाव केला. त्यांत शंकरराव होते. हक्कासाठीं भांडणें हा माझा प्रकृतिधर्म. कोणी याला "आगाऊपणा" म्हणतात! मला स्वस्थ बसूं देईना. स्वयंसेवकांनीं

आम्हांला डॉ. पळसुल्यांपुढें हजर केलें, आणि त्यांच्या शिस्तीनें रागाचें स्वरूप धारण केलें. ताकदीनें व वयानें ते मोठे होते. पण आवाजांत व युक्तिवाजांत मी त्यांना कमी पडलों नाहीं. एवढ्यांत बाबूराव गोखले तेथें आले व त्यांनीं आम्हांला आंत जाऊं दिलें. शंकररावांचा हा माझा परिचयाचा पाहिला मुजरा असें म्हटलें तरी चालेल.

## मित्रसंघाची स्थापना

त्या वेळच्या तरुण मंडळींनीं एक मित्र-संघ काढण्याचें ठरविलें, आणि त्याप्रमाणें तो आम्हीं काढला. त्याची बैठक डॉ. पळसुले यांच्या माडींत, फडतरे चौकांत भरे. साधारणपणें ही गोष्ट १९१६ ची आहे. ह्या मित्र-संघांत मी, सदुभाऊ जोगळेकर, प्रसिद्ध साहित्यिक बापू केळकर, बाबा धारप, बापू जोशी, महाडकर, बाबुराव भिडे व शंकरराव जोशी हे असत. श्री. नानासाहेब ऊर्फ गंगाराम गोखले हे दहशतवादी म्हणून सरकारनें ठरविलेले होते. कोल्हापूरच्या बॉंब प्रकरणांत त्यांना दीर्घ कारावासाची शिक्षाहि झाली होती. १४ सालींच ते सुटून आले होते. ते धांदली स्वभावाचे होते, धाडसी होते; पण अन्यथा दहशतवादी असा आरोप करण्यासारखें त्यांचें वर्तन नव्हतें. तसल्या विचारांकडे त्यांनीं पाठ फिरविली होती. या मंडळांत ते जुन्या आठवणी बोलत. साहित्यिक व नाटककार असल्यानें नाट्यपूर्ण भाषेंत ते सांगत. शंकरराव जोशी हे मोजकें बोलत, शांतपणें बोलत व लोकमान्यांच्या परिसरांत असल्यानें, त्यांच्या कथा ते सांगत व त्या आम्ही औत्सुक्यानें ऐकत असूं. बापू केळकर हे नेपोलियनमय होते; इतके कीं, केस ठेवण्याची ढब नेपोलियनप्रमाणें नकळत त्यांनीं अंगीकारली होती. बापू जोशी महाडकर म्हणजे कट्टर हिंदु संकृतीचे अभिमानी व आचरणाबाबत दक्ष. मी व जोगळेकर आधुनिक मताचे. वावदूकपणांत सदू जोगळेकर कुणालाहि हार जाणारा नव्हता. आणि मी हार होणार अशी चाहूल लागतांच परिस्थितीला निराळें वळण देणारी कलंदरगिरी बाळगून होतों.

## चहा व बुद्धिमत्ता

या मित्रसंघांत आम्ही वारंवार एकत्र येत असूं. शंकररावांची ओळख दृढ होत गेली व तिची वाटचाल मैत्रीच्या मंझीलकडे सुरू झाली. संघ म्हटला कीं, संघटना हवी, आणि मग बापू जोशी यांनीं असें सुचविलें कीं, सभासदानें चहा वर्ज्य केला पाहिजे. त्या वेळीं जोगळेकर हे चहाबाज होतेच. मी एक वेळ घेत

होतो. त्यावर मी म्हणालों कीं, टिळक चहा घेऊन एवढे मोठे होऊं शकतात, तर चहांत दोष नसावा; आणि नंतर म्हणालों कीं, " Tea and Talent go together. " चहा व बुद्धिमत्ता हे सहयात्री आहेत. अन् महाराष्ट्रांत खूप चर्चा झाली म्हणजे कार्यनाश होतो, हाच अनुभव त्याहि वेळीं आला. आणि मित्र-संघ–मित्रसंघ न राहतां दुसरेंच स्वरूप त्याला आलें ! तथापि शंकररावांचा अन् माझा जो परिचय झाला तो कायम राहिला.

## वास्तूचें सार्थ नांव

शंकरराव यांनीं इतिहाससंशोधनाच्या क्षेत्रांत प्रवेश केला व तेथील त्यांची कामगिरी तज्ज्ञांनीं मान्य केली आहे. ते आपलीं पुस्तकें मोठ्या प्रेमानें मला धाडात आणि त्यांचा उपयोगहि मला फार झालेला आहे. विशेषतः मराठ्यांच्या राज्यकारभाराबाबत जें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे त्याचा मुबलक उपयोग मी माझ्या ' पंजाब विद्यापीठांतील राज्यकारभार ' या विषयावरील व्याख्यानमालेंत केला. त्यांची विचारसरणी आग्रही दिसली नाहीं. तथापि, अभिमानामुळें व आपुलकीमुळें मराठी राज्यकारभारांतील कांहीं दोष त्यांनीं डोळ्यांआड केले असले तर तें अस्वाभाविक नव्हतें. पांच-सहा वर्षांपूर्वी तर ते भेटले असतांना, वाई केव्हांच सुटली. आतां पुण्याला वास्तु बांधली असून तिचें नांव " सारसंग्रह " ठेवलें आहे, असें सांगितलें. नांवाबद्दल मीं त्यांचें अभिनंदन केलें, कारण त्या नांवांतच त्यांचें जीवनचरित्र अभिव्यक्त झालें होतें. १९६१ सालीं १४ जानेवारीला पानपतच्या युद्धाला २०० वर्षें पुरीं होत होतीं म्हणून उत्सव साजरा करावा व त्यानिमित्त एक ग्रंथ निर्माण करावा असें माझ्या मनांत आलें. ती गोष्ट मी पंजाबच्या मुख्य मंत्र्याला सांगितली. त्यानें तात्बडतोब मान्यता दिली. ही गोष्ट जेव्हां जाहीर झाली तेव्हां दहा-वीस पत्रें तरी निंदास्पद अशीं माझ्याकडे आलीं. त्यांतील भाषा कशी होती, हें न सांगितलेलेंच बरें !

### ' पानपत ' ग्रंथलेखन

१४ जानेवारी १९६१ रोजीं पानपत युद्धावर अनेक दृष्टींनीं चर्चा केलेलें लिखाण पंजाब युनिव्हर्सिटीनें प्रसिद्ध केलें, पोवाडागायन झालें. ह्याच प्रसंगाच्या निमित्तानें श्री. सेतु माधवराव पगडी यांनीं ग्रंथ लिहिला आणि त्यांना ज्या अस्सल बखरी पाहिजे होत्या त्याहि उपलब्ध करून दिल्या. शंकररावांनीं पत्रव्यवहार करून आपण 'पानपत'वर लिहिणार आहोंत असें कळविलें. आणि मग त्यांनाहि मज-

जवळचे ग्रंथ व कागदपत्र दिले. एक-दोन वेळां त्यांनीं चर्चा केली. अधिक ते करणार होते. शीख जमातीच्या ऐतिहासिक कागदांत पानपताबद्दल बराच पत्र-व्यवहार आहे. मराठे व शीख यांच्या बाबतींत अनेक शीख इतिहासकारांनीं व विशेषतः प्रो. गंडासिंग यांनीं लिहिलें आहे. ते कागदपत्र शंकररावांना हवे होते. व ते मिळवून देण्याचें मीं कबूलहि केलें होतें. पण हें सर्व आतां स्वप्न ठरलें आहे. अव्वल प्रतीच्या इतिहासकारांत अगर संशोधकांत त्यांची गणना अनेकांच्या मतें करतां येत नाहीं. तथापि मोजकेंच क्षेत्र घेऊन त्यांत जास्तींत जास्त दक्षता घेऊन सत्यान्वेषण करण्याची त्यांची वृत्ति स्पृहणीय होती. ते संकलनकार होते हें निश्चित. संशोधक होते हें तर खरेंच; पण इतिहासकारांची विवेचक बुद्धि व विवेकी अभि-प्रायक्षमता त्यांच्यांत होती, असें माझें मत आहे. ते विनयशील होते, आर्जवी होते. विचाराचें पाऊल सुद्धां जपून टाकत. साक्षेपी होते व सावधानता पण त्यांच्या अंगीं होती. जेथें कोठें जें जें चांगलें दिसेल त्यांतील सार काढून घेऊन त्याचा संग्रह करण्याची त्यांची बुद्धि होती. म्हणूनच त्यांचें व्यक्तिमत्त्व ' सार-संग्रही ' होतें असें मी म्हणतों. मराठ्यांच्या इतिहास-दालनांतील प्रकाश देणारा दीप मालवला हें खरें.

※ ※ ※

: १३ :

# कहाँ जायें रे गंगा

जेथपर्यंत दृष्टि जात होती तेथपर्यंत पाणीच पाणी दिसत होतें. उत्तरेकडे तर क्षितिजानें पापमुक्तीसाठीं गंगेच्या प्रवाहांत बुडी मारल्याचें दिसत होतें. त्या उभ्या असलेल्या जागेवरून जोरानें येणारा प्रवाह वळण घेऊन भारतभूमीला नमन करून किंचित् खिन्न स्वरूपांत पूर्वेकडे वळला होता, आणि दिशा बदलल्या बरोबर पुढें काय वाढून ठेवलें आहे याची कल्पना देण्यासाठींच कीं काय जेथें गंगा वळण घेते त्या ठिकाणापासून एक फर्लांगावर असलेली उंच टेकडीवरील मशीद स्पष्ट करीत होती. कथानक असें आहे कीं, ज्या ठिकाणीं सती पार्वतीचें देवालय होतें तेथें तें देवालय, बंगालचा घात करणारा, हिंदूंचा मुसलमान झालेला कालापहाड यानें मोडून तोडून भ्रष्ट करून तेथें मशीद बांधली होती! तीच भूमि, तेच दगड, तेच कारागीर, तींच माणसें तेंच कलाकौशल्य ह्या सर्वांना विकृत करून तेथील मशीद आज, हिंदूंच्या ऐवजीं मुसलमानांना बांग देऊन धर्मवेडे करीत आहे. सर्वांना पावन करणारी गंगा त्या मुसलमान जेत्याला पावन करूं शकली नाहीं. खडक फोडून पहाडांना शरण आणणारा, गंगेचा प्रवाह तेथें अशरण झाला.

कितीतरी वेळ त्या हृदयंगम दृश्याकडे मी पाहात होतों. आणि त्याच-

बरोबर हृदयामध्यें खळबळ पण वाढत होती. दक्षिण दिशेकडे सरळ येणारी गंगा वाममार्गी म्हणजे पूर्वेकडे वळते. हा खडक प्रवाहाच्या मध्यभागीं आहे; प्रवाहाच्या नेहमींच्या पातळीपासून सुमारें १०० फूट उंच असून त्यावर अजय गहिनीनाथ ह्यांचें देऊळ आहे. नवनाथांपैकीं गहिनीनाथ हे एक होते असें मानण्यांत येतें. बिहार प्रदेशांतील भागलपूर शहरापासून सुमारें बारा मैलांवर सुलतानगंज या गांवीं हें स्थान आहे. या गहिनीनाथाचें मंदिर पहावें अशी उत्कट इच्छा झाली.

भारताच्या या भागांत प्रथमच आलों होतों, आणि ह्या स्थानाला येण्यापूर्वी तेथील कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढें माझ्या वाक्‌गंगेचा प्रवाह दाखवून आलों होतों. मातीच्या खोदून काढलेल्या दहावीस पायऱ्या ओलांडून पाण्याच्या तीरापर्यंत मीं येऊन पोंचलों तों, तेथें येण्यापूर्वीं तीराशीं डुंबत असलेलें महिषीपाति व महिषी यांचा समूह पाहिल्यानंतर असें वाटलें कीं, पंडित जगन्नाथाप्रमाणें आपणहि दहाबारा श्लोकांत गंगा-प्रशस्ति करावी आणि मग आपल्या भक्तीला व किंचित् विद्वत्तेला मोहित होऊन गंगा माता वर येईल आणि पावन करील. तथापि तसें कांहीं जमलें नाहीं आणि जमलें असलें तरी पुरेंसें पाप हातून न घडल्यामुळें उद्धार करण्यास मी योग्य झालों नाहीं, परिपक्व झालों नाहीं. असें गंगेला वाटल्यास मग श्लोकहि वायां जावयाचे ! कदाचित् भारताच्या राजकारणांत वावरत असल्यानें हा उद्धारापलीकडील प्राणी आहे असेंहि तिला वाटलें असतें तर कठीण होतें. काव्य दाखवून अवलक्षण केल्यासारखें तें झालें असतें.

वेळ दुपारची होती. तसें प्रातःस्नान गंगेच्याच पाण्यानें पण नळाद्वारें येणाऱ्या पाण्यानें केलें होतें. तथापि निदान स्नान करावें अशी इच्छा होती, पण महिषी व महिषीपाति यांची तेथें जलक्रीडा पाहून त्या गंगेच्या पाण्यांतसुद्धां स्नान करूं नये अशी श्रद्धाहीन मति माझी झाली. समोर मध्यस्थ खडक; पण त्यानें एकप्रवाही गंगेला द्विधारा केलें होतें. जणूं कांहीं १९४७ ची घटना कशी होणार हें दाखविणारा ग्रह गंगेनें भारताच्या कुंडलींत मांडला होता. आजहि राजकारणांतील मध्यस्थामध्यें स्थित करण्याएवेजीं अस्थिरच करीत असतात. जोडलेलें मोडीत असतात. चिकटवलेलें तोडीत असतात ! खडकाच्या दोन्ही बाजूंना प्रवाह वाहात होता. आणि एकंदर सृष्टिसौंदर्य अनुपम होतें. तसें म्हटलें तर मनांतून दर्शनोत्सुकता वाढत होती. नवनाथांबद्दल लहानपणीं वाचलें होतें,

नाथपंथीयांबद्दल थोडीशी माहिती पण होती, आणि म्हणून गहिनीनाथाचें हें मंदिर पाहावें अशी इच्छा वाढतच गेली. नौका समीप होत्या. नौकेची रचना माझ्या व्यावहारिक दृष्टीला रामायणकालीन वाटली. आधुनिकतेचा तिला यत्किंचित्सुद्धां स्पर्श नव्हता. कोणाला ठाऊक रामलक्ष्मण व सीतादेवी यांना गंगेवरून दक्षिणेस दक्षिणमुलखांत नेण्यासाठीं जी नौका वापरण्यांत आली असेल तिचीच वारस असण्याचा संभव. माझ्या अमर्याद प्रतिभेला असें वाटलें कीं, ती तीच नौका होती. दोन घटनांत फरक एवढाच होता कीं, रामयात्रा दक्षिणाभिमुखी होती, माझी उत्तराभिमुखी. राम सीतेसहित होते. मी विरहित होतों. त्यांच्याबरोबर त्यांचा अनुज लक्ष्मण होता. माझ्याबरोबर अनुज नव्हता व असता तरी मोठ्या भावामागें जावें ही आधुनिक परंपरा नसल्यानें तो आला असता कीं नाहीं कोणास ठाऊक ! तात्पर्य, गंगेच्या अथांग प्रवाहाबरोबर माझी मानसिक सरस्वतीहि अथांग दिसूं लागली.

प्रयागानंतर भागलपूरला गंगा येत असल्यानें गंगेच्या प्रवाहांत यमुनेची गहनता व गुप्त सरस्वतीची प्रासादिकता असलीच पाहिजे असें मी मानीत होतों. या ठिकाणीं जन्हु ऋषीनें तपश्चर्या केली व त्याचा आश्रम जवळपास होता. शंकराच्या जटेंतून अल्लडपणें बाहेर पडलेली गंगा म्हणजे विश्वविद्यालयांतील वसतिगृहांतून बाहेर पडलेल्या कॉलेज-कन्येप्रमाणें मुक्तपणें वागडत चालली होती व आपल्या प्रवासांत व आपल्या गतींत तिचें विलोभनीयत्व प्रदर्शित होत होतें.आपण ऋषि-आश्रमाजवळ आहोंत ह्याचें भान तिला राहिलें नाहीं व त्याचा परिणाम जन्हूच्या रागावण्यांत झाला. जन्हुऋषींनीं ऋषींची परंपरा राखली आणि रागांत येऊन त्यानें सबंध गंगेला आपल्या पोटांत घेतलें व अगस्तीप्रमाणें विक्रम केला;पुढें कोप शांत झाल्यानंतर पुन्हा मुखावाटे गंगेला सोडले व तेव्हांपासून गंगेला जान्हवी म्हणूं लागले आणि तेथून पुढची गंगा उच्छिष्ट गंगा मानली जाते. आणि आतां तर भागलपुरापासून थोड्याच अंतरावर पाकिस्तानांत तीच जात असल्यानें तिचें महत्त्व कमी झालें आहे.आतां तेथें गंगाजल आहे,तीर्थ नाहीं. गंगेच्या प्रवाहांत तो विशाल खडक आहे. गहिनीनाथांचा आश्रम जो त्या खडकावर आहे तो स्पष्ट दिसूं लागला.

गहिनीनाथांच्या आश्रमाकडे नौका जात होती. मन मात्र परिस्थितिनिरपेक्ष वातावरणांत स्थिर होत होतें. अज्ञात कालापासूनचा भारताचा इतिहास त्या सविकल्प समाधींत चित्रपटाप्रमाणें समोरून जात होता. इकबालचे

शब्द 'क्या याद है, तुमको उस दिनकी जब तेरे किनारे उतरा कारवा हमारा' हेहि येऊन गेले. इतिहासाच्या ब्राह्ममुहूर्तावर काय घडलें? ह्या शोधार्थ मन गुंतलें. अबोध स्थितीचा बोध घेण्याचा प्रयत्न करीत होतों. न लिहिलेलें वाचत होतों. असें वाटत होतें कीं, ध्वनि कानाशिवाय ऐकत आहे व अवर्णनीय दृश्य अनयनरीतीनें पाहत आहे. रामचंद्रांनीं सीतेला पाहिल्यानंतर तुलसीदासांनी जें वर्णन केलें आहे त्याची आठवण झाली. "वाणी अनयन, नयन, निनवाणी," डोळ्यांनीं पाहिलें, पण तें बोलूं शकत नव्हतें, आणि भाषेला नयन नसल्यानें ती पाहूं शकली नाहीं. किती कालखंडांतून इतिहास झपाट्यानें जात होता त्याचें दृश्य दिसूं लागलें, निर्मानवी सृष्टि पाहिली. मनूचा मत्स्य पाहिला. "धाता यथा-पूर्वमकल्पयत्" तशी सृष्टीची निर्मिति पाहिली. नकाशाप्रमाणें काम झालें कीं नाहीं ह्याचें निरीक्षण केलें. चौऱ्याऐंशी लक्ष योनींतून भ्रमंती करून आलेला आत्मा न थकलेला व अमरत्वाची ओढ लागलेला डोळ्यांपुढें उभा राहिला. दशावतार डोळ्यांपुढून गेले. अज्ञात व ज्ञात काळांतून इतिहासाचा रथ झपाट्यानें जात असलेला डोळ्यांपुढें उभा राहिला. भारताच्या वायव्य सरहद्दींतून मानवी समूहाच्या लाटांच्या लाटा भारतात प्रवेश करीत असतांनाचें दृश्य दिसलें. आणि सर्वांची ओढ गङ्गमुखी होती. अनेक पंथ व सांप्रदाय निघाले, तथापि गंगेचें आकर्षण कुणालाहि सोडवलें नाहीं. शिखांना गंगा पवित्र वाटते. मुसल-मानांनाहि. आणि ज्यानें त्यानें आपला अंमल गंगेच्या किनाऱ्यावर बसवण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांच्या भागीरथीविषयक प्रेमाची आठवण झाली. दुआबमधील, गंगा–यमुनांमधील दुआबांतील राजकारणें डोळ्यापुढें आलीं. शतकेंच्या शतकें अंतर्वेदीमध्यें काय घडले हेंहि ऐकूं आलें. यवनांनीं मंदिरें उद्ध्वस्त करतांना ठोकलेल्या आरोळ्या त्या शांत प्रवाहांतून नौका जात अस-तांना कानांवर आल्या. विश्वेश्वराला एका मामुली इस्लामी माणसाने नष्ट केल्याचें दृश्य डोळ्यांसमोर येतांच त्या शांत वातावरणांतसुद्धां माझ्यांतील कडवा हिंदु जागा झाला. भगवान् बुद्धानें गंगेच्या परिसरांत प्राप्त केलेल्या साक्षात्काराचा भास झाला. वैराचा बदला वैरानें होत नाहीं ह्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानाची लहर किंचित् उदित झालेल्या कोपाला शमवती झाली. शुक्रताला ऊर्फ शुकतीर्थ ह्याच भागी-रथीच्या तीरावर असलेलें डोळ्यांपुढें आलें व दुःखांत असलेल्या पांडवांच्या नाते-वाईकाला शुकमुनीनीं सांगितलेलें भागवत क्षणभर कानीं आलें. मनाला उन्नत करूं लागलें. अगदी अलीकडील काळांतील घटनांचे आधुनिक चित्रपट डोळ्यांपुढें उभे

राहिलें आणि हें सर्व माझ्यासमोर निर्विकारमनानें वाहणाऱ्या गंगामातेनें पाहिलें आहे हेंहि लक्षांत आलें.

कोठून आली ही ? केव्हां जन्मली ? कुठें वाढली ? आणि मग मन सापेक्षांतून निरपेक्षतेच्या कोड्याकडे वळलें आणि येथपर्यंत सरळ चाललेलें मन पायांत लटपटूं लागलें, गिरक्या घेऊं लागलें आणि तिची जन्मतिथि कोणती असावी याची कुंडली मांडतां मांडतां एका श्रेष्ठ ज्योतिष्याचा पणतू असूनसुद्धां व नवग्रहाचे अठरा ग्रह करूनसुद्धां, महाराष्ट्रांतील सारीं नवीं जुनीं सायन–निरयन, पटवर्धनी–केतकी सर्व पंचांगें लक्षांत आणूनसुद्धां, जन्मतिथीचें ज्ञान होईना. जेव्हां सृष्टि निर्माण झाली असेल, तेव्हांच ती उत्पन्न झाली असेंहि समाधान मानण्याकडे मन वळलें; तथापि कणासाठीं आळी पाताळापर्यंत जाते, तसें एका क्षुल्लक क्षणाच्या शोधासाठीं माझें मन अनंतकालच्या यात्रेला निघालें; पण आदीचा शोध लागला नाहीं. क्षणभर असें वाटलें कीं, गंगेची निर्मिति व तिचा निर्माता हे समकालीन आहेत. पिता आणि पुत्री एकाच वेळीं जन्मली असें वाटलें आणि क्षणभर एक गहन प्रमेय माझ्या बुद्धीनें जगापुढें आणलें असा थोडा क्षम्य अभिमान पण मनांत आला. काळाची सुरुवात केव्हां झाली, सांगणें कठीण ! जें दिसत नाहीं, ज्याचा शोध दृश्यानें घेणें हें अवघड व अशक्य आहे आणि कांहीं तरी विचित्र तर्क बुद्धीनें उभा केला. तो असा कीं, ज्याची सुरुवात समजत नाहीं त्याचा शेवट समजून घेऊं या. ज्याचा उपक्रम आढळत नाहीं त्याचा उपसंहार पाहूं या आणि अंतावरून आदीची कल्पना करूं या. उपसंहारावरून तात्पर्य काढूं या.

फळामध्यें बीज असतें, त्याच न्यायानें अंत सांपडला तर आदि सांपडेल असें माझ्या मनानें घेतलें; आणि मनाची यात्रा गंगेच्या अंताकडे सुरू झाली. आणि मग माझें तोंड पूर्ववाहिनी गंगेकडे झालें. थोड्याच प्रवासांत तिचा अधःपात शतमुखांनीं झाला असें आढळून आलें. परराज्यांत जी गेली आहे तेथें शरीराला प्रवेश नसला तरी मनाला बंदी नव्हती. हजारों मुखांनीं तिनें सागरांत प्रवेश केला असें आढळून आलें. तिच्या तीर्थसमान उदकाचें महासागरांत मीलन झालें व क्षणभर तिचें व्यक्तित्व आढळेनासें झालें. तथापि बोचक मन पाठलाग करीतच होतें. ह्यांत अयोग्य अशी वासना नव्हती; ज्ञानाची प्रेरणा होती. विचारांचें चेतन्य होतें. कांहीं तरी गूढ असें आकर्षण होतें आणि तिच्या उदकाचें बाष्पीकरण होऊन समुद्राच्या संगतींत आलेलें रुचिवैचित्र्य पृथ्वीवर

सोडून अधिक निर्मल स्वरूपांत ती आपली भगिनो आकाशगंगेकडे जात आहे असें आढळून आलें. पुढें अधिकाधिक मन जाऊं लागलें तों त्याचें धैर्य गलित झाल्याचें वाटूं लागलें. आदीचा शोध लागलाच नाहीं, अंतहि अशोधित राहिला. आदि नाहीं, अंत नाहीं पण अस्तित्व आहे. मानवी जीवनाप्रमाणें ती व्यक्तमध्य आहे, असेंच आढळून आलें; आणि क्षणभर असें वाटलें कीं, हा गंगाप्रवाह मानवी जीवनाप्रमाणेंच आहे. कोठून आला? माहीत नाहीं. कोठें जाणार? माहीत नाहीं. कुरतडून एक एक कण खावा त्याप्रमाणें क्षण–क्षण आस्वादीत आहे आणि वर्तमानाला अनंतांत ढकलीत आहे.

नौका आतां खडकाजवळ आली. तेथील पुजारी जवळ आले, पण खडकाची उंची पाहतां व स्वतःचें वय लक्षांत घेतां वर न जाण्याचें ठरविलें आणि तेथूनच गहिनीनाथाच्या त्या खडकावरील मंदिराला वंदन करून मी परिसराला प्रदक्षिणा घालून किनाऱ्याकडे परतलों. किनाऱ्यावर पाय ठेवला. पुन्हां उत्तरेकडे गंगेच्या अनादि प्रवाहाकडे पाहिलें आणि मनांत उद्‌भूत झालेल्या प्रश्नाला "कहाँ जायें रे गंगा" उत्तर देऊं शकलों नाहीं याचा किंचित् खेद वाटला. पण महत्त्व यशांत नाहीं; प्रयत्नांत आहे असें कोणी तरी म्हणाल्याचें आठवलें, तेवढ्यानें समाधान मात्र झालें नाहीं. विद्यापीठाच्या अतिथिभवनाकडे मी परतलों पण डोक्यांत मात्र "कहाँ जाये रे गंगा" हा नाद गुण गुणतच होता.

* * *

: सतरींतील काका :

: १४ :

## गद्दीपै आतेही सब बदमाश होते हैं।

एकोणीसशें अठ्ठावनच्या जानेवारींतील गोहत्ती येथील अधिवेशनानंतर ६ वर्षांनीं काँग्रेसच्या जाहीर अधिवेशनाला हजर राहणार होतों. या ६ वर्षांत राज्यपाल असतांना तीन वेळां ए. आय्. सा. सी. च्या बैठकीला हजर होतों आणि त्या बाबतींत एक नवा संकेतहि निर्माण केला होता. १९५८ मध्यें कै. पंत यांनीं मी हजर राहूं नये असें सुचाविलें. त्या वेळीं माझ्या राजकीय श्रद्धेचा स्रोत काँग्रेसमध्यें जन्मला आहे म्हणून मी हजर राहणार व केंद्रीय सरकारला पसंत नसेल तर राज्यपालपदाचा राजीनामा मी देईन, असें सांगितलें. या प्रश्नाची चर्चा पत्रव्यवहारांतूनहि झाली. आणि काँग्रेसी तत्त्वज्ञानाप्रमाणें याहि प्रश्नाचा होय अगर नाहीं असा निर्णयात्मक निकाल अजूनहि झालेला नाहीं. मला वाटतें कीं अन्य कोणा राज्यपालानें हा प्रश्न उकरून काढला नाहीं. या खेपेस तर मी राज्यपालपदाचा त्याग करून मुक्त नागरिक झालों होतों व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीवर महाराष्ट्रातर्फे निवडून आलों होतों. आणि त्या नात्यानें मी कलिंगाच्या राजधानीस-भुवनेश्वरला आलों होतों. त्यापूर्वी तीन दिवस भारताच्या राजधानींत संस्कृत साहित्य-संमेलनाच्या निमित्तानें गेलों होतों. तीन दिवस वैय्याकरणी, वेदान्ती, साहित्यरत्न इत्यादींच्या संगतींत राहून कांहीं गुण न घेतां थोडा वाण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ★ दा. क्र. 98362 ★

घेऊन कलकत्यास आलों होतों. तेथें दोन दिवस राहून त्या वंगभूमींतून कलिंगांत आलों होतों.

माझा डेरा काँग्रेसच्या गोपबंधुनगरांत न ठेवतां कटक येथील चंदीरोड-मधील एका महाराष्ट्रीय गृहस्थाकडे ठेवला होता. दि ६ ते १० जानेवारीपर्यंत दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत काँग्रेस अधिवेशनांतील विविध कार्यक्रमांना हजर होतों. देशभर गेले १४ महिने काँग्रेसबद्दलचे श्रवणसुख अनुभवलें होतें.

जिव्हायात्रा करतांना अनेकांच्या जिव्हांनीं माझ्या जीवनांतील काँग्रेसश्रद्धेला जबर आघात केले होते.

तथापि कोठेंहि निवडणुकीच्या काळांत अनुभवलेलें अश्मयुग अगर चपला-युग नजरेस आलें नव्हतें. भुवनेश्वर हें मयासुरानें निर्माण केलेल्या नगराप्रमाणें आहे. या नगरीच्या मुखावर कोठेंहि घाण वस्तीचा डाग नव्हता. रस्ते सरळ, रेखीव, प्रशस्त होते. मात्र या वास्तूच्या स्वरूपाला विसंगत असें ओरिसा राज्याचें सार्वजनिक जीवन व राजकारण होतें. माणसें सरळ नव्हतीं. दृष्टिकोन संकुचित होते. अधिवेशनाच्या निमित्तानें ही नगरी आज नववधूप्रमाणें सजली होती. मंगळागौरीच्या पूजेसाठीं ज्याप्रमाणें मुली नाना तऱ्हेची फुलें, पानें गोळा करतात त्याचप्रमाणें या काँग्रेस–नगरीची अवस्था होती.

## भीक मागून सत्यनारायण

सरकारी जिपा, सरकारी मोटारी या तर सेवेला हजर होत्याच; पण ओरिसां-तून झाडून साऱ्या काँट्रॅक्टरकडून शेंकडों जिपगाड्या खुषीनें वेठीस धरल्या होत्या! भीक मागून 'सत्यनारायण' करावा असें त्याचें यथार्थ वर्णन करतां येईल; पण हे सारे लोक उत्साहानें देत आहेत असा प्रचार तेथे दिसून आला. ४० लाख रुपये स्वागत-मंडळानें अवघ्या १० दिवसांत जमा केले होते.

भोर राज्यांत पूर्वीं राजाच्याकडे लग्न, मुंज, फलशोभन असा कांहीं समारंभ असला म्हणजे गावगन्ना शेतकऱ्यांकडून पट्टी वसूल करीत. तीच नीति स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या अधिवेशनाबाबत प्रतिष्ठित ठरली आहे.

## साध्या माणसाची संभावना

कटकमधील एकहि मोठा दुकानदार, कारखानदार यांतून सुटला नाहीं. किंबहुना पुरी येथील जगन्नाथाचा रथ जसा हजारों लोकांनीं ओढावा लागतो, तसेंच या अधिवेशनाच्या रथाबाबत झालें होतें! सरकारी नोकरांसाठीं बांधलेलीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमांक
अनुक्रम 63866 दि. 11/2/69

सारी घरें प्रतिनिधींसाठीं देण्यांत आलीं होतीं. समान संधीच्या निशाणाखालीं जमलेल्या या अधिवेशनांत जेवण्यामध्यें वर्गवारी केली होती. बैठकींतहि होती. विशिष्ट शिष्ट (व्ही. आय्. पी.) यांचीं प्रवेशद्वारें निराळीं, त्यांची व्यवस्था निराळी.

ज्या जनसाधारणासाठीं ( कॉमन मॅन ) काँग्रेसच्या पुढाऱ्यांचे आत्मे तळमळत होते, त्याच्या भंडाऱ्यांत चार दिवस मी जेवावयास जात होतों. कोणीहि कातीव अगर ओतीव, अस्सल अगर नकली पुढारी तेथें दिसला नाहीं. सामान्य जनाच्या सुखदुःखासाठीं काँग्रेसजनांचे अश्रु नक्राश्रूंपेक्षां सघन आणि समृद्ध दिसून येत होते !

गेल्या मे महिन्यांत ज्या घटना, काँग्रेस-पराभवांत दिसून आल्या त्यांतून जनतेचें लक्ष दुसरीकडे नेण्यासाठीं समाजवादाची आरोळी ठोकण्यांत आली होती असा उघड अर्थ संबंधित ठरावाबाबत लोक करीत होते. करावयाचें नसेल तेव्हां बारामती मापानें बोलावें व लोकांना बनवावें हा लोकशाही राजकारणांतील प्रतिष्ठित संकेत आहे.

गेल्या सहा महिन्यांत ४० टक्के महागाई वाढली व गळवाप्रमाणें सर्व जनतेला व्यापाऱ्यांनीं निःसत्त्व केलें. असें असतां तिच्या तोंडावर भुवनेश्वरी प्रबंध टाकण्यांत आला होता.

## हवें अन्न पण—

मुलगी क्षयानें आजारी आहे, तिला अन्नाची जरूरी आहे; पण तिला सुंदर साडीचें लेणें देण्यांत यावें असा हा प्रकार होता.

तहानेलेल्या माणसाला व्याकरणाचा उपयोग नसतो ! आणि म्हणून अगदीं मोजमाप ठरवून चालू दिलेल्या चर्चेतसुद्धां आर्तांचा आवाज कौरवसभेंतील द्रौपदीच्या तळमळीनें उठला ! मतविभागणी झाली असती तर कठीण झालें असतें ! तथापि नेहरूंचा आजार काँग्रेसश्रेष्ठांच्या उपयोगी आला. गेल्या १५ वर्षांतील नियोजन, भांडवलवाल्यांच्या उपयोगी आलें, असेंच हेंहि होतें ! देवकीच्या उदरीं जन्म घेऊन यशोदेनें वाढविलेला कृष्ण अर्जुनाचा मोतद्दार झाला; पण त्याप्रमाणें १९३८ सालीं हरिपुरा काँग्रेसमध्यें नियोजनाचें तत्त्व निर्माण झालें. स्वातंत्र्यानंतर काँग्रेससरकारनें तें स्वीकारलें आणि आतां नियोजन हें भांडवलवाल्यांना श्रीमंती वाढविणारें साधन ठरलें आहे. या साऱ्या अधिवेशनांत राजकीय ढोंग मुत्सद्देगिरीच्या मुखवट्याखालीं वावरत होतें !

डावे उजवे, आडवे व सरळ, कांहीं अपवाद सोडल्यास, कॉंग्रेसच्या भिंतीमध्यें व्यवस्थितपणें चिणलें जात होतें आणि ता. १० ला अधिवेशन संपल्यानंतर एका वैचारिक तुरुंगांतून माझी सुटका झाली असें मला वाटलें.

## जनमनाचा कानोसा

अकरा बारा दोन दिवस मी कटकलाच राहिलों होतों. युरोप व अमेरिका यांमध्यें लोकमत अंदाजण्यासाठीं ‘ गॅलपपोल ’ ही संस्था निघाली आहे.

गेल्या अर्ध्या शतकाच्या माझ्या राजकीय जीवनांत जनमत अंदाजण्याचा माझा मार्ग म्हणजे हॉटेलें, पानपट्टीवाले, मोटारी, केशकर्तनालयें या ठिकाणीं जाऊन कानोसा घेणें हा होय. त्यांतून जनमत काय आहे तें चांगलें समजून येतें.

न्हावी हा फार चतुर मनुष्य असतो. तसाच नामदेव होता. ५४ वर्षांतील सर्व निवडणुकींत जनमताचा अंदाज घेण्यासाठीं मी त्याचा उपयोग करी व नाना कळा असलेला पण बावळा वेष असलेला नामदेव अड्डयाअड्डयामधून हिंडे आणि जो अंदाज तो व्यक्त करी तो क्वचितच चुकीचा ठरे. हा अनुभव लक्षांत घेऊन मी ता. ११ ला चारपांच भटारखान्यांत भूक नसतांना गेलों. प्रत्येक ठिकाणीं वाढलेल्या महागाईत कॉंग्रेस अधिवेशनानें २५ टक्के भर टाकली होती ही गोष्ट दिसून आली. माझ्या खात्यांत पूर्वीं असलेले एक अधिकारी कटक येथें असून व्यापारधंदा करीत होते. त्यांनीं ता. ११ ला संध्याकाळीं माझ्या सन्मानार्थ कांहीं मंडळी चहापानासाठीं बोलाविली होती. त्यांत ओरिसाचे दोन माजी मुख्य मंत्रीहि होते. कांहीं व्यापारी, कांहीं पत्रकार होते, हायकोर्टाचे कांहीं प्रमुख वकीलहि होते. तसेंच एक न्यायमूर्तीहि आलेले होते. त्या एक तासभराच्या चर्चेंत सरकारची नालायकी, भाववाढ, भ्रष्टाचार, चारित्र्यशून्यता हे सर्वत्र दिसून येणारे चार विषय प्रामुख्यानें चर्चिले गेले. मी सन्माननीय पाहुणा आरोपीच्या पिंजऱ्यांत उभा आहे असा जणूं अनुभव घेत होतों. आरोपीनें थोडेंसें कबूल करावें व बरेंचसें नाकारावें ही योजना वकिली सोडूनसुद्धां मी विसरलों नव्हतों.

## गाढवाचा गोपालदास

लोकशाही राजकारणांत गाढवाचा गोपालदास होतो. कारण राजकारणांत लायकी दुय्यम दर्जाची व लोकप्रियता मुख्य ! तथापि गुणविहीनतेवर लक्ष्मी बेहद्द खूष झाल्याचीं उदाहरणें चर्चेत देण्यांत येऊं लागल्याबरोबर रक्तावलेले दात

असून गुन्हा नाकारण्याइतके निर्लज्जपणाचे ते झाले असते; म्हणून मीं मौन स्वीकारलें. मौनास शरण गेलों.

लक्ष्मीला पद्मजा म्हणतात; पण कमळाची उत्पत्ति चिखलांतून होते असें साहित्याचा आश्रय करून मी त्यांना सांगूं लागलों; आणि ती कितीहि चंचल असली तरी विष्णूच्या पादसंवाहनांत ती गर्क असते, सत्तेविरुद्ध संपत्ति क्षणभंगुर असते हा युगायुगाचा न्याय त्यांना सांगायचा मीं प्रयत्न केला. त्यांना चहा गोड लागत असला पाहिजे. मला मात्र तो घोटागणिक कडू वाटत होता! सगळ्या गोष्टीस अंत असतो, तसा या चर्चेला होता त्यामुळेंच मी माझ्या आदर्शांसुद्धां सहीसलामत बचावलों.

दुसरे दिवशीं चंडीमंदिराच्या समोरील कर्तनालयांत जाण्याचें ठरविलें. बहुतेक साऱ्या पाट्या ओरियामध्यें होत्या. म्हणून कर्तनालय ओळखणें माझ्या-सारख्या माणसाला कठीण होतें. जरा निरीक्षण करतांना, चंडीमंदिरासमोर खोकेवजा दुकानांत दोन खुर्च्या दोन आरशांपुढें मांडलेल्या दिसल्या. दुकानाजवळ गेलों. आंत कोणी नव्हतें. 'कोई है!' म्हणून विचारलें. दुकानाच्याजवळ एक गृहस्थ कमरेला लुंगी लावून उभा होता. पण त्याच्या गळ्यांत जानवें होतें; म्हणून तो कारागीर असेल असें वाटलें नाहीं. माझा प्रश्न ऐकतांच तो पुढें आला व म्हणाला, "हां, बाबू, चलो!"

## ध्येयासाठीं पडेल तो त्याग

मी दुकानांत शिरलों. एकंदर रचना पाहून पळून जावें असें वाटूं लागलें. पण साधारण माणसाला काय वाटतें हें मला पाहावयाचें होतें. त्या ध्येयासाठीं वाटेल तो त्याग करावयास मी तयार होतों. प्रथम बेत दाढी काढण्याचाच होता, कारण कापण्याइतके केस वाढले नव्हते. पण थोड्या पैशांत तो सौदा होणार नाहीं असें वाटलें. आरशाजवळ ठेवलेलीं शस्त्रास्त्रे पाहून पोटांत भीतीच वाटली. क्षणभर वाटलें कीं, समोरच्या चंडीला माझी इच्छा नसतांना हा माझ्या पवित्र व पाक रक्ताचा अर्घ्य देणार! मीं बेत बदलला व त्याला म्हणालों कीं, 'बाल काटना है।' त्याला अधिक बरें वाटलें. त्यानें कित्येक महिन्यांत परिटाचें दर्शन न घडलेला एक कापडांचा तुकडा 'कफना' वर घालावा त्याप्रमाणें माझ्या गळ्याभोंवतीं गुंडाळला! कंगवा कात्री हातांत घेतली. मधून मधून केस कापण्याचें यंत्रहि तो उपयोगांत आणी. त्याचे हात काम करीत होते. माझी जिव्हायात्रा सुरू झाली.

## ओढगस्तीचा प्रपंच

सहज विचारलें, ' जागेचें भाडें किती ? ' आणि त्या ८ × १० च्या खोक्याला महिना ४० रु. द्यावे लागतात असें सांगितलें. 'प्राप्ति किती होते ? 'हा प्रश्न विचारतां, अंगांत एक शर्ट व धोतर, हातांत एक रुमाल घेतलेली व्यक्ति इन्कमटॅक्स ऑफिसर नसेल याची त्याला खात्री होती. तो म्हणाला, ' सगळा खर्च जाऊन २–२॥ रुपये मला उरतात. आणि ५–६ माणसांचा प्रपंच अनेक दिवस माशाशिवाय चालवावा लागतो. ' मासे व भात या दोन वस्तु मिळाल्यानें गरीब ओरियांना पंचपक्वान्नाचें समाधान वाटतें.

या प्राथमिक प्रश्नांचा परिणाम चांगला झाला. आपल्यांत दोष न काढणारें गिऱ्हाईक व सहानुभूतीनें बोलणारें गिऱ्हाईक त्याला मिळालें असा विश्वास त्याच्या मनांत उत्पन्न झाल्याचें दिसलें. मग त्यानें आपल्या जीवनगाथेंतील एक एक पर्व सांगायला सुरुवात केली.

## सारा प्रसाद पुजाऱ्यांच्या पदरांत

१५ वर्षांपूर्वीचे अनुभव तो सांगत होता. त्याच्या आठवणीनें साधी वाणी सानंद झाली होती. कुठल्याहि आर्थिक शास्त्राची माहिती नसणारा हा लुंगीवाला ज्या ज्या पदार्थांचे भाव मी विचारी ते ते हमखास सांगत होता खाद्यपदार्थांचे मीं दर विचारले; २२–२३ वर्षांच्या अंतरानें विचारलें. त्या दिवशींचा ताजा भाव विचारला आणि कळवळून तो म्हणाला, ' स्वराज्य येण्यापूर्वी अर्ध्या आण्यांत मिळणारा चहाचा पेला ' अब्र साले तेरा नया पैसा मांगते है, ' आणि ताजा कलम जोडला कीं, ' कप पण लहान झाला आहे. दूध, चहाची पत्तीहि कमी झालेली ! '

मी त्याला मग स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुढारी मंत्री झाले, मुख्य मंत्री झाले त्यांच्याबद्दल विचारलें. ओरिसाच्या विकासाच्या कार्याला हिराकूड प्रकल्पापासून प्रारंभ झाला होता. तेव्हां मी मंत्री होतों. नवीन राजधानीची जागा कायम करण्याचा निर्णय जागेवर हजर राहून माझ्या सल्ल्यानुसार केला गेला. त्या ' जंगलांत आज मंगल झालें ' आहे. ओरिसांतील जुनीं देवळें हळूहळू नष्ट होत आहेत; आणि पंडितजींच्या शब्दांत सांगायचें तर मोठाले प्रकल्प हे नवीं मंदिरें, नवीं तीर्थें म्हणून अस्तित्वांत येत आहेत.

तथापि सारा प्रसाद पुजाऱ्यांच्या पदरांत पडतो हें सनातन तत्त्व याहि आधुनिक तीर्थस्थानांत आज दिसून येत आहे.

ओरिसाची माहिती असल्यानें मंत्र्यांचें नांव घेत होतों व त्यानें काय केलें तो कसा वागतो असें म्हणून १२-१३ मंत्र्यांची नामावलि मी त्याच्यापुढें ठेवली. दोघा-तिघांच्या बाबतींत त्यानें उत्तरें दिलीं व तो म्हणाला की, " बाबूजी क्या पूछते हो ? गद्दीपे आतेहि सब बदमाश होजाते हैं ! "

इतका समर्पक समारोप माझ्या पन्नास वर्षांच्या राजकीय जीवनांत कोठ-ल्याहि चर्चेचा मी केला नसेल; कोणीहि केल्याचें मला स्मरत नाहीं.

केश–कर्तनाचें कार्य संपलें. चर्चा संपली. मी त्याला विचारलें, " किती पैसे देऊं ? "

## तो सनातन वाद

न्हाव्याच्या स्वाभाविक चातुर्यानें ' तुमच्याकडे किती देतात ? ' असा त्याने प्रश्न केला. मी त्याला सांगितलें कीं, १०–१२ आणे देतात. त्यानें सांगितलें कीं मला १२ आणे द्या. मी त्याला एक रुपयाची नोट दिली. मग त्यानें मला हळूच विचारलें कीं'मी काय करतो ? कोठे राहतों ?' " मीं उत्तर केलें कीं मी पुण्यांस राहतों" व बेकार आहे. 'त्यानें विचारलें, ' त्या पूर्वी काय करीत होतां ? आणि आतां खरें सांगावें तर कठीण; राजकारणांत राहून खोटं बोलण्याची कला अवगत झाली नव्हती. मोघम व अर्थशून्य बोलण्याइतकी विद्या हस्तगत केली होती. पण विचार-लेल्या प्रश्नाला मोघम उत्तर शक्य नव्हतें, मग खरें सांगणें प्राप्त झालें. आणि आतां पैसे दिल्यानंतर धोरणानें खरें सांगणें अशक्य नव्हतें. मी म्हणालों, मी पंजाबचा राज्यपाल होतों. त्यानें म्हटलें कीं, बाबू पहिलें क्यों नहीं बोले ?

मी कांहींच बोललों नाहीं. त्यानें अक्षरशः माझ्या गुडघ्याला हात लावले व तो मजबरोबर दुकानाखालीं उतरला. मी लवकर निसटलों. त्याचें दुकान स्मृति-शेष झालें. त्याचें व्यक्तिमत्वहि अस्पष्ट झालें. पण आजहि कानांत जें दुमदुमत आहे व जो सनातन वाद आहे तो म्हणजे ' गद्दीपे आतेहि सब बदमाश होते हैं ' आणि माझ्या मनाची साक्ष मीच काढली व मला तरी वाटतें की, इतिहास मला अपवाद ठरवील.

✻ ✻ ✻

: सतरीतील काका :

: १५ :

# आजीचं घर उन्हांत बांधा

दिल्लीहून विमानानें परत आलों होतों. मुलाच्या ब्रिग्हार्डी नेहमीप्रमाणें खुर्चीवरून नेण्यांत आलें होतें. नेहमीप्रमाणें चिमुरडी नात दारांत उभी होती. पण नेहमीप्रमाणें घडलें नाहीं, तें म्हणजे तिनें चॉकलेट मागितलें नाहीं. नाहीं म्हणायला, आंत शिरतांच माझा हात धरून तिनें मला कोचाजवळ आणलें. पण इकडल्या तिकडल्या गोष्टी न करतां, उपोद्घात-प्रस्तावना न करतां, प्रारंभीचें प्राक्कथन अगर प्रास्ताविक न करतां, आपल्या मृदु पण ठसक्या आवाजांत तिनें " आजीचें घर उन्हांत बांधा " अशी एकदम मागणी केली! ती ऐकून मी थोडा आश्चर्यचकित झालों. ही नात आहे तीन वर्षांची. तिचे तिच्या, ' आधुनिक आई-बापांनीं नांव ठेवलें आहे. ' " अर्चना " पण मी तिला " गूळपापडी " म्हणतों. आणि कोणी तिला नांव विचारलें तर तीहि " अर्चना " हें नांव सांगते. पण लागलीच 'आजोबा किनी मला गूळपापडी म्हणतात,' असेंहि सांगून टाकते, आणि लगेच ' आजोबांच्या या गूळपापडीला कोणी बोलायचें नाहीं ' अशी घोषणाहि करते. त्यांतल्या ' नाहीं ' या शब्दाचा उच्चार व त्या वेळचा तिचा अभिनय थेट तिच्या वडिलांच्या आईसारखा असल्यानें तो प्रसंग पुन्हां पुन्हां पाहावा असें माझ्या मनाला वाटत असतें.

आज नेहमींप्रमाणें बॅगमध्यें काय आहे हें पाहण्याचें धर्मकृत्य ती करीत नव्हती. नेहमीप्रमाणें मांडीवर बसून आपल्या गोड गोड शब्दांनीं आजोबांशीं बोलत नव्हती. ती सारखी वटवट करते, असा तिच्या वडिलांचा तिजवर गंभीर आरोप. सारखी कटकट करते, असा तिच्यावर तिच्या आईचा आक्षेप. आणि दोघांनाहि नादमाधुर्य म्हणजे काय हें कळत नाहीं, असें माझें आपले प्रामाणिक मत! गोड चेहऱ्यावर जितका संताप येणें शक्य आहे, गुलाबाच्या फुलाला जितकें रागावणें शक्य आहे, तितका राग तिच्या चेहऱ्यावर होता आणि म्हणूनच ती मागणी प्रचारकी पुढाऱ्यांची अगर बिनडोक अनुयायांची नव्हती! तिच्या मनांतील तळमळ "झालाच पाहिजे" अशा घोषणेनें तिनें सांगितलेली नव्हती त्यामुळेंच ती माझ्या मनावर अधिक प्रभाव करीत होती. 'मुलें आणि फुलें याविना जीवन ना खुलें' हा कविवर्य रेव्ह. टिळकांचा अनुभव मी अर्धशतक घेत आहे.इंग्लंडचे एक माजी मुख्य मंत्री यांच्या घरासंबंधी लिहितांना एकानें असें वर्णन केलें आहे कीं "His house was full of babies and blue books." त्यांचें घर मुलें आणि पुस्तकें यांनीं गजबजून गेलें आहे. हें वर्णन माझ्या घरालाहि लागू पडणार आहे. फरक एवढाच कीं माझें घर मुख्य मंत्र्यांचें घर नाहीं आणि माझी मुलेंहि आतां 'मुलें' राहिलेलीं नाहींत पण त्यांच्या मुला-मुलींनीं गाडगीळांच्या वाड्याला नातू-वाडा केलें आहे. आणि पारिजातकांच्या फुलांचा सुप्रभाती सुवास यावा त्याप्रमाणें दिवसांतून केव्हांना केव्हा तरी ती येतात. ग्रंथालयांतील पुस्तकें इकडेतिकडे चाळतात. मी थोडा रागावतों पण एखादे दिवशीं कोणी न आल्यास, त्रास झाला नाहीं म्हणूनहि राग येतो! पुस्तकें विस्कटलीं नाहींत म्हणून दुःख वाटतें, असा हा विचित्र अनुभव व आनंद या वानप्रस्थाश्रमांत मी घेत आहें.

मुलांना व गड्यांना बोलावयाचे नाहीं. हा अलिखित वटहुकूम गृहस्थाश्रमांत काढलेला होता आणि एका प्रसंगानें गृहिणीनें यावर असें भाष्य केलें होतें कीं, 'मी काय येथें सांगितलेल्या कामाची मोलकरीण आहे! म्हणे मुलांना बोलावयाचें नाहीं? गड्यांना बोलावयाचे नाहीं?' तथापि आजतागायत त्या वटहुकमांत बदल झालेला नाहीं. जो हट्टी तो कार्यक्षम शासक असें खूळ तेव्हापासूनच माझ्या मस्तक सिंहासनावर विराजमान झालेलें होतें. आणि म्हणून जेव्हां सूनबाईनें डोळे वटारून आमच्या गुळपापडीकडे पाहिलें तेव्हां मोठ्या

युक्तीनें 'लवकर चहा करून आण' असें सांगून आज्ञा न करतां आज्ञाभंगाला सवड न देतां, मुत्सद्देगिरीचा मार्ग काढला.

लहान मुलांवर माझ्यादेखत तरी कुणी रागावलेलें मला आवडत नाहीं. नातवंड काकांच्यामुळें ऐकत नाहीशीं होतात, या आक्षेपाला माझें उत्तर एवढेंच की त्यांचे आईवडील ज्या वातावरणांत वाढले, त्याच वातावरणांत माझी नातवंडें वाढलीं पाहिजेत. आणि हल्लींच्या युगांत मुलं–मुली बापाच्या डोक्यावर बसण्याऐवजी त्यांच्या आईनेच ती जागा आधी व्यापून टाकलेली असते! तेव्हां तीहि भीति बाळगण्याचें कारण नाहीं! आई नाहीं असें पाहतांच, गूळपापडीने आपली फिर्याद मांडण्यास सुरुवात केली. तिचा आशय असा होता कीं, "कांहीं कारणांसाठीं ती, तिची आई पुण्याला गेली होती. मुंबईच्या सव्वातीन खोल्यांच्या 'फ्लॅट' पेक्षां पुण्यांतील घराचें अंगण, मोठाल्या माड्या, ह्या सर्व नातवंडांना आवडतात. आणि आतां समोरचा रस्ता रुंद झाल्यानें जणूं आझाद मैदानच घरासमोर निर्माण झालें आहे. आणि चौरंगी सामन्याला अगर कसोटीच्या सामन्याला ११–११ गडी तरी लागतात. वेळेचा निर्बंध असतो. पण या आझाद मैदानावरील सामन्यास असा कांहीं निर्बंध नाहीं. मंगल प्रभातपासून सूर्यास्तापर्यंत आणि पुण्यांतील विजेनें धोका न दिल्यास, त्या नंतरहि किती तरी वेळ, हा क्रिकेटचा महायज्ञ चालूच असतो. दांड्याऐवजीं एक खोकें, बॅटीऐवजीं एक फळकूट आणि अनंत चिंध्या गोळा करून तयार केलेला एक चेंडू. मिश्र शिक्षणाप्रमाणें येथें मुलें–मुलीं मिश्र क्रिकेट खेळत असतात. मुंबई-हून पुण्यास आल्यानंतर ही खेळण्याची संधि नातवंडांना सोडून द्यावीशी वाटत नाहीं. किंबहुना याच व असल्या उनाडक्या करण्यासाठीं पुण्याचें आकर्षण त्यांना अधिक असतें.

अर्चनाच्या आईच्या वडीलांनीं कलकत्ता सोडून पुण्यांत वास्तव्य केलें होतें. आणि तेथें नवीन वास्तु बांधली होती म्हणून त्या समारंभानिमित्त, माझ्या पुढें फिर्यादी आली होती. आणि समारंभासाठीं हजर रहावयाचे म्हणून तिच्या आईनें तिला सरळ माहेरी नेलें होतें. त्या बिऱ्हाडाचें स्वरूप शनवारातील घरा-पेक्षां निराळें दिसल्याने तिनें आईच्या मागें भुंगा लावला कीं; 'पुण्याला चल.' जेथें आलों आहोंत तें पुणें हे तिच्या सुप्रबुद्ध आईनें सांगण्यांचा कितीतरी प्रयत्न केला. पण आईचे बालमानसशास्त्र अपुरे पडले. चिमुरडी म्हणाली, 'हें नाहीं पुणें, येथें आजी नाहीं' आणि शेवटीं तिला घेऊन शनवारांतील घरांत तिच्या आईला यावें लागलें व वास्तूशांतीचा मुहूर्त संपल्यानंतर तिला पुण्यांत राहावयाचें अस-

तांना तिला न विचारतां मुंबईस आणलें होतें आणि हाच फिर्यादीचा विषय होता. ठसक्यात ती म्हणाली की, " आजीनें मला धाडून दिले म्हणून आजीचं घर उन्हांत बांधा. "

माझ्यापुढें प्रश्नच पडला. न्यायाधीश असून संबंधित आरोपीची बाजू नकळत घेऊन म्हणाला कीं, कलकत्याच्या आजीचें का ? ती म्हणाली. ' नाहीं पुण्याच्या आजीचे ! आतां आरोपी गैरहजर. त्याची बाजूं समजावून सांगणारा कोणी नाहीं. आणि मुलगा बॅरिस्टर असला तरी मुलगी फिर्यादी व आई आरोपी ! या खटल्यांत बापाच्या कोर्टात वकीलपत्र घेण्याचे धैर्य होईल का नाहीं याची शंकाच. शिवाय हा असा खटला होता कीं, कायद्याला बाजूला ठेवून, पुरावा वगळून न्याय द्यायचा होता. तिला पुन्हा विचारलें, " तुला आईनें मुंबईला आणलें ना ? " तिनं उत्तर दिलं, " पण आजी थांब कुठं म्हणाली ? " आणि अपराधशास्त्राप्रमाणें प्रत्यक्ष कांहीं करावे लागल्याशिवाय अपराध होत नाहीं व तसें न केलें तर कर्तव्यच्युतिसुद्धां होत नाहीं. या दृष्टीनं नैतिक न्यायानंसुद्धा आरोपी गुन्हेगार ठरत नव्हता. मग हळूच मी तिला विचारलें, " तुझ्या आईचें घर मी उन्हांत बांधू कां ? " आणि राजकारणांतील उपद्व्यापी स्वभावामुळें असा विकल्प मांडला कीं, " कां बाबांचें घर उन्हांत बांधूं ?" मला वाटलें, कीं या बिनतोड युक्तिवादांत, ह्या युक्तिवादाच्या जाळ्यांत ही चिमुकली हरिणी सांपडेल.

सारे डावपेच, सारे युक्तिवाद डावपेंची मनाला अगर युक्तिवादी मनाला जिंकूं शकतात, पण ते निरागस मनाला स्पर्श करतांच, निष्प्रभ होतात. जमुनेचें काळें पाणी कृष्णपदयुगुलांना स्पर्श करतांच ओसरतें, असेंच हें आहे. राजकारणांतील अनुभव तर असा कीं, खटाशीं खट, उद्धटाशीं उद्धट, शठाशीं शठ ! या सामन्यांत अंतिम विजय कधींच कुणाला मिळत नाहीं ! उलट सत्य व सद्भावना ह्यांचा खरा साक्षात्कार होतांच, सारी शठंप्रति शाठ्यनीति शम व शांत होते... वैयक्तिक जीवनांतहि प्रथमक्षणींच सत्य सांगणें हें यशस्वी होतें. सर्वदृष्ट्या हा अनुभव असून सुद्धा मी राजनीतीचें डावपेच करीत होतों. तिनें सांगितलें कीं, " नाहीं, आईचेंहि नाहीं अन् बाबांचेंहि नाहीं. आजीचेंच घर उन्हांत बांधा. " मोठा पेचप्रसंग मजपुढें उभा राहिला. कांहीं नाहीं तरी पांच वर्षांच्या मंत्रिपदाच्या काळांत हजारों घरें मीं बांधलीं असतील. पण असा कांहीं पेच कधीं पडला नाहीं ! शिल्पज्ञ वा सल्लागार यांची कधीं तूट वाटली नाहीं, पण हें

'उन्हांत घर बांधण्याचें' बिकट काम अधिक विचार करतां अधिकच बिकट होऊं लागलें !

मग मी तिला हळूच विचारलें,–"आजीचें घर उन्हांत बांधलें तर मी मग कुठं राहूं ?" हें ऐकतांच ती जरा कावरीबावरी झाली. "आजी मला तिच्या घरांत राहूं देणार नाहीं. आणि मग तूं आणि मी कुठं राहूं ?" आणि तिच्या चेहऱ्यावरून असें दिसूं लागलें कीं, तिच्या मनामध्यें कांहीं तरी वादळ उत्पन्न झालें आहे. थोडा वेळ तसाच थांबलों आणि क्षणांत ती जवळ आली आणि एकदम गालाला गाल लावून म्हणाली, "नको; आतां आजीचें घर उन्हांत बांधूं नका." न्यायाची मागणी तिनं सोडून दिली कारण तिच्या मनांत दयाभावानें न्यायावर विजय प्राप्त केला होता. मग तिला मी म्हणालों, "आजी येथें आली म्हणजे तिला म्हणेन कीं, आजोबांच्या गूळपापडीला कोणीहि बोलायचं..." आणि तबल्याची साथ जुळावी त्याप्रमाणें तिनं ठसक्यांत सांगितलं, "नाहीं."

न्याय देण्याचा सालोमनपेक्षांहि कठीण प्रसंग माझ्यावर गुजरला होता, तो अशा सुंदर वातावरणांत सुटला होता. किती वेळ तरी तिचे मुके मी घेतच होतों. त्या क्षणीं मी कुठल्यातरी दिव्य वातावरणांत गढून गेलों होतों, धुंद झालों होतों. एवढ्यांत 'चहा ठेवलाय' असा सूनबाईचा आवाज ऐकून माझ्या त्या समाधीचा स्वागतार्ह भंग झाला.

× × ×

: १६ :

# श्रद्धांजलि

आम्ही ऐकत आहों तेव्हांपासून बंगाल प्रांत म्हणजे चळवळ व खळबळ! १९०६ सालीं फाळणी झाली. तिचे पडसाद कमी होतात तोंच गुप्त चळवळी व प्रसंगाप्रसंगानें बहिऱ्याच्याहि कानठळ्या बसतील अशा अपार्थिव घोषणा. हा इतिहास गांधीयुगाच्या सुरवातीपर्यंत बंगालचा होता. गांधीयुग सुरू झाल्यानंतर गुप्त कटांची चळवळ फल्गुवत् झाली! अहिंसावाद जरी देशभर पसरला तरी आंब्यांतील नाना तऱ्हांप्रमाणें पंजाबी अहिंसा निराळी, बंगाली निराळी, महाराष्ट्राची तर इतकी निराळी कीं, त्याला जसें स्वरूप द्यावेंसें वाटेल व वर्णन करावेंसें वाटेल तशी सोय असलेली. बंगालमधील चळवळ गांधीयुगानंतर अदृश्य झालेली दिसली तरी अनुशीलन समिति व युगांतर समिति यांचीं भांडणें कॉंग्रेसच्या राजकारणांत पूर्वीच्या दशदोषांसह आली.

चित्तरंजनदास हे एका पक्षाचे अध्वर्यु तर दुसऱ्या पक्षाचे श्यामाबाबू, सामान्यपणें अकरा वर्षें सरकारी नोकरी केल्यानंतर चित्तरंजन दास यांनीं डॉ. बिधानचंद्र यांचें राजकीय उपनयन केलें आणि एका पोटनिवडणुकीच्या निमित्तानें डॉ. राय हे प्रसिद्धीच्या रंगपटावर आले. चित्तरंजनांचें नेतृत्व त्यांनीं मान्य केलें होतें, तरी बंगाली राजकारणांत बिधनचंद्राची भूमिका जास्तींत जास्त

तटस्थपणाची होती. राजकारणांत जेवढी तटस्थता राखतां येते तेवढी त्यांनीं राखली. राजकारण–प्रवेशानंतर प्रत्यक्ष कृतींतील नेतृत्व त्यांनीं दूर ठेवलें असलें तरी बंगालमधील कुठलेंहि राजकारण १९२५ पासून बिधनचंद्राच्या मृत्यूपर्यंत त्यांच्या देखरेखीखालीं चाललें होतें म्हटलें तरी चालेल.

१९०६ सालीं बंगाली लोकांनीं फाळणीला विरोध केला. १९११ सालीं फाळणी रद्द झाली. कलकत्त्याहून राजधानी दिल्लीला गेली. १९४७ सालीं त्याच पुढाऱ्यांनीं–म्हणजे फाळणीला पूर्वी विरोध करणारांनीं–तिला मान्यता दिली. अनिवार्य झालें म्हणूनच. पण १९०६ सालींच मान्यता दिली असती तर बंगालचा व भारताचाहि इतिहास निराळा झाला असता असें निदान श्यामाप्रसादांनीं मला सांगितलें होतें. आजचीं मतें उद्यांला शिल्लक राहात नाहींत आणि राजकारणाच्या वरच्या वातावरणांत अपरिवर्तनीय अगर अनंत काल टिकणारें असें कांहींहि नसतें, हें मोर्ले यांचें म्हणणें भारताच्या इतिहासांतहि सिद्ध झालेलें दिसतें. प्रत्यक्ष वांटपाच्या वेळीं डॉ. राय अमेरिकेंत होते आणि बंगालमधील भांडणें पाहून वल्लभभाईंनीं त्यांची उत्तर प्रदेशच्या राज्यपालपदावर नेमणूक करवली. डिसेंबर १९४७ मध्यें ते परत आले. १९४८ मध्यें राज्यपालपदाऐवजीं त्यांनीं बंगालच्या राजकारणांत पडण्याचें ठरवलें. पक्षानें त्यांना नेता निवडलें. डॉ. प्रफुल्ल घोष यांच्या जागीं डॉ. राय मुख्य प्रधान झाले आणि फाळणीचा धक्का बसल्यानें किंचित् ऐक्यभाव बंगालच्या राजकारणांत निर्माण झाला होता तो लुप्त झाला! १९४८ पासून तों त्यांच्या मृत्यूच्या घडीपर्यंत बंगालचें राजकारण चिंताग्रस्त करणारें होतें व आतां कदाचित् अधिकहि होईल.

थेट १९५२ पर्यंत बिधनचंद्रांच्या अडचणी किती होत्या आणि त्या त्यांनीं निवारण कशा केल्या त्याची प्रत्यक्ष माहिती मला आहे. अन्य प्रांतांतील मुख्य मंत्री हे सामान्यतः केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय मानण्याच्या प्रवृत्तीचे होते. पण हा आरोप राय यांच्यावर करतां येण्यासारखा नाहीं. बंगालचें हित प्रथम असें ते मानीत व आग्रही वृत्तीनें त्याचा पाठपुरावा करीत. केंद्राकडून ते आपलीं धोरणें मान्य करून घेत. दिसायला जसे ते उंचेपुरे होते, तसेच व्यक्तिमत्त्वांतहि होते. भारतांतील विद्यमान पुढाऱ्यांपेक्षांहि त्यांची उंची–व्यक्तित्वाची व प्रतिष्ठेची अधिक होती. त्याचप्रमाणें कितीहि गडबड अगर गोंधळ झाला तरीहि ती गडबड अगर गोंधळ त्यांच्या व्यक्तित्वाशीं टकरा घेत घेत विलय पावे. ते शरीराचे डॉक्टर तर होतेच, पण मनोविकारांचे व मनोविकृतींचेहि यशस्वी चिकित्सक होते.

८

काँग्रेसजनांचें त्यांच्यापुढें चालत नसे. कम्युनिस्ट त्यांना वचकत. इतर पक्ष हिणवण्यापलीकडे कांहींएक करूं शकत नसत. काँग्रेसचा समाजवाद त्यांना पसंत होता असें म्हणणें धाडसाचें होईल. पण त्याला ते थोतांड मानीत कीं काय हें सांगणें कठीण. त्यांच्या आर्थिक विचारांची वीण ज्यूटच्या आणि कापसाच्या धाग्यांनीं विणलेली होती. संपत्तीची मिजास त्यांच्यापुढें नसे; पण मनांत आणतांच व टेलिफोनवरून बोलतांच लक्षावधि रुपये त्यांच्याकडे धांवत येत ! हिंदुस्थानचा अभिमान त्यांना कमी होता असें नाहीं, पण 'सोनार बांगला' चा अधिक होता. बंगालमधील परदेशी व देशी व्यापाऱ्यांनीं आपापल्या कंपनींत बंगाली लोकांना नोकरी दिलीच पाहिजे असा आग्रह रॉय यांनीं राजनीतीचा भाग म्हणून धरला. महाराष्ट्रांतील कारखाने केवळ भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रीय आहेत, यापेक्षां अधिक कांहीं सांगतां येत नाहीं. पण डॉ. राय यांनीं बंगाली माणसें बंगालमध्यें व केंद्रीय राजकारणांत मोठ्या प्रमाणांत अधिकाराच्या पदावर बसवण्याचे यशस्वी प्रयत्न केले. भारतीय व जागतिक दृष्टीचें केंद्रीय नेतृत्व त्यांच्यापुढें नेहमींच ठेंगणें पडे !

डॉ. राय हे श्रेष्ठ बंगाली असले तरी भारतीय नागरिकत्वाची जबाबदारी त्यांनीं पूर्णपणें पाळली होती. आजचा बंगाल अद्यापि स्थिरस्थावर झाला असें म्हणतां येत नाहीं. चिखलांत रुतलेल्या गजाला बाहेर काढण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. दोन पाय बाहेर आले आहेत, राहिलेले दोन लौकर बाहेर काढले नाहींत तर बाहेरचे आंत जाण्याचा धोका आहे. या स्थितींत विधनचंद्रांचा नैसर्गिक मृत्यूहि अकालीं झाला असेंच म्हणावें लागतें.

'तुका म्हणे आतां, उरलों उपकारापुरता' याच चालीवर 'टंडन म्हणे आतां, उरलों हिंदीकार्यापुरता.' १९५३ मध्यें एका पोटनिवडणुकींत टंडनबाबू हे पुन्हां लोकसभेंत निवडून आले होते आणि शपथविधीच्या दिवशीं आम्हीं सर्व मंडळींनीं त्यांचें सहर्ष स्वागत केलें होतें. त्या दिवशींच्या भाषणांत लोकसभेंत येण्याचें प्रयोजन व हेतु स्पष्ट करतांना ते म्हणाले कीं, "हिंदीची वृद्धि व्हावी व तिला स्वसंतोषानें राष्ट्रीय मान्यता मिळावी आणि नजीकच्या भविष्यकाळांत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतहि तिला मानाचें स्थान मिळावें म्हणून मी येथें आलों आहे." १९५३ नंतरच्या हिंदुस्थानांतील केंद्रीय अगर प्रांतिक राजकारणांत त्यांनीं कांहींहि भाग घेतला नाहीं, संपूर्णपणें हिंदीलाच त्यांनीं वाहून घेतलें.

एल्एल्. बी. होतांच उत्तर प्रदेशाच्या राजकारणांत त्यांनीं प्रवेश केला. त्या वेळचें तेथील राजकारण म्हणजे प्रागतिक पक्षाचें राजकारणच होतें. त्याच

राजकारणांत कांहीं काळ राहून लखनौ कॉंग्रेसनंतर कॉंग्रेसच्या जहाल राजकारणांत त्यांनीं प्रवेश केला. सुरवातीपासून ज्याला आग्रही म्हणतां येईल असा त्यांचा स्वभाव असल्यानें आणि कुठल्याहि परिस्थितींत कार्याच्या साफल्याच्या दृष्टीनें जुळवून घेण्याची त्यांची वृत्ति नसल्यानें पन्नास वर्षांच्या त्यांच्या राजकीय जीवनांत अनेक वेळां त्यांनीं वैयक्तिक साफल्याच्या विचारांना बाजूला सारून तत्त्वांची कास धरली. त्यामुळें ते सतत बाजूलाच पडले. राजकारणांत प्रसिद्धि हा आत्मा मानला जातो. तथापि टंडनबाबूंनीं लोकप्रियतेची हाव कधींच धरली नाहीं. मात्र अनेक वेळां न कळत लोकप्रियता त्यांचा मागोवा घेत होती, हेंहि खरें आहे.

१९२४–२५ ची गोष्ट आहे. हिंदु–मुस्लिम दंग्यांमुळें रामलीलेच्या मिरवणुकीवर सरकारनें बंदी घातली. मोठी जाहीर सभा झाली. त्या वेळीं रामलीलेच्या चालकांनीं असें सांगितलें कीं, रामलक्ष्मण यांच्यासाठीं कोणीहि आपलीं मुलें द्यायला तयार नाहींत. कारण गोळीबार होण्याची शक्यता निश्चित होती. टंडनबाबूंनीं जाहीर केलें कीं मिरवणूक निघेल आणि त्या कामीं माझ्या सात मुलांपैकीं मी दोन मुलें देत आहे. ह्याचा परिणाम असा झाला, कीं सरकारला आपला बंदीहुकूम मागें घ्यावा लागला. टंडनबाबूंचें नांव अक्षरशः आबालवृद्धांच्या तोंडीं झालें !

घटना-परिषदेचें काम सुरू होतें. उत्तर आणि दक्षिण भारत यांच्यामधील मतभेद कमी होईनात. ‘ हिंद ’ हें नांव असलें पाहिजे असा टंडनजींचा आग्रह होता. हिंदुस्तानी या शब्दाला त्यांचा फार विरोध. हिंदुस्तानींत शुद्ध गंगाजळाला यमुनेचें काळें पाणी मिळालें होतें! उर्दू व फारसी या दोन्ही भाषा त्यांना चांगल्याच येत. तथापि उर्दू भाषेची मागणी ही जातीय आहे असें त्यांचें मत होतें. १९२५ सालीं कानपूर कॉंग्रेस अधिवेशनांत स्वतः त्यांनीं ‘ हिंदी याने हिंदुस्तानी ’ अशी शब्दरचना केली होती. पण फाळणीनंतर हिंदी व हिंदुस्तानी यांचीहि फाळणी झाली. त्या सुमाराला एके दिवशीं टंडनजी घरीं आले आणि म्हणाले, “ पंडितजी आग्रह सोडत नाहींत. तुम्ही प्रयत्न करून त्यांच्याकडून हिंदीला मान्यता मिळवून घ्या. ” मीं प्रयत्न केले आणि पंडितजींना म्हणालों.

“ तुम्हांला नांव हवें आहे कीं रूप हवें आहे ? ”

त्यांनीं उत्तर दिलें, “ गोंधळांत टाकूं नका. ”

मी म्हणालों, “ हिंदीचें स्वरूप आपण ठरवूं. हिंदी नांव तुम्ही स्वीकारा. ”

तें त्यांनीं मान्य केलें आणि हिंदी कशी असावी याचें कलम घटनेच्या

खड्यांत सामील झालें. टंडनजींचा जय झाला होता. परंतु आंकड्यांचें भांडण काढून त्यांनीं जयाचा पराजय केला होता. त्यामुळें नेहरूंनीं माघार घेत घेत पराजयांतून जय मिळविला! सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, मोडेन पण वाकणार नाहीं हें त्यांचें ब्रीद समाजकारणांत, राजकारणांत, एवढेंच नव्हे, तर भाषा-कारणांतहि होतें.

विधानसभेचे अध्यक्ष झाल्यामुळें 'विधानसभेच्या कामांत तटस्थ असेन, पण राजकारणांत पक्षातीत राहीन' हें त्यांनीं मान्य केलें नाहीं. तथापि एकाहि सभासदानें आपल्या अधिकाराला विरोध केल्यास आपण स्थान सोडूं असें त्यांनीं जाहीर केलें होतें. त्यांची कारकीर्द सर्वमान्य झाली.

त्यांचे आचारविचार प्राक्प्राचीन होते. स्वच्छतेसाठीं ते माती वापरीत. गाईशिवाय अन्य दूध वर्ज्य. मृत जनावरांच्या कातड्याचीं पादत्राणें न मिळा-ल्यास अनवाणी. अनिवार्य झालें तरच इंग्रजी भाषा. ह्या सामान्यपणें लहरी वाटतील; पण अशांनींच त्यांचें जीवन भरलेलें होतें. तथापि बौद्धिक सहिष्णुते-बरोबर सामाजिक जीवनांत कटुता क्वचितच दिसून येई. आधुनिक काळांतील वाहनें, पुस्तकें व क्रिकेट या तीनच गोष्टी त्यांनीं घेतल्या होत्या! ते आपल्या कॉलेजच्या क्रिकेट टीमचे कॅप्टन होते. तथापि क्रिकेटच्या खेळांतील श्रेष्ठ मानलेला खिलाडूपणा त्यांच्या जीवनांत मोठ्या प्रमाणांत दिसून आला नाहीं.

कॉंग्रेसचें अध्यक्षपद त्यांना मिळालें, पण ती त्यांची महत्त्वाकांक्षा नव्हती. पंडितजी व सरदार यांच्या राजकीय पतंगबाजींत नेहरूंनीं रफी किडवाईच्या मांज्यानें उडवलेला कृपलानींचा पतंग, पटेल यांनीं टंडनजींच्या आपल्या पतंगानें प्रच्छन्न व भांडवलवाल्यांच्या मदतीनें कटवला. नाशिकचें १९५० चें कॉंग्रेस अधिवेशन म्हणजे सुरतेची आवृत्ति होती. तथापि स्वातंत्र्योत्तर काळांतील नवीन ज़बाबदारीमुळें सुरतेंत जें अंतीं घडलें तें नाशिकला घडलें नाहीं! पटेल निधन पावतांच पंडिजींनीं आपला विरोध स्पष्ट केला आणि १९५१ च्या ऑगस्टमध्यें टंडनजींना राजीनामा द्यावा लागला.

राजनीतिज्ञ पण राजनीति न जाणणारे, संस्कृतीचे अभिमानी, तथापि प्रगतीचे एका दृष्टीनें विरोधक, हिंदीचे अभिमानी, श्रेष्ठ प्रचारक, साहित्यिक व पंडित असें टंडनजींचें वर्णन करतां येईल. त्यांना राजर्षि म्हणत तेंहि अयोग्य नाहीं. राजकारणांत ते विसरले गेले तरी हिंदीच्या क्षेत्रांत ते अविस्मरणीय राहतील.

✕ ✕ ✕

## : १७ :

# भुवनेश्वरींतील समाजवाद

चावून चावून खाल्लें म्हणजे अन्न पचतें असें वैद्यकशास्त्र सांगतें. लोकशाही तंत्राप्रमाणें साधकबाधक चर्चा झाल्यानंतर तत्त्वबोध होतो असें सांगतात. भुवनेश्वरला थोडा निराळा अनुभव आला. तीन दिवस मिळून पंधरा तासांच्या चर्चेनंतर अपेक्षिलेला तत्त्वबोध शोधूनहि मिळाला नाहीं! अनेकांना आपले विचार मांडावयाचे होते, आपले दृष्टिकोन स्पष्ट करावयाचे होते, शब्दांतील गुप्त व सुप्त अर्थ प्रकट करावयाचे होते, पण अध्यक्षपदीं श्री. कामराज असल्यानें सभा-नियंत्रणासाठीं अक्षरशः द्राविडी प्राणायाम करावा लागत होता. श्री. कामराज यांना हिंदी समजत नाहीं व इंग्रजी बेताबाताचेंच समजतें, त्यामुळें कामकाजी प्रश्न, प्रस्तुत विषयींचे प्रश्न, लागू-गैरलागू यासंबंधींचे आक्षेप झटकन निकाली निघत-नसत. त्याचप्रमाणें एतद्विषयक नियमहि पूर्णपणें पाळले गेले नाहींत. ज्यांनीं उप-सूचना दिल्या त्यांची धूर्तता त्यांनाच भाषण करण्याची संधि मिळाल्यानें, सफल ठरली. पुढें कांहीं वक्त्यांना सर्वसाधारणपणें ठरावावर बोलण्याची संधि मिळाली. पण त्यांपैकीं बहुसंख्य कार्यकारिणीचे सभासद होते! त्यांचे दृष्टिकोन व त्यांची विचारसरणी यांच्या अभिव्यक्तीमुळें सामुदायिक जबाबदारीला अनेक छिद्रें पड-ल्याचें दिसून आलें. ठरावाचा नक्की अर्थ काय? ठरावांतील शब्दांचा अर्थ काय?

याबद्दल ठाम मत कोणीहि सांगूं शकलें नाहीं. शब्दमेघांनीं एवढा आवाज काढला कीं, मंडपांतील दशदिशा बधिर झाल्या. शब्दांच्या धुक्यानें मंडपांतील आकाश अस्पष्ट झालें. 'कियती चातकचंचुकी साऽपि न भृता जलेन' अशी परिस्थिति चातकाप्रमाणें खऱ्या अर्थाच्या जलबिंदूची वाट पाहणाऱ्या श्रोत्यांच्या मनाची झाली.

## उद्योगपतींचें वर्चस्व

'लोकशाही समाजवाद' ह्यांत समाजवादाचें विशेषण लोकशाही कीं 'लोकशाही समाजवाद' हा द्वंद्व-समास अशी शंका अनेकांच्या मनांत आली! लोकशाही हें विशेषण असेल तर, एक्कावन टक्के बहुमतानें जें मान्य होईल तें अंमलांत आलें पाहिजे हा सरळ अर्थ निघतो. पण तसा अर्थ कॉंग्रेसच्या नेतृत्वानें सत्ताप्राप्तीच्या क्षणापासून घेतलेला दिसत नाहीं! समन्वयाच्या नांवाखालीं प्रस्थापित हितसंबंध सुरक्षित करण्याकडे तें नेतृत्व झुकत आहे असें दिसून येतें. पुंजीपात ज अनावश्यक म्हणून टाकून देतात, तेवढेंच घेऊन नियोजनाचा संसार भारत सरकार करीत आहे! अप्रगत देशांत संपत्ति कमी, पण मनुष्यबळ जास्त; आणि त्याचाच फायदा उद्योगपति घेत असतात. पोटावारी किंबहुना अर्धपोटावारी पुरे श्रम घेऊन धनिकांच्या इच्छा सफलतेचें बाळसें वाढवीत असतात! अप्रगत देशांत किंबहुना आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांत अनियंत्रित अर्थव्यवस्था म्हणजे गरीब जनतेची केवळ पिळवणूक नव्हे, तर तशी अर्थव्यवस्था म्हणजे गंभीर गुन्हा आहे, असें एका मोठ्या अर्थशास्त्रज्ञाचें मत आहे. आणि जोंपर्यंत आर्थिक प्रगति या वर्गाच्या इच्छेवर अवलंबून आहे, तोंपर्यंत सामाजिक न्याय मिळणार नाहीं व सर्वसामान्य जीवनस्तर उंचावणार नाहीं. देशांतील संपत्तींत भर पडेल, पण प्रजेच्या दुःखांत व दारिद्र्यांत कांहींहि कमी होणार नाहीं! श्रीमंत देश व गरीब प्रजा हेंच चित्र यांतून उपलब्ध होतें. आणि तीच स्थिति आज भारतांत आहे. म्हणून लोकशाही हें विशेषण असलें पाहिजे. संबंधित हितसंबंधांना बाजू मांडण्यास वाव मिळाला पाहिजे, एवढाच अर्थ 'लोकशाही' या शब्दांत असला पाहिजे. तिच्या नांवाखालीं धनिकवर्गाला, संचितवाद्यांना निर्णायक नकाराचा ( व्हेटो ) अधिकार मिळतां कामा नये. आज कॉंग्रेसच्या नेतृत्वांत भांडवलशाहीचे अनेक पंचमस्तंभी आहेत. संसदेंतहि कॉंग्रेस पक्षांतील सुमारें तिसरा हिस्सा सभासद भांडवलशाहीच्या आश्रितांपैकीं म्हणतां येतील असे आहेत. रेल्वेइंजिनांच्या दोन्ही बाजूंस बारीक वाळूच्या पेट्या

ठेवलेल्या असतात. गाडीचा वेग कमी करावयाचा असल्यास त्या पेट्यांतून रुळावर बारीक वाळू नळ्यांद्वारें सारखी सोडली जाते आणि इंजिनाची गति कमी करण्यांत येते. अशा वाळूच्या कांहीं पेट्या काँग्रेसच्या इंजिनावर आहेत. सामान्य जनांचा बुद्धिभेद करण्यासाठीं अशा सभासदांची वाणी सतत झटत असते. निवडणुकीच्या फंडाचा मुख्य पुरवठा पुंजीपती वर्गाकडून होतो. 'अन्नमय प्राण' ह्याचप्रमाणें 'धनमय कार्यक्रम' असें म्हणण्यास हरकत नाहीं!

## भोंदूगिरीचे युक्तिवाद

आज ४० टक्के महागाई गेल्या सहा महिन्यांत वाढली असतांना सुद्धां अन्नधान्याचा व्यापार काँग्रेसप्रणीत सरकार हातीं घेत नाहीं याचा अर्थ उघड आहे. राष्ट्रीयीकरणाच्या बाबतींत तत्त्व मान्य, पण काल अनुकूल नाहीं, ही क्रांतिशून्यांची दर्शनदृष्टि या अधिवेशनांत स्पष्ट झाली. कुठल्याहि प्रगतिपर कार्याला विरोध करण्याचें प्रतिष्ठित साधन म्हणजे कालाची अननुकूलता! ज्याच्या हातांत संपत्तीचीं साधनें तो सत्तेवर हुकमत चालवतो आणि ज्याच्या हातीं सत्ता त्याच्यापुढें काळ कुत्र्याप्रमाणें वागतो! सगळे नवग्रह रावणानें पालथे घालून त्यांच्यावर आपलें सिंहासन प्रतिष्ठित केलें होतें. काळ अनुकूल नाहीं असें म्हणण्यांत मूर्खपणा नसून भोंदूगिरी आहे, ठगेगिरी आहे, हीच गोष्ट भुवनेश्वरीं दिसून आली. कांहीं करावयाचें नसेल तेव्हां जे आक्षेप घेण्यांत येतात, त्या सर्वांना काँग्रेसस्मृतीमध्यें सिद्धान्तांचें स्वरूप प्राप्त झालें आहे. गेल्या पंधरा वर्षांत राजकर्त्यांची अशी एक जात निर्माण झाली आहे. त्यांत निधर्मीपणा आहे, निःस्वार्थीपणा नाहीं! या जातीचें कुळगोत्र 'प्राप्ति' हें आहे. संपत्ति ही कुलदेवता आहे. 'साधनानाम् अनेकता' हा त्यांच्या मंत्राचा विनियोग आहे. कंपनी सरकारच्या वेळीं असें म्हणत कीं, 'खुल्क खुदाका, मुलूख बादशहाका, अंमल कंपनी सरकारका!' आज 'राज्य जनतेचें, मुलूख काँग्रेसचा आणि अंमल विवक्षित काँग्रेसजन व त्यांच्या आश्रितांचा आहे!' आज संस्थानिक गेले. जमीनदारांच्या गोवऱ्या स्मशानांत येऊन पडल्या आहेत. पण जुने भांडवलवाले मात्र कायमच आहेत! त्यांच्यांत नव्या राजकर्त्या वर्गांतील, नवश्रीमंतांची भर पडली आहे. आर्थिक रचनेचें स्वरूप अल्पसंख्याक भांडवलशाही ( प्लुटोक्रॅटिक कॅपिटॅलिझम ) असें झालें आहे.

## जाणूनबुजून भोंगळपणा

आणि हें कायम राहावें म्हणून लोकशाही व समाजवाद हा अर्थ लोकशाही समाजवादांतून काढण्यांत येत आहे. साधा ठराव जाणूनबुजून भोंगळ ठेवला

आहे. शब्दानें फसणाऱ्यांसाठीं त्यांत व्यवस्था आहे. भावनावश मनांसाठीं खाद्य आहे, पण सामान्य जनांसाठीं कांहींहि नाहीं, फक्त शब्द आहेत. आणि शब्दांच्या रानांत अर्थरूपी हरीण पूर्णपणें बांधला गेला आहे. जनसाधारणाला भाकरी हवी आहे, पुरेसें वस्त्र हवें आहे, निवास हवा आहे, शिक्षण हवें आहे, आणि त्याला फक्त भोंगळ-भावडीं आश्वासनें या ठरावांत दिलीं आहेत. व्याकरणानें तहान भागत नाहीं, काव्यानें भूक शमत नाहीं. समान संधि व सामाजिक न्याय हीं अनुभवांत यावयाचीं तर राज्यानें संग्रहित संपत्ति, निदान पन्नास टक्के तरी आज कररूपानें घेतली पाहिजे. चालू अगर क्रियमाण संपत्तींतून कमाल मर्यादेपेक्षां जें जास्त असेल तें शासनानें घेतलें पाहिजे. अन्यथा समाजवाद येणार नाहीं. सामान्य माणसाचें युगायुगांचें दारिद्र्य जाणार नाहीं !

## मध्यमवर्गीय नेतृत्व

कॉंग्रेसमधील नेतृत्व मध्यमवर्गीय आहे. तत्त्वतः समाजवाद त्यांना मान्य आहे. पण तो तावडतोब अंमलांत यावा, आपल्या पिढींत अंमलांत यावा असें त्यांना वाटत नाहीं. हयातींत तो त्यांना नको आहे. मरणोत्तर आला तर त्यांची त्याला मुळींच हरकत नाहीं. पण हरकतीचा वारसा चालवणारे त्याहि वेळीं उपस्थित असणार हेंहि उघड आहे. हिंसा नको असेल तर संघटित अहिंसा आणि निश्चयी नेतृत्व खराखुरा समाजवाद आणूं शकेल. पण तसें कांहीं होईल असें मला आजतरी वाटत नाहीं. समाजवादी राष्ट्रांशीं मैत्री जोडून समाजवादाची प्राप्ति होणार नाहीं. "यस्मिन् कुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते।" म्हणजे आजचें कॉंग्रेसचें नेतृत्व समाजवाद आणूं शकणार नाहीं हें भुवनेश्वर येथें स्पष्ट झालें ! तथापि, पुढील वर्षभर वाट पाहण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ती वाट स्वस्थ बसून पाहूं नये. लोकशाहीचें महावाक्य म्हणजे सतत शिक्षण व आंदोलन, आणि याचाच आश्रय जनतेनें स्वीकारला तरच समाजवादाकडे तिची वाटचाल होईल.

* * *

: १८ :

# राजस्थानी साहित्यांतील कांहीं रस-विशेष

काव्य हें मनांत उत्पन्न होणाऱ्या प्रतिभेचें स्वरूप असलें तरी देशकाल-परिस्थिति यांना सर्वस्वीं सोडून अगर सर्वस्वीं विसंगत असें तें नसतें. कवि ज्या वातावरणांत राहिला असेल, ज्या ऐतिहासिक घटनांनीं त्याच्या मनावर परिणाम केला असेल, त्याच्या भोंवतालील वातावरणानें त्याच्या विचारांना जो आकार दिला असेल, त्या सर्वांचा परिणाम त्याच्या काव्यावर होत असतो. जें व्यक्तिगत कवीच्या काव्याबद्दल म्हणतां येतें, तसेंच थोडेंसें प्रादेशिक काव्याबद्दलहि म्हटलें तर चूक ठरणार नाहीं. प्रादेशिक साहित्याचा अगर प्रादेशिक काव्याचा असा एक स्थायी भाव असतो आणि प्रसंगाप्रसंगानें जें साहित्य अगर काव्य निर्माण होत जातें तें त्या स्थायी भावाला अनुसरून व सुसंगत असें असतें. नदीचे अनेक प्रवाह असतात, शतधारांनीं ती वाहात असली तरी तिचा उगम एक असतो. तिचा विनिपात अगर विकास शतमुखांनीं होत असतो. परंतु मूळ आवाज देणारा कंठ एक असतो. वृक्षाच्या शाखा अनेक आणि पानें अगणित, फुलें व फळेंहि असंख्य, तथापि त्या वृक्षाच्या मुळांतील बीज एक, बुंधा एक; त्याचप्रमाणें साहित्याचे विविध प्रकार असले तरी त्यांची प्रेरणा मुळांत एक. काव्यांत विविध स्वरसंगम असले, तरी मूळ स्वर एक असतो. अनेक भावभेद व रसभेद असले तरी मूळ स्वर हाच काव्याचें हृदयस्पंदन आहे, त्याचा प्राण आहे.

## पराक्रमाला आव्हान

आणि या दृष्टीनें निरनिराळ्या भाषांच्या अगर प्रदेशांच्या साहित्याचा विचार केल्यास तें एक चांगलें व उद्बोधक कार्य होणार आहे. अलीकडे राजस्थानी साहित्यविषयक कांहीं निर्मिती अवलोकन करीत असतांना एक वैशिष्ट्य त्यांत दिसून आलें. राजस्थानचें जीवन गत काळांत एक संघर्षमय जीवन होतें. तेथील जीवन म्हणजे पराक्रमाला आव्हान होतें आणि केवळ सुख व चैन, केवळ स्वप्न व कल्पना असें त्याचें स्वरूप नव्हतें. जुन्या राजस्थानी काव्यांत मादक संगीताची लहर नाहीं. युद्धाची तुतारी अगर संघर्षाचा शंखनाद तेथें ऐकूं येतो. स्वप्नमय मधुर कल्पनांच्या कोमल शय्येवर राजस्थानची काव्यकामिनी कधींच आढळून आली नाहीं. राजस्थानचें काव्य जागरूक अवस्थेंत होतें. रानावनांतून तें वावरत होतें. पहाडांतून व दऱ्यांतून लढाऊ जीवनाची शीळ घालत होतें. जीवनांत पाण्यापासूनच्या अडचणी समाजाला अनुभवाव्या लागत होत्या. ४००–४०० फूट खोलवर अल्पस्वल्प मिळणारें पाणी, सभोंवतालीं असणारें मरुस्थळ, उन्हाळा व थंडी या दोन्ही ऋतूंत जीवाला बेजार करणारी हवा, यामुळें तेथील जीवन काटक अडचणींशीं लढा घेणारें असें होतें. पाण्याची कमतरता असली तरी पुरुष पाणीदार होते. घोडे तेजस्वी होते. त्यांच्या तलवारीचें पाणी त्यांच्या शत्रूंना जाणवत होतें. आणि अशा त्या वेळच्या समाजाचा आदर्श राजस्थानी शाहिरानें खालील शब्दांत वर्णन केला आहे—

> तेहि जम्मउ निग्गहु गयऊ, भउ सिर खग्गु न भग्गु ।
> तिक्खा तुरियाँ न माणियां, गोरी गले न लग्गु ॥

'ज्याची तलवार शत्रूच्या डोक्यावर तुटली नाहीं, ज्यानें तेजस्वी घोड्यावर स्वारी केली नाहीं व ज्यानें सुकुमार गोरीला आलिंगन दिलें नाही, त्या माणसाचें जीवन व्यर्थ आहे.' 'वृथा गतं तस्य नरस्य जीवितम् ।' लोक पराक्रमी, पण भोळे व सरळ, तथापि मदोन्मत्त हत्तीला विदीर्ण करणाऱ्या सिंहाच्या छाव्याप्रमाणें.

> दिन दिन भोलो दीसतौ, सदा गरीबो सूत ।
> काकी कुंजर काटताँ, जाणवियो जेठूत ॥

'गरीब आणि भोळा हा वाटला होता, पण जेव्हां त्यानें हस्तीला परास्त केलें, तेव्हां त्याचें स्वरूप दिसून आलें.' त्यांचें जीवन कसें होतें याचें वर्णन तत्कालीन कवीनें खालीलप्रमाणें केलें आहे–

घोडा घर ढालां पटल, भालां भत्रणाय ।
जे ठाकुर भोगै जमीं, और किसौं अपणाय ॥

'घोडा हेंच घर, ढाल हें छप्पर व भाले हे खांब. हे राजस्थानी वीर बाणासारखे सरळ, पण बाणाप्रमाणेंच लक्षवेधक असे होते.' राजस्थानांतील वातावरण कोमल व मधुर असें नाहीं. कठोर, दृढ, रुक्ष. ठिकठिकाणीं दिसून येणारें वन खडे, दगड, अरण्यें यांनीं पूर्ण असलेलें. पण वर्षाकाळांत राजस्थानचें स्वरूप नववधूप्रमाणें वाटतें. कारण या चार महिन्यांत सर्वत्र भूमि हिरवीगार दिसून येते. जणूं कांहीं कोणाच्या स्वागतार्थ बैठक सजविली आहे. दिवसा सूर्याचा प्रकाश एवढा तापदायक कीं लोकांना सहन करणें कठीण. त्यांतच वारा सुरू झाला म्हणजे वाळूचे कण जाणाऱ्या येणाऱ्याला इतके कष्ट देतात, कीं त्याला चालणें कठीण होतें. आणि सूर्यास्त होतांच व चंद्र वर येतांच हेच सारे वाळूचे कण व सारी सृष्टि चंद्रप्रकाशापेक्षांहि अधिक शीतल होत जाते. आणि अशा या वातावरणांत मोठा फेटा बांधलेला राजस्थानी शेतकरी, लू चालू असो अगर थंड हवा चालू असो, स्थितप्रज्ञाप्रमाणें आपलें काम एखाद्या कर्मयोग्याप्रमाणें करत असतो. प्राकृतिक अडचणींनीं अगर दुःखांनीं राजस्थानी मन संकुचित होत नाहीं. पण राजस्थानी जीवनांत भावनांची अतिशयता आहे. चांगल्या व वाईट दोन्ही दृष्टींनीं औदार्य सीमेंत बांधलेलें तेथें आढळणार नाहीं. तसेंच एकदा मन बिघडलें म्हणजे पाय सुद्धां देणार नाहींत. मधला मार्ग हा राजस्थानी नाहीं. शेवट गांठतील, नाहीं तर हलणारच नाहींत. त्यांच्या जीवनाच्या सतारीच्या तारा एकदम घट्ट तरी असतील, नाहींतर तुटलेल्या तरी असतील !

## निसर्ग प्रकृतीचा परिणाम

आणि हा सर्व परिणाम तेथील प्रकृतीनें निर्माण केला आहे. क्षणभर राजस्थानांतील भूमीवर उभें राहिलें असतां दृष्टि टाकावी, जिकडे तिकडे वाळूच वाळू ! वर्षाकाळांत पिकांनीं भूमि सजली आहे असें स्वरूप दिसतें. उष्णता ही-राजस्थानी जीवनांतील प्रधानशक्ति आहे. आणि त्यामुळें, साहस, सहिष्णुता व शक्ति तेथें दिसून येतात. क्षात्रतेज, अभिमान, अस्मिता व मृत्यूला हंसत तोंड देण्याची वृत्ति ही तेथील लोकांची प्रकृति आहे. केसरी वस्त्र नेसून जोहार करतील, तसेंच जोगिणी बनून मठांत राहतील. आणि ह्या वृत्तीमुळें राजस्थानी स्त्रीपुरुषांच्या जीवनाला जें वळण लागलें आहे, तें अन्य भारतांतील भागापेक्षां विशेष आहे, असें म्हटलें पाहिजे. प्रसंग आल्याबरोबर, स्नेह करणाऱ्या बहिणींना,

माया करणाऱ्या मातांना व सेजेच्या प्रेयसीला सोडून रजपूत वीरांनीं मरणाला उदात्त स्वरूप दिलेलें दिसून येतें. तसेंच व्यापार व उद्योगक्षेत्रांतहि दूर दूर जाऊन संपत्ति मिळविण्याची त्यांची वृत्ति याच्या मुळाशीं राजस्थानी प्रकृति हेंच कारण आहे. राजस्थानांतील अगर मारवाडांतील व्यापारी देशभर पसरले आहेत. आणि त्यांच्या स्वभावांतहि राजस्थानी वृत्ति दिसून येते. दान करतील तेव्हां मर्यादा मानणार नाहींत व जेव्हां बिघडतील तेव्हां मुद्दल सोडतील, पण व्याजाची पै सोडणार नाहींत ! अतिवादी असें राजस्थानी जीवन आहे. कवि म्हणतो–

माई एडा पूतजण, कै दाता कै सूर ।
नाहर रहिजै बांझडी, मती गमाजै नूर ।
माई एडा पूत जण, जेडा राण प्रताप ।
अकबर सूतो ओझके, जाण सिराणै साँप ॥

" हे माते, अशा पुत्राला जन्म दे, कीं जो शूर; दाता असेल; तसें नसेल तर वांझ राहा व आपलें सौंदर्य गमावूं नको.

" हे माते, अशा पुत्रास जन्म दे, कीं जो राणा प्रतापसारखा असेल कीं ज्यानें अकबरापुढें मान टेकली नाहीं. "

राजस्थान भूमि ही शूरांची व वीरांची भूमि आहे. तसेंच रससिद्ध कवीश्वरांची पण ती भूमि आहे. उदात्त भावना, उन्नत स्फूर्ति, अथांग अनुभव, यांनीं परिपूर्ण वाटणारी राजस्थानची साहित्य-सरिता आहे. राजस्थानी साहित्य जीवनाशीं इतकें समरस आहे, कीं या मानानें त्याची बरोबरी करणारें साहित्य फार थोड्या ठिकाणीं आढळून येईल. एका प्रसिद्ध साहित्यिकाच्या शब्दांत राजस्थानी साहित्य असें आहे– " सत्य शक्तिशाली पण निर्मळ जीवनाची अभिव्यक्ति यांत असून त्यांतील महिमा व प्रगल्भता हीं विशेष महनीय आहेत. "

## एकेक कण इतिहास–गाथा !

राजस्थानचें नांव घेतांच चितोड हळदीघाट, अरवली पर्वत इत्यादि गोष्टी डोळ्यांपुढें येतात व राजस्थान म्हणजे जेथील जमिनीच्या धुळींतील एकेक कण इतिहासाची गाथा आहे, असें आढळून येतें. असा इतिहास कीं ज्यांत पराक्रमाचें स्फुलिंग व मृत्यूला उत्सवप्रसंग मानणारी मनोभूमिका या प्रामुख्यानें दिसून येतात. कवीच्या शब्दांत सांगावयाचें तर ज्या ठिकाणीं जीवनाची बासरी आणि मृत्यूचा शंखनाद एकाच ठिकाणीं आढळून येतात, असें हें जीवन क्षणभर

असें म्हटलें तरी चालेल, कीं राजस्थानी कवींनीं व साहित्यिकांनीं लेखण्या टाकून तलवारी घेतल्या नसून तलवारींनींच आपलें काव्य व साहित्य लिहिलें आहे आणि रक्ताच्या शाईनें जीवनाचा ग्रंथ सजविला आहे. आणि हें इतकें त्यांना स्वाभाविक होतें, कीं जणूं कांहीं आपण जें अनुभवीत आहोंत तेंच लिहीत आहोंत.

इला न देणी आपणी, हालरियाँ हलराम ।
पूत सिखावै पारणै, मरण बडहि माँय ।

'आपली जमीन द्यावयाची नाहीं आणि आपल्या जमिनीवर कोणा शत्रूला पाऊल ठेवूं द्यावयाचें नाहीं, त्या कामीं मरण्यांत मोठेंपण आहे, हें शिशुगीत अद्यापिहि राजस्थानी माता मुलांना झोपवितांना म्हणत असतात.

पुत्ता जायउ कवण गुण, अवगुण कवण धावेण ।
जा बप्प की भूंहडी, चप्पीजई अवरेण ।।

मुलगा होऊन काय फायदा झाला व मुलगी झाल्यानें काय नुकसान झालें जर बापजाद्याची भूमि शत्रूनें जिंकली तर ?

राजस्थानी समाजांतील एका श्रेष्ठ धर्माची अभिव्यक्ति कवीनें खालील शब्दांत केली—

धर जाणां ध्रम पलटतां मिया पडतां ताव ।
ए तीन्यू दिन मरण रा, कूण रंक कुण राव ।।

' जेव्हां देश आक्रमित होत आहे, धर्म विपत्तींत आहे, नारीचें सतीत्व संकटांत आहे, हे तीन प्रसंग असे आहेत कीं मृत्यु आल्यास तो खरा मोक्ष आहे. मग ती व्यक्ति राजा असो, रंक असो ! ' राजस्थानी लोक ' मरणानू मंगल गिणै समर चढै मुख नूर । ' मृत्यूला मंगल उत्सव मानतात व त्यामुळें त्यांच्या मुखमंडलावर एक प्रभात चमकत असते व जेव्हां वीर पुरुष युद्धावर जातात, त्या वेळीं वीरमाता आपले स्तन धन्य झाले, आपली कीर्ति वाढली, आपल्या बांगड्या प्रतिष्ठा पावल्या व आपलें सौभाग्य खरेंखुरें शोभलें, असें मानतात व राजस्थानच्या नारी आपल्या मनांतील भाव त्याप्रमाणें प्रदर्शित करतात—

पाछा फिर मत झांकज्यो, पग मत दीज्यो टार ।
कटभल जाज्यो खेत में, पर मत आज्यो हार ।।
भाग्य मत तूं कंथडा, तो भोग्यै मुझ खोड ।
मोरी संग सहेलियाँ, ताली दे मुख मोड ।।

परत फिरूं नकोस, पाय वळवूं नकोस, कापला गेलास तरी पराभूत होऊन परत येऊं नकोस, पळून येऊं नकोस, नाहीं तर मला माझ्या मैत्रिणी तोंड काढूं देणार नाहींत. पळून आलेल्या पतीला पाहून राजस्थानी वीर युवती कासारणीला म्हणते –

मणिहारी जारी सखी, अब न हवेली आव ।
पति मुआ घर आविया, विधवा किस्या बणाव ।।

' हे सखी, तूं परत जा, माझ्या घरीं येऊं नको. माझा पति युद्धांतून पळून आला आहे, म्हणून तो मेला आहे. मी आतां विधवा झालें आहें. मग मी कुठला शृंगार करूं ? '

युद्धाचा प्रसंग आहे. सर्वत्र वीर घायाळ पडले आहेत. सासू आपल्या सुनेच्या डोक्यावर पाण्याचा घडा घेऊन रणभूमीवर आली आहे. तिचा मुलगा घायाळ होऊन पडला आहे व तो आपल्या पत्नीला पाणी पाजण्याबद्दल इशारा करीत आहे. परंतु त्याची आई जे अधिक जखमी होते, त्यांच्याजवळ सुनेला घेऊन जाऊन त्यांना पाणी पाजल्यानंतर मुलाजवळ येते, तों पाणी संपलेलें असतें. मुलाचे प्राण गेलेले असतात. त्या प्रसंगीं सूत म्हणते–

किण विध पाऊँ आणियौ, बोलतां जल लाव ।
बाँटे सास बलोबली, भालो हंदा घाव ।।

' आपण म्हणत आहांत कीं पाणी पाज, मी कसें पाणी पाजूं ? सासूबाई तर जखमांचा विचार करून पाणी पाजत आहे. ' एक अन्य स्त्री आपल्या पतीला भाल्याच्या जखमा झालेल्या पाहून आश्चर्य प्रदर्शित करते–

कठण पयोधर लग्गतां, कसमसतो जो कंत ।
सै लघमोडा किमि सह्या, किमि सहिया गजदंत ।।

ज्याला कठीण स्तनाचा स्पर्श होतांच जो घायाळ होई त्यानें ह्या भाल्याच्या व हत्तीच्या दांतांच्या जखमा कशा सहन केल्या ?

## भक्तिरस

वीररस ज्याप्रमाणें राजस्थानी काव्यांत उज्ज्वल स्वरूपांत दिसून येतो, त्याप्रमाणें शृंगार, करुण व भक्तिरसहि तशाच स्वरूपांत दिसून येतो. भक्तिरसाच्या बाबतींत मीरेचीं पदें इतकीं श्रेष्ठ दर्जाचीं आहेत, कीं आजहि ४०० वर्षांनीं कोट्यवधि लोकांच्या मनाला ती आनंद व समाधान देत आहेत. मीराबाई

ही तिच्या पदांतून इतकी करुण वृत्तीची वाटते, तितकीच ती हट्टी व क्षात्र तेजानें परिपूर्ण होती.

राणाजी रुठे तो म्हारो काई करसी ।

राणाजी ( पति ) रुसला तर माझें काय करणार आहे ?

संतन ढिग बैठ बैठ लोक लाज खोई ।
अब तो बात फैल गई होत हो सो होसी ॥

' आतां तर संतमंडळींत बसून लाज नाहींशी झाली आहे. सर्वांना आतां कळलें आहे. जें व्हायचें असेल तें होवो. अशी वृत्ति मीरेची होती.

प्रेमाच्या संदर्भात राजस्थानी काव्यहि तितकेंच अथांग भावनेनें भरलेलें आढळून येतें. प्रेम असो सौंदर्य असो, पीडाविषयक प्रसंग असो, राजस्थानी काव्यांत त्यासंबंधीं होणारी अभिव्यक्ति श्रेष्ठ मर्यादा गांठते. तिचा विस्तार कमी; तिचें क्षेत्र कमी. कला व शब्द कमी असतील, पण त्यांत भावनेचा समुद्र उचंबळून आलेला दिसतो. एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें कवींनीं शब्दाचा प्रवाह उभा नाहीं केला, तर लेखणींच्या मुखांतून अश्रूंची धार उपस्थित केली. त्या काव्यांत भोळेंपण आहे, चतुराईपण आहे. नायक प्रश्न करतो–

कद थे नाग चिसासिया, नैण लिया मृग–झल्ल ।
मान सरोवर कद गया, हंसा सीखण हल्ल ? ॥

' हे सुंदरी, नागावर केव्हांपासून तूं विश्वास ठेवूं लागलीस ? कारण तो आतां तुझ्या वेणीच्या स्वरूपांत डोक्याशीं क्रीडा करीत आहे. हरिणाचे नयन तूं केव्हां काढून घेतलेस व हंसाचीं गाणीं शिकविण्यासाठीं केव्हां मानससरोवराला गेली होतीस ? '

साजन साजन हूँ करुं, साजन जीव जडी ।
साजन लिखाळूँ चूडले, वाँचूँ घडी–घडी ॥

यांत किती सरळ शब्दांत प्रेमभावनेची अथांगता वर्णन केली आहे ! आणि जेव्हां विरह येतो, त्या वेळीं त्यांतील उदात्तताहि अवर्णनीय असते.

सजन सकाराँ जावसी, नणा मरसी रोय ।
विधना ऐसी रैण कर, भोर कदे ना होय ॥
सजन सिधासी हे सखी, प्रात उगंते भाण ।
वधज्ये म्हारी रातडी, कदे न होय विहाण ॥

आज सखी हमयूं सुण्यो, मो काटत पिय गोण ॥
पो अर हिवडे होड है, पहली फाटे कोण ॥

या लोकगीतांत जीवनाचा गहरा रंग चढला आहे. परमेश्वरा, अशी रात्र असूं दे, कीं सकाळ कधीं होऊंच नये व तसें झालें म्हणजे विरहाचा प्रसंग येणार नाहीं. हीं लोकगीतें राजस्थानी जीवनाची अमर कहाणी आहे. राजस्थानी स्त्रियांना नित्य संघर्ष चालू असल्यानें सतत विरहाचे प्रसंग येत. पति रणभूमीवर व स्त्रीला एकाकिनी जीवन कंठावें लागे.

डूंगर ऊपर मारुजी घर करुंगी । काई बादल कर स्यूं ओ किवाड ॥
बिजली रै पलकै देखूं । भँवर थांने आवंता जी ॥

'हे प्रिया, डोंगरावर माझें घर मी बांधतें. मेघाचें दार बनवतें व विजेच्या प्रकाशांत दूर दूर येतांना मी तुला पाहीन.' स्त्रीजीवनाचा राजस्थानांत स्थायी रस म्हणजे करुण रस. जन्मभर घाव सोसत जावे लागत असल्यानें म्हातारपणींसुद्धां तोच करुण भाव डोळ्यांपुढें येत असतो.

यहि अँगना यहि देहरी यहि ससुरसे गांव ।
दुलहिन दुलहिन टेरतां बुढियां पडग्यो नांव ॥

तेंच अंगण आहे, तीच देवडी आहे, तोच सासरचा गांव आहे, कीं ज्यांत मी नववधू आलें होतें व सर्वजण मला नवा वधू–नववधू म्हणून माझें कौतुक करत होते व आज सर्व मला म्हातारी म्हणून पुकारत आहेत. पुढें ती म्हणते, 'पुन्हां श्रावण येईल, पुन्हां वर्षा–ऋतु येईल, पण ज्यांच्या बरोबर मी खेळलें ते आतां नाहींत. सखी व संगी नाहींसे झाले आहेत.'

वीर रस असो, शृंगार रस असो, करुण रस असो, राजस्थानी साहित्यांत प्रत्येक रस उत्कर्षाला गेलेला दिसतो. आणि त्याचें कारण तेथील भूमि, तेथील प्राकृतिक गोष्टी व इतिहास हें आहे.

× × ×

: सत्तरींतील काका :

: १९ :

# देवाचिया द्वारीं

नाना फडणिसांनीं आपल्या आत्मचरित्रांत पुण्यांतील टवाळखोर वृत्ती-बद्दल आपलें मत नमूद करून ठेवलें आहे. त्यांच्या मताप्रमाणें पुण्यांतल्या बातम्या सुतराम् निराधार असतात. पुण्यांतील भांग्या मारुती हा त्या काळचा एक लहरींवर लहरी उचंबळून देणारा आकाशवाणीवजा कार्यक्रमाचा अड्डा होता अगर केंद्र होतें. तुळशीबागेंत, बेलबागेंत, रामेश्वरीं भिक्षुकवृंद जमला असतांना किंवा सुगंध्याच्या दुकानीं बुधवार पेठेंत गप्पाष्टकें चालू असतांना, बातम्यांचें पीक एवढें दिसून येई, कीं जगानें आश्चर्यचकित व्हावें ! आजहि नगरवाचनालयाच्या गॅलरींतील ‘ गप्पाष्टकमंडळ ’ हेंच कार्य करीत आहे.

तसें पाहिलें तर समाजाच्या जीवनांत करमणुकीसाठीं, विश्रांतीसाठीं माणसें एकत्र येतात. सुखदुःखाच्या गोष्टी बोलतात. ४० वर्षांपूर्वी वर्तमानपत्रें हळूहळू लोकमताला आकार देऊं लागलीं; पण १०० वर्षांपूर्वी ही परिस्थिति नव्हती. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं तर जे युद्धांत घडले नसतील तसले पराक्रम व पराभव ‘ देवाचिये द्वारीं ’ ऐकूं येत ! मोठ्यानें नव्हे, अगदीं कानाशीं लागून. ‘ आमचा हा कलेक्टर कचेरींत आहे त्यानें सांगितलें ’ असें अण्णा म्हणत. मग तात्या ‘ उससे भी जादा ’ अशी लोणकढी ठेवून देत आणि तेहि आपला

एक जिगर दोस्त मुंबई ऑफिसांत आहे त्याच्या साहेबानें त्याला सांगितलें असें ठणकावून सांगत !

## बातम्या पण न घडलेल्या

ज्याला सामाजिक शिस्त म्हणतात व जिची आवश्यकता राष्ट्रीय कालांत आवश्यक असते, तसें कांहीं या देशांत आतांपर्यंत अनुभवाला आलें नाहीं. इंग्रजी राज्य तर परक्याचें; तेव्हां त्याच्याविरुद्ध बातमी पसरविणें म्हणजे देशभक्ति असें मानलें जाई. पहिल्या महायुद्धाच्या काळांत प्रस्तुत लेखक कॉलेज-जीवनांत होता तरीसुद्धां आळींतील मारुती व महादेव (ओंकारेश्वर) यांच्या दर्शनास जात असे आणि तेथें अगदीं गुप्त गुप्त बातम्या, तेथें जमलेल्या लोकांत चर्चिलेल्या त्यानें ऐकिल्या होत्या. आज हें सर्व आठवण्याचें कारण तसेंच झालें आहे. रेडिओवरतीं सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं, रात्रीं लोक बातम्या ऐकत असतात. वर्तमानपत्रं तर नकोशीं व्हावीं इतकीं निघालीं आहेत आणि नको इतकीं तीं लिहीत असतात. साक्षर लोकांची संख्या आतां देशांत एकंदर २२ टक्के झाली असली तरी शहरांतून ती ७० टक्क्यांपर्यंत गेली आहे. तथापि साक्षरता म्हणजे ज्ञान नव्हे व वाचणें म्हणजे विवेक नव्हे; हा अनुभव अजूनहि अंगीं मुरलेला नाहीं. आजहि गप्पा-मंडळांतून, सुगंध्यांच्या दुकानांतून, मंडईतून, मंदिरांतून, भांग्या–मारुती–रेडिओंतून न घडलेल्या बातम्या प्रक्षेपित करण्याचें कार्य चालूच आहे. सुतावरून स्वर्गाला जाणें या म्हणींत सुताची तरी आवश्यकता असते ! भांग्या–मारुती–रेडिओला त्याचीहि आवश्यकता लागत नाहीं.

## थापेबाज इरेला पेटला

असें सांगतात कीं, नाना फडणिसांच्याकडे सर्व कलावंतांची कदर होत असे, गुणग्रहण होत असे. आणि अशाच एका प्रसंगीं, एक गृहस्थ नाना फडणिसांच्याकडे पुरस्कारार्थ गेला.

नानांनीं विचारलें, 'कोणती कला आपल्याला येते ?'

त्यानें सांगितलें, 'मी उत्कृष्ट थापा मारतों !'

नानांनीं प्रकरण हसण्यावारी नेलें आणि त्याला वाटेला लावलें. त्या महाभागानें मग आपल्या कलेचा प्रताप नानांना दाखविण्याचा निश्चय केला आणि तो भांग्या मारुतीच्या देवळांत आला. त्यानें थोडी शांभवी घेतली आणि रस्त्यावरून जाणाऱ्या सैन्यांतील एका पखालवाल्याला म्हटलें, 'भाई हसन, आतां तयारी

कर. असा स्वस्थ काय बसलास ?' त्यानें विचारलें, 'शास्त्रीबुवा, आतां कशाची तयारी करायची ?' शास्त्रीबुवांनीं सांगितलें कीं, 'श्रीमंतांनीं टिपूवर स्वारी करायचें ठरवलें आहे.' शास्त्रीबुवांचा तो भव्य चेहरा, त्यांचा तो प्रतिष्ठित पोषाख व एकंदर बोलण्याची ऐट पाहून, हसनला खरें वाटलें आणि त्यानें मग हुसेनला तें सांगितलें. हुसेननें दाऊदला सूचित केलें. दाऊदनें आपल्या शिलेदाराला सांगितलें. शिलेदारानें पागेंतल्या लोकांना सांगितलें. त्यांनीं फडांतल्या लोकांना सांगितलें. मग खाजगींतून पत्रें गेलीं आणि दोन महिन्यांच्या आंत दसऱ्याच्या आधींच शिंदे आले, होळकर आले, धारकर आले, देवासकर आले, सेनाखासखेल गायकवाडहि आले. 'दक्षिण दिक्पाल' पटवर्धन आले आणि जो तो एकमेकाला विचारूं लागला कीं 'स्वारीसाठीं कोणता मुहूर्त धरला आहे ?'

## ज्ञानगभस्तीहि आश्चर्यचकित

गारपीर माणसांनीं गजबजला. छावणींतून पोवाडे ऐकूं येऊं लागले. पंचकल्याणी घोडे नाचूं लागले. शिपायांनीं व शिबंद्यांनीं शस्त्रास्त्रें साफ केलीं; तथापि स्वारीला केव्हां निघावयाचें त्या मुहूर्ताचा पत्ता कुणालाच नव्हता. शेवटीं कांहीं सरदार मंडळी नाना फडणिसांच्याकडे गेली व त्यांनीं विचारलें कीं, 'स्वारीचा मुहूर्त केव्हां ठरवला ?' आम्ही सगळे येथें आलों; आज महिना झाला. दाणागोटा संपत आला.' नाना आश्चर्यचकित झाले.' कोणती स्वारी, कुठला मुहूर्त ? मग ते म्हणाले कीं, 'आम्हांला पत्रें आलीं.' नानांच्या ध्यानांत आलें कीं, कांहीं तरी गडबड झालेली दिसते. नाना 'ज्ञानगभस्ती' असल्यामुळें त्यांनीं शोधून पाहण्याचें ठरवलें. खाजगींत चौकशी केली, फडांत-पागेंत चौकशी केली. शिलेदाराला विचारलें; दाऊदला, हुसेनला, हसनला विचारलें आणि मग हसननें शास्त्रीबुवांची हकीकत सांगितली व अशा प्रकारें अफवेची उतरंड शास्त्रीबुवांच्या कुशल मस्तकघटापर्यंत पोचली.

## सूड उगवला

नानांनीं त्या थापेबाज गृहस्थाला बोलावलें व विचारलें कीं, 'हें तुम्ही कां सांगितलेंत ?' त्या महाभागानें उत्तर दिलें, 'मीं पुरस्कार मागितला, तुम्हीं माझी कदर केली नाहीं. माझ्या अभिमानानें डंख धरला आणि मीं माझ्या कलेचा नमुना दाखविण्याचें ठरवलें.' नानांनीं विचारलें, 'कांहीं आधार तरी होता का तुम्हांला?' त्यांनीं 'होय' म्हणून सांगितलें. तो म्हणाला, "शिलंगणाच्या वेळीं श्रीमंतांनीं

अंधारांत असतांना, दक्षिणेकडे पाहून मिशी पिळली आणि मीं कयास केला कीं, दक्षिणेंतील शत्रु म्हणजे टिपू. तेव्हां त्यावरच स्वारी होणार!" नानांनीं त्याला बक्षीस दिलें आणि पुन्हा असा पराक्रम न करण्याबद्दल बजावलें!

## तीच कलात्मक परंपरा

थापेबाजांची ही कलात्मक परंपरा आजहि चालू आहे. आतां भांग्या मारुती हें एकच केंद्र राहिलें नसून कर्तनालयें, उपाहारगृहें, मारुतीचे कट्टे इत्यादि कितीतरी केंद्रें झालीं आहेत. परवां संध्याकाळीं नेहमींप्रमाणें ओंकारेश्वराच्या दर्शनार्थ गेलों होतों. तो दिवस संचारबंदीचा ठरला होता. तथापि प्रकाशबंदीचा काटा अजून बारावर आला नव्हता. ओंकारेश्वराच्या देवडीजवळ मी उभा होतों. एक गृहस्थ मजजवळ आले आणि म्हणाले, 'आतां जरा सरकार जागें झालेलें दिसतें. आम्ही म्हणतच होतों कीं, मुसलमान अधिकाऱ्यावर विश्वास ठेवूं नका. बरें झालें, त्याला अटक करण्यांत आली!' मी कांहींच बोललों नाहीं. त्या गृहस्थानें मग अटकेची तपशीलवार हकीकत सांगितली. तरीहि मी कांहींच बोलत नव्हतों. तो अशा ढंगांत सांगत होता कीं, जणू त्यानें प्रत्यक्ष पाहिलें.

मीं त्याला हळूच विचारलें, 'केव्हां अटक झाली?' त्यानें सांगितलें 'आज पहाटे!' आणि आमचे रामभाऊ तर सांगत होते कीं, 'चार वाजेपर्यंत तो कचेरींत आला नाहीं. आतां त्याला म्हणावं तुझे इस्लामी चाळे खुशाल येरवड्यांत कर!' मी त्या गृहस्थाला म्हणालों, 'तुम्ही चौकशी केलीत का? खोट्या अफवा पसरवणें हा गुन्हा आहे.' त्यानें उत्तर दिलें, 'मी पैज मारायला तयार आहें!' मग मात्र मी गंभीर होऊन त्याला सांगितलें कीं, 'येथें येण्यापूर्वी १५ मिनिटेंच त्यांचें व माझें टेलिफोनवर बोलणें झालें आहे. त्यांना अटक झालेली नाहीं. तुम्हांला जर अटक करून घ्यावयाची नसेल तर यापुढें कोणाजवळ बोलूं नका!'

## आयूबखाँ स्थानबद्ध?

मी निघणार एवढ्यांत पांढरी टोपी घातलेला एक तरुण देवळांत जाण्यासाठीं म्हणून देवडीजवळ आला. मला त्यानें पाहिलें. तो म्हणाला, 'अहो, माझें भविष्य खरें झालें.' मीं त्याला विचारलें, 'कसलें?' आयूबला हाऊस ॲरेस्ट (गृहबंध) करण्यांत आलें. आतां परिस्थिति ताबडतोब बदलेल. मीं त्याला विचारलें, 'कोठें वाचलेंस? कोठें ऐकलेंस?' त्यानें एका चिंधीवजा

वर्तमानपत्राचें नांव सांगितलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, तो म्हणाला, " आयूब एकान्तवासासाठीं एका खेडेगांवांत गेला आहे आणि पुढें लिहिलें होतें कीं त्याला गृहबंद करण्यांत आलें आहे !" मी म्हणालों, "गड्या, हें खरें नाहीं. असें होईल पण इतक्या लवकर नाहीं. राजकीय कुंडलींत त्याचें पतन आहे; पण तो क्षण आलेला नाहीं. अफवेवर विश्वास ठेवून जनतेचें मन विचकवूं नकोस. भलताच उल्हसित होऊं नकोस. आयूब पठाण आहे. पठाणाच्या मौतीनें तो मरेल. आयूब पहिल्या झटक्यांत पराभवानें कदाचित् अप्रतिष्ठित होईल, पण अपदस्थ होणार नाहीं. हुकूमशाहींत हुकूमशहाची शक्ति लोकमतांत नसते, ती देशांतील एका शक्तिशाली गटांत असते ! आयूबचा गट म्हणजे वायव्य प्रांतांतील पठाण हे होत. गेल्या निवडणुकींत त्यांनींच मताची मोर्चेल त्यावर धरली. म्हणूनच त्याचा ताबूत उभा राहिला. "

मी असें त्याला सांगत आहे तोंच एक मध्यमवयीन गृहस्थ देवळांतून देवडीजवळ आले आणि मोठ्या आनंदानें सांगूं लागले कीं, ' अहो, लाहोर पडलें. ' त्यानें सुपारीएवढा पेढाहि माझ्यापुढें केला. परिस्थितीप्रमाणें पेढ्याचा आकारहि संकुचित होता. मी म्हणालों, ' रावजी ! तुम्हांला कोणीं सांगितलें लाहोर पडलें म्हणून ? '

रावजी म्हणाले, ' अहो, हें काय पुसतां ? वर्तमानपत्रांतच आलें आहे. '

मी म्हणालों, " कांहीं वर्तमानपत्रांतल्या बातम्या काकडीला मीठ लावून खातात त्याप्रमाणें समजल्या पाहिजेत. कुठल्याहि झाडाचें फळ पहिल्या झटक्यास पडत नाहीं आणि लाहोर तर पाकिस्तानच्या मयूराचा तुरा आहे. तें पडलें म्हणजे पाक पडलें असाच अर्थ होईल. बघा हें सरहद्दीवरचें ठिकाण आहे आपल्या हद्दींत. तेथून लाहोर १४ मैल आहे आणि हा १४ मैल पल्ला गांठायला कांहीं आठवडे लागतील. लाहोर इतक्या लवकर पडणार नाहीं. कदाचित् पडण्यापूर्वी आणखीहि कांहीं घटना घडतील. "

माझी ही वाणी ऐकून माझ्या श्रोत्याला म्हणजे रावजींना प्रथम संताप आला. नंतर ते खिन्न झाले. नंतर उदासीन झाले आणि त्यांतून मग विवेकाचें गांभीर्य त्यांच्या चेहऱ्यावर दिसूं लागलें.

' देवाच्या दारीं ' क्षणभर उभे राहून चारी मुक्ति साधावयाच्या त्याऐवजीं तेथें शहाणपणाला, विवेकाला, चातुर्याला व चाणाक्षपणाला मुक्ति मिळत आहे हें पाहून मला अधिकच वाईट वाटलें !

× × ×

: सतरींतील काका :

: २० :

# स जयति सिंदुरवदनो देवो

तसें म्हटलें तर ओंकारेश्वराच्या परिसरांत मृत्यूची बातमी म्हणजे आश्चर्य उत्पन्न करणारी नव्हे ! बाजारपेठेंत भावाची चढउतार या गोष्टी जशा नित्याच्या, राजकारणांत डावपेच व गटबाजी या गोष्टी जशा नित्याच्या, त्याचप्रमाणें ओंकारेश्वराच्या परिसरांत मृत्यूची वार्ता ही नित्याचीच ! सूर्य रोज उगवतो, रोज मावळतो, पण कित्येक प्रसंगीं मनुष्याला तो प्रकाश देत नाहीं असें वाटतें. चंद्राचा शीतल प्रकाशहि कित्येक व्यक्तींना दाह उत्पन्न करतो ! खरें सांगावयाचें म्हणजे सृष्टींतील परिवर्तन हें पद्धतशीर रीतीनें होत असतें. तथापि त्यांचा परिणाम ' पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ' या न्यायानें होत असतो.

अलीकडे संध्याकाळच्या ऐवजीं ओंकारेश्वराला मी सकाळीं जात असतों. त्या दिवशींहि नेहमींप्रमाणें भल्या पहाटेच गेलों होतों. देव व पुढारी पारोसा पाहूं नये असें म्हणतात. पुढाऱ्यांच्या बाबतींत तें खरें असेलहि. त्याचें खरें स्वरूप वर्तमानपत्री स्वरूपापेक्षां निराळें असतें. मुळांतील सडकें, सजवलें जातें. गुणाच्या मुंडावळ्या भाडोत्री वर्तमानपत्रांच्या स्तुतिसुमनांनीं बांधल्या जातात. कांहीं देवांच्या बाबतींतहि तसें असतें. देव स्वयंभू असतात किंवा परंपरेनें त्यांचा लौकिक कीर्तिस्तंभासारखा वाढत असतो. उत्तर हिंदुस्थानांतील देव तर मानवा-

प्रमाणें वामकुक्षी घेतात आणि त्यांचीं शय्यागारें पण असतात. बिचारा ओंकारेश्वर तसा नाहीं. २४ तास त्याचें दर्शन होऊं शकतें. चंदन-विरहित जितका तो शिवस्वरूप असतो तितकाच कुणी महापूजा बांधली असतांनाहि दिसतो.

त्या दिवशीं मला नगर जिल्ह्यांतील कर्जत कॉलेजच्या समारंभाला जावयाचें होतें. लवकर निघावयाचें होतें. म्हणून मी नित्यापेक्षां अर्धा तास आधीं आलों होतों. दर्शन घेऊन बाहेर रस्त्यावर आलों तों एक परिचित गृहस्थ भेटले. त्या लगोलग स्मशानांतील मिरासदार वृत्तीकार पण भेटले. या दोघांचें एकत्र येणें याचा अर्थ कोणाचा तरी मृत्यु झाला आहे हाच होता. आणि त्या परिचित गृहस्थानें एका वृद्ध स्त्रीची मृत्युवार्ता सांगितली. वास्तविक ती खेदाची गोष्ट नव्हती. ती मुक्त झाली होती. पण प्रवासाचे विचार मनांत चालू असतांना ती वार्ता कळली आणि भाराभर पुस्तकें वाचूनसुद्धां ज्याच्या मनांतील शकुन-विषयक अंध कल्पना पूर्णपणें गेल्या नाहींत, अशा मला किंचित् धक्का बसला. आणि मी साहजिकच मनामध्यें मंगलमूर्ति 'गणेशाची' प्रार्थना केली. 'विघ्नारंभे विवाहे च, संकटे संग्रामे च निर्विघ्नं कुरु' असें कांहीं पुटपुटलों व घरीं परतलों. १५ मिनिटांत आम्ही निघालों. मी, माझी नंबर दोनची मुलगी व सौभाग्यवती, गाडीचा ड्रायव्हर व युनिव्हर्सिटीचा एक कर्मचारी, असें पंचक मार्गस्थ झालें.

केलेल्या बेताप्रमाणें आम्ही दौंड–लिंपणगांवमार्गें राशिनच्या देवीला वंदन करून बारापर्यंत कर्जतला पोचणार होतों. आमचा प्रवास सुंदर चालला होता. नुकताच पाऊस पडून गेला होता. त्यामुळें रस्त्यांतील चिखल गाडीला त्रास देत असला तरी इतस्ततः असलेलीं हिरवींगार शेतें नयनाला व त्यामुळेंच मनाला आनंदित करीत होतीं. रेल्वे ओलांडून गेल्यानंतर लिंपणगांव येईल त्याला उजवी घालून पेडगांवमार्गें राशिनच्या रस्त्याला मिळावयाचें असा सगळा कार्यक्रम ठरलेला होता. ड्रायव्हरला रस्ता माहीत नव्हता, पण माझें मार्गदर्शन उपलब्ध होतें. मार्ग व दर्शन दोन्ही होतीं पण मार्गाचें दर्शन मात्र झालें नाहीं! गप्पा मारण्याच्या भरांत लिंपणगांव केव्हां निघून गेलें याचा पत्ता लागला नाहीं. गाडी तशीच पुढें जात होती. चार पांच फाटे ओलांडून, मधला घाट ओलांडून नगरच्या जवळ १२ मैलांवर आलों तेव्हां ध्यानांत आलें कीं आपण रस्ता चुकलों आहोंत.

गाडी थांबविली व रस्त्यावरील वाटसरूंना श्रीगोंद्याचा रस्ता विचारला. तिघांनीं तीन उत्तरें दिलीं. 'पुढें वाटा फुटतात म्हणून शहाणा मनुष्य आगाऊ

कोणत्या फाट्यानें जावयाचें हें ठरवितो ' असें ज्ञानेश्वरींत लिहिलें आहे, त्याची आठवण झाली. पण तीन तपें वाचन करून तिच्यांतील बोधापासून माझें मन अलिप्त राहिलें याची दुःखद जाणीव झाली. तेवढ्यांत एक आधुनिक तरुण, खादीटोपीधारी भेटला. त्यानें परिस्थितीची योग्य जाणीव करून दिली. ढाला फिरविल्या म्हणजे गाडी फिरविली. १५ मैल परत आलों व पुन्हा एका फाट्यानें दक्षिणेकडे वळलों. दुधानें तोंड भाजलें म्हणजे ताकहि फुंकून पितात. तसें वाटेंत ' जें जें भेटलें त्याला भगवंत ' मानून कर्जतरूपी मोक्षाचा मार्ग विचारत गेलों.

टळटळीत १२ वाजतां श्रीगोंद्याला आलों. तेथें सारथ्यानें सांगितलें कीं, पेट्रोल दोन गॅलनसुद्धां नाहीं. मग चौकशी केली तों कळलें कीं, तेथें पेट्रोल पंप नाहीं. असलेल्या पेट्रोलवर कर्जतला पोचणार नाहीं. शिवाय कर्जतलाहि पेट्रोल पंप नाहीं, हेंहि धक्का देणारें वृत्त कळलें.

मग एका चलाख व्यक्तीला विचारलें कीं, खाजगी कुठें मिळेल का ? त्यानें सांगितलें कीं, ' मिशनचा साहेब कदाचित् देईल. ' मग मिशनच्या बंगल्यांत गेलों. त्याला ऐटींत नामपत्रिका दिली. अमेरिकन मिशन होतें तें. त्यानें नीट न्याहाळलें. म्हणाला कीं, ' चार गॅलन वीस लिटर देतों. थांबा, चहा घ्या. ' मी म्हणालों कीं 'मला १२॥ला पोहोंचलें पाहिजे. चहाबद्दल कृतज्ञ आहे.' पैसे दिले व पेट्रोल भरून संकट टळलें या आनंदांत कर्जतकडे गाडी हाकण्यास सांगितली. दुपारीं दीडला तेथें पोहोंचलों.

कॉलेज व प्रशाळा यांचें संयुक्त स्नेहसंमेलन होतें. वार मंगळवार होता. मुलगी म्हणाली, आज राशिनच्या अंबेचें दर्शन झालें पाहिजे. सनातनी मन तसेंच सुचवूं लागलें. सौभाग्यवतीनें तसेंच मतदान केलें. सारथ्यानें सांगितलें कीं, पेट्रोल २॥ गॅलन आहे. तेथील मंडळींनीं सांगितलें कीं, करमाळ्याहून आणून देऊं. मुक्काम करणें मीं मान्य केलें नाहीं. तेथून सिद्धटेक २१ मैल होतें तें गांठूं. तेथें पेट्रोल मिळेल. ' मनीं आणलें तें मोरया देत आहे ' हा श्लोक मनानें म्हटला. माझी श्रद्धा भक्कम. दि. १३ ऑक्टोबर, चतुर्थी संकष्टी तेव्हां त्या दिवशीं मी सिद्धटेकला देवाचें दर्शन घेणार हें मनानें पक्कें ठरविलें. पण मनानें पाण्याचें पेट्रोल होणार नव्हतें ! श्रद्धेनें पर्वत हालवितां येतात असें बायबलमध्यें वाचलें होतें.

बरोबर दोन तास कार्यक्रम चालला. मुलांनीं १००१ रुपये सर्व सोहळे

टाळून संरक्षणफंडास माझ्या हस्तें दिले. भाषणांत युद्धाचे हेतु वगैरे 'शनवारवाडा प्लेट' लावून सायंकाळीं ६ ला राशिनमार्गें निघालों. ९ मैलांना अर्धा तास लागला. रस्ता म्हणणें प्राप्त होतें; कारण त्यावर कांहीं उगवलें नव्हतें. देवीचें दर्शन घेतलें. दोन मूर्ति आहेत; एक तुळजापूरची व एक राशिनची. मंदिर भव्य आहे. दोनशें वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. दोन दीपमाळा आहेत. एक हालते असा लौकिक आहे. १९३४ सालीं मी ती हालतांना पाहिली होती. एक अजब शिल्पाचा नमुना आहे. मूळ पाया भक्कम ठेवून झुलतें राजकारण इंग्रज कसें करतो याचें तें क्षणभर मला प्रात्यक्षिकच वाटलें! सौ. नें व मुलीनें स्त्रीसुलभ नवस केले. माझ्या मनांत हिच्या पुढें कोणता बकरा बळी द्यावा याचा विचार! आता पाकिस्तान का समाजद्रोही व्यापारी! पण निर्णय होण्यापूर्वीच गाडींत आलों. कार्यकर्ते भेटले. थोडी चर्चा करून निघालों. अर्धा तास होतांच सिद्धटेक भेटेल या आनंदांत होतों; पण एकदां बोट ठेंचाळलें म्हणजे पुन्हा ठेच खाते तसेंच झालें! सिद्धटेकच्या रस्त्याऐवजीं भिगवणचा रस्ता गाडीनें घेतला.

रात्र वद्य प्रतिपदेची, चंद्र वर येत होता, मन आल्हादमय झालेलें. सुमारें अर्धा तास झाला तरी परिचित परिस्थिति दिसेना. गाडी थांबविली. धनगरांनीं सांगितलें कीं, 'सिद्धटेकचा रस्ता वायला है.' पण ते सर्व तर्र होते. तशीच गाडी पुढें नेण्यास सांगितलें. तीनचार बैलगाड्या भेटल्या. त्यांतील गड्यांना विचारलें. त्यांनींहि तसेंच सांगितलें. पिऊन सुद्धां कांहीं साहित्यिक शुद्ध ठेवतात, तें मला वाटतें धनगरांचें उदाहरण पाहूनच. येवढ्यांत एक मोटार आली. त्यांत ७।८ कार्यकर्ते होते म्हणजे खादी टोपीवाले होते. दोघेतिघे व्याख्यान देत होते, म्हणजे बडबडत होते. त्यांना खूण करतांच त्यांनीं गाडी थांबविली. एकानें मात्र ओळखलें व त्यानें सर्व परिस्थिति स्पष्ट केली. आमची गाडी भिगवणपासून ६ मैलांवर होती. मी म्हणालों, "भिगवणला रात्रीं मुक्काम करीन व सकाळीं सिद्धटेकला जाईन." त्यांतील एकानें सांगितलें कीं, 'मध्यें भीमा आहे व तींतून गाडी नेतां येणार नाहीं. नाव रात्रीं मिळणार नाहीं.' रात्रीचे आठ वाजले होते. काळोख इर्दगिर्द होता. मी एकटा असतों तर फिकीर केली नसती, पण बरोबर 'जनाना' होता. भाऊसाहेब पेशव्यांनीं पानपतच्या स्वारीच्या वेळीं जी चूक केली तीच मी करून बसलों होतों! मन अस्वस्थ झालें. पुन्हां मनानें 'स जयति सिंदुरवदनो देवो' हा श्लोक वाचून दाखविला.

मीं झटपट निर्णय केला कीं, राशिनला परतावयाचें व रात्र तेथें काढा-

कोणत्या फाट्यानें जावयाचें हें ठरवितो ' असें ज्ञानेश्वरींत लिहिलें आहे, त्याची आठवण झाली. पण तीन तपें वाचन करून तिच्यांतील बोधापासून माझें मन अलिप्त राहिलें याची दुःखद जाणीव झाली. तेवढ्यांत एक आधुनिक तरुण, खादीटोपीधारी भेटला. त्यानें परिस्थितीची योग्य जाणीव करून दिली. ढाला फिरविल्या म्हणजे गाडी फिरविली. १५ मैल परत आलों व पुन्हा एका फाट्यानें दक्षिणेकडे वळलों. दुधानें तोंड भाजलें म्हणजे ताकहि फुंकून पितात. तसें वाटेंत ' जें जें भेटलें त्याला भगवंत ' मानून कर्जतरूपी मोक्षाचा मार्ग विचारत गेलों.

टळटळीत १२ वाजतां श्रीगोंद्याला आलों. तेथें सारथ्यानें सांगितलें कीं, पेट्रोल दोन गॅलनसुद्धां नाहीं. मग चौकशी केली तों कळलें कीं, तेथें पेट्रोल पंप नाहीं. असलेल्या पेट्रोलवर कर्जतला पोचणार नाहीं. शिवाय कर्जतलाहि पेट्रोल पंप नाहीं, हेंहि धक्का देणारें वृत्त कळलें.

मग एका चलाख व्यक्तीला विचारलें कीं, खाजगी कुठें मिळेल का ? त्यानें सांगितलें कीं, ' मिशनचा साहेब कदाचित् देईल. ' मग मिशनच्या बंगल्यांत गेलों. त्याला ऐटींत नामपत्रिका दिली. अमेरिकन मिशन होतें तें. त्यानें नीट न्याहाळलें. म्हणाला कीं, ' चार गॅलन वीस लिटर देतों. थांबा, चहा घ्या. ' मी म्हणालों कीं 'मला १२॥ला पोहोंचलें पाहिजे. चहाबद्दल कृतज्ञ आहे.' पैसे दिले व पेट्रोल भरून संकट टळलें या आनंदांत कर्जतकडे गाडी हाकण्यास सांगितली. दुपारीं दीडला तेथें पोहोंचलों.

कॉलेज व प्रशाळा यांचें संयुक्त स्नेहसंमेलन होतें. वार मंगळवार होता. मुलगी म्हणाली, आज राशिनच्या अंबेचें दर्शन झालें पाहिजे. सनातनी मन तसेंच सुचवूं लागलें. सौभाग्यवतीनें तसेंच मतदान केलें. सारथ्यानें सांगितलें कीं, पेट्रोल २॥ गॅलन आहे. तेथील मंडळींनीं सांगितलें कीं, करमाळ्याहून आणून देऊं. मुक्काम करणें मीं मान्य केलें नाहीं. तेथून सिद्धटेक २१ मैल होतें तें गांठूं. तेथें पेट्रोल मिळेल. ' मनीं आणलें तें मोरया देत आहे ' हा श्लोक मनानें म्हटला. माझी श्रद्धा भक्कम. दि. १३ ऑक्टोबर, चतुर्थी संकष्टी तेव्हां त्या दिवशीं मी सिद्धटेकला देवाचें दर्शन घेणार हें मनानें पक्कें ठरविलें. पण मनानें पाण्याचें पेट्रोल होणार नव्हतें ! श्रद्धेनें पर्वत हालवितां येतात असें बायबलमध्यें वाचलें होतें.

बरोबर दोन तास कार्यक्रम चालला. मुलांनीं १००१ रुपये सर्व सोहळे

टाळून संरक्षणफंडास माझ्या हस्तें दिले. भाषणांत युद्धाचे हेतु वगैरे 'शनवारवाडा प्लेट' लावून सायंकाळीं ६ ला राशिनमार्गें निघालों. ९ मैलांना अर्धा तास लागला. रस्ता म्हणणें प्राप्त होतें; कारण त्यावर कांहीं उगवलें नव्हतें. देवीचें दर्शन घेतलें. दोन मूर्ति आहेत; एक तुळजापूरची व एक राशिनची. मंदिर भव्य आहे. दोनशें वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. दोन दीपमाळा आहेत. एक हालते असा लौकिक आहे. १९३४ सालीं मी ती हालतांना पाहिली होती. एक अजब शिल्पाचा नमुना आहे. मूळ पाया भक्कम ठेवून झुलतें राजकारण इंग्रज कसें करतो याचें तें क्षणभर मला प्रात्यक्षिकच वाटलें! सौ. नें व मुलीनें स्त्रीसुलभ नवस केले. माझ्या मनांत हिच्या पुढें कोणता बकरा बळी द्यावा याचा विचार! आता पाकिस्तान का समाजद्रोही व्यापारी! पण निर्णय होण्यापूर्वींच गाडींत आलों. कार्यकर्ते भेटले. थोडी चर्चा करून निघालों. अर्धा तास होतांच सिद्धटेक भेटेल या आनंदांत होतों; पण एकदां बोट ठेंचाळलें म्हणजे पुन्हा ठेच खाते तसेंच झालें! सिद्धटेकच्या रस्त्याऐवजीं भिगवणचा रस्ता गाडीनें घेतला.

रात्र वद्य प्रतिपदेची, चंद्र वर येत होता, मन आल्हादमय झालेलें. सुमारें अर्धा तास झाला तरी परिचित परिस्थिति दिसेना. गाडी थांबविली. धनगरांनीं सांगितलें कीं, 'सिद्धटेकचा रस्ता वायला है.' पण ते सर्व तर्र होते. तशीच गाडी पुढें नेण्यास सांगितलें. तीनचार बैलगाड्या भेटल्या. त्यांतील गड्यांना विचारलें. त्यांनींहि तसेंच सांगितलें. पिऊन सुद्धां कांहीं साहित्यिक शुद्ध ठेवतात, तें मला वाटतें धनगरांचें उदाहरण पाहूनच. येवढ्यांत एक मोटार आली. त्यांत ७।८ कार्यकर्ते होते म्हणजे खादी टोपीवाले होते. दोघेतिघे व्याख्यान देत होते, म्हणजे बडबडत होते. त्यांना खूण करतांच त्यांनीं गाडी थांबविली. एकानें मात्र ओळखलें व त्यानें सर्व परिस्थिति स्पष्ट केली. आमची गाडी भिगवणपासून ६ मैलांवर होती. मी म्हणालों, "भिगवणला रात्रीं मुक्काम करीन व सकाळीं सिद्धटेकला जाईन." त्यांतील एकानें सांगितलें कीं, 'मध्यें भीमा आहे व तींतून गाडी नेतां येणार नाहीं. नाव रात्रीं मिळणार नाहीं.' रात्रीचे आठ वाजले होते. काळोख इर्दगिर्द होता. मी एकटा असतों तर फिकीर केली नसती, पण बरोबर 'जनाना' होता. भाऊसाहेब पेशव्यांनीं पानपतच्या स्वारीच्या वेळीं जी चूक केली तीच मी करून बसलों होतों! मन अस्वस्थ झालें. पुन्हां मनानें 'स जयति सिंदुरवदनो देवो' हा श्लोक वाचून दाखविला.

मीं झटपट निर्णय केला कीं, राशिनला परतावयाचें व रात्र तेथें काढा-

वयाची. उद्यांच्या सूर्योदयाबरोबर परिस्थिति पण पालटेल हा विश्वास धरला. गाडीनें तोंड फिरविलें. आज श्रीमोरयाचें दर्शन नाहीं याची रुखरुख व थोडी चीड आली. इतर कुणाला जबाबदार धरणें शक्यच नव्हतें. सारथी निर्दोष, सौ. ला तर दोषी धरणें पुरुषार्थाला धरून नव्हतें. मुलींच्या बाजूनें वात्सल्य वागत होतें. मीच कसा गाफील राहिलों याचा मनांत विचार करीत होतों. पंजाबींत म्हण आहे कीं, बायको पुढें चालत नाहीं म्हणून रागवलेला चौधरी गाढवाचे कान पिरगळतो ! येथें गाढवहि नव्हतें. मोटारीला प्रचंड मुख होतें पण कान नव्हते. शेवटीं माझेच कान मनानें पिरगळले. ८ वाजतां राशिनला परत आलों. गांवांतील नवरात्राचा उत्सव कालच संपला होता पण त्यांचें पारणें तमाशानें फेडलें जात होतें. अवसरकरिणीचा तमाशा होता. आकाश–आच्छादनी रंगमंच होता. तिकीटविक्री जोरानें चालू होती व माणसांची एकच गर्दी होती. गाडी तेथें येतांच एका हुशार मुलास विचारलें कीं, डाक बंगला कोठें आहे ? त्याला गाडींत घेतलें. त्यानें पी. डब्ल्यु. डी. स्टोअरमध्यें नेलें. चौकशी केली तर कळलें कीं एक खोली मोकळी होती; ती पण त्याच दिवशीं मलेरियानिवारक पार्टीनें घेतलेली. मला हुडहुडी भरली ! गांवांत कोठें जावें. राहण्याची व्यवस्था असणारें उपाहारगृह नव्हतें. पुजारी, गुरव मंडळी आहेत व कोणी पुरोहित म्हणून देवीचे भक्त व तैनातदार आहेत असें कळलें. मनांत ठरविलें कीं, कोठें जमलें नाहीं तर देवीच्या ओवरींत रात्र काढावयाची. जमल्यास तमाशा पण पाहून घ्यावयाचा. पण पुरोहितावर 'चान्स' घ्यावा असें ठरवून त्या हुशार मुलाचें मार्गदर्शन मानून वाकडया आळ्यांतून, पडक्या घराच्या ओळींतून पुरोहिताच्या वाड्यासमोर आलों.

तेथें चौकशी करतां एक शिक्षक पुढें आले. त्यांनीं ओळखलें व आंत नेलें. एकमजली चाळवजा तो वाडा होता. चंद्र आतां पूर्णपणें दिसूं लागला होता. सौम्य व शीतल वातावरण सर्वत्र पसरूं लागलें होतें. श्री. कुलकर्णी शिक्षकांना मी म्हणालों, 'आम्ही वाट चुकलेले वाटसरू आहोंत. रात्रीपुरती जागा हवी आहे.' त्यांनीं आमचें स्वागत केलें. ते म्हणाले, 'तुम्हांला शाळेंत नेतों. तेथील जागा प्रशस्त आहे.' पुन्हां आम्ही गाडींतून शाळेच्या आवारांत आलों. शाळा प्रशस्त, १० खोल्या आहेत. कुलकर्णी यांनीं मग हेडमास्तर श्री. गोरे यांना विचारून 'कॉमन रूम' मध्यें सतरंजी घालून व्यवस्था केली. त्यांना अधिक त्रास देण्याची इच्छा नव्हती. पण त्यांनीं ऐकलें नाहीं. झुणका व चपात्या

अर्ध्या तासांत आल्या. पाणी तर थंड व अमृतासमान होतें. भूक पदार्थाला गोडी देते, झोंप दगडाला मखमल करते. मी सौ. ला म्हणालों, 'बरेच दिवसांनीं राजभवनांत आहे असें वाटतें.' मन चंगा तो काठवट में गंगा। मन स्वच्छ असेल तर परटाच्या सान्निध्यांतसुद्धां गंगा दिसते. जेवणानंतर १॥ तास अनेक शिक्षकांबरोबर गप्पा मारल्या. त्यांची जीवनव्यवस्था म्हणजेच अत्यवस्था समजून घेतली. सकाळीं पुरोहितांच्या वाड्यांत चहापार्टीचें निमंत्रण स्वीकारलें. चांदणें पाहरा देत होतें. गार वारा चवरी ढाळीत होता. डोळे मिटतांच गरिबाची संपदा म्हणजे झोंप लागली.

पहाटे पांचला उठलों. गांव सात हजारांचा, तथापि संडास नाहींत. जुनी परंपरा सोडलेली नाहीं. तिला अनुसरून मीं प्रातःकर्म संपविलें व चहाला गेलों. रात्रीं सारथी व तो छोटा मित्र यांना गांवांत पेट्रोल मिळतें का तें पाहा म्हणून चौकशी करण्यास सांगितलें. वाटल्यास आणा दोन आणे भाव जास्त द्या. त्याचा चांगला परिणाम झाला. छोटा मित्र बहिर्जीनाइकासारखा होता. प्रथम पेट्रोल खाजगी व्यक्तीजवळ होतें. तो देण्यास तयार नव्हता. त्याला वाटलें अधिकाऱ्याचीच गाडी आहे. अधिकारी तेल घेतात. पण पैसे देत नाहींत हा त्याचा अनुभव. छोट्या मित्रानें सांगितलें कीं, पैसे रोख व थोडे अधिक. माझें नांवहि त्यानें सांगितलें. परिणाम पांच गॅलन व तेंहि अधिक भाव न घेतां मिळालें! या घटनेनें रात्रीं काळजी वाढली नाहीं. आतां पुणें गांठूं असा विश्वास उत्पन्न होऊन मी निभ्रांत झालों होतों.

सकाळीं आनंदानें चहापार्टीस गेलों. चालत गेलों. सारा उध्वस्त झालेला गांव पाहिला. पूर्वीचें वैभव धुळीस मिळालेलें दिसलें. ती रम्य नगरी आतां नव्हती, ते शिलेदार नव्हते. ते पराक्रमाचे पोवाडे आतां ऐकूं येत नव्हते. त्याची जागा छेलबटाऊच्या लावण्यांनीं घेतली होती! गवळणी गायल्या जात होत्या. राधाकृष्ण यांच्या लीलांचें वर्णन ऐकूं येत होतें. सामान्यपणें कठोर पण प्रसंगीं दयाळू असे ते सावकारहि आतां नव्हते. आता सोसायट्या होत्या व त्यांत गांधीलमाशा शिराव्यात तसे कार्यकर्ते शिरले होते. वशिल्याशिवाय पान हलत नाहीं, ही तक्रार ध्रुवपद झाली होती. असले विचार मनांत घोळत असतांनाच आमचा मोर्चा पुरोहित वाड्यांत आला. सर्व खोल्यांतून शिक्षक राहात होते. साधारणपणें ९-१२ फुटांची खोली, त्यांत जोडपें व परिवार. भाडें रु. ५. प्राथमिक शिक्षकाचें गृहसौख्य जवळून न्याहाळलें. मुलें घोंगडीवर निजलीं होतीं.

तीं जागीं होतांच, घोंगडीचीं भोकें ठळकपणें दिसूं लागलीं. तेंच स्वयंपाकघर, तेथेंच सारें जीवन. उन्हाळा, हिंवाळा, पावसाळा या सर्वांना सम लेखणारी ती खोली खरीच 'स्थितप्रज्ञ' होती. चौकशी करतां कळलें कीं धान्य मिळत नाहीं, स्वस्त दुकानांत केव्हांतरी येतें. पण मिळणारें पुरत नाहीं. उघड्या बाजारांत चोरबाजाराचें परिवर्तन झालेलें आहे. तेथें दुप्पट भावानें मिळतें. दूध महाग, लाकडें स्वस्त ! शेवटीं तरी मित्रांना फारसा खर्च लागणार नाहीं म्हणायचा ! भाजीपाला, सणावाराला. पगार 'बेसिक' पण महागाई तितकीच. पैसे पुरत नाहींत. एकाहि शिक्षकाच्या अंगावर कोट दिसला नाहीं. तरीहि दुर्दशेला समाधानानें त्यांनीं सजविलें होतें. मी ते त्यांचें पारोसें जीवन पहात होतों. अर्धा तास त्यांच्याशीं चर्चा केली.

कर्जतला जे शिक्षक भेटले, त्यांनीं 'झेड. पी'च्या हातून शिक्षणखातें काढलें तर त्यांत प्रगति होईल असें सांगितलें होतें. त्याचाच प्रतिसाद येथेंहि दिसला ! पुणें जिल्ह्यांत तर बदल्यांत जातीयता, पक्षबाजी यांनीं कहर केल्याच्या तक्रारी ऐकल्या होत्या. तसल्याच थोड्याफार नगर जिल्ह्यांतहि ऐकल्या. विकेंद्रीकरणाच्या क्रियेंत कार्यक्षमता, न्याय, नीति यांना स्थान नव्हतें. आज तरी असें आहे. प्रयोग आहे. प्राथमिक शिक्षक-संघटना आहे. पण संघटनेंतील पुढाऱ्यांना धारेवर धरलें जातें ! हें ब्रिटिश अमदानींत नव्हतें. तात्पर्य, त्या चहाच्या घोटाबरोबर या शिक्षकांचीं दुःखें श्रवण करीत होतों. बरोबर ६॥। ला नीट रस्ता समजावून घेऊन निघालों. अर्ध्या तासांत सिद्धटेकच्या फाट्यावर जाऊन आसाराम पाटलाच्या वस्तीजवळ आलों. देऊळ व वेस दिसूं लागली. प्याला ओठाशीं आला. येवढ्यांत सारथ्यानें गाडी थांबविली व म्हटलें पुढें चिखल आहे. गाडी रुतेल ! मग तेथून अर्धा मैल चालत जाण्याचें ठरविलें. येवढ्यांत गांवचा गडी धांवत आला. त्यानें मार्गदर्शन करून पांच मैल वळसा घालून पुन्हा प्रदक्षणेच्या वाटेजवळ गाडी आणवली. इंजिन तापलें. आंतला पट्टा जळाला असल्याचें सारथ्यानें सांगितलें.

आम्ही चालत घरीं आलों. घाटावर स्नान केलें. आठवेल तेवढी संध्या केली. गायत्रीजप केला. सकाळचे नऊ वाजले होते. सुंदर घाट. पुढें नदी वाहात होती. शुभ्र पातळाला हिरवी किनार असावी त्याप्रमाणें वाळवंटाला लागून डगरीवरील झाडें वाटत होतीं. वातावरण रमणीय होतें. क्षणाक्षणाला नवता उत्पन्न होत होती. 'रसो वै सः' अशी ब्रह्माची कल्पना डोळ्यांपुढें आली. तसें त्याचें

स्वरूप निराकार असून क्षणाक्षणाला नवें नवें वाटत होतें. तेथून देवळांत आलों. महापूजा केली. मूर्तीच्या अगदीं जवळ बसलों. युगानंतर पीतांबर नेसलों होतों. अथर्वशीर्ष थोडेसें म्हणत होतों. दृष्टि मूर्तीवर खिळली होती. ‘ नेत्रीचे दोन हिरे ’ त्या मुद्रेला गांभीर्य सजवीत होते. त्यांत प्रसन्नता होती. विवेकाला प्रेरणा देणारी दृष्टि होती. क्षणभर त्या मूर्तीकडे पाहात पाहात तल्लीन झालों. किती तरी मिनिटें मी मनाच्या बंधनाच्या पलीकडे गेलों असें झालें. काय झालें हें कळलें नाहीं, अजूनहि कळलें नाहीं. काय म्हणावें या स्थितीला असें कोडेंच पडलें. पण मग घंटानाद सुरू झाला. पुजाऱ्यानें ‘ आरती धरा ’ असें हलवून सांगितलें. मी डोळे उघडले. ती झोप नव्हती, जाग्रति पण नव्हती. कोण जाणे तें काय होतें! दोन नेत्र अंतःकरणांत झोत टाकून शोध घेत असतांनाच ती अवर्णनीय अवस्था प्राप्त झाली. पूजा संपली, घरीं आलों. भोजनाचा कार्यक्रम संपविला. थोडी विश्रांती घेतली. सारथ्यानें खबर दिली कीं, ‘वावरांतून जाऊं, तें वाळलें आहे. ’ जाण्यापूर्वी गांवच्या लोकांनीं शाळेच्या इमारतीच्या व पंचायतीच्या कचेरीच्या पायाभरणीचा समारंभ करविला आणि वेशींत हार घालून निरोप दिला. आतां रस्ता चुकणार नव्हता, पेट्रोलची तूट पडणार नव्हती. मोटारीचा पट्टा पण दुरुस्त झाला होता. पुण्यास चारपर्यंत पोहचूं. मंगलमूर्तीच्या कृपेनें सर्व विघ्नें टळलीं असें म्हणून निघालों. पण पाटसजवळ चाक पंक्चर झालें! कसेंबसें १५ मिनिटांत तें दुरुस्त झालें. ५॥ पर्यंत पुण्यास आलों आणि त्या सिंदुरवदन देवाची स्तुति केली. संकटाच्या राशी त्याच्याचमुळें नाश पावल्या. भविष्यासाठीं मन भक्कम झालें. श्रद्धेनें सर्व दिलें हेंच खरें!

* * *

## : २१ :

# राज्य नको, मोक्ष नको, क्षणक्षण काम हवें !

अर्जुनाला भगवंतांनीं ' तुला काय पाहिजे तें माग ' असें विचारलें असतां त्यानें सांगितलें कीं, ' मला राज्य नको, मोक्ष नको; जे दुःखानें तप्त झालेले प्राणी आहेत त्यांचीं दुःखें दूर करण्याची माझी इच्छा आहे. ' ह्या त्याच्या मागणींत अनंत काळ टिकणारा संदेश आहे. तसेंच मानवसमाज आहे तोंपर्यंत सारीं द्वंद्वें चिरकाल राहणार हेंहि त्याच संदेशांत सूचित झालें आहे.

जन्म-मरण, सुख–दुःख, बनेल पुढारी, अडलेले अनुयायी, मगरूर श्रीमंत, लाचार गरीब, स्वार्थी बहुसंख्य, निःस्वार्थी मूठभर ' इत्यादि द्वंद्वें कायमच राहणार हा त्याचा अर्थ आहे.

अखंड कलहाचें, अशांतीचें, अन्यायाचें सनातन यज्ञकर्म चालूच आहे. साधु आणि संत यांनीं आपली वाणी शिणवली. हरिनामाचा, विठ्ठलनामाचा गजर केला. तथापि चंद्रभागेला सालोसाल पूर यावा त्याप्रमाणें बिनचूक अन्याय होतच आहेत. सामाजिक, आर्थिक व राजकीय जे श्रमी आहेत तेच कष्टी आहेत. जे प्रयत्नशील आहेत तेच विफल आहेत. जे विचार करीत आहेत तेच विमनस्क आहेत आणि हे सर्व जणूं कांहीं कोणी संकेताप्रमाणें चालविलें आहे असें वाटत आहे.

## जुनी निस्तेज दीपमाळ

कार्यकारणभाव सामान्यपणें भौतिक शास्त्रांत निश्चित असतो. सामाजिक शास्त्रांत तो तसा नसतो. आणि म्हणूनच सामाजिक शास्त्राचे सिद्धान्त हे सापेक्ष असतात, परिस्थितीनें प्रभावित असतात. आणि म्हणून आजचा दुराचार उद्यांचा सदाचार बनतो. आजचा सामाजिक न्याय उद्यांचा अन्याय बनतो. अशा स्थितींत कुणी आग्रहानें अगर अधिकपणें कांहीं सांगूं लागेल तर तें मानणें कठीण असतें.

ज्ञान आणि विज्ञान यांचीं क्षितिजें सतत वाढलीं असलीं तरी सामान्य जन तेवढ्या प्रमाणांत ज्ञानी झाला नाहीं आणि जेथें ज्ञान प्राप्त झालें आहे, उपलब्ध झालेलें आहे, तेथें अजून विचाराचें प्राबल्य प्रस्थापित झालें नाहीं. जुनी दीपमाळ आतां निस्तेज झाली आहे. तिच्या तेजांतील प्रौढता, सौंदर्य, प्रमाणबद्धता संपली कारण तीच संपली. आहे. आतांची विद्युत् तेज देते; पण केव्हां धोका देईल याचा नेम नाहीं. जणुं कांहीं कुंभारानें जुनीं मडकीं कुटून, माती करून पुन्हा आपल्या चाकावर घातलीं आहेत असें वाटतें आणि हें दृश्य सर्व देशांतून दिसत आहे.

## स्वार्थाचें पीकपाणी

पूर्वी राज्यक्रांति झाली म्हणजे ती राजधानीच्या नगरांत असे आणि कळसाचा रंग बदलला जाई. बाकीचें मंदिर जसेंच्या तसें राही. तुलसीरामायणांत मंथरेनें म्हटलें आहे कीं, " कोई भजे राजा, हमे क्या हानि ! "

रामाच्या राज्याभिषेकाची बातमी तिला सखीनें दिल्यावर वरील उद्गार तिनें काढले. रामाचें राज्य झालें तरी दासीच्या हातीं केरसुणी आणि धुणीं यापलीकडे कांहींच येणार नव्हतें. तो तिचा सनातन धर्म होता. त्यांत बदल होणार नव्हता. तसेंच थोडेसें भारतांतील खेडेगांवाबाबत झालें आहे. पाटील-कुलकर्णी गेले. तलाठी, सरपंच आले. तलाठी गेले, ग्रामसेवक आले; पण जो तो आपल्या स्वार्थाचें पीक-पाणी पाहत आहे. आपण म्हणजे ग्राम असें समजून १०० टक्के सेवा करीत आहे.

## संघटनेंत स्पर्धेचा मुंगा

कॉंग्रेसच्या हत्तीनें पारतंत्र्याच्या दरवाजावर धडक देऊन दरवाजा उघडा केला आणि स्वातंत्र्य हें सर्वांसाठीं आणलें. पण सत्ताधारी होतांच या पक्षांतील

संघटना शिथिल झाली. संघटनेंत स्पर्धेचा मुंगा शिरला, ती पोखरली गेली, तिची शक्ति व स्थैर्य कमी झालें. बहुतेक नेते सत्तास्थानीं गेले. दुय्यम कार्यकर्ते राजशालकाप्रमाणें वागूं लागले आणि बहुतेकजण आपापल्या स्वार्थाची खिचडी शिजवूं लागला. स्वातंत्र्यानें राजकारण निर्भय झालें, त्यागाची किंमत कमी झाली, वशिला राजकीय बाजारामध्यें तेजींत आला. खटपट म्हणजे गुणसंपात्ति अशी परिस्थिति निर्माण झाली आणि काँग्रेसचें मंदिर किंबहुना सारें राजकारण स्वार्थी लोकांनीं गजबजून गेलें !

## विषांतले किडे

मनुष्य चुकत असला तरी समाजांतील वातावरण व मूल्य-व्यवस्था प्रभावी असली तर समाजाची संस्कृति राखली जाते. त्यांचा आत्मा प्रसन्न राहतो. पण येथें वातावरण बिघडलें आणि त्याचा परिणाम साऱ्या समाजावर झाला. धान्यापासून नोकरीपर्यंत सरळ मार्गानें कांहीं मिळेनासें झालें आणि म्हणून समाजांत राहावयाचें तर सरळ मार्ग निरुपयोगी आहे हा विश्वास मूळ धरूं लागला ! त्यायोगें समाजाचा नैतिक पायाच उखडून गेला.

खेडेगांवच्या हवेंतहि काळाबाजार बाळसें धरूं लागला. भ्रष्टाचाराचा रोग हा कांहीं शरीरावरील एक गळूं अशी स्थिति राहिली नाहीं; तर समाजाचें सारें जीवन सडलें आहे, रक्त बिघडलें आहे, हें सत्य आहे.

आपत्तींत मनुष्य हिरीरीनें काम करतो. देश संकटांत आला तर किंमत न मागतां त्याग करतो. जीवन दान करण्यापर्यंत त्याची वृत्ति जाते. पण हें धैर्य व ही देशाबद्दलची आपुलकी आज दिसून येत नाहीं. कारण देशावरची खरी मालकी मूठभर भांडवलवाल्यांच्या हातीं व त्यांच्या रुपेरी दोरीला बांधलेल्या राजकीय पक्षाच्या हातीं आहे. दोन टक्के श्रीमंतांच्या संपत्तीसाठीं आम्ही मरावें काय ? आम्हीं आधींच खालीं गेलेल्या पोटाला चिमटा घ्यावा काय ? असा प्रश्न अनेकजण विचारूं लागले आहेत. जेथें जातो, शहरांत–खेड्यांत–तेथें वशिलेबाजी, भ्रष्टाचार, दुर्भिक्ष व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचीं लफडीं ऐकतच असतों. दवाखान्यांतील दाई व ग्रामीण भागांतील शिक्षिका सामान्यपणें भयभीत आहेत. त्यांच्या बदल्या व बढत्या या सरळ मार्गानें होत नाहींत ! ही स्थिति साऱ्या देशभर आहे. जे सत्ताधारी पक्षाचे आहेत त्यांचें दारिद्र्य झपाट्यानें दूर झालें आहे. जे त्यांत श्रीमंत होते त्यांची श्रीमंती वाढली आहे. त्यांच्याविरुद्ध

सत्तेकडून होणाऱ्या अन्यायाविरुद्ध कोणी आवाज काढल्यास साम-दाम-दंड-भेद यांपैकीं अनेकांनीं त्यांना प्रभावहीन करण्यांत येत आहे. स्वातंत्र्याचें व राजकीय शीलाचें संरक्षण करणारे शिलेदार म्हणजे वर्तमानपत्रें, तींहि पुरस्कारानें बहुतेक मिंधीं झालीं आहेत. सत्तेवरील माणसाच्या इशाऱ्यावरून, कोणी अन्यायाविरुद्ध ओरडूं लागला तर हेत्वारोप करून त्याच्यावर टीकेचा प्रहार केला जात आहे. एका सुभाषितांत असें म्हटलें आहे कीं, एका सज्जन माणसाला विचारलें कीं, 'तूं ह्या भ्रष्ट नष्ट समाजांत कसा राहतोस?' त्यानें उत्तर दिलें—'विषकृमिन्यायेन' म्हणजे विषांतला किडा जसा जिवन्त राहतो त्या वृत्तीनें! तो स्वतः विषारी नसतो, पण सारें वातावरण विषारी असतें. पण असें असूनहि तें वातावरण सोडून त्या सृष्टीबाहेर तो जाऊं शकत नाहीं.

## जाणिवेची मक्षिका

असेच कांहींसे विचार थोड्या दिवसांपूर्वी दूर एका खेड्यांत कांहीं कार्यक्रमानिमित्त गेलों असतांना व तेथून परतत असतांना मनांत उत्पन्न झाले. तसें म्हटलें तर अनेक लाख खेड्यांपैकीं तें एक खेडें आहे. स्वातंत्र्यापूर्वी त्या खेड्याकडे कुणी बघितलें नव्हतें. सह्याद्रीच्या कुशींत मातेच्या मांडीवर सुखानें झोपणाऱ्या मुलांप्रमाणें तें होतें. सामाजिक शांतता होती. मनुस्मृतीनें नेमून दिलेले जे स्वधर्म त्याचें पालन सामान्यपणें होत होतें. नाण्याशिवाय बहुतेक विनिमय व व्यवहार होत होता. बहुतेक कामें तीं तीं माणसें स्वतःच करीत. गडी व मोलकरीण क्वचित् आणि जेथें असतील तेथें त्यांचें वेतन अमुक खंडी भात, अमुक कपडा अशा श्रेणींत होतें. श्रम मोबदल्याच्या भावनेनें तितकेसे होत नसून आपला तो धर्म आहे या भावनेनें होत होते. चातुर्वर्ण्य थोडा प्रभाव राखून होतें. ब्राह्मण्यांत पावित्र्य होतें. पाटिलकींत अभिमान होता. एखादा दुसरा वैश्य पण गांवकीला धरून चालत होता. हिंदु धर्मानें दूर ठेवलेले 'पायरीनें' वागत होते. त्यांचाहि स्वाभिमान सामान्यपणें जोपासला जात होता. १९२०सालापासून बारा बलुतेदारांत तेरावा बलुतेदार म्हणजे निवडणुकीसाठीं मत मागणारा याची भर पडली होती. ती बेताबेतानें होती. पण १९५२ पासून किंबहुना १९४५ पासून या बलुतेदाराचे गुमास्ते, वैशाखमासीं वसंत यावा किंवा फाल्गुनमासीं शिमगा यावा त्याप्रमाणें या खेड्याला दर्शन देत होते. 'छोडो भारता'च्या चळवळीनें जुना जमाना समाजाला सोडून गेला होता. झोप चाळवावी त्याप्रमाणें साऱ्या जनतेची व विशेषतः ग्रामीण भागांतील जनतेचा शांतता चाळवली गेली होती.

ती जनता अस्वस्थ होऊं लागली. पक्षापक्षाचे लोक तिच्या खऱ्या व तथाकथित दुःखाच रामायण तिच्यापुढें गाऊं लागले. ती उपेक्षित होतीच. आतां त्या उपेक्षेची जाणीव तिला झाली. 'जाणिवेची मक्षिका' आतां तिच्या डोक्यांत शिरली आणि मग जें व्हायचें तेंच झालें.

## सत्तेचें बहिरेपण

विद्यमानांत विशेष तिटकारा व अन्यायाची चीड अधिकाधिक चिघळूं लागली. जातिभेदाची सुप्त भावना प्रज्वलित झाली आणि सार्वजानिक जीवनाच्या सराईत जीवनाचे यात्रेकरू अलग अलग विचारांचीं थालिपीठें तयार करूं लागले. सामाजिक शांतता समाप्त झाली आणि अन्याय वाढूं लागले. आर्थिक व राजकीय अन्याय होते, त्यांत सामाजिकांची भर पडली आणि मग सर्वत्र 'गमका तराना' दुःखगान सुरू झालें! गेलीं बारा वर्षें हें मी ऐकत आहे. खेड्यांतून, तालुक्यांच्या गांवांतून, शहरांतून, वाड्यांतून, वस्त्यांतून स्वातंत्र्य आलें आणि त्याचें फळ म्हणजे समृद्धि, तें मात्र आलें नाहीं. दुःखांना वाचा फोडण्यासाठीं वेशींतील घंटा वाजवतां येऊं लागली. तथापि सत्तेचें बहिरेपण वाढतच गेलें. साऱ्या सामाजिक जीवनाचा चुथडा झाला. सुबक व सुंदर झुंबर जमिनीवर आपटावें व विखुरलें जावें, छिन्नभिन्न व्हावें त्याप्रमाणें झालें. स्वातंत्र्यासाठीं विध्वंसन-सिद्धि हातीं धरली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तिचा प्रतिनाद चालूच राहिला. बाजार मोडावा व उचल्यानें मिळेल तें हातीं घ्यावें त्याप्रमाणें घडूं लागलें. राजकारणांत फासेपारधीपणाच प्रतिष्ठित झाला. गुन्हेगार जमाती, कायद्यानें बेगुन्हेगार केल्या. अनुभवांत, सार्वजनिक जीवनांतहि गुन्हेगारी वाढली. अन्यायाची दाद लागेनाशी झाली. अन्नासाठीं दाही दिशाच नव्हे, दहा दहा तास उन्हांत उभें राहावें लागत आहे आणि सरकारी व्यवस्थेनें आपण दिक्कालातीत आहोंत असेंच दाखवून दिलें आहे. या बारा वर्षांत दुःखाचे डोंगर वरून कोसळत आहेत, तर भूमींतून भूकंप होऊन खंड पडावें असें या समाजाचें जीवन झालें आहे. परराज्यांत हिंदमातेचें चित्र मलीन मुख, कष्टमय, दृष्टि निरुत्साही असल्याचें एकानें काढलें होतें. कुणीतरी तिला विचारीत आहे कीं, 'माते, तुला काय होत आहे?' आणि तेवढ्यानेंच तिला समाधान झाल्याचें वाटत आहे. आज कुणी तिला तसें विचारीत नाहीं आणि विचारलें तर वस्त्राआड मार्केटमध्यें सौदा करतात त्याप्रमाणें मताच्या दृष्टीनें विचारलें जात आहे.

## अन्यायाची दुर्गंधी

इंग्रजांनीं भारताचें शोषण केलें, पण कांहीं संवर्धनहि केलें. आजच्या राज्यांत शोषण अखंड चालू आहे व जें संवर्धन होत आहे तें विशिष्ट वर्गापुरतें व तें वर्तुळ अगदीं अल्प आहे. विहीर अमृतवापी पण पाणी मात्र पाटलाच्या वावरांत जात आहे. या अन्यायाविरुद्ध भीतीनें, प्रलोभनानें, उदासीनतेनें कुणी बोलत नाहीं. पण कुणी तरी हें कार्य केलें पाहिजे. ' संभवामि युगे युगे ' म्हणणारा परमेश्वर क्षीरसागरांत विश्रांति घेत आहे. प्रक्षोभ निर्माण केल्याशिवाय प्रगति होत नाहीं. आणि म्हणून अन्यायाविरुद्ध प्रक्षोभ निर्माण करून जनशक्ति निर्माण केली पाहिजे. आज पुरस्कार व द्रव्यप्राप्ति या दोन्हींना अन्यायाची दुर्गंधि येत आहे. या स्थितींत सर्व समाजाची उन्नति शक्य नाहीं. म्हणून अन्यायाविरुद्ध जनतेला चेतवणारा, नव्या युगाची तुतारी फुंकणारा कुणी तरी निःस्वार्थी, निर्भीड वर्ग हवा आहे. ज्यांनीं स्वातंत्र्यांत बलिदान केलें ते आज अन्नाला मोताद झाले आहेत. ज्यांनीं गांधी-नेहरूंचीं चित्रें फेकून दिलीं, अवमानिलीं ते आज सत्तेवर आहेत. देश विकणारे सत्तेपर्यंत पोचले आहेत आणि हेंच आठवें शल्य आहे. आपलें कर्तव्य केलें, एवढ्यानें भागत नाहीं, दुसऱ्यांना तें करावयास लावलें पाहिजे. ज्यांना ज्यांना टिळक गांधीपासून प्रेरणा मिळाली त्यांनीं पुनर्जन्मासाठीं प्रार्थना केली पाहिजे. नव्या पिढींत तशी प्रेरणा मिळून काम करणारे मिळतील कीं नाहीं हें सांगणें कठीण आहे आणि अशा विचारतंद्रींत असतांना पुनर्जन्मावर विशेष विश्वास नसलेला मी एक विचार करूं लागलों. आपल्याला ही प्रेरणा मिळालेली आहे. शेवटल्या श्वासापर्यंत तिला अनुसरून कार्य करूं हा आत्मविश्वासहि आहे. तथापि क्षणभर असें वाटलें कीं, मला जर परमेश्वरानें विचारलें कीं, 'तुला काय हवें आहे?' तर मी सांगेन 'राज्य नको, मोक्ष नको, जे दुःखी आहेत, ज्यांच्यावर झालेल्या अन्यायांची दाद लागत नाहीं, त्यांच्यासाठीं क्षणक्षण काम करण्याची संधि मला हवी आहे. जुनी खंडचिठ्ठीची मुदत संपत आलेली आहे. माझा आत्मा खळखळ करणारा भाडेकरी नाहीं. तो देहाची जागा मुदत संपतांच खाली करील. पण पुन्हां मला जर तूं जन्मास घातलेंस तर हें कार्य चालू ठेवीन आणि म्हणूनच ' कामये तु पुनर्भवम् । ' असें सांगेन '

* * *

: २२ :

# जय सोमनाथचें स्वप्न

दुपारचे १२॥ वाजले होते. सूर्य मे च्या मध्यांतला आणि त्यांतहि अगदीं डोक्यावर होता. लांबून 'जय सोमनाथ'–'जय सोमनाथ' अशी हजारो मुखांतून निघणारी घोषणा मी ऐकत होतों. मन आनंदित झालें होतें. शरीर पुलकित झालें होतें; तथापि तो ध्वनि ज्या ठिकाणाहून निघत होता त्या ठिकाणीं वेळेवर पोहोंचतां येत नाहीं याची जाणीव मनाला खटकत होती. मन गत-गोष्टींचा इतिहास अवलोकन करण्यांत किंचित् गुंग झालें होतें. मनापुढें १ नोव्हेंबर १९४७ च्या मंगल प्रभातीं घडलेल्या घटनेचा प्रसंग उभा राहिला.

१५ ऑगस्ट १९४७ ला देशविच्छेदनाची किंमत देऊन भारत स्वतंत्र झाला; त्या स्वातंत्र्याचें स्वरूप मोठें कावरेंबावरें करणारें होतें. स्वतंत्र भारताच्या वांट्याला म्हणा अगर त्याच्या भूप्रदेशांत म्हणा, पांचशेंच्यावर लहानमोठीं संस्थानें आलीं होतीं. त्यांत कांहीं मुसलमानी रियासतीहि होत्या. त्यांत हैदराबादचा निज़ाम व जुनागडचा नबाब हे प्रमुख होते. रामपूरच्या नबाबानें मुक्त मनानें परिस्थितीचा कौल मानून संस्थान समर्पण केलें होतें. भोपाळच्या नबाबानें, धूर्तपणें विरोध दाखवून पण गुप्तपणें मुदतींत सामीलनाम्याचा करार लिहून दिला होता!

## काठेवाडी कावेबाजपणा

जुनागडचा नबाब ही एक और चीज होती. मुसलमानी विलासप्रियते-बरोबर काठेवाडी कावेबाजपणा त्याच्या आश्रयालाच जणूं राहिला होता ! त्यानें माउंटबॅटनचा सल्ला न जुमानतां, गुप्तपणें पाकिस्तानला सामीलनामा लिहून दिला होता. तथापि त्याचें राज्य तिन्ही बाजूंतीं भारतीय प्रदेशानें व दक्षिण बाजूस अरबी समुद्रानें वेढलें होतें. जलांत राहून माशाशीं वैर करणें त्याला शक्य नव्हतें. शिवाय त्याच्या प्रजेपैकीं ९५ टक्क्यांपेक्षां अधिक लोक हिंदु होते. जे कांहीं मुसलमान होते ते केवळ राजाश्रित होते. त्यांचा पराक्रम व त्यांची स्पर्धा नबाबाला नर्तकी पुरविण्यापुरतीच मर्यादित होती. असा हा नबाब कुत्र्यांचा मोठा शौकिन. म्हणूनच नाना प्रकारचे कुत्रे व कुत्र्या यांचा आहेर नबाबाला देण्यामध्यें प्रजाजनांची अहमहमिका लागे !

१५ ऑगस्ट ४७ पर्यंत सामीलनामा दिला नाहीं म्हणून दिल्लीमध्यें चिंता व्यक्त होऊं लागली. खलबतें झालीं आणि मुंबईला ' ताजमहाल ' हॉटेल-मध्यें सप्टेंबर अखेर जुनागडचे एक कार्यकर्ते व महात्मा गांधींचे पुतणे, सामलदास गांधी व अन्य मंडळी त्यांना मार्गदर्शन करणारे केंद्रीय राज्यखात्याचे चिटणीस श्री. व्ही. पी. मेनन यांच्यांत सल्लामसलत होऊन एक योजना ठरली. मुंबईतील सुमारें २५–३० काठीयावाडी कार्यकर्ते ऑक्टोबर ४७ च्या पहिल्या आठवड्यांत राजकोटला गेले आणि त्यांनीं तेथें ' स्वतंत्र जुनागड सरकार ' स्थापन केलें. राजकोट येथें आलेलें जुनागडच्या नबाबाचें वसतिस्थान–बंगला–मोठा बंगला– त्यांनीं सरळ आंत प्रवेश करून ताब्यांत घेतला. तेथें स्वतंत्र जुनागड राज्याची स्थापना झाली ! ऑक्टोबरच्या मध्याच्या सुमारास सुमारें हजार स्वयंसेवकांची टोळी तयार झाली आणि त्यांनीं सैनिकी थाटानें जुनागडकडे मोर्चा नेण्यास सुरुवात केली. त्यांच्या मदतीला म्हणून नव्हे पण त्या प्रदेशांत गडबड होऊं नये म्हणून भारताचें सैन्य सुमारें ६०० रणगाड्यांसह साथ देत होतें. अर्थात् ही बातमी कळतांच, जुनागडच्या नबाबानें लढण्यापेक्षां जुनागडचा त्याग पत्करला !

मियाँभाई बढाईखोर असतात. पण प्रसंग पाहतांच बाकेपणा सोडून नम्र-पणा पत्करतात; येथेंहि तेंच झालें.

२०–२२ ऑक्टोबरला राज्यकारभाराचे हक्क एका इंग्लिश अधिकाऱ्याच्या स्वाधीन करून त्याला कुलमुखत्यारी त्यांनीं दिली व विमानांतून कांहीं बेगमा व कांहीं कुत्रीं व कांहीं हुजरे एवढ्या लवाजम्यासह नबाबानें जुनागडच्या जनतेला

वाऱ्यावर सोडून कराचीकडे प्रयाण केलें ! जातांना जेवढी 'चलसंपत्ति' नेतां येईल तेवढी नेली आणि जंगम वस्तूंत कुत्रीं नेलीं. त्याच्या अनेक बेगमा होत्या, पण बहुतेकांना त्यानें जुनागडला सोडलें.

२६ ऑक्टोबरला सामळदास गांधींच्या नेतृत्वाखालीं निघालेल्या 'प्रचंड' सैन्यानें जुनागड शहरांत प्रवेश केला. अनेक शतकांच्या जुलमी राज्याचें दफन झालें ! प्रजा स्वतंत्र झाली आणि त्याच वेळीं सामळदास गांधींनीं केंद्र सरकारच्या सल्ल्यानें तात्पुरत्या राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेतलीं. सरदार वल्लभभाईंनीं स्वतः जुनागडला जाऊन, तेथील जनतेला नंतर भेटण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें ते व त्यांच्या सांगण्यावरून मी ३१ ऑक्टोबर ४७ रोजीं विमानानें राजकोट व तेथून केशोकला एक नोव्हेंबर ४७ ला पहाटे निघून सोमनाथला आला होतों व महंमद गझनीनें भग्न केलेल्या सोमनाथ-मंदिराच्या आवाराला भेट दिली होती. मंदिर उध्वस्त झालें होतें व गर्भघरांत आकाशांतून सूर्यचंद्रांना मूर्तिविरहित असलेलें तें स्थान जवळजवळ हजार वर्षें पाहण्याची संधि मिळत होती ! अनंत विचार त्या वेळीं माझ्या डोक्यांत आले.

ब्राह्मणांनीं व पुजाऱ्यांनीं लक्ष लक्ष होन महंमद गझनीला देण्याची तयारी दाखविली; पण त्यानें सांगितलें कीं, "मी मूर्तिभंजक आहें. मी मूर्तिविक्रेता नाहीं." आणि नंतर त्यानें सोमनाथाचें लिंग फोडलें आणि खालच्या तळघरांतून कोट्यवधि रुपयांचीं जडजवाहिरें लुटून नेलीं. देवळांतील अनेक रूपवान् सेविकांना गुलाम करून नेलें. मुलूख उध्वस्त केला.

परमेश्वर ही शक्ति मानवांच्याद्वारेंच कार्यान्वित होते, पण मानवानें तेथें त्या शक्तीचा आदेश मानला नाहीं. धर्माचें पालन विवेकाइतकेंच प्रक्षुब्ध भावनांनीं होतें. नुसता विवेक अपुरा पडतो हा जगाचा इतिहास आहे.

त्या उध्वस्त वास्तूकडे पाहून, त्यांतून क्षणाक्षणाला स्रवत असलेली उदासीनता पाहून, माझ्यांतील विवेक व माझ्यांतील भावना दोन्हीहि प्रभावी होऊं लागल्या.

## प्रतिष्ठापनेचा निर्णय

मी आणि सरदार त्या मंदिरालाच लागून ५० यार्डांवर असलेल्या पश्चिम महासागराच्या किनाऱ्यावर गेलों. लाटा उसळून येत होत्या सोमनाथाचें पाद-प्रक्षालन करण्यासाठीं, पण आतां तो तेथें नाहीं म्हणून विरमून, विरस होऊन, परत जात होत्या. लहरींचा हा लहरी खेळ बाहेर पाहात होतों व माझ्या मना-

मध्येंहि लहरी उसळत होत्या. किंबहुना क्षणभर तुफानाचा लाल ञावटा लागला होता. तथापि प्रक्षुब्ध विचार करून अगर तसें बोलून हजार वर्षांपूर्वी घडलेल्या घटनांचा राष्ट्रीय अपमानाचा बदला घेणें शक्य नव्हतें! वयपरत्वें व अधिकाराच्या पदामुळें विचारांना प्रौढता आली होती. गांभीर्यानें परिणाम लक्षांत घेऊन, बोलण्याच्या विद्येचीं धुळाक्षरें नुकताच मी गिरवूं लागलों होतों. मी व सरदार त्या पुलीनावर त्या मंगल प्रभातीं सहल करीत होतों आणि एक मंगल विचार माझ्या मनामध्यें आला.

मी सरदारांना म्हणालों कीं एक कल्पना मांडतों.

'मांड' सरदार म्हणाले.

मी म्हणालों, 'हें सोमनाथाचें मंदिर. आतां भारत स्वतंत्र झाला आहे म्हणून पुन्हा बांधावें, त्याचें पुनर्निर्माण व्हावें. राष्ट्राचें, नागरिकांचें, त्यांच्या आराध्य देवतांचें.'

'पसंत आहे.' सरदारांनीं सांगितलें.

त्यावर म्हणालों, 'मग घोषणा करूं का? तीहि सरकारतर्फें करूं का?'

'कर.' सरदारांनीं सांगितलं आणि मग आम्ही पुन्हा भग्न देवालयाच्या आवारांत आलों. आवाराच्या फाटकाजवळ ही 'वास्तु' पुराणसंशोधन खात्याच्या कायद्याप्रमाणें संरक्षित आहे अशी पाटी होती आणि मनांत किंचित् हसलों, कारण ही पुराणांत पुरलेली वास्तु उद्यांच्या इतिहासांत पुन्हा निर्माण होणार होती. आणि मग देवळाच्या पडक्या महाद्वाराजवळ आलों. त्याची फक्त चौकट उभी होती. अन्य सर्व नष्ट झालें होतें. आणि शेंदीडशें माणसें त्या ठिकाणीं जमलीं होतीं. मग दरवाजांतील उंबऱ्यावर उभे राहिलों आणि हिंदींत म्हणालों कीं—

'भारत अनेक शतकांनंतर स्वतंत्र झाला आहे. लोकांचें राज्य आलें आहे. आम्हीं विनाशासाठीं सत्ता घेतली नाहीं, निर्मितीसाठीं सत्ता घेतली आहे. (We have not come to destroy but to fulfil.) या येशू खिस्ताच्या वचनाचा हवाला देऊन, मीं म्हटलें, 'भारत सरकारनें हें मंदिर पुन्हा बांधण्याचें ठरवलें आहे' असें भारत सरकारतर्फें मी जाहीर करीत आहें. टाळ्यांचा कडकडाट झाला. 'जय सोमनाथाच्या' आवाजानें सारें आवार निनादलें. उसळणाऱ्या लाटांनीं प्रतिसाद दिले. सारें वातावरण बदललें आणि यदुवंशीय जामसाहेब जे आमच्याबरोबर होते त्यांनीं जाहीर केलें कीं या कामीं मी एक लाख रुपये देत आहें! .

तेथून मग फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या अहिल्याबाईनीं बांधलेल्या सोमनाथमंदिराच्या आवारांत गेलों. तेथें सभा होती. हजारावर माणसें जमला होतीं. वल्लभभाईनीं तेथें जाहीर केलें कीं, या मंगलप्रभातीं काकांच्या मनांत एक शुभविचार आला आहे. मलाहि तो पटला आहे. या मंदिराचें पुनरुत्थान, पुनर्निर्माण आम्ही करणार आहोंत. लोकांनीं पण त्याला मदत करावी. पुन्हा जय सोमनाथच्या घोषणा झाल्या आणि पंधरा मिनिटांच्या आंत तीन लाखांच्या देणग्या जाहीर झाल्या. नंतर मोटारींतून परततांना देवळासंबंधीं काय व्यवस्था करावी वगैरे विचार करीतकरीत केशोकला आलों. तोंपर्यंत झालेल्या घटनेची वार्ता दशदिशांना पसरली होती !

## कोणी कसे फाटे फोडले ?

दिल्लींत आलों. मंत्रिमंडळापुढें योजना ठेवली. तिचा स्वीकार झाला. मरहूम मौलाना आझाद यांची इच्छा देऊळ दुरुस्त करावें, नवें बांधूं नये अशी होती. मीं सांगितलें कीं जुनें भग्न ठेवण्यांत प्रक्षुब्धता निर्माण करणारी घोषणा ठरेल.' म्हणून अगदीं पूर्वीं जसें होतें तसेंच बांधूं, 'हुबेहूब बांधूं' असें आश्वासन दिलें. पुढें पाकिस्तानी वर्तमानपत्रांत मियाभाईनीं घोषणा केल्या, 'आम्ही बांधू देणार नाहीं. पाडून टाकूं ! आमच्यांत महंमद गझनी अनेक आहेत.' त्यानंतर पं. नेहरू यांनीं गांधींची भेट घेतली. गांधींनीं मला बोलाविलें व म्हणाले कीं, 'लोकांनीं यांत भाग घ्यावा असें तुला वाटतें ना ? मग हें सारें कार्य सरकारी स्तरावर न ठेवतां, तें जनतेनें करावें असें मला वाटतें. त्यानंतर आम्हीं एक विश्वस्त मंडळ नेमलें. त्यांत मी, जामसाहेब, बिर्लाजी, सौराष्ट्र सरकारचा एक प्रतिनिधि, मुनशी व जुनागडचा एक प्रतिनिधि असे सभासद झालों. सरदार जिवंत असेपर्यंत म्हणजे डिसेंबर १९५० पर्यंत आम्हीं ४० लाख रुपये गोळा केले. अनेक राज्यांनीं व उद्योगपतींनीं मुक्तहस्तानें पैसे दिले. महाराष्ट्रांतूनहि एक लाख जमा झाले. शिल्पासंबंधीं सल्लागार समिति नेमण्यांत आली व ती भारतसरकारच्या नियंत्रणाखालीं होती. मी भारतसरकारचा प्रतिनिधि म्हणून विश्वस्त मंडळांत होतों व मंत्रिपद संपल्यानंतर मीं राजीनामा दिला, पण भारतसरकारनें मलाच प्रतिनिधि म्हणून राहण्यास सांगितलें. म्हणून आजहि मी प्रतिनिधि म्हणून विश्वस्तमंडळांत आहें.

जुन्या शिल्पाप्रमाणें बांधावयाचें म्हणून सोमनाथ गांवांतील सोमपुरा

जातींतील मंडळींनीं जसेंच्या तसें बांधून देऊं म्हणून कळविलें व भग्न मंदिराचा नकाशा 'शंकरप्रासाद' या नमुन्याचा आहे व त्यांत भग्न मंदिराच्या आवारांत कुठें खणलें असतां काय सांपडेल याचा अंदाज दिला. तो खरा ठरला. मग त्याच जातींतील एक इंजिनीअर होते. त्यांना सल्लागार नेमलें आणि त्यांच्या सल्ल्यानें सारें काम सुरू झालें. १९५१ मध्यें चबुतरा तयार झाला. गर्भगृह तयार झालें व लिंगाची प्रतिष्ठापना झाली. नऊ फूट लांब व सहा फूट घेर असलेलें असें लिंग तयार करण्यांत आलें व त्याची प्रतिष्ठापना राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्यामार्फत व्हावी असें ठरलें. त्या प्रतिष्ठापनेच्या समारंभासाठीं अनेक भारताबाहेरील नद्यांचें पाणी मागविण्यांत आलें होतें. तशीच मृत्तिकाहि. मुनशी यांनीं चायनांतील नद्यांचें पाणी व मृत्तिका मागवली ती डॉ. पणीकर यांनीं धाडली.

हें सर्व पाहून नेहरू संतापले. आणि त्यांचा निधर्मी आत्मा कोपला! मुनशींना त्यांनीं पत्र लिहिलें व खुलासा मागितला. मुनशींनीं मला विचारलें. मी त्यांना सांगितलें कीं, 'तुम्ही पंडितजींना लिहा कीं, हें सर्व गाडगीळांचें प्रकरण आहे आणि मग मी त्यांना उत्तर देईन!' राजेंद्रबाबूंना मी निमंत्रण देऊन चुकलों होतों व त्यांच्या माहितीसाठीं एक टिपणहि करून दिलें होतें. त्यास मंत्रिमंडळाची संमति होती. पुढें मंत्रिमंडळाच्या सभेंत नेहरूंनीं मला विचारलें. मी मंत्रिमंडळाच्या सभेंत मूळ वृत्तान्त वाचून दाखविला. त्यानंतर बांधकामाची प्रगति कशी होत गेली याचें साप्ताहिक खातेवार (वीकली नोट) टिपणांतून वाचून दाखविलें. मौलानाहि म्हणाले कीं, 'गाडगीळ म्हणतात तें बरोबर आहे.' जगजीवनरामाहि म्हणाले, 'मम.' मग पंडितजींच्या रागाचा समंध शांत झाला!

## राजेंद्रबाबूंची निष्ठा

पण त्यांनीं, निदान राष्ट्रपतींनीं प्राणप्रतिष्ठा करूं नये असा प्रयत्न केला. राजेंद्रबाबूंनीं सांगितलें कीं, 'मीं वचन दिलें आहे. मी वचन पुरें करीन. तुम्ही म्हणत असाल तर राष्ट्रपतिपदाचा राजीनामा देईन.' मी त्यांना दिलेल्या निवेदनांत अजमीरचे खाजासाहेबाचा दर्गा याला सरकार मदत करतें, तेथें राष्ट्रपति गेले होते आणि तेथें केव्हांहि निधर्मीपणाचा प्रश्न कोणी केला नाहीं. सरकार भारतांतील साऱ्या प्राचीन मशिदांना मदत करतें.

राज्य निधर्मी आहे, अधर्मी नाहीं व निधर्मी म्हणजे सर्वधर्मसहिष्णु होय.

परिणामतः नेहरू स्वस्थ बसले ! ( पाकिस्तानच्या पत्रांतून देऊळ भंग करण्याच्या घोषणा येतच होत्या व एका हिंदी पत्रानें लिहिलें कीं, ' नया गझनी आयेगा तो भारतमें नये गाडगीळ भी होंगे ! ' तात्पर्य कुठल्याहि प्रचारांना बळी न पडतां, राजेंद्रप्रसाद आले व प्राणप्रतिष्ठा झाली.

## मे महिन्यांतील तो सोहळा

प्रतिष्ठापना झाली, पण मंदिराचें काम पुरें व्हावयाचें होतें. येथून पुढील अडचण राजकीय विरोधाची नव्हती. व्यक्तिगत हट्टहि कुणाचा आडवा आला नाहीं. अडचण होती पैशाची ! १९६४ च्या मध्यापर्यंत मंदिर पुरें झालें. फक्त एक नृत्यगृह बांधावयाचें शिल्लक राहिलें. नृत्यगृह हा देवळाचा भाग नव्हे, ती देवळाची शोभा होय. त्याला आणखी १५ लाख रुपये लागणार आहेत म्हणून व बहुतेक ट्रस्टी सत्तरी ओलांडून गेले आहेत. तेव्हां देऊळ बांधण्याचा संकल्प पुरा झाल्यानें धार्मिकदृष्टया यज्ञ वगैरे करून व प्रसादाभिषेक, कलशप्रतिष्ठा आणि ध्वजारोपण करण्याचें आम्हीं ठरवलें. या वर्षाच्या जानेवारी महिन्यामध्यें जाम-साहेब यांची दृष्टि गेली आणि त्यांची इच्छा हा समारंभ पाहण्याची होती म्हणून मुहूर्त काढून वैशाख शुद्ध सप्तमीपासून वैशाख शुद्ध त्रयोदशीपर्यंत यज्ञयागादि पुरें करून १३ मे गुरुवार रोजीं १२ वाजून ३० मिनिटांनीं ध्वजारोपण पुरें करा-वयाचें असें ठरलें होतें. जामसाहेबांनीं मला पत्रानें व टेलिफोनवरून काय करावें असें विचारलें. मीं सांगितलें कीं, १३ मे १९६५ गुरुवार १२ वाजून ३० मि. नीं झेंडा उभारला जाईल व मी स्वतः हजर राहत आहे. त्यांना आनंद वाटला, हिंमत आली.

## मार्गांत नसतीं विघ्नें

इतर सर्व कामें बाजूला ठेवून १३ ला सकाळीं विमानानें निघालों व ११-४० ला केशोक विमानतळावर आलों. तेथून सोमनाथ ३१ मैल आहे आणि बरोबर १२-२० ला मी सोमनाथला पोंचेन अशी खात्री होती. विमान वेळेवर आलें, पण तीन पौंड वजनाची बॅग विमानांतून माझ्या हातीं येईपर्यंत २० मिनिटें गेलीं ! १२ ला निघालों. वाटेंत दोन ठिकाणीं रेल्वेचीं फाटकें बंद होतीं, पण तींहि ताबडतोब उघडण्यांत आलीं. गाडी जोरानें चालू होती. माझें लक्ष घड्याळाकडे होतें. ३ वर्षांनीं मी सोमनाथला जात होतों. सारा भोंवतालचा सोरट प्रदेश काळ्याभोर जमिनीचा आतां केळींनीं बहरलेल

होता. सारेच गुजराथी व्यापारी दृष्टीचे आणि त्या दृष्टीनें शेतकरीहि बाजरी न पिकवितां केळीच्या घडासाठीं प्रयत्नांची रास ओतीत होते! मैलांमागून मैल जात होते आणि माझें मन १२–३० पर्यंत आपण पोहोंचूं अशी ग्वाही देत नव्हतें. गाडींत सोमनाथ ट्रस्ट मिळकतीचा व्यवस्थापक होता. त्यानें सारथ्यास ' टॉप गिअर ' मध्यें गाडी चालविण्यास सांगितलें. त्याला रस्त्याची माहिती होती म्हणून त्यानें तसें फारसें केलें नाहीं. माझें मन मात्र शरीराआधींच मंदिरांत दाखल झालें होतें.

## जय सोमनाथचा जयघोष

वेरावळला बाजारांतून गाडी किंचित् मंद गतीनें न्यावी लागली. खाडीचा पूल ओलांडला आणि मग मंदिर अवघें चार मैलांवर राहिलें. किल्ल्याजवळील वळणावर आम्ही आलों. मंदिर मैलभर होतें आणि एवढ्यांत ' जय सोमनाथ 'चा प्रचंड घोष कर्णपथावर आला. मन किंचित् खिन्न झालें, किंचित् उदास झालें. एक नोव्हेंबर १९४७ रोजीं भारत सरकारतर्फे दिलेलें आश्वासन आतां पूर्ण झालें होतें. हा अर्थ, हा आशय, हा आनंद त्या गगनभेदी आरोळ्यांतून अभिप्रेत होता! बरोबर १२–३५ मिनिटांनीं गर्दीतून मोटारीनें मला मंदिराच्या आवाराच्या फाटकाजवळ आणलें. सारें आवार माणसांनीं फुललें होतें. कार्यक्रमांतील पूर्णाहुति-वसोर्धारा समारंभ सुरू झाला होता आणि तो आणखी तासभर चालावयाचा होता. मग हळूहळू गर्दीतून जिथें पूर्णाहुति चालली होती त्या मांडवापर्यंत गेलों. आणि इतके पाय भाजले कीं, फोड आले. मनानें म्हटलें कीं, कांहीं पाप केलें असेल त्याचें हें प्रायश्चित्त मिळत आहे. गर्दीमुळें पळत जाण शक्य नव्हतें. सावकाश चालणें म्हणजे निखाऱ्यावर चालण्यासारखें होतें. शुद्ध मनाची शुद्धि होत होती आणि सुमारें दोन मिनिटें ही पदयात्रा करून मी त्या मंडपाशीं आलों.

## दौलतीचें दान

महापूर्णाहुतीचें काम चालूच होतें. वेदमूर्ति ब्राह्मणांनीं कुंकुमतिलक व अक्षता लावल्या. सारें राजघराणें हजर होतें, आणि दोन वाजतां पूर्णाहुति संपली. ' महानिरंजना ' म्हणजे महाआरती झाली आणि तारीख ९ पासून सुरू झालेला हा धार्मिक कार्यक्रम तारीख तेराला दोन वाजतां संपला! जामसाहेब आले होते. महाराणीसाहेब व त्यांच्या मुली आल्या होत्या. महाराणीनें जामसाहेबांना

विचारलें कीं, ' मी देवालयाला देणगी देऊं इच्छितें. ' त्यांनीं सांगितलें कीं, ' गाडगीळांना विचारा. ' त्यांनीं विचारलें, विश्वस्त मंडळातर्फें मीं मान्य केलें आणि मग बरोबर आणलेली मखमली पेटी उघडून मोती, माणिक-हिरे यांचे अलंकार पार्वतीसाठीं त्यांनीं दान दिले. त्यांची किंमत एक लाख रुपये होती आणि वर कांहीं तरी द्यावें म्हणून शंभर–शंभराच्या अकरा नोटा त्यांनीं दिल्या. मंदिराच्या निर्माणाची घोषणा झाली, त्या वेळीं एक लाख एक हजाराची देणगी जामसाहेबांनीं दिली होती आणि आज मंदिर पूर्ण झालें त्या वेळीं त्यांच्या धर्मपत्नी महाराणी साहेबांनीं एक लक्ष एक हजाराची रक्कम दिली होती. हजार वर्षांपूर्वी गझनीनें याच ठिकाणीं मूर्ति भग्न करून तिची दौलत लुटून नेली आणि याच ठिकाणीं जामनगरच्या राजाराणींनीं त्याला संपत्तीचें दान केलें. संपत्ति ही तटस्थ असते. ती चांगली कीं वाईट हें तिचा उपयोग करणाऱ्या माणसाच्या हेतूवर अवलंबून असतें. पुन्हा एकदां दर्शन घेतलें आणि पुन्हा येणें घडेल कीं नाहीं असाहि विचार मनांत आला आणि आम्ही सर्व देवळाबाहेर पडलों !

दुसरे दिवशीं सकाळीं राजकोटला गेलों व तेथून विमानानें संध्याकाळीं पुण्यास परत आलों. साऱ्या प्रवासांत ' जय सोमनाथ ' हाच आवाज विमानाच्या घरघरणाऱ्या आवाजाला न जुमानतां मुखवीत होता.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८३६२
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
९८३६२ २९२४ ५/३/६९

REFBK-0014382



किंमत ५ रुपये

**राजकारणांत भाग घेणाऱ्यांनीं अवश्य**

**[illegible]ाचावे असे**

**श्री. न. [illegible] काकासाहेब गाडगीळ**

**[illegible]र्वमान्य ग्रंथ**

| | | |
|---|---|---|
| (१) | ग्यानबाचें अर्थशास्त्र | रु. ६ |
| (२) | कायदेमंडळांतील सहा वर्षें | रु. ४ |
| (३) | राज्य-शास्त्र-विचार | रु. ८ |
| (४) | राज्य-व्यवहार-विचार | रु. ८ |
| (५) | राज्य-कारभार-विचार | रु. १० |
| (६) | सभाशास्त्र | रु. ६ |
| (७) | हिंदी अंदाजपत्रकें भाग १ | रु. ८ |
| (८) | घटनाप्रबोधिनी | रु. ८ |
| (९) | सालगुदस्त | रु. ५ |
| (१०) | विधिशास्त्रविचार | रु. १० |
| (११) | लाल किल्ल्याच्या छायेंत | रु. १० |